# वीरशैव समाजाचा सांस्कृतिक इतिहास

**प्रा. डॉ. सोमनाथ गुंजकर**
एम.ए., बी.एड., सेट, पीएच.डी.
श्री गुरु बुद्धिस्वामी महाविद्यालय, पूर्णा
ता. पूर्णा जि. परभणी

**प्रवर्तन पब्लिकेशन, लातूर**

ISBN- 978-93-84572-38-9

वीरशैव समाजाचा सांस्कृतिक इतिहास
Veershaiva Samajacha Sanskratik Itihas

**प्रा. डॉ. सोमनाथ गुंजकर**
मो. नं. ९५९५३५३०३९

**सर्व हक्क**
© लेखक

**प्रकाशक**
प्रवर्तन पब्लिकेशन, लातूर

**प्रथम आवृत्ती**
१५ ऑगस्ट, २०१८

**मुखपृष्ठ**
संतोष घोंगडे

**अक्षरजुळणी**
अक्षरवेध बुक क्रिएशन,
आनंदनगर, नांदेड.

**मुद्रक**
रुद्रायणी ऑफसेट, औरंगाबाद.

**किंमत** : ₹ ३२१/-

# प्रस्तावना

आमचे विद्यार्थी प्रा. डॉ. सोमनाथ गुंजकर, श्री गुरु बुद्धिस्वामी महाविद्यालय, पूर्णा यांनी 'वीरशैव' समाजाचा सांस्कृतिक इतिहास या ग्रंथाची निर्मिती करुन वीरशैव लिंगायत समाजाचा इतिहास प्रकाशात आणण्याचा प्रयत्न केला आहे. प्रा. डॉ. सोमनाथ गुंजकर यांनी या ग्रंथाची पाच प्रकरणात विभागणी केली आहे. त्यामध्ये १) वीरशैव समाजाचे सामाजिक जीवन २) वीरशैव समाजाचे धार्मिक जीवन ३) वीरशैव समाजाचे आर्थिक जीवन ४) वीरशैव समाजाचे राजकीय जीवन ५) वीरशैव समाजाची मठपरंपरा या क्रमाने विषयाची शिस्तबद्ध व सूत्रबद्ध रितीने मांडणी केली आहे. लेखकाने हा ग्रंथ प्रसिद्ध करुन अभ्यासकांना व समाज बांधवांना हे साहित्य उपलब्ध करुन दिले आहे. या ग्रंथात वीरशैवांची प्राचीन इतिहासाची उज्ज्वल परंपरा चित्रित केली आहे. वीरशैवांच्या महाराष्ट्रातील ऐतिहासिक व सांस्कृतिक वाटचालीत नांदेड जिल्ह्याचा वैशिष्ट्यपूर्ण वाटा आहे. वीरशैवांची लोकसंख्या बऱ्यापैकी आहे. वीरशैव मताचा पुरस्कार करणाऱ्या विविध संघटना व कार्यकर्ते कार्यरत आहेत. वीरशैवांचे सामाजिक, धार्मिक, आर्थिक आणि राजकीय जीवनाचे विविध पैलू समजून घेण्यास या ग्रंथाचे महत्त्व असणार अहे. तसेच वीरशैव समाजातील मठपरंपरा समजून घेण्यातही प्रा. डॉ. सोमनाथ गुंजकर यांच्या ग्रंथाचे अनमोल स्थान असणार आहे.

डॉ. गुंजकर यांनी एकीकडे आपल्या ग्रंथात वीरशैवाचे तत्त्वज्ञान आणि वीरशैवांची उपासना परंपरा यांची अभ्यासपूर्ण मांडणी केली आहे. तसेच वीरशैव समाजातील गर्भधान संस्कार, जातकर्म संस्कार, नामकरण संस्कार, दीक्षाविधी, लग्नविधी, पूजाविधी, दफन संस्कार इत्यादी बाबत सविस्तर माहिती देवून त्यांचे वेगळेपण स्पष्ट केले आहे. वीरशैव समाजावर असलेल्या महात्मा बसवेश्वर आणि मन्मथ स्वामीच्या प्रभावाचा विशेषत्वाने उल्लेख केला आहे. हे दोन्ही महान विभूती वीरशैवांचे श्रद्धास्थान व मार्गदर्शक दीपस्तंभ आहेत. महात्मा बसवेश्वर हे खऱ्या अर्थाने तथागत गौतम बुद्धानंतर समतेचे कट्टर पुरस्कर्ते आहेत. मध्ययुगीन भारताच्या इतिहासात महात्मा बसवेश्वराएवढा समतेचा दुसरा प्रवक्ता आपणास पहावयास मिळत नाही. लेखकाने आपल्या ग्रंथात वीरशैव आणि लिंगायत एकच असल्याचे मत व्यक्त केले आहे. अर्थात पंचाचार्यवादी व बसवेश्वरवादी अनुयायी या मतावर एकत्र येतात काय ? हाच समाजापुढील खरा प्रश्न आहे. महात्मा बसवेश्वरांच्या विचारातील कायक, दासोह, स्त्री-पुरुष समानता,

सदाचार हा स्वर्ग, देवालयापेक्षा देहालय श्रेष्ठ या सर्व कल्पना काळाला अनुरुप अशा वाटतात. या विचारांना साक्षी ठेवून वीरशैव समाजाची भावी वाटचाल व्हावी असे वाटते. लेखकाने नांदेड जिल्ह्यातील मठ परंपरेचा आढावा घेतला आहे. मठ संस्थाने केवळ गादीचा वारसा चालविणारी केंद्रे न ठरता ती समाजाला नैतिकतेचे, सदाचाराचे, लोककल्याणाचे धडे देणारी केंद्र व्हावीत असे वाटते. भक्तगणाला डोळस, विवेकी नी विज्ञाननिष्ठ बनविण्याचे महान कार्य मठाच्या माध्यमातून व्हावे असे सूचवावे वाटते. वीरशैव समाजाला समृद्ध राजकीय वारसा मिळाला नाही याची खंत लेखकाने व्यक्त केली आहे. आजच्या राजकीय जीवनात जात, पैसा, गुंडगिरी यांना महत्त्वपूर्ण स्थान असल्यामुळे आणि वीरशैवांची ती मानसिकता नसल्यामुळे राजकीय क्षेत्रात वीरशैवांची उपेक्षाच होणार हे कायम लक्षात ठेवले पाहिजे. त्यासाठी वीरशैवांनी अन्य क्षेत्रात आपली चुणूक दाखवावी. प्रा. गुंजकर यांनी केलेल्या महत्त्वपूर्ण शिफारशीवर समाजधुरीणांनी विचार करावा. समाजाच्या सर्व कार्यात एकवाक्यता आली तर समाजाच्या एकूण कार्याला चालना मिळते. अर्थात त्यांनी केलेल्या काही शिफारशीचा फेरविचार करण्याची आवश्यकता आहे. तेव्हा प्रा. डॉ. सोमनाथ गुंजकर यांनी वीरशैवांच्या सांस्कृतिक वाटचालीचा एक उत्तम दस्तऐवज या ग्रंथाच्या माध्यमातून परिश्रमपूर्वक व अभ्यासपूर्ण रितीने तयार केला आहे. त्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन !

**प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे**

मा. अध्यक्ष मराठवाडा इतिहास परिषद

# अभिप्राय

समाज परीवर्तन घडवून आणायचे असेल तर समाजातील प्रत्येक व्यक्तीने सकारात्मकरित्या बदलले पाहिजे. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनामध्ये धर्माला अतिशय महत्त्व आहे. धार्मिक प्रसंग हे आत्ममांगल्य आणि लोकमांगल्याचे समर्थक, पोषक, प्रचारक आणि संरक्षक असतात. समाजाची पूजागृहे, उपासनागृहे, मंदिरे, गुरुद्वारे, त्या त्या व्यक्तीच्या जीवनाच्या आत्मशांतीची केंद्रे असतात. प्रा. डॉ. सोमनाथ गुंजकर यांनी 'वीरशैव समाजाचा सांस्कृतिक इतिहास' या ग्रंथातून वीरशैव समाजाच्या मठपरंपरेची माहिती सविस्तर लिखित केली आहे. समाजाच्या उभारणीमध्ये मठाची भूमिका त्यांनी अतिशय सुत्रबद्ध पद्धतीने मांडणी केली आहे.

**पिठाधीपती सद्‌गुरु डॉ. नंदिकेश्वर**

**(लासिनेश्वर)**

शिवाचार्य मठसंस्थान, लक्ष्मीवन, लासिना पूर्णा (ज.)

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

मानव हा समाजशील प्राणी असल्यामुळे तो समाजाशिवाय एकटा राहु शकत नाही. समाज हा सतत बदलत असतो. बदल हा समाजाच्या दृष्टीकोनातून महत्त्वाचा असतो. समाजाच्या विकासाला चालना मिळण्यासाठी मानवतावादी विचारांची पेरणी होणे गरजेचे आहे. समाजाच्या समस्या सोडवून समाजात एका विचाराची रुजवण करण्याचे काम संघटना करत असतात. संघटना ही व्यक्तीला संघटन करुन त्यांच्या विचाराला एक प्रकारचे विचारपीठ निर्माण होत असते. प्रा. डॉ. सोमनाथ गुंजकर यांनी 'वीरशैव समाजाचा सांस्कृतिक इतिहास' ह्या ग्रंथाच्या माध्यमातून वीरशैव समाजाच्या सामाजिक, धार्मिक, राजकीय, आर्थिक विचारांची पेरणी केली आहे.

**श्री राजेंद्रअप्पा विश्वनाथअप्पा हुरणे**

अध्यक्ष : महाराष्ट्र वीरशैव सभा जिल्हा शाखा नांदेड

## अभिप्राय

आर्थिक संपन्नता समाजाचा आधारस्तंभ असतो. ज्या समाजाचा आर्थिक विकास जास्त त्या समाजाचा अर्थव्यवस्थेवर प्रभाव दिसून येतो. आर्थिक संपन्नतेतुनच समृद्ध समाजाचाी निर्मिती होत असते. 'वीरशैव समाजाचा सांस्कृतिक इतिहास या ग्रंथातून प्रा. डॉ. सोमनाथ गुंजकर यांनी वीरशैव लिंगायत समाजातील आर्थिक, सामाजिक, धार्मिक, राजकिय जीवनाची माहिती अत्यंत सोप्या भाषेत दिली आहे. वीरशैव लिंगायत समाजाच्या संस्कृती, तत्त्वज्ञानाचे, आचाराचे चित्रण या ग्रंथाच्या माध्यमातून करण्यात आले आहे. वीरशैव लिंगायत समाजाबद्दल माहिती मिळण्यास ग्रंथाचा निश्चित फायदा होईल....!'

**श्री सितारामअप्पा एकलारे**
कार्याध्यक्ष, श्री गुरु बुद्धिस्वामी
शिक्षण प्रसारक संस्था, पूर्णा (जं.)

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

प्रा. डॉ. सोमनाथ गुंजकर यांनी 'वीरशैव समाजाचा सांस्कृतिक इतिहास' या ग्रंथात वीरशैव समाजाच्या सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय जीवनाचे वर्णन ग्रंथातून साकार केले आहे. वीरशैव समाजाच्या संघटना, कयक व दासोह, मठपंरपरेची सविस्तर माहिती संकलित करुन उत्कृष्ट ग्रंथसाधन निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. त्यांच्या पुढील कार्यास शुभेच्छा....!

**श्री उत्तमरावजी कदम**
सचिव, श्री गुरु बुद्धिस्वामी शिक्षण प्रसारक
संस्था, पूर्णा (जं.) जि. परभणी

## अभिप्राय

'वीरशैव समाजाचा सांस्कृतिक इतिहास' या ग्रंथातून प्रा. डॉ. सोमनाथ गुंजकर यांनी वीरशैव समाजातील अष्टावरण, पंचाचार, षट्स्थल, तत्त्वज्ञान यांचे अतिशय चांगल्या प्रकारे चित्रण केले आहे. त्याचबरोबर महात्मा बसवेश्वर यांच्या कार्याची थोडक्यात माहिती सांगितली आहे. महात्मा बसवेश्वरांनी स्थापन केलेल्या अनुभवमंटपाचे राजकीय जीवनातील विचार स्पष्ट केले आहेत. वीरशैव समाजाचा आरसा म्हणून कार्य करील. त्यांच्या पुढील कार्यास शुभेच्छा....!

**श्री भुजंगरावजी कदम**
जेष्ठ संचालक, श्री गुरु बुद्धिस्वामी शिक्षण प्रसारक
संस्था, पूर्णा (जं.) जि. परभणी

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

'वीरशैव समाजाचा सांस्कृतिक इतिहास' या ग्रंथातून प्रा. डॉ. सोमनाथ गुंजकर यांनी वीरशैव समाज व्यवस्था, राहणीमान, आहार, संस्कृती, स्त्रियांचा दर्जा, संस्कार यांची पुरेपुर माहिती ग्रंथामध्ये संकलन करण्यात आले आहे. वीरशैव समाजामध्ये पंचाचार्य, पंचपीठे, मठ यांचे सविस्तर चित्रण या ग्रंथाच्या माध्यमातून करण्याचा प्रयत्न प्रा. डॉ. गुंजकर यांनी केला आहे.

**श्री साहेबरावजी कदम**
जेष्ठ संचालक, श्री गुरु बुद्धिस्वामी शिक्षण प्रसारक
संस्था, पूर्णा (जं.) जि. परभणी

## मनोगत

समाजातील सामाजिक, भौगोलिक सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय परिस्थितीचे मानवी जीवनावर दुरगामी परिणाम होत असतात. स्थानिक संस्कृतीमध्ये तेथील समाज जीवनाची प्रतिमा निर्माण झालेली दिसून येते. ज्या नैसर्गिक भागामध्ये जी भौतिक संस्कृती नांदत असते त्यातील भूतकाळाच्या गोष्टी ऐतिहासिक संस्कृतीच्या सानिध्यातून वर्तमान काळात समोर येत असतात. त्यामध्ये लोकांचा विश्वास, लोककथा, लोकगीत, राहणीमान चालीरीती, व्यवहार, विचारधारा, तत्त्वज्ञान या बाबीचा समावेश असतो. कोणत्याही समाजाच्या संस्कृतीचा सांस्कृतिक वारसा हा ऐक्याचा घटक असतो. प्रत्येक व्यक्ती, समाज, ग्राम, जनपद, नगर, प्रदेश या प्रत्येकाचे कार्य संस्कृतीच्या जोपासनेत अलौकिक असे योगदान असते. समाज संस्कृतीच्या जोपासनेतून एक सृजनशील समाज घडण्यास मदत होते. वीरशैव समाजाच्या तत्त्वज्ञानाचा उपयोग जनसामान्याला होऊन एक आदर्श समाजव्यवस्था निर्माण होण्यास मदत होईल. ज्या समाजात आपण राहतो त्या समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो या जाणीवेतून 'वीरशैव समाजाचा सांस्कृतिक इतिहास' या ग्रंथाची निर्मिती झाली आहे.

या ग्रंथामध्ये वीरशैव समाजातील सामाजिक, धार्मिक, राजकीय, आर्थिक जीवनाचे वर्णन करण्यात आले आहे. त्याच बरोबर वीरशैव लिंगायत समाजाचे संस्कार केंद्र मठाची माहिती समाविष्ट करण्यात आली आहे. कोणत्याही समाजाच्या भूतकालीन संस्काराचे वर्तमान कालीन इच्छेवर आणि भविष्यकालीन संकल्पावर समाजाची वाटचाल चालू असते. प्रत्येक मुनष्याच्या इच्छा, आकांक्षा, स्वप्न भिन्न असतात. त्याचा परिणाम समाजावर होत असतो. समाजिक, धार्मिक, आर्थिक विषमता नष्ट करण्यासाठी वीरशैव समाजाचे तत्त्वज्ञान अत्यंत महत्त्वाचे आहे. समाजामध्ये उच्च-निच्च, श्रीमंत-गरीब असा भेदभाव न करता सर्वांना समानतेची व मानवतावादी विचाराची प्रेरणा मिळणे खूप गरजेचे आहे. हे विचार वीरशैव लिंगायत समाजाच्या तत्त्वज्ञानामध्ये आहे. इष्टलिंगपूजा, अनुभवमंटप, अष्टावरणे, पंचाचार, षट्स्थल या विचाराची पेरणी समाजातील सर्व समाजबांधवांना समानतेची वागणूक देण्याचे कार्य करते. ग्रंथाची निर्मिती करत असताना प्रत्यक्ष अप्रत्यक्ष अनेक मान्यवरांचे सहकार्य लाभले. त्यामध्ये श्री गुरु बुद्धिस्वामी शिक्षण संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष श्री १०८ डॉ. नंदिकेश्वर शिवाचार्य कार्याध्यक्ष श्री सितारामअप्पा एकलारे, सचिव श्री उत्तमरावजी कदम, कोषाध्यक्ष श्री गोविंदराव कदम, सहसचिव श्री अमृतराज कदम, जेष्ठ संचालक श्री भुजंगरावजी कदम, श्री साहेबरावजी कदम, डॉ. दत्तात्रय वाघमारे, माजी प्राचार्य मनोहर सोनटक्के, संचालक प्रमोदअप्पा एकलारे ह्या सर्वांचे कृपाशीर्वाद लाभले. ग्रंथ निर्माण करण्यासाठी ज्यांची प्रेरणा मिळाली माझे मार्गदर्शक डॉ. विजया साखरे त्याचबरोबर श्री गुरु बुद्धिस्वामी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. राजकुमार, उपप्राचार्य डॉ. जितेंद्र पुल्ले, डॉ. आदिनाथ इंगोले, डॉ. विळेगावे, डॉ. बुरटे, प्रा. डॉ. रामेश्वर पवार, डॉ. भुताळे, डॉ. बिरादार यांचेही मोलाचे सहकार्य लाभले.

प्रा. डॉ. शिवसांब कापसे, प्रा. डॉ. संजय दळवी, प्रा. डॉ. रवी बरडे, प्रा. डॉ. गजानन कुरुंदकर, प्रा. डॉ. शेटे, प्रा. कानडे, प्रा. डॉ. चांडोळे, प्रा. डॉ. भांगे, प्रा. कुऱ्हे, डॉ. कापुरे, प्रा. शेख, प्रा. डॉ. राख, प्रा. मुसळे, प्रा. डॉ. विजय पवार, डॉ. राजीव यशवंते, प्रा. शिंदे, प्रा. थगनर, प्रा. चाकोते, प्रा. मिटकरी, प्रा. डावरे, प्रा. शेजुळ, प्रा. कदम, प्रा. पंडित त्याचबरोबर श्री अरुण डुबेवार, बाळासाहेब कुलकर्णी, गिरिष शिवणकर, प्रभू भालेराव, वसंतराव कदम, देवणे, वानोळे, अशोकराव कदम यांचे सहकार्य लाभले. या ग्रंथाला प्राचार्य डॉ. रोडे सोमनाथ यांनी प्रस्तावना देऊन सहकार्य केले. त्याचबरोबर भाऊजी व ताई श्री साईनाथ चंदापुरे, सविता चंदापुरे, पुजा चंदापुरे, पवन चंदापुरे, महेश आंबेगावकर, आई-वडिल, भाऊ सदाशिव, बालाजी व त्यांचे कुटुंब यांचेही सहकार्य लाभले. प्रा. डॉ. वैजनाथ गंदगे, वैभव व वैष्णवी, श्री शशिकांत गोरशेट्टे, शिवदासअप्पा महाजन, डॉ. भारत कचरे, संजय मठपती, विजय मुखेडे, डॉ. पराग साले, डॉ. जळबा हाटकर, अतुल रांदड व डॉ. संजीवकुमार पांचाळ यांचेही सहकार्य लाभले.

**- प्रा.डॉ. सोमनाथ गुंजकर**

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरणाचे नाव | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | वीरशैव समाजाचे सामाजिक जीवन | ११ |
| २. | वीरशैव समाजाचे धार्मिक जीवन | ४० |
| ३. | वीरशैव समाजाचे आर्थिक जीवन | ९९ |
| ४. | वीरशैव समाजाचे राजकीय जीवन | १३६ |
| ५. | वीरशैव समाजाची मठ परंपरा | १५३ |




# १. वीरशैव समाजाचे सामाजिक जीवन

भारतीय संस्कृतीचा अभ्यास करत असताना प्रत्येक व्यक्ती, समाज, ग्राम, नगर, स्थानिक प्रदेशाचे कार्य संस्कृतीच्या जोपासनेत अलौकिक योगदान असते. याचेच एक उदाहरण म्हणून प्राचीन परंपरेचा वारसा लाभलेले एक ग्राम म्हणजे नंदीग्राम होय. गोदावरी नदीच्या पावन स्पर्शाने पवित्र झालेले ग्राम आज नांदेड म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्राच्या दक्षिण टोकाला तेलगंणा राज्याच्या सीमेलगत लातूर, परभणी, हिंगोली जिल्ह्याचा केंद्र बिंदू आहे. नांदेड या शहराच्या नावाला प्राचीन वारसा आहे. 'नंदीतट' या शब्दापासून नांदेड हे नावरुपाला आले. 'नंदी' म्हणजे भगवान श्री शंकराचे वाहन आणि 'तट' म्हणजे पवित्र गोदवरी नदीचा 'काठ' होय. भगवान शंकराच्या नंदीने पावन झालेल्या नांदेड जिल्ह्याला पवित्र शिवोपासनेचे केंद्रबिंदू मानण्यात येते. म्हणूनच या ग्रामला नंदीग्राम, नंदीकड, नंदीयाड, नंदीतट, नांदेय, नंदवासी, नांदीयाडी अशा अनेक ऐतिहासिक नावाचे पुरावे मिळाले आहेत. परंतू सर्व नावामध्ये नंदी हा शब्द समान आहे. यावरून ह्या शहराला प्राचीनतेचा वारसा आहे. आद्य संस्कृती म्हणून शिवसंस्कृती समजली जाते. शिवाचे उपासक असणाऱ्या लोकांची संख्या मोठ्या प्रमाणात नांदेड जिल्ह्यात आहे. शिव हे आद्य भारतीय दैवत आहे. त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील वीरशैव समाजालाही प्राचीन वारसा लाभला आहे. गोदावरी नदीच्या काठावर तसेच अनेक नद्यांच्या भू-प्रदेशात वीरशैव लिंगायत समाजाचा विकास झाला आहे. नांदेड येथील प्रसिद्ध संस्कृत पंडीत मयुरेश्वर शास्त्री यांनी नांदेड क्षेत्र व गोदावरी महात्म्य यावर आधारित 'नदीतट विजय' हा ग्रंथ लिहीला. यामध्ये त्यांनी नांदेडचे नाव पूर्वी 'पुण्योदय' असून महादेवाचे वाहन नंदी या क्षेत्री आला म्हणून या परिसराचे नाव 'नंदीतट' पडले आहे. आजचे नांदेड म्हणजे प्राचीन काळचे 'नवनंदडेरा' होय.

## १.१ नांदेडचा ऐतिहासिक वारसा

महाराष्ट्र राज्याच्या दक्षिण टोकाला तेलंगणा राज्याच्या सीमेलगत नांदेड

जिल्हा वसलेला आहे. 'नांदेड' या नावाचा उगम 'नंदीतट' या शब्दामधून झालेला असून 'नंदी' म्हणजे भगवान श्री शंकराचे वाहन आहे. 'तट' म्हणजे पवित्र गोदावरी नदीचा काठ होय. वीरशैव समाज हा शिवाला आपला आराध्य दैवत मानतो व नंदीला नेहमी पूजतो त्यामुळे वीरशैव लिंगायत समाजाचा प्राचीन वारसा नांदेड जिल्ह्याला लाभला आहे. इ.स.पूर्व सहाव्या शतकाच्या सुमारास महाराष्ट्रातील विविध प्रदेशात अश्मक, कुंतल, मुलक, अपरांत या प्रदेशाचा उल्लेख आहे. नांदेडच्या भोवतालचा प्रदेश त्याकाळी विदर्भात होता. या भागाची दक्षिण सीमा गोदावरी नदी होती. त्यामुळेच नांदीतट, नंदिकड या शब्दापासून नांदेडची उत्पत्ती झाली असेही काही तज्ञाचे म्हणणे आहे. राजकीयदृष्ट्या नांदेडला अतिशय महत्त्व होते. नांदेडच्या परिसरात सातवाहन, वाकाटक, बदामीचे चालुक्य घराण्यांनी नांदेडच्या वैभवात भर घातलेली आहे नांदेड परिसराचे भाग्य राष्ट्रकुटाच्या काळात उजळलेले आहे. राष्ट्रकुट राज्यांनीच नांदेड जिल्ह्यातील 'कंधारपूर' आताचे 'कंधार' या शहराला राजधानीचा दर्जा दिला होता. यादवाच्या काळातही नांदेड जिल्ह्याचा विकास झालेला दिसून येतो. इ.स.१३१८ मध्ये यादवाचे राज्य कायमचे बुडाले व महाराष्ट्रात मुसलमानी सत्तेचा अमल सुरू झाला. इसवी सनाच्या तेराव्या शतकापर्यंतचा मराठवाड्याचा परिसर म्हणजे महाराष्ट्रातील गोदाखोरे संपन्न व राजसत्तांचे माहेरघर होते. पाचव्या शतकापासून अश्मक आणि मुलक हे दोन्ही महाजनपदे या परिसरात होती. त्यानंतर सातवाहन, वाकाटक, पूर्वचालुक्य, राष्ट्रकुट, उत्तरचालुक्य, यादव, शिलाहार, कलचुरी या राजसत्तांचा कालखंड नांदेड जिल्ह्याला लाभला. इ.स.१३४६ साली दिल्लीच्या राजकीय हालचाली सुरू झाल्या. दिल्लीचे अनेक सुभ्यामध्ये रूपांतर झाले. त्याकाळी नांदेडचा समावेश वऱ्हाड अणि बिदर तरफेत झाला. सफदरखान सिस्तानी हा या प्रांताचा सुभेदार झाला. गोंड हे दख्खनच्या पठारावरील खरे राजे होते. नांदेड जिल्ह्यातील खेरला गोंड राजा नरसिंगदेव हा सुद्धा बहमनी सुलतानला सोबत लढला. नांदेड जिल्ह्यातील कंधारचा किल्ला हा कासीम बरीदचा प्रमुख लष्करी ठाणे बनला. इ.स.१५२६ साली बाबर सत्तेवर चालुन आला व मोगलांची सत्ता स्थापन झाली. काही दिवसानंतर अहमदनगरच्या निजामशाहीत समाविष्ट



असलेला वऱ्हाड सुभा आणि नांदेड जिल्हा इ.स.१५९६ मध्ये मुघलांच्या राज्यात मुस्लिम सलतनीचा संघर्ष संपून नांदेड जिल्हा पुन्हा दिल्लीच्या अधिपत्त्याखाली आला. सतराव्या शतकातील नांदेड जिल्ह्याचा इतिहास म्हणजे अहमदनगरची निजामशाही आणि मुघल संघर्षाची गाथा होती. दौलताबाद व कंधारसारखी महत्त्वाची ठाणे मोगलाच्या क्षेत्रात होती. आदिलशाही व कुतुबशाहीचा पाडाव केल्यानंतर अठराव्या शतकापर्यंत मुघल आणि मराठा सत्ता संघर्ष सुरूच राहिला. अशा प्राचीन वारसेतून नांदेड जिल्ह्याचा विकास होत गेला.निजाम प्रांत व गुरू गोविंदसिंहची भेट हे नांदेड जिल्ह्याच्या इतिहासाला कलाटणी देणारे ठरले. नांदेड हा मराठवाडा विभागातील ऐतिहासिक जिल्हा आहे. पवित्र गोदावरी नदीवरील नांदेड जिल्हा मध्यवर्ती क्षेत्र असल्याने त्यास गोदावरी नदीचे नाभिस्थान मानले जाते. श्री गुरु गोविंदसिंहजी सारख्या लढवय्या गुरुच्या पदस्पर्शाने ही भूमी पावन झालेली असून शहरास शिखांची काशी म्हटले जाते. त्यामुळेच नांदेडला 'पवित्र तीर्थक्षेत्राचे महत्त्व प्राप्त झाले आहे.'

देशाच्या सांस्कृतिक विकासात भौगोलिक परिस्थितीला फार महत्त्व आहे. पर्यावरणातील बदलाचा व्यक्तीच्या जीवनावर परिणाम होत असतो. देशाची भौगोलिकता व बदलते हवामान यांचा मानवी जीवनावर दुरगामी प्रभाव पडतो. मानवी शरीरास पोषक द्रव्य रक्तवाहिन्या पुरवित असतात त्याचप्रमाणे भौगोलिक सृष्टीचा बदल नद्या करत असतात. नद्या ह्या रक्तवाहिन्यासारखे काम करतात. दक्षिण पठारावर असलेल्या कर्नाटक, तेलंगणा या वेगवेगळ्या भिन्न भाषिक राज्याचा प्रभाव नांदेड जिल्ह्यावर पडला आहे. दक्षिणेकडील व उत्तरेकडील काही भाग वगळता नांदेड जिल्ह्याचा भाग सपाट व सुपीक आहे. नांदेड जिल्हा दक्षिण महाराष्ट्राच्या पठारावर वसलेला आहे. जिल्ह्याच्या दक्षिणेकडील भाग हलक्या व माळरान जमिनीने व्यापला आहे. जिल्ह्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्राच्या ११.२५% वनक्षेत्र आहे. त्यापैकी सर्वात जास्त ५२% वनक्षेत्र एकट्या किनवट तालुक्याने व्यापले आहे. जिल्ह्याचे मुख्यालय नांदेड असून केंद्र व राज्य शासनाचे व इतर अनेक कार्यालये नांदेड ठिकाणी आहेत. नांदेड जिल्हा ऐतिहासिकवारसे बरोबरच आज शिक्षणाचे माहेरघर बनत आहे. शिक्षणाची द्वारे खोलण्यासाठी शासनाने १७

सप्टेबर १९९४ रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाची स्थापना केली. या विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामध्ये नांदेड, लातूर, हिंगोली, परभणी चार जिल्ह्याच्या शिक्षणाचा प्रसार विद्यापीठाअंतर्गत असून लातूर व परभणी हे दोन उपकेंद्र सुरु करण्यात आले आहेत. नांदेड शहराजवळ देशातील सर्वात मोठा उपसा सिंचन प्रकल्प शंकरराव चव्हाण यांच्या प्रयत्नातून साकार करण्यात आला असून नांदेड शहराबरोबरच आसपासच्या परिसरातील लोकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटलेला आहे.

### १.३ नांदेड जिल्ह्यातील वीरशैव समाजाची ऐतिहासिकता

एकंदरीत व्यक्ती, कुटुंब, समाज यांचा प्रत्यक्ष नि अन्योन्य संबंध असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे कोणत्याही समाजाचा इतिहास पाहताना त्यांचा अभ्यास करणे गरजेचे आहे. भारतीय समाज, संस्कृती, तत्वज्ञान आणि भारतीय जीवनपद्धती नीटपणे समजून घेण्यासाठी भारतातील विविध धर्माचा अभ्यास करावा लागतो.

'त्रैलोक्यसंपदालेख्यसुमुल्लेखन भित्ये।
सच्चिदानंदरुपाय शिवाय ब्रम्हणे नमः'।।

पलसिद्ध यांनी म्हटले आहे की, "सद्‌भक्तांनो, तुम्ही सर्व शिवभक्त आहात. वीरवृत्तीनं आचारधर्माचं पालन करणारे वीरशैव आहात. शिव हे आपले आराध्य दैवत आहे. पण शिव एकटा नाही. अविना-भाव संबंधान शक्ती त्यांच्याशी एकरुप होऊन राहते. ही सर्व सृष्टी म्हणजे शिवाच्या शक्तीचा विस्तारच होय."समाज हा भारतीय जीवनपद्धतीचा आत्मा आहे. भारतही केवळ अद्‌भूत कथा, प्रणयकथा, कलात्मकता आणि सौंदर्यपूर्तता याचीच भूमी नव्हे तर भारत ही संपूर्ण विश्वाची एक तीर्थभूमी आहे. शिव हे आद्य भारतीय दैवत आहे. त्यामुळेच त्याला विश्वेश्वर, विश्वनाथ, विश्वंभर, जगन्नाथ, आदिनाथ, सर्वेश्वर, महादेव असे म्हटले आहे. त्यामुळे शिवाची आदिप्राचीनता आपल्याला दिसून येते. "मेहरगड या ठिकाणी शिवसंस्कृतीचे काही अवशेष सापडले आहेत. त्यामुळे भारतीय शिवसंस्कृतीचा इतिहास दहा-बारा हजार वर्ष मागे गेला आहे." "सिंधू नदीच्या नावावरुन भारतीय संस्कृतीला सिंधुसंस्कृती जरी पडले असले तरी शिवसंस्कृती ही निश्चितच अधिक



प्राचीन आहे. त्यामुळे शिवसंस्कृती ही आद्य भारतीय संस्कृती आहे." भारताला असलेल्या विविध नावापैकी 'भारत' हे नाव प्राचीनतम आहे. कारण शिवाच्या भरत, भरतेश, भरतेश्वर या नावावरुन ते रुढ झालेले आहे. त्याचा पुरावा चतुर्वेद तात्पर्यसंग्रह या ग्रंथातील श्लोकात आढळून येतो तो पुढील प्रमाणे

"त्वया पितृमतो परतः स्तुवानास्वा मा मनति
भरत नटनाभियोगात"

भारतात आणि भारताबाहेर सुद्धा शिवाची संस्कृती उदयास आलेली आहे. त्यामुळे शिवाचे 'भरत' हे नाव कालबाह्य होऊन भारत असे झाले. भरत आणि भारत ही दोन्ही नावे भगवान शिवाचीच आहेत कारण

"भरतस्य देश :
इति भारतः"

भारत, भारतवर्ष, भरतखंड, ही या देशाची नावे शिवांच्याच नावावरुन पडली असून शिवसंस्कृतीच आद्य संस्कृती म्हणून नावारुपाला आली आहे. हे सर्व ऐतिहासिक माहितीवरुन निश्चितपणे सांगता येईल. भारतात निगम आणि आगम नावाची दोन शास्त्रे अत्यंत प्रसिद्ध होती. निगमाची निर्मिती शिवाच्या निःश्वासा पासून उत्पन्न झाली तर आगमाची निर्मिती शिवाच्या वाणीतुन प्रकट झाली. 'आगमसंस्कृती' हरप्पा-मोहोजदाडो येथील उत्खननात सापडलेल्या अवशेषावरुन त्या काळात अस्तित्वात होती असे सिद्ध होते. आगम हे वीरशैवाचे मुळ आहे. त्यामुळे वीरशैव समाजही पाच हजार वर्षापासून अस्तित्वात होता असे म्हणता येईल.

"वीरशैव वैष्णवच शाक्त सौर विनायकम्।
कापालमिति विषेय दर्शनानि षडेव हि।।"

या पारमेश्वरागमाच्या उक्तीमध्ये आगमसमत अशा षड्‌दर्शनाचा उल्लेख आला आहे. त्यामध्ये वीरशैवाचाही उल्लेख आला असल्यामुळे वीरशैवाना आगम साहित्याचा मूलाधार असल्याचे दिसते. आगमामध्ये क्रियापद, चर्यापद, योगपाद, ज्ञान (विद्या) पाद असे चार भाग आहेत. क्रियापदामध्ये देवालयाची स्थापना, मूर्तीचे निर्माण आणि त्याची प्रतिष्ठापना या विषयाचे ज्ञान, चर्यापादानेमध्ये प्रतिष्ठित मूर्तीची

पूजा, उत्सव याचे विवेचन, योगपादामध्ये अष्टांग योगसाधना आणि ज्ञानपादामध्ये दार्शनिक विषय पती, पशु आणि पाशाच्या बरोबरच जगदुत्पत्तीमध्ये येणाऱ्या छत्तीस तत्त्वाचे स्वरुप यामध्ये आहे. वीरशैवाची प्राचीनता यावरुन आपल्या लक्षात येते. वेदाचा उत्तर भाग असलेल्या उपनिषदातही 'वीरशैव' शब्दाची उत्पत्ती कशी झाली याचे स्पष्टीकरण करण्यात आलेले आहे. वेदान्त वाक्यातून जन्म घेणारी जी विद्या तीच ब्रम्हारुपी विद्या होय. या शिवरुपी विद्येत रमणारे, रसघेणारे त्यांना 'वीरशैव' म्हणतात. तसेच वीरशैव शब्दाचे दार्शनिक अर्थाने व सांप्रदायिक अर्थाने स्पष्टीकरण झाले पाहिजे म्हणून प्रथम 'वीरशैव' शब्दाच्या अर्थाचे स्पष्टीकरण केले आहे. ते पुढील प्रमाणे-

"विद्यायां शिवरुपायां विशेषाद् गमनं यतः ।
तस्मादेते महाभाग वीरशैवा इति स्मृतः ।।
वीशब्देनोच्यते विद्या शिवजीवैक्यबोधिकाः ।
तस्या रमन्ते ये शैवा वीरशैवास्तुते मताः ।।
वेदान्तजन्य यज्ज्ञान विद्येति परिकी र्त्यतेः ।
विद्या रमते तस्या वीर इत्यभिधीयतेः ।।"

वीरशैव शब्दामध्ये येणाऱ्या 'वी' शब्दाचा 'वी' गति व्यति-प्रजनन कांत्यसन खादनेषु अशा पाणिनीच्या धातुपाठात 'वी' धातुच्या दिलेल्या अनेक अर्थापैकी 'गति' अर्थात गमन असाही एक अर्थ आहे. वीरशैवातील 'र' चा अर्थ रमणे अर्थात आनंद घेणे असा होतो. त्यामुळे 'वी' शब्दापासून निघणाऱ्या 'विद्या' अथवा 'ज्ञान' यामधून शिव जीवाचे अथवा लिंगाचे एकत्व सांगणाऱ्या विद्येत जो शिवभक्त रमतो, आनंद घेतो तोच वीरशैव होय. "वीरशैव म्हणजे वीर वृत्तीने शिवाच्या आचरणाचा पुरस्कार करुन पंचाचार्याच्या आदेशानुसार धार्मिक ज्ञानात रमणारे हे शिवभक्त म्हणजेच वीरशैव." धर्माला ग्लानी येते तेव्हा भगवान शिव अवतार घेतात. असे स्कंदपुराणामध्ये सांगितले आहे. 'भगवान शिवाच्या पंचमुखाच्या रुपाने विराजमान झालेल्या पंचलिंगापासून अवतीर्ण झालेले पंचाचार्य प्रत्येक युगात विभिन्न नावांनी अवतीर्ण होऊन वीरशैवाचे संचलन करीत आले आहे.' वीरशैवाचे मुळ हे पंचाचार्य असून



महात्मा बसवेश्वरांनी उत्कट शिवभक्तीने आणि समाजोद्धाराच्या तळमळीने वीरशैव मताचे प्रवर्तन केले. प्राचीन आगम साहित्यात किंवा कन्नड साहित्यात वीरशैव संस्थापक म्हणून त्यांचा कुठेच उल्लेख सापडत नाही. महात्मा बसवेश्वर वीरशैवाचे संस्थापक नसून त्याला क्रांतीकारक वळण देणारे धर्मधुरीण होते. 'मुळ संस्थापक पंचाचार्य हेच आहेत.' हे आता सर्वसामान्य मान्य करण्यात आले आहे. पंचार्याचा स्थावर जन्म लिंगातून झाला आणि त्यांनी प्रत्येक युगात वीरशैवाची स्थापना केली. "पंचाचार्याचा कालावधी कोणताही असेना, वीरशैव समाजाच्या प्रसारकार्यात व त्यांच्या संवर्धनकार्यात पंचाचार्यानी केलेले कार्य खुप मोलाचे आहे." वीरशैव सिद्धांत सर्वांना कळावा म्हणून पंचाचार्यानी रेणुका भाष्य, दारुकाभाष्य, एकोराम भाष्य, पंडीत भाष्य, विश्वाराध्य भाष्य या नावांनी प्रसिद्ध केले आहेत. परंतु त्याचे साधने सध्या उपलब्ध नाहीत.

मोहेजोदडो व हडप्पा येथे इ.स. १९२२ च्या दरम्यान सापडलेल्या काही पुराणवस्तु व साधनावरुन भारताच्या प्राचीन इतिहासावर प्रकाश पडलेला आहे. मोहेजोदडो, हडप्पा व मेहरगड येथे शिवाच्या मूर्ती, स्त्री देवतामूर्ती, छोटे शिवलिंग, नंदी, त्रिशुल, सर्प, स्वस्तिक यासारख्या अनेक शिवसंस्कृतीला पोषक अशा वस्तू सापडलेल्या आहेत. त्या वीरशैव समाजासी निगडीत आहेत. शिवसंस्कृती ही आद्य भारतीय संस्कृती आहे. वीरशैव संस्कृतीलाच शिवसंस्कृती म्हटले असून. वीरशैव हे शिवाचेच एक नाव आहे. वीरशैव संस्कृती ही मूलतः शिव शक्तिप्रधान आहे. वीरशैव अथवा शिवसंस्कृती ही अत्यंत प्राचीन व व्यापक-संस्कृती आहे. या संस्कृतीत विकसित स्वरुप प्राग्वेदिक संस्कृती मानल्या जाणाऱ्या हडप्पा व मोहेजोदडो या उत्खनीत संस्कृती काळात दिसून येतो. "संस्कृती म्हणजे एका विशिष्ट समाजाचा ठेवा असलेल्या अंतिम मुल्याची जाण, जी त्यांच्या सामुहिक संस्थामधून व्यक्त होते. जी व्यक्तीचा स्वभाव, भावना, दृष्टीकोण, वागणूक यामधुन व्यक्त होते." व्यक्तीने जीवनभर अंगावर धारण केलेले लिंग म्हणजे शिवप्रतिक जळू नये यासाठी अत्यंसंस्कार हा दफन विधीने करत असतात. उत्खननात सापडलेल्या पूजा करीत बसलेल्या अवस्थेत दफन संस्कार करण्याची मृताला मांडी घालून बसविण्याची

प्रथा आजही वीरशैवात प्रचलीत आहे. हडप्पा या ठिकाणी एक स्मशानभूमी देखील आढळून आली आहे. त्यावरुन वीरशैव समाजाची प्राचीनता हडप्पा संस्कृतीमध्ये सुद्धा अस्तित्वात होती हे सिद्ध होते. सिंधू संस्कृतीत व्यापाऱ्यांना उद्देशून 'पणी' म्हणत असत. 'पणी' या शब्दाचा अपभ्रंश होऊन 'वाणी' हा शब्द रुढ झाला असावा, आज देखील 'वाणी' हा शब्द वीरशैवासाठी वापरला जातो. "वाणी या शब्दाचे मुळ आर्यपूर्व सिंधू संस्कृतीत आढळते की जो शब्द वीरशैवासाठी वापरला जातो." हरियाणातील राखीगडी येथील संशोधनात सापडलेल्या सात हजार वर्षापूर्वीच्या मृतदेहाच्या सोबत वीरशैवाचे प्रतिक असलेले इष्टलिंग त्या ठिकाणी सापडलेले आहे. त्यामुळे वीरशैव समाजाची प्राचीनता पूर्वी भारतामध्ये होती हे आपल्याला अनेक पुराव्याद्वारे व उत्खननाद्वारे सिद्ध होते. वीरशैव समाज हा प्राचीन असून इष्टलिंगाच्या सानिध्यात राहणारा समाज आहे. पुढील श्लोकात आपल्या ते लक्षात येईल.

'इष्टलिंग वियोगे व्रताना वा परिच्यूतौ ।<br>
तृणवत प्राणसंत्याग इति वीरव्रत मतम ।।<br>
भक्त्युत्साह विशेषोपि वीरत्वामिती कथ्यते ।<br>
वीरव्रत समायोगाद वीरशैव प्रकीर्तितम्' ।।

"इष्टलिंगाच्या ठिकाणी निष्ठा असणारा हा समाज लिंगाची नित्य पूजा करीत असूनही अकस्मात लिंगासाठी प्राणत्याग करण्याचा प्रसंग येता प्राणत्याग करण्यासाठी मागेपुढे पाहत नाही. भारतातील शिवोपासना ही मुळात मूर्ति विषयी संबंध नसून लिंग संबंध आहे. कारण भारतातील कोणत्याही शिवालयात शिवाची मूर्ती नसून अनेक ठिकाणी शिवाचे शिवलिंगच पहावयास मिळते. मोहेजोदडो ही संपूर्णतः शिवसंस्कृती आहे. हडप्पा या शब्दाचा अर्थच मुळात हरअप्पा अर्थात हर म्हणजे शिव आणि अप्पा म्हणजे बाबा किंवा श्रेष्ठ व्यक्ती असा आहे. मोहेजोदडो संस्कृती मध्ये शिवसंस्कृतीचे स्वरुप दिसून येते. मोहेजोदडो, हडप्पा, मेहरगड येथील उत्खननातून वीरशैवाची संस्कृती, संस्कार, अर्थव्यवस्था, तत्त्वज्ञान या बाबतचे पुरावे आढळतात. त्यामुळे प्राचीन भारतीय संस्कृतीचा वीरशैव संस्कृतीशी संबंध



कसा होता हे मिळालेल्या उपलब्ध साधनावरुन कळते. वीरशैवाच्या पंचाचार्य, आगम, कायक, दासोह, अनुभवमंटप, इष्टलिंग, अष्टावरण, पंचाचार, षट्स्थल, लिंगधारणा याचे धार्मिक महत्त्व आहे. सद्‌गुरुकडून दीक्षेत मिळालेले इष्टलिंग आपल्या शरीरापासून विलग न करता जो सावधपणे धारण करतो तो वीरशैव होय. वीर हा वीरत्व शारीरिक नाही ते भक्तीच्या पराकाष्ठेचे, अतीव व उत्कटतेचे द्योतक आहे. वीरवृत्तीने शैवमताचा पुरस्कार करणारे या अर्थाने 'वीरशैव' हा शब्द योग्य वाटतो. "वीरशैव हे एकान्तिक शिवभक्त भगवान परशिव ब्रम्हा हेच त्याचे एकमेव उपास्य दैवत आहे."

शि.का. संकनवाडे यांनी म्हटले आहे की, वीरशैव समाजाची तत्त्वे समन्वयवादी आणि सर्वसमावेशक स्वरुपाची आहेत. वीरशैव समाज मानवतावादी, शांततावादी, अहिंसावादी, समतावादी व विश्वबंधुत्ववादी आहे. त्यामुळे जगात शांतता प्रस्थापित करायची असेल तर वीरशैव समाजाची तत्त्वे अतिशय महत्त्वाची आहेत. वीरशैव समाजाची महती सांगणारा एक श्लोक 'पारमेश्वरागम मध्ये समाविष्ट करण्यात आला आहे. तो श्लोक चिंतनीय आणि माननीय आहे. तो पुढील प्रमाणे -

"नमस्ते रुद्ररुपेभ्यः<br>
नमस्ते वीरशैवाय शिवाय गुरवे नमः<br>
वीरशैव मतेशाय महावीराय शंभवे<br>
नमस्ते वीरशैवाय शिवाय गुरवे नमः"

'पारमेश्वरागमनातील' श्लोकांत असे म्हटले आहे की रुद्र, वीरशैव, महावीर हे सर्व शिवाचीच रुपे आहेत. वीरशैव हा शब्द वेदपूर्वकालीन आगम ग्रंथात त्याचा उपयोग केला आहे. वीरशैवासाठी 'लिंगायत' हा शब्ददेखील सर्वत्र उपयोगिलेला आपण पाहतो. लिंगायत हा शब्द अंगावर नित्य लिंग धारणा करण्याच्या तत्त्वावरुन रुढ झालेला आहे. गुरुने दीक्षाविधीतून दिलेल्या इष्टलिंग धारणेशिवाय कोणालाही लिंगायत म्हणता येत नाही. इष्टलिंग धारण करणारा तो लिंगवंत म्हणूनच लिंगपूजक ते लिंगायत होत. एकंदरीत शिव व जीव यात फरक न मानणारा तो वीरशैव तर इष्टलिंग स्वरुपात शिवाला कायमपणे आपल्या अंगावर धारण करणारा तो लिंगायत

होय. वीरशैव व लिंगायत या दोन्ही शब्दाचा मुळ अर्थ एकच असून वीरशैव हा तत्त्ववाचक शब्द असून लिंगायत हा शब्द रुढीवादी आहे. वीरशैव व लिंगायत समाजाबद्दल डॉ. सुधाकर मोगलेवार यांनी असे म्हटले आहे की, वीरशैव व लिंगायत दोन्ही शब्द एकाच नात्याच्या दोन बाजू आहेत. 'लिंगायताची व वीरशैवाची तत्त्वे सारखीच आहेत. शिवाच्या श्रेष्ठत्वावर श्रद्धा असणारा, अंगावर इष्टलिंग धारण करणारा व त्यामध्ये शिवभक्ती अनुभवणारा शिव व शक्तिमध्ये भेद न करणारा वर्ग व जातीभेद न पाळणारा जीव - शीव ऐक्यात रममाण होणारा समाज म्हणजे वीरशैव लिंगायत समाज होय.' लिंगपूजा, रुद्र, परब्रम्हा, शिव यातील भिन्न उपासनापद्धती एक होऊन शिवोपासना रुढ झाली. भारतातील विभिन्न संस्कृतीच्या संपर्क - संघर्षाच्या काळात विविध उपासनाचे एकत्रीकरण होऊन शिवोपासना सिद्ध झाली. "आज वीरशैव व लिंगायत वाद होताना दिसतात. परंतू प्राचीन काळापासून वीरशैव लिंगायत एकत्र असून त्यामध्ये विरोध निर्माण करुन समाजात फुट पाडणे यामध्ये काहीही तथ्य नाही. वास्तविक पाहता वीरशैव, लिंगायत, लिंगर्वण, लिंगधारी, लिंगधर, वाणी हे सर्व समानार्थी शब्द आहेत." प्रत्येक मनुष्याच्या इच्छा, आकांक्षा भिन्न असतात. त्याचा परिणाम त्यांच्यावर व समाजातील अन्य व्यक्तीवर होत असतो. मनुष्यातील भूतकालीन संस्कार, वर्तमानकालीन इच्छा आणि भविष्यकालीन संकल्प यांच्या उभ्या आडव्या धाग्यांनी विणलेल्या जाळ्यात मनुष्यसमाजातील गुंतवणुक त्याची प्रत्येक कृती आचार विचार समाजात वावरताना दिसतात. वीरशैव समाजाला अध्यात्मिकतेचा व तत्त्वज्ञानाचा वारसा लाभलेला असून एक भारतीय प्राचीन परंपरा लाभलेली आहे. वीरशैव लिंगायत समाजानी अध्यात्मिक जीवनाबरोबर जीवनातील सर्व प्रकारच्या समतेचे तत्त्व जोपासलेले आहे. त्यामुळेच उच्चनीचता, जातीभेद मानत नाही व त्याच बरोबर स्त्रियांना पुरुषाबरोबर समान हक्क देण्याचा स्वीकार केलेला आहे. म्हणूनच वीरशैव समाज हा समभाव मानणारा, श्रमाला महत्त्व देणारा म्हणनूही वीरशैव लिंगायत समाज ओळखला जातो. वीरशैवाची प्राचीनता आपल्याला खालील तत्त्वाच्या म्हणजेच वीरशैव, अनादिशैव, आदिशैव, अनुशैव, योगशैव, महाशैव, ज्ञानशैव अशा पैकी वीरशैव एक आहे. त्यामुळेच -



"वीरशैव तथानादिशैवमादिपरं ततः
अनुशैव महाशैव व योगशैवतु षष्ठकम ।
सप्तम ज्ञानशैवाख्यं तंत्र सर्वोत्तमम्
वीरशैवमितीशानि तंदगानीतराणि तु ।।"

के.एम. निळकंठशास्त्री म्हणतात की, "वीरशैव समाजाला आरंभिक इतिहास अद्याप काहीसा अनिश्चित, अपरिचित आहे." वीरशैव समाजाची प्राचीनता सांगताना असे म्हटले जाते की, 'अत्रादौ वीरशैवाख्य तंत्राणामुत्तमोत्तम' म्हणजे वीरशैवाला वरील सातपैकी मानावयाचे असेल तर सर्वात प्राचीन म्हणून वीरशैवाची गणना करावी. त्यामुळे वीरशैव प्रथम व ज्ञानशैव हा सातवा होय. याच पार्श्वभूमीवर चमके यांनी वीरशैव समाजाच्या प्राचीनतेचा दावा केलेला तो यावरुनच त्यामुळे वीरशैवाला अतिप्राचीनतेचा वारसा लाभलेला आहे. वीरशैव लिंगायतच शिवाला एकरुप मानणारा समाज आहे. भगवान शिवशंकराची अतिप्राचीनता लिंगधारणेचे महत्त्व तेही सांस्कृतिक सातत्य उत्खननातील सापडलेले अवशेष अशी अतिप्राचीन असंख्य पुरावे आज उपलब्ध आहेत. मानखेडकर स्वामी यांनी मन्मथ स्वामी यांच्या 'परमरहस्यातील परम अर्थ यामध्ये असे नमुद केले आहे की,

'शिवधर्म असे अनादि स्थिती ।
त्याची उत्पत्ती न वर्णवे ।
ज्याचे सेवेने लोक होतो पावन ।
ऐसा हा शिवधर्म गहन ।'

'शिवधर्म हा अनादि आहे तो शिवधर्म म्हणजेच वीरशैव आहे.' शिवाची भक्ती केल्याने बहुसंख्य लोकांना मोक्षप्राप्ती होते. असा विश्वास वीरशैवामध्ये आहे आणि तो सार्थक आहे. श्री सद्‌गुरुकडून दीक्षासंस्कार प्राप्त करुन त्यांच्या अनुग्रहाने लाभणारे इष्टलिंग नेहमी देहावर धारण करुन प्रसंग पडताच तो प्राणत्यागही करतो. मात्र इष्टलिंगाची पूजा व धारणा सोडत नाही. वीरशैव धार्मिकता कोणत्याही धार्मिक भावनेत नाही. 'सर्वाशी प्रेमाचा व्यवहार करणारा असा उदात्त भावना असणारा भक्त वीरशैव समाजात राहतो तोच वीरशैव होय.' 'वीरशैव' हा शब्द वेदपूर्वकालीन

'आगम ग्रंथात' उपयोगिलेला आहे. प्रा. विश्वनाथ थोटे यांनी वीरशैव समाजाबदल प्राचीनता दिसून येते. कारण महाभारतातील अनु शासनपर्वामध्ये वीरशैवाचा स्पष्ट उल्लेख आलेला आहे.

"सर्वेषा वीरशैवांना मुमुक्षुणा निरंतर
शिवभक्तान् सदाचार निरतान्धृतं लिङ्गकान्
क्रियानाशश्चय सदाभस्म रुद्राक्षधारिण:"

या श्लोकावरुन असे आढळून येते की, 'सदैव भस्म आणि रुद्राक्ष धारण करणारे वीरशैव समाजाचे लोक महाभारतातही अस्तित्वात होते' हे वरील श्लोकाच्या आधारे आपल्याला वीरशैवाची प्राचीनता सांगता येते. विरोधरहित असणारा वीरशैव असे वीरशैव समाजाचे मुख्य लक्षण आहे. म्हणजेच कोणत्याही भारतीय धर्म-दर्शनाला तो विरोध करत नाही किंवा भावनेचे खंडन करत नाही. सर्वाकडे समन्वय दृष्टीने पाहण्याचा वीरशैव समाजाचा उद्देश आहे.

अनेक संदर्भ, श्लोक, पुराव्यावरुन असा निष्कर्ष निघतो की, भाषा, प्रांत, जाती विसरुन आम्ही सर्व एक आहोत. ही भावना निर्माण करुन राष्ट्राच्या भवितव्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न केला पाहिजे. अनुकुल व्यवहारासाठी, भाषा, प्रांत, धर्म, भिन्न असला तरी भेद वैयक्तिक असून समस्त व्यवहाराच्या वेळी प्रत्येक धर्मिय लोकांनी समाजप्रेमी व राष्ट्रधर्म भावना वाढवून घेण्यास प्रयत्न केला पाहिजे. जगातील समाज लोकप्रिय व महान बनतो तो त्या समाजाच्या तत्त्वावर आणि प्रचलित असणाऱ्या शिकवणुकीवर. समाजाची प्राचीनता ही त्यांच्या धार्मिक प्राचीनतेवरुन व आधुनिक विचार सारणीवर अवलंबून असते. कोणत्याही समाजाची मुलभूत तत्त्वे काही भक्कम पुरावे आहेत की जी मानवाला शाश्वत समाधान, आत्मसमाधान, मनशांती मिळवून देण्यासाठी समोरच्या व्यक्तीला दीपस्तंभाप्रमाणे, ध्रुवताऱ्याप्रमाणे सदैव मार्गदर्शकाची व मार्गदर्शनाची भूमिका व्यक्त करत असते. म्हणून वीरशैव लिंगायत समाज अतिप्राचीन असून वीरशैव समाजाचा विकास झपाट्याने होताना दिसत आहे. धार्मिक, आर्थिक, सामाजिक, राजकिय, शैक्षणिक क्षेत्रातील प्रगतीचा आलेख वाढत आहे. वीरशैव समाजाचा विकास भक्तीभावनेतुन विज्ञान तंत्रज्ञानातून



स्पष्ट होताना दिसतो. कारण समाज हा परीवर्तनशील असतो. परीवर्तनाशिवाय कोणत्याही समाजाचा विकास होत नाही.

## १.३ नांदेड जिल्ह्यातील वीरशैव समाजव्यवस्था

कुटुंबसंस्था ही एक सार्वभौम सामाजिक संस्था आहे. नांदेड जिल्ह्यातील वीरशैव लिंगायत समाजाचे अनेक कुटुंब हे ग्रामीण भागात आहेत. समाजात ज्या प्रकारची कुटुंबपद्धत अस्तित्वात असते. त्या पद्धतीची सुसंगत सांस्कृतिक लक्षणे, स्थायीभाव, हावभाव, समाज, संस्कृती विकसित होत असते. कामधंद्याच्या निमित्ताने अनेक वीरशैव कुटुंब शहराकडे आली व स्थाईक झालेली आहेत. वीरशैव समाजामध्ये पितृसत्ताक कुटुंब पद्धत असून काही मोजक्याच ठिकाणी मातृसत्ताक कुटुंब पद्धत अस्तित्वात आहे. वीरशैव समाजात पितृसत्ताक कुटुंबपद्धत अधिक प्रमाणात प्रचलित आहे. पितृसत्ताक पद्धतीमध्ये कुटुंबाचे सर्व कारभार सत्ताही पुरुषाकडे असतो. विवाह झाल्यानंतर पत्नी पत्नीच्या घरी जाऊन राहते. व त्या कुटुंबातील ती सदस्य बनत असते. परंतु वीरशैव समाजामध्ये जरी पितृसत्ताक पद्धत अस्तित्वात असलो तरी स्त्रिला व पुरुषाला सारखेच स्थान आहे. कोणतीही पूजाविधी, कोणतेही महत्त्वाचे निर्णय हे स्त्री-पुरुष मिळून घेत असतात. आज अनेक स्त्रिया पुरुषाच्या बरोबर नोकरी, व्यवसाय, उद्योग करताना दिसून येतात. त्यामुळे वीरशैव समाजामध्ये कुटुंबाचा प्रमुख जरी पुरुष असला तरी सर्व निर्णय तो एकटा न घेता सर्व कुटुंबाला विश्वासात घेऊन कार्य करत असतो. वीरशैव समाजामध्ये कुटुंबाला खुप महत्त्व आहे. कारण कुटुंबच हे व्यक्तीच्या संस्कार केंद्राचे माहेरघर असते. व्यक्तीचा विकास हा कुटुंबाच्या सानिध्यातच होत असतो. आई-वडिलांच्या सहवासातच मुलाच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास चांगला होत असतो. कुटुंबाची भाषा, रितीरिवाज, रुढी, परंपरा इत्यादी आचरण हे कुटुंबातच मिळत असतात. व्यक्तीच्या जडण-घडणीमध्ये कुटुंबाचा प्रमुख वाटा असतो. म्हणून कुटुंब हे सामाजिकरणाचे एक उत्तम असे माध्यम आहे. कुटुंबाच्या अनेक परंपरा कुटुंबसंस्थेच्या एकत्रीकरणामुळे आज टिकून आहेत. 'व्यक्तीच्या गरजांची पूर्तता करणारा, आत्मीयता, जिव्हाळा, प्रेम, आत्मविश्वास याचा सुयोग संबंध असणारा, रक्तसंबंधावर आधारलेला व्यापक समुह म्हणजे

कुटुंब होय.'

### १.३.१ राहणीमान

वीरशैव समाजाचे राहणीमान अत्यंत साधे आणि सोपे आहे. वीरशैव संस्कृतीला शोभणारा पोषाख वीरशैव समाजातील लोक घालत असतात. तरूण व्यक्ती त्याला शोभेल असाच पेहराव करत असतो. विवाहप्रसंगी, कार्यक्रमामध्ये दाग-दागिने, शृंगार करताना दिसतात. वीरशैव समाज हा ग्रामीण भागात राहत असल्यामुळे त्याचे राहणे पुणे, मुंबई सारखे नाही पण अंगभर कपडे घालण्याची प्रथा वीरशैव समाजात आहे. व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाला पटेल असाच पोषाख घालताना वीरशैव समाज दिसत असतो. स्त्रियापण साधाच पेहराव करतात.

### १.३.२ आहार

वीरशैव समाज हा ग्रामीण भागात खूप मोठ्या प्रमाणात आहे. तो खाण्या-पिण्यावर जास्त खर्च करत नाही. व्यक्ती गरीब असो की श्रीमंत सगळ्यांच्या आहारामध्ये समानता आढळून येते. दाळ, भात, पोळी, ज्वारीची रोटी असा दैनंदीन खाद्य आपल्या जेवणात ते वापरताना दिसतो. सणाला ते गोडधोड पदार्थ खात असतात. एकंदरीत वीरशैव समाज हा शुद्ध शाकाहार घेतो. समाजाच्या धार्मिक नैतिक मूल्यांच्या पालनासाठी अहिंसावृत्ती पूर्तता व्यक्तीकडून होणे गरजेचे आहे. व्यक्तीचा आहार आणि नैतिकता यांचा देखील अत्यंत अनिष्ठ संबंध असतो. व्यक्तीच्या आहाराचा शुद्ध शाकाहार हा शक्तिचा स्त्रोत व आरोग्याचा रक्षक मानला जातो; पण शाकाहाराचे महत्त्व इतकेच नाही तर तो एक नैतिकतेचा आधार आहे. हे सत्य सर्वात महत्त्वाचे आहे. व्यक्तीच्या आहारातून त्याचा सर्वांगीण व्यक्तिमत्त्वाचा विकास होताना दिसतो. आहार चांगला असेल तर व्यक्तीचे मन, बुद्धी, शरीर योग्य कार्य करते व त्यामधूनच त्याचा सर्वांगीण विकास होत जातो. मानवाचे पोट मुख एकंदरीत शरिररचना ही शाकाहार सुलभ असेल तर मानवाचे शरीर, मन, बुद्धी यांचे संवर्धन होते.

वीरशैव समाजाच्या अहिंसात्त्वाच्या विचारसरणीचा तसेच आहारपद्धती यावर जबरदस्त प्रभाव पडलेला आहे. आजदेखील बहुसंख्य वीरशैव समाजबांधव स्त्री-



पुरुष आहाराबाबत धर्मिक दृष्टीकोनातून बंधनात आहे. रुद्राक्षाची माळ, गळ्यातील इष्टलिंग, कपाळावरील विभूती त्याला आहारावर बंधन घालत असते. वाढते शहररीकरण, धकाधकीचे जीवन, संगत गुण, आरोग्याच्या समस्या यामुळे वीरशैव काही बांधव आहारात बदल करण्याचा पवित्रा अवलंबतात. असे करणे किंवा असा आहार सेवन करणे वीरशैव समाजाच्या विरोधी आहे.

### १.३.३ संस्कृती

मानवी जीवन जगण्याची पद्धत म्हणजे संस्कृती मानवाच्या जीवनमूल्याची माहिती संस्कृतीवरुन समजत असते. सुशिक्षित व्यक्ती ही सुसंस्कृत असते. जेवढा समाज शिक्षित त्या समाजाची संस्कृती उच्च असते. संस्कृती शिवाय मानव समाजाची कल्पनाच करता येत नाही. संस्कृती मानवी समाजाचा अविभाज्य भाग आहे. कोणत्याही व्यक्तीला जन्मानंतर कुटूंबातून समाजातील लोकांच्या संपर्कातून संस्कृतीचा विकास होतो. व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वातून व शिक्षणातून संस्कृतीचा विकास होतो. संस्कृतीचे अध्ययन केल्याशिवाय मानवाच्या समाजाचे अध्ययन पूर्ण होऊ शकत नाही. संस्कृती मानवी समाजाचे एक अविभाज्य अंग आहे. जगातील संपूर्ण मानव समाजाची संस्कृती एकसारखी नसते. कारण वेगवेगळा प्रदेश, लोकांचे ज्ञान, विश्वास, मूल्य, प्रतिके, प्रमाणके, प्रथा, चिन्हे यामध्ये भिन्नता दिसू येते. त्यामुळे वेगवेगळ्या समाजामध्ये संस्कृतीत बदल पाहावयास मिळतो. व्यक्ती ज्या समाजात जन्म घेतो, त्या समाजाच्या संस्कृतीचा त्याच्यावर प्रभाव पडत असतो. व्यक्तीला आपल्या संस्कृती विषयी मनात आपलेपणा आणि आत्मीयता दिसून येते. व्यक्तीच्या सर्व प्रकारच्या शारीरिक आणि मानसिक बाह्य, अंतर्गत वागणूकीवर संस्कृतीचा प्रभाव पडत असतो. प्रत्येक संस्कृतीच्या लोकामध्ये सांस्कृतिक समुह केंद्रितता आढळते.

## १.४ वीरशैव समाजातील स्त्रियांचा दर्जा :

वीरशैव समाज जरी पितृसत्ताक असला तरी स्त्रिला पुरुषांच्या बरोबर समान वागणूक दिली आहे. वीरशैवाचे समतावादी धोरण असल्यामुळे स्त्रियांच्या आचार-विचाराला स्वातंत्र्य मिळालेले आहे. समतावाद शिवाच्या परमात्म्यापासूनच चालत आलेला आहे. वीरशैव समाजामध्ये कोणतेही धार्मिक कार्य असेल तर पुरुषाच्या

बरोबर स्त्रियांना धार्मिक विधी, पूजा करताना प्राधान्य दिले जाते. शिव व शक्तीमध्ये कोणताही भेद मानीत नसल्यामुळे स्त्रियांना पुरुषासारखीच वागणूक दिली जाते. पूर्वीपासूनच स्त्रियांना धार्मिक, अध्यात्मिक, शैक्षणिक, आर्थिक, व्यावसायिक, राजकिय इ. अधिकार स्वतंत्र देण्यात आले आहेत. त्याचबरोबर सामाजिक स्वातंत्र्य, हक्क, अधिकार, मोठ्या प्रमाणात देण्यात आलेले आहेत. वीरशैव स्त्रिजातीला कोणत्याच अवस्थेत अपवित्र, अपात्र, अस्पृश्य मानले नाही. तिचे स्थान पुरुषांच्या बरोबरीचेच आहेत. स्त्रियांना पूजा स्वातंत्र्य दिलेले असून 'दीक्षा' हा प्रमुख वीरशैव संस्कार स्त्री-पुरुष यांना सारखाच आहे. त्याच बरोबर ते पुरुषाबरोबर 'गुरु' ही करतात. म्हणून त्या धार्मिक विधी, उत्सव समारंभात स्त्रियांच्या कार्याला स्थान दिले जाते. एकंदरीत वीरशैव समाजाचा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टीकोन उदार, व्यापक, सहकार्यवादी आहे. अनेक स्त्रिया डॉक्टर, प्राध्यापक, इंजिनियर, शैक्षणिक, राजकिय क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवत आहेत. याचे सर्वश्रेय तिच्या मुक्त स्वातंत्र्य प्राप्त झाल्यामुळे अनेक क्षेत्रातील अतिउच्च पदावर काम करण्याची संधी मिळाली आहे. महात्मा बसवेश्वरांनी स्त्रियांना हक्क मिळावेत यासाठी बाराव्या शतकात महिला संघटन करुन अनुभव मंटपाची स्थापना केली. स्त्री शिक्षण, स्त्री साक्षरता, स्त्रियांना आवडता व्यवसाय, विधवा विवाह, स्त्रियांची वाङ्मयीन निर्मिती, वेगवेगळ्या चर्चासत्रामध्ये सहभाग इ. क्षेत्रात महिलांना प्राधान्य देवून त्यांना खंबीर नेतृत्त्व निर्माण करण्याचे कार्य अनुभव मंटपातून केले. स्त्रिला जीवनाचे आदर्श अनुकरण स्त्री संस्कृतीचा विकास करता आला. याचाच फायदा घेवून आज वीरशैव समाजातील स्त्रिया आपल्याला अनेक क्षेत्रात आपले वर्चस्व निर्माण करत आहेत. स्त्रियांना पुरुषाबरोबर शिक्षणात समानता प्रदान केल्यामुळे त्यांना शैक्षणिक संधीची समानता प्राप्त झाली. "प्रस्थापित अज्ञानाविरुद्ध स्त्रिला विरोध करता आला. सनातनी व्यवस्थेविरोधी, जातीय विषमतेविरोधी लढा देवून त्यांनी शैक्षणिक क्रांती घडवून आणली." आजच्या प्रत्येक स्त्रिला मिळालेली ही एक अमूल्य देगणी ही वीरशैव समाजानी महात्मा बसवेश्वरांच्या विचाराच्या आचरणातून समाजात रुढ झालेली आहे. स्त्रियांना त्याचे अधिकार हे महात्मा बसवेश्वरांच्या स्त्री विषयक दृष्टीकोनातून



प्राप्त झाले. त्याचा ऋणभार कधीच न संपणारा आहे. पुरुष आणि स्त्री यांच्यात भेदभाव करुन मुक्तीमार्गाची वाटणी करणाऱ्या संस्कृतीवर शिवभक्तांनी कडाडून टिका केली आहे. पुरुष आणि स्त्रियांच्या नैसर्गिक स्वरुपाच्या पलीकडे जावून त्यांनी चिरंतन सत्याचे दर्शन घडविले ते म्हणतात,

"स्तनभार, केशसंभार वाढल्यास स्त्री म्हणतात,
दाढी नि मिशा असल्यास पुरुष म्हणतात ।
या दोघांच्यामध्ये जो आत्मा वास करतो,
तो पुरुष नाही, ना स्त्री ।।"

शारीरिक संरचनेमुळे स्त्री आणि पुरुष अशी नामाभिधाने जरी पडली असली तरी या दोघांच्या शरीरात ज्या आत्म्याचे अस्तित्व असून, तो पुरुष नाही ना स्त्री नर आणि नारी याचा शारीरिक भेदभाव जर नाहीसा केला तर एकाच परमतत्वाची अनुभूती होते. ती म्हणजे समतावादी विचार व मानवतावादी दृष्टीकोनाची अनुभव मंटपातून स्त्रियांच्या मुक्तस्वातंत्र्याला सुरुवात होण्यास बळ मिळाले. बाराव्या शतकातील शिवशरणी वीरशैव स्त्रिया - स्त्री विमोचनाच्या क्रांतिकार्याच्या अध्वर्यू ठरल्या. दिव्य मानवांना व इतर शिवशरणांनी या कार्यास सहानुभूती दाखवली आणि ते स्वतः त्याच सहभागी झाले. स्त्रिमुक्ती हा वीरशैवाच्या सामाजिक चळवळीचा परिपाक ठरतो. स्त्रिमुक्ती चळवळ हे वीरशैव समाजाचे भारतीय संस्कृतीला लाभलेले एक अतिशय मोलाचे योगदान आहे.

**१.५ नांदेड जिल्ह्यातील वीरशैव लिंगायत सामाजिक संघटना**

समाजात नवमुल्याची रुजवण व्हावी यासाठी मानवी इतिहासात अनेक प्रयत्न केले गेले आहेत. समाजातील रुढी, परंपराची घट्ट वीण विस्कळीत करण्याची प्रक्रिया प्रत्येक कालखंडात कमी अधिक प्रमाणात चालू असते. जेव्हा या प्रक्रियेला प्रागतिक विचारधारेचा तात्वीक आधार सक्षमपणे दिला जातो. तेव्हा मात्र समाज जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात क्रांती निर्माण होत असते. क्रांतीतून उदय पावणारी नवमुल्यही सामाजिक चैतन्याचाच परिपाक असतात. काळाच्याही पुढे राहण्याची भाषा बोलणारी ही मुल्ये प्रचलित काळात मात्र नव कल्पना वाटतात किंवा मानल्या जातात. परंतू या नवकल्पना

म्हणजे निव्वळ स्वप्नरंजन नसून भविष्यातील नवसमाजाच्या निर्मितीच्या नांदी ठरतात. समाजाची प्रतिगामी मानसिकता व विचारशैली बदलविण्यासाठी आणि प्रागतिक विचारधारेला आधारलेला नवसमाज निर्माण करण्यासाठी नवमुल्याची मांडणी केली जाते. राजकीय इच्छाशक्ती तथा प्रागतिक विचारशैली असते. म्हणूनच समाज जीवनात व्यापक परिवर्तन घडवून आणण्याचा पुरस्कार विचारातून होतो. समाजाला अधोगतीपासून वाचविण्यासाठी स्पष्ट वक्ता व सदस्यांची गरज असते. समाजात परखड भूमिका घेणाऱ्यांचा दुष्काळ असतो तो समाज रसातळाला जाण्यास वेळ लागत नाही. म्हणून सुधारणावादी व विवेकवादीची कास धरुन समाज परिवर्तनाची ठाम भूमिका प्रत्येक समाजाला असते. त्यासाठी संघटना मजबूत असणे महत्त्वाचे आहे. आदर्श समाजाचा अविष्कार लोकांच्या आचार आणि उच्चारातून होत असतो. समाजातील लोकांनी आपली जीवनशैली आदर्श स्वरुपात विकसित केली. तरच समाजाची योग्य दिशेने जडण-घडण होऊ शकते. समाजातील लोकांना व्यक्तीगत व सामाजिक पातळीवर स्वतंत्रता असावी. परंतू समाजाचा विकास करायचा असेल तर एकत्र येऊन कार्य करावे लागते. सामाजिक विचारधारा ही सुधारणावादी व प्रगतीशील समाजाच्या जडणघडणीसाठी कटीबद्ध असते. समाजात अमुलाग्र परिवर्तन घडवून समतावादी समाजाच्या निर्माणासाठी आग्रही असणारी समतावादी विचारधारा समाजाला हवी असते. "सामाजिक जीवनातील अंधविश्वास, रुढी परंपरा, अंधानुकरण, वर्णभेद, उच्चनिच्च भेदभाव या विरोधात समतावादी विचार अत्यंत मोलाचे आहेत." प्रागतिक आणि विवेकवादी विद्रोहता विचार आपल्या सामाजिक विचार मांडून नवसमाज निर्मितीसाठी प्रत्येक समाजाने करणे गरजेचे आहे. म्हणून महात्मा बसवेश्वरांच्या विचारधारेवर विश्वास ठेवून वीरशैव लिंगायत समाज समतावादी विचार जनसामान्यावर प्रभावीत करुन समाजामध्ये नवचैतन्य आनण्याचा प्रयत्न करत आहे. त्यामुळे वीरशैव लिंगायत समाजाचे सामाजिक जीवन अतिशय महत्त्वाचे आहे. सामाजिक विचाराच्या दृष्टीकोनातून नांदेड जिल्ह्यामध्ये विविध संघटना निर्माण करुन त्याद्वारे समाजाचे प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न सातत्याने केला जातो. समाजाच्या समस्या सोडवून समाजात एका विचाराची रुजवण करण्याचे काम ह्या संघटना



करत असतात. आपआपसातले वाद बाजूला ठेवून संघटना समाजाच्या विकासासाठी सतत कार्यशील असतात. संघटना ही व्यक्तीला संघटन करुन त्यांच्या विचाराला एक प्रकारचे विचारपीठ निर्माण करते त्यामुळे कोणत्याही समाजाच्या संघटना मजबुत असल्या की त्या समाजाचे प्रश्न लवकर सुटत असतात. नांदेड जिल्ह्यामध्ये महाराष्ट्र वीरशैव सभा जिल्हा शाखा नांदेड, शिवा संघटना, बसव ब्रिगेड, महात्मा बसवेश्वर विचारमंच, नंदी फाऊंडेशन अशा वेगवेगळ्या सामाजिक बांधीलकीतून या संघटनांची निर्मिती झालेली आहे. परंतु सर्व संघटनाचा उद्देश एकच असून वीरशैव लिंगायत समाजाच्या प्रश्नांना वाचा फोडणे व ते निकालात आणणे संघटनाचे लोक जरी वेगवेगळे असले तरी संघटना ही समाजाच्या विकासासाठी कार्य करते हे तितकेच खरे.

### १.५.१ महाराष्ट्र वीरशैव सभा जिल्हा शाखा नांदेड

नांदेड जिल्ह्यातील वीरशैव लिंगायत समाजाच्या समस्या सोडविण्यासाठी महाराष्ट्र वीरशैव सभा पुणे याची एक शाखा स्थापन करण्याचा नांदेड जिल्ह्यातील वीरशैव लिंगायत बांधवाचा मनोदय होता. तो एक बैठक घेवून डॉ. सुभाष विश्वनाथ हुरणे यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २७.११.१९९४ रोजी महाराष्ट्र वीरशैव सभा जिल्हा शाखा नांदेडची स्थापना करण्यात आली. त्यामध्ये उपाध्यक्ष प्रभाकर विश्वनाथ उदगीरे, सरचिटणीस श्री प्रभाकर शिवलिंगअप्पा थोन्टे या सर्व कार्यकारणीची नेमणूक अध्यक्षाच्या मार्फत करण्यात आली. आजपर्यंत महाराष्ट्र वीरशैव सभा जिल्हा शाखा नांदेड या सभेला डॉ. हुरणे, शंकरराव पाटील, राजेंद्र हुरणे या अध्यक्षाचा काळ सभेसाठी लाभला आहे. महाराष्ट्र वीरशैव सभा पुणेची ही शाखा असून पुणेच्या शाखेचे जे उद्देश आहेत ते उद्देश नांदेडच्या शाखेचे आहे. या शाखेच्या उद्देशानुसार श्रीमान राजेंद्रअप्पा हुरणे कार्य करत असतात. महाराष्ट्र वीरशैव सभा जिल्हा शाखा नांदेड अध्यक्षपदी समाजसेवेची आवड असलेले राजेंद्रअप्पा हुरणे यांची इ.स. २००७ मध्ये एकमताने अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. त्यामुळे या शाखेचा पूर्ण कार्य करण्याचा कारभार त्यांच्या खांद्यावर येवून पडला. त्यांच्या कार्यामुळे संघटनेत नवचैतन्य प्राप्त झाले. संघटनेमार्फत करावयाच्या सार्वजनिक कामाची

यादी करुन एक एक काम पूर्ण करण्यासाठी सदैव कार्यतत्पर असतात. संघटनेत समाजातील सर्व थरातील बांधवाना समाविष्ट करुन संघटनेची बांधणी मजबुत केली. त्याचे वीरशैव युवा आघाडी, वीरशैव महिला आघाडी, वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टर्स अशा अनेक आघाड्या निर्माण करुन संघटनेसाठी हुशार व होतकरु लोकांची फळी त्यांनी निर्माण केली. श्री राजेंद्रअप्पा हुरणे यांनी गेली १० वर्षापासून संघटनेच्या विकासासाठी तरुण व्यक्तीची संघटनेत नियुक्ती करुन समाज संघटन करण्याचे कार्य केले आहे. त्यामध्ये प्राध्यापक, डॉक्टर, व्यापारी, शिक्षक यांचा सहभाग घेवून त्यांच्या कार्याची संघटनेशी नाळ जोडली आहे. महाराष्ट्र वीरशैव सभा जिल्हा शाखा नांदेड ही सामाजिक चळवळीतील एक संघटना आहे. वीरशैव लिंगायत समाजाला योग्य दिशा देण्याचे कार्य संघटनेतील श्री राजेंद्रभय्या हुरणे, राजन मिसाळे, मारकोळे अविनाश, देवराव चिंचोलकर, उदगीरे संघटनेतील सर्व सहकारी एकत्र येवून समाजाच्या समस्या सोडवण्याचे प्रयत्न करतात.

१) नांदेड जिल्ह्यामध्ये वीरशैव लिंगायत समाजाच्या न्याय व शांततेच्या मार्गाने महाराष्ट्रातील तसे नांदेड जिल्ह्यातील समाजाची संघटना करुन समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी व उत्पत्तीसाठी प्रगतीसाठी कार्य करणे. २) महाराष्ट्रातील जाती, पंथ, धर्मातील व्यक्तीच्या शैक्षणिक उन्नतीसाठी हुशार व गरजू विद्यार्थ्यांना त्यांच्या गरजेनुसार व विधीच्या उपलब्धतेनुसार संस्था वेळोवेळी ठरविल त्याप्रमाणे शैक्षणिक मदत देण्यासाठी शैक्षणिक विशिष्ट फंड निर्माण करणे, शैक्षणिक संस्था चालवणे, वीरशैव लिंगायत समाजाच्या शैक्षणिक उन्नतीसाठी कार्य करणे. ३) समाजाच्या उन्नतीसाठी व हितसंबंध रक्षणासाठी शासकिय पातळीवर प्रयत्न करुन समाजाच्या समस्या सोडवणे. ४) समाजाच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक संस्कार केंद्र चालविणे, सामुदायिक विवाह समारंभ घडवून आणणे, ग्रंथ प्रकाशित करुन समाजाचा विकास करणे. ५) समाजातील गरजू रुग्णांना संस्थेच्या नियमानुसार यथाशक्तीप्रमाणे वैद्यकीय मदत करणे. ६) वीरशैव लिंगायत समाजोन्नतीच्या कार्यासाठी काळाची गरज लक्षात घेऊन लेख, भाषणे, आदिच्या माध्यमातून सामाजिक सुधारणा करणे व समाजामध्ये सामाजिक प्रबोधन निर्माण करणे. ७) सभेच्या कार्यासाठी



आवश्यकतेनुसार भवन निर्मिती करणे, जमिनी घेणे, खरेदी करुन भाड्याने देणे, इमारती उभारणे. ८) सभेच्या कार्यासाठी समाजातील होतकरु लोकांची जिल्हानिहाय व तालुकानिहाय समित्या नेमून त्यांना कार्याचा विस्तार करणसाठी मदत करणे. ९) महाराष्ट्र वीरशैव सभा जिल्हा शाखा नांदेडच्या ध्येय व उद्देशाच्या पूर्तीसाठी आवश्यक ते सर्व प्रकारे कार्य करणे. हे सर्व उद्देश सामाजिक बांधिलकीच्या हेतुने नांदेडच्या शाखेने ठेवले आहे. यासाठी श्री राजेंद्र अप्पा हुरणे हे सदैव कार्यशील असतात. महाराष्ट्रातील वीरशैव सभा जिल्हा शाखा नांदेड च्या वतीने समाजातील अनेक समस्या सोडविण्याचे कार्य केले जाते. त्यामध्ये चैतन्यनगर महादेव मंदिराची निर्मिती असो की वीरशैव समाजासाठी नांदेडमध्ये स्मशानभूमीचा प्रश्न असे अनेक प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम शाखा नांदेडच्या वतीने केल्या जाते. वीरशैव समाजातील बांधवामध्ये जवळीकता व्हावी व एकमेकाबद्दल प्रेम व सहकार्याची भावना निर्माण व्हावी यासाठी दरवर्षी शाखा नांदेडच्या वतीने विविध समाजोपयोगी उपक्रम हाती घेऊन राबविले जातात. महाराष्ट्र वीरशैव सभेच्या उद्देशाप्रमाणे सर्व कार्य हाती घेण्याचे काम राजेंद्रअप्पा हुरणे यांचा सतत प्रयत्न असतो. समाजातील सर्व स्तरातील लोकांना त्यांचा फायदा व्हावा म्हणून ते पुढील उपक्रम दरवर्षी राबवतात.

१) नांदेड जिल्ह्यातील वीरशैव लिंगायत समाजातील गुणवंत विद्यार्थी व विविध स्तरातील गुणवंतांचा सत्कार महाराष्ट्र वीरशैव सभा जिल्हा नांदेड तर्फे श्री राजेंद्रअप्पा हुरणे यांच्या मार्गदर्शनाखाली व सर्व त्यांच्या पदाधिकाऱ्याच्या कार्याच्या नियोजनानुसार पार पडली जातात. या कार्यक्रमाला जिल्ह्यातील हजारो विद्यार्थ्यांचा सहभाग असतो. विद्यार्थ्यांचा सत्कार केल्यामुळे त्यांना प्रेरणा मिळते म्हणून समाजातील गुणवंत उद्या भारताचे गुणवंत होऊन अनेक क्षेत्रात आपले वर्चस्व निर्माण करावे यासाठी नांदेड शाखा प्रेरणा देत असते. समाज सुधारला तर जिल्हा सुधारेल व जिल्हा सुधारला तर राज्य व देश सुधारेल त्यामुळे देशाच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रेरणेला उजाळा देण्याचे काम ही गुणवंताचा सत्कार या कार्यक्रमातुन वीरशैव सभा नांदेड शाखा करत असते.

२) महाराष्ट्र वीरशैव सभा शाखा नांदेडच्या वतीने भव्य दिव्य असा उपवधु-उपवर

परिचय मेळावा दरवर्षी घेतला जातो. समाजातील सर्व बांधवांना एकत्रित करुन त्यांच्यामध्ये असलेले भेदभाव विसरुन त्यांना एकत्र आणण्याचे काम शाखा नांदेडची कार्यकारणी करत असते. सध्याच्या आधुनिक युगात व धकाधकीच्या जीवनात मानवाकडे सण, उत्सव, मेळावे, पारंपारिक गोष्टीकडे लक्ष देण्यासाठी वेळ उरला नाही. यातूनच वधु-वरांच्या माता-पित्यांना वधु-वर शोधण्यासाठी अशा परिचय मेळाव्याची उपयोगिता वाटत आहे. त्यामुळे अशा कार्यक्रमाला केदार जगदगुरु, अहमदपुरचे शिवलिंग शिवाचार्य महाराज, समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती, राजकारणी, काशीचे जगद्गुरु अनेक मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित असतात. श्री राजेंद्र अप्पा हुरणे आपल्या कार्यकारणीसह वधु-वर परिचय मेळावे भरवत असतात. कोणत्याही उपक्रमाची सुरुवात करणे सोपे असते. मात्र त्यात सातत्य राखणे अवघड असते. गेल्या २३ वर्षापासून महाराष्ट्र वीरशैव सभा जिल्हा शाखा नांदेड यांनी असे उपक्रम पार पाडले आहेत. अशा उपक्रमांना अनेक मान्यवरांना बोलावण्याचे कार्य श्री राजेंद्र हुरणे अप्पा करत असतात. कार्यक्रम घेवून त्यांची पुस्तिका निर्माण करण्याचे कार्य महाराष्ट्र वीरशैव सभा जिल्हा नांदेड शाखेचे सर्व कार्यकारणी समाजासाठी कार्य करत असतात.

३) सामाजिक कार्याबरोबरच महाराष्ट्र वीरशैव सभा ही रुणांना सुद्धा मदत करते. त्याचेच उदाहरण म्हणून २००८ मध्ये गुरु-ता-गद्दीच्या सोहळ्यामध्ये नांदेड वीरशैव शाखेतर्फे तत्कालीन मा. मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते नांदेड महानगरपालिकेला रुगणवाहिकेचे लोकार्पण करण्यात आले.

४) महात्मा बसवेश्वरांची जयंती दरवर्षी करण्याचा मनोदय सभेच्या मार्फत असतो. बसवेश्वरांच्या जयंती निमित्त वेगवेगळी व्याख्याने, सभा, रक्तदान शिबीरे हे सभेच्या मार्फत घेतले जातात.

५) नांदेडमधील वीरशैव लिंगायत समाजाच्या महिला डॉक्टर यांचा सत्कार महाराष्ट्र वीरशैव सभेच्या मार्फत केला जातो. जेणेकरुन समाजाबद्दल जाणीव होऊन समाज सहकार्याची भावना त्यांच्यामध्ये निर्माण होईल.

महाराष्ट्र वीरशैव सभा जिल्हा नांदेड यांच्या माध्यमातून वीरशैव समाजाची



'वीरशैव भवन' नांदेडमध्ये सर्व समाज बांधवांच्या सहकार्याने उभारण्याची जिद्द अध्यक्षांची आहे. ते वीरशैव समाजा बरोबर इतर समाजाचीही सेवा विविध माध्यमातून करता येईल. अशा रितीने नांदेड वीरशैव शाखा नांदेड ही आपल्या उद्देशाप्रमाणेच समाज बांधवांना वेगवेगळ्या सोयी सुविधा देण्यासाठी सतत प्रयत्नशील असते. याचे सर्वश्रेय अध्यक्ष व त्यांच्या कार्याकारणीला जाते. ज्या उद्देशाने या सभेची स्थापना झाली त्याला पुर्णत्वास नेण्याचे काम श्री राजेंद्रअप्पा हुरणे करताना दिसत आहेत.

### १.५.२ अखिल भारतीय शिवा संघटना

नांदेड जिल्ह्यामध्ये वीरशैव लिंगायत समाजामध्ये नवचैतन्य आणण्याचे काम शिवा संघटनेने केले आहे. नांदेड जिल्ह्यातील सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय अशा सर्वच क्षेत्रावर आपले वर्चस्व निर्माण करुन महाराष्ट्रामध्ये सुद्धा कार्य केले. महाराष्ट्रामध्ये वीरशैव लिंगायत समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रा. मनोहर धोंडे यांनी अखिल भारतीय वीरशैव शिवा संघटनेची २८ जानेवारी १९९६ ला स्थापना केली. प्रा. मनोहर धोंडे अभ्यासु व्यक्तिमत्त्व संस्थापक अध्यक्ष लाभले हे मोठे भाग्य या शिवा संघटनेचे आहे. शिवा संघटनेच्या माध्यमातून वीरशैव लिंगायत समाजाचे संघटन केले. पहिल्या ५ वर्षाच्या काळात महाराष्ट्रात अनेक शाखा स्थापन करुन महाराष्ट्रामध्ये ४५०० च्या वर शाखा स्थापन करुन वीरशैव लिंगायत समाजाचे संघटन केले. त्यानंतर त्यांनी समाजाचे धर्मिक, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, सांस्कृतिक प्रश्न सोडवण्यावर भर देवून कपिलधार क्षेत्राचा अलिकडच्या काळात मोठ्या प्रमाणात विकास घडवून आणला. शिवा संघटनेच्या माध्यमातून गेल्या २० वर्षाच्या कालखंडात कोट्यावधी रुपयाचा निधी शिवा संघटनेनी शासनाकडून मंजूर करुन तो विकासावर खर्च करण्यासाठी शिवा संघटना कार्य तत्पर आहे. अशा अनेक समाज उपयोगी कार्यातून प्रा. धोंडेच्या मार्गदर्शनानुसार शिवा संघटना करत असते. शिवा संघटनेच्या कार्यरत माध्यमातून प्रा. मनोहर धोंडे नांदेड येथे अखिल महाराष्ट्रीय शिवकीर्तनकार, प्रवचनकार, गायक, वादक, भजनी प्रमुखाची चिंतन बैठक घडवून त्यांना समाजसंघटन करण्यासाठी मार्गदर्शन करण्याचे काम ते करत

असतात. शिवा संघटना ही सदैव वीरशैव लिंगायत समाजाचे प्रश्न सोडवत असते. त्यामध्ये गाव तेथे स्मशानभूमी, गाव तेथे शिवा संघटना, वीरशैव लिंगायत जोडो अभियान, वीरशैव लिंगायत समाजाचे अनेक प्रश्न त्यांनी मार्गी लावले. त्यामध्ये महात्मा बसवेश्वराच्या नांदेड येथील पूतळ्याचा प्रश्न अशा अनेक समस्यावर शिवा संघटनेच्या माध्यमातून प्रा. धोंडे मनोहर समाजाचे प्रश्न सोडवण्यास अग्रेसर असतात. अखिल भारतीय शिवा संघटनेच्या मार्फत वीरशैव लिंगायत गुणवंतांचा सत्कार दरवर्षी केला जातो. समाजातील विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी यासाठी हा गुणवंताच्या सत्काराचे आयोजन केल्या जाते. वीरशैव लिंगायत गुणवंतामधून देशाचे चांगले नागरीक व भावी आय.ए.एस. अधिकारी घडावेत यासाठी प्रेरणा देण्याचे काम ते वेगवेगळ्या कार्यक्रमातून करत असतात. सामाजिक बांधीलकीच्या जाणिवेतून भविष्यातील मोठी स्वप्ने पाहून ती सत्यात उतरावी व वाटचाल करावी असे आवाहन प्रा. मनोहर धोंडे नेहमी करत असतात. गुणवंताच्या सत्काराला लाखोच्या संख्येने लोक एकत्र येतात. वीरशैव लिंगायत गुणवंताबरोबरच, सरपंच, उपसरपंच, राजकिय व्यक्ती अशा अनेकांचा सत्कार या कार्यक्रमात केला जातो. समाजाला एकत्र आणण्याचा प्रयत्न शिवा संघटनेच्या मार्फत केला जातो. प्रा. मनोहर धोंडे यांच्या अथक प्रयत्नातून समाजातील लोकांना एकत्र आणण्याचे कार्य सतत चालू आहे. दरवर्षी महात्मा बसवेश्वर जयंती साजरी करणे. वेगवेगळे अधिवेशन, सभा, परिषदा, व्याख्याने घेऊन वीरशैव लिंगायताना एकत्र आणण्याचे कार्य ते सतत करत असतात. त्यामध्ये नांदेड जिल्ह्यातील समाज संघटनेची एक ती प्रमुख विचारसारणी आहे. ही विचारसरणी नांदेड मधील वीरशैव लिंगायत समाजाला एकत्र आणून त्यांच्या समस्या सोडवण्याचे काम संघटना करत असते.

### १.५.३ बसव ब्रिगेड

नांदेड जिल्ह्यामध्ये महाराष्ट्र वीरशैव सभा शाखा नांदेड प्रमाणेच समाजातील लोकांना एकत्र आणण्याचे कार्य 'बसव ब्रिगेड' करत आहे. बसव ब्रिगेड या संघटनेचे संस्थापक ॲड. अविनाश भोसीकर असून ते नांदेडमधील युवकांना एकत्र आणण्याचे कार्य त्यांच्या 'बसव ब्रिगेड' मधून करत असतात. वीरशैव लिंगायत समाजातील



अनेक प्रश्नांना बसव ब्रिगेड सामोरे जावून ते मिटविण्याचे काम करत असते. वीरशैव लिंगायत समाजामध्ये संघटन घडवून आणण्याचे काम अविनाश भोसीकर सातत्याने करत असतात. बसव ब्रिगेडच्या माध्यमातून बसवेश्वर जयंती करणे, रॅलीचे नियोजन करणे, वेगवेगळ्या मोर्चामध्ये सहभाग घेऊन युवकाचे प्रबोधन करण्याचे कार्य बसव ब्रिगेड करत असते.

### १.५.४ महात्मा बसवेश्वर विचारमंच

नांदेड येथे महात्मा बसवेश्वर विचारमंचाची स्थापन करण्यात आली. या संघटनेच्या मार्फत म. बसवेश्वरांच्या विचारांची पेरणी करणे व समाज संघटन करणे हे महत्त्वाचे कार्य या विचारमंचाच्या मार्फत केल्या जाते. बसवेश्वर विचारमंचाच्या मार्फत अनेक व्याख्याने घेतली जातात. त्यामधून वीरशैव लिंगायत समाजाच्या विचाराना चालना मिळण्यासाठी अनेक विचारवंतांना बोलून त्यांचे विचार समाजापर्यंत पोहचविण्याचे काम ही संघटना करत असते. बसवेश्वर विचारमंचाच्या माध्यमातून वेगवेगळे शिबीरे घेणे, गुणवंतांचा सत्कार करणे, विशिष्ट कामगिरी केलेल्यांना पुरस्कार देणे इ. कार्य बसवेश्वर विचारमंचाच्या मार्फत केले जाते. जेणेकरुन समाजात चांगले काम करण्याची प्रेरणा मिळेल. महात्मा बसवेश्वर विचारमंच वीरशैव लिंगायत समाजाला संघटन करुन वेगवेगळ्या विचाराची उकल करत असते. नांदेड जिल्ह्यामध्ये महाराष्ट्र वीरशैस सभा, शिवा संघटना, बसव ब्रिगेड, महात्मा बसवेश्वर विचारमंच या संघटने मार्फत समाजाला एकत्र आणण्याचे व समाजातील समस्या सोडविण्याचे काम ह्या संघटना करत असतात. संघटना जरी वेगवेगळ्या असल्या तरी त्याचा एकच मुख्य उद्देश आहे तो म्हणजे समाजाचा विकास करणे व समाजाच्या समस्या सोडून एक आदर्श समाजाची निर्मिती करण्यासाठी प्रयत्न करणे.

### १.५.५ नंदी फाऊंडेशन

नांदेड जिल्ह्यातील ऐतिहासिक परंपरा लाभले दरगू घराणे त्यांनी आपला प्राचीन वारसा संरक्षित राहण्यासाठी जूना गंज इतवारा नांदेड या ठिकाणी नंदी फाऊंडेशनची स्थापना २०१३ रोजी केली. दरगु मोदी पुरातत्त्व हे सुद्धा मार्च २०१३ मार्च स्थापन करण्यात आले. नांदेड जिल्ह्यातील संशोधकाला या नंदी फाऊंडेशनच्या

सहकार्यामुळे नांदेड हस्तलिखित पुराव्याचा संदर्भ वापरता येतो. पुरातत्त्व संग्रहालयामध्ये, वीरशैव लिंगायत समाजातील अनेक संदर्भ ग्रंथ शैवागम, सिद्धांतसिखामणि, वचनसाहित्य, अभंग, संतसाहित्य, सारंगा मोदी जीवनी, हस्तलिखिते, ताम्रपट, प्राचीन कागदात्रे याचा पुरावा हा संग्रहालयामध्ये आजही पहावयास मिळतो. दरगु घराण्यातील शस्त्र, पुरातत्त्वीय संपदा, याचे संवर्धन करण्याचे कार्य सध्या प्रा. डॉ. शशिकांत दरगु मोदी करत आहेत. नंदी फाऊंडेशन मार्फत अनेक धार्मिक कार्यक्रम घेतल्या जातात. त्यामध्ये, शिवयोग शिबीर, शिवनामसप्ताह, व्याख्याने, श्रावणमास तापोनुष्ठान. असे अनेक धार्मिक कार्यक्रम व उपक्रम फाऊंडेशन मार्फत घेण्यात येत असतात. त्याचबरोबर बसवेश्वर जयंती, शिवयोग अभ्यास, राष्ट्रीय सेवा योजनेत मार्फत अनेक उपक्रम फाऊंडेशन मार्फत केले जातात. नंदी फाऊंडेशनच्या स्थापनेमुळे वीरशैव लिंगायत समाजातील साहित्याची जी कमतरता दुर झाली वाचनसाहित्य, शैवागम सिद्धांत, संत साहित्य या वर विपुल प्रमाणात संदर्भाची निर्मिती करुन जास्तीत जास्त वीरशैव लिंगायत समाजाचे तत्त्वज्ञान जनसामान्यापर्यंत पोहचविण्याचे काम नंदी फाऊंडेशन करताना दिसत आहे. नंदी फाऊंडेशनच्या मार्फत गरजू विद्यार्थ्यांना, संशोधकाला संशोधन करण्यासाठी या संदर्भग्रंथाची उपलब्धता मोफत केली जाते. जेणेकरुन त्या संशोधकाचे संशोधन समाजापर्यंत पोहचवून त्याचा फायदा होईल. नंदी फाऊंडेशनच्या माध्यमातून प्रा. डॉ. शशिकांत दरगू हे आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, स्थानिक परिषदा घेतात व त्यामार्फत नांदेड जिल्ह्याचा प्राचीन वारसा लोकापर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न करतात. विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शना बरोबरच श्रावण महिन्यात समाज प्रबोधना बरोबर धार्मिक बाबीवर व्याख्याने देतात. त्यांच्या व्याखानातुन सामाजिक, धार्मिक जनजागृती होण्यास मदत होते. अनेक मठाच्या शिवाचार्याच्या प्रवचनामध्ये प्रा. डॉ. शशिकांत दरगू सहभाग घेतात. त्यामुळे वीरशैव लिंगायत समाजामार्फत या नंदी फाऊंडेशनला 'बसवरत्न' असे पुरस्कार फाऊंडेशनचे कार्य पाहून देण्यात आले आहेत. वीरशैव लिंगायत साहित्याची माहिती मिळणारे एकमेव ग्रंथालय म्हणून 'नंदी फाऊंडेशन' च्या माध्यमातून हे कार्य पूर्ण होते.



बाराव्या शतकात विश्वामध्ये अद्‌भूत अपूर्व अशी क्रांती भारतातील कर्नाटक प्रांतात कल्याणनगरीत घडत होती. प्रथमच 'अनुभव मंटप' च्या रुपाने धार्मिक, सामाजिक, अध्यात्मिक, सांस्कृतिक, आर्थिक, नैतिक इ. सर्वक्षेत्रात जी वैचारिक, वैज्ञानिकदृष्ट्या मानवतेच्या विचारातून सक्रिय सहभागातून घडलेला बदल आजही आश्चर्यकारक वाटतो हे सर्व घडविणारे प्रेरक भक्त भंडारी महात्मा बसवण्णा व त्यांचे असंख्य शरण यांच्या श्रृंखलेत नंदीग्रामचा एक शरण सुरय्या यांचा कल्याणनगरीत सक्रिय सहभाग होता. शरण सुरय्या यांचे वंशज नंदीग्राम (नांदेड) येथील जुना गंज भागात राहतात. दरगु मोदी पुरातत्त्व संग्रहातील संस्कृत हस्तलिखितातून बाराव्या शतकापासून पुढील नंदीग्राम येथील घटनांची नोंद येथील हस्तलिखितातुन दिसून येते. शरण सुरय्या अनुभव मंटपामध्ये 'दासोह प्रमुख' म्हणून सेवा करत होते. सर्व शरणांचे 'दासोह' अर्थात भोजन प्रसाद झाल्यानंतर ते प्रसाद सेवन करत असत. असे संदर्भ 'बसवपुराणात अध्याय ३१' मध्ये दिसून येते. सुरय्या व कंधार येथील उर्लिगदेव गोदावरीच्या तीरावर बसलेले नंदवाड सध्याचे नांदेड येथे केलेल्या इष्टलिंग पूजाविधीचा उल्लेख श्री राजेंद्र जिरोबे 'श्री बसवेश्वर व पददलित शिवशरण' या पुस्तकात करतात. 'लिंग व दर्पण' वरील घटनेचा उल्लेख करतात. म्हणजेच शरण सुरय्या ह्या नांदेड येथील वीरशैव लिंगायत घराण्यातील दरगु घराणे प्राचीन असून त्याचे कार्य अतिशय महत्त्वाचे आहे. शरण सुरय्याच्या जीवनी वर त्यांच्या घराण्याचा इतिहास समजण्यास मदत होते. अनेक हस्तलिखितामधून येथील घराण्याचा इतिहास प्रकाशित होण्यास मदत होते. शरण सुरय्यांनी अनुभवमंटपात अनेक दिवस सेवा केली आहे. अनुभवमंटपात सुरय्या सहभागी होवून तेथील समानता, लोकसहभाग, पुरुषासह स्त्री शरणीचा सहभाग, वैचारिक मंथन या सर्वाची सुरय्याने अनुभूती घेतली आहे. 'दासोह केंद्रात' तो रममाण झाला होता. शरण सुरय्या नांदेडला आल्यानंतर त्यांनी नंदीग्राम येथे नंदीची स्थापना केली. बाराव्या शतकात नंदीग्राम परिसरात अनेक नंदीची स्थापना करण्यात आली. त्यामध्ये लहानचा बसवन्ना, येवली येथील बसवण्णा मंदिर, रायेवाडी येथील मंदिर, शिराढोण परिसरातील नंदी अशा अनेक ठिकाणी नंदीची स्थापना करण्यात

आलेली आहे. त्याचाच वारसा सध्या प्रा. शशिकांत दरगु चालवत आहे. दरगु सुद्धा आपला वंशजाचा वारसा अनेक कार्यक्रमातून, साहित्यातून, प्रवचनातून प्रकाशात आणत असतात.

**१.५.६ श्री सचखंड गुरुदरबार परंपरा व वीरशैव लिंगायत परंपरा**

दरगु परिवाराच्या मार्फत वीरशैव लिंगायत परंपरेचा वारसा समजण्यास मदत होते. बाराव्या शतकापासूनच चालत आलेल्या ह्या परिवाराच्या परंपरा त्यामध्ये नंदीपूजन, बिल्वार्चना, महाकाळेश्वर पूजन, ईश्वरपूजन इत्यादी पूजाविधी वीरशैव लिंगायत परंपरेतील आहेत. केवळ श्री सचखंड गुरुदरबारातील पूजा पद्धती ही शिख धर्माशी संबंधीत आहे. ही पूजा पद्धती दरगु परिवाराकडून इ.स. १९१० रोजी शिख धर्माकडे हस्तांतरीत झाली आहे. त्यावेळी सारंगा दरगु मोदी हे या परिवारातील प्रतिनिधी होते. तख्त सचखंड श्री हुजूर साहब येथे जी अखंडीत परंपरा चालू आहे त्याचे वीरशैव परंपरेशी कसे साम्य आहे ते आपल्याला खालील बाबीवरुन दिसून येते.

**१.५.६.१ ध्वज :**

वीरशैव लिंगायत समाजामध्ये ध्वज हे संस्कृतीचे प्रतीक मानल्या जाते. त्यापैकी वीरशैव ध्वजास नंदीध्वज असे म्हणतात. तर काही ठिकाणी त्याला महादेवाची काठी म्हणतात. ध्वजाच्या दंडास खालपासून वरपर्यंत कापड गुंडाळण्याची पद्धत आहे. याशिवाय पंचाचार्याच्या पीठाचे पाच ध्वज आहेत. त्यांचा रंग हिरवा, लाल, निळा, पिवळा, पांढरा आहे. पंचाचार्य हे ध्वज धारण करतात. तर शिख परपंरेत ध्वजास 'निशाण साहिब' असे म्हणतात. निशाण दंडास खालपासून वरपर्यंत केसरी वस्त्र गुंडाळले जाते. पंचप्यारे साहेब पंचध्वज हातात धारण करतात.

**१.५.६.२ त्रिकालपूजन :**

वीरशैव परंपरेत गुरु समाधीचे दररोज त्रिकाल पूजन केले जाते. त्याचप्रमाणे शिख गुरु गोविंदसिंह यांच्या समाधीचे त्रिकाल पूजन केले जाते.

**१.५.६.३ शंख :**

वीरशैव लिंगायत समाजामध्ये दररोज आचार्य समाधी पूजेत शंख पूजन करुन



तो वाजवितात तर शिख परपंरेतील नंदीग्राम येथील श्री सचखंड गुरुद्वारामध्ये दररोज शंख वाजविला जात असे. आज तो न वाजवता आता केवळ पूजेत ठेवला जातो.

**१.५.६.४ आरती :**

वीरशैव समाजामध्ये आचार्यच्या समाधीची पूजा करताना वीरशैव समाज समाधीची आरती करतात. तसेच शिख परंपरेत श्री गुरु गोविंदसिंह यांच्या समाधीचे पूजन करताना नित्य आरती केली जाते.

**१.५.६.५ प्रसाद :**

वीरशैव लिंगायत समाजामध्ये गुरु समाधीच्या पूजेनंतर वीरशैव प्रसाद देतात. त्यास दासोह किंवा गुरुचा प्रसाद असे म्हणतात. तर शिख गुरु पूजेच्यानंतर जो प्रसाद देतात. त्यास 'गुरुप्रसाद' किंवा 'कडाव प्रसाद', 'गुरु का लंगर' ही म्हणतात.

**१.५.६.६ गुरु :**

वीरशैव लिंगायत समाजामध्ये गुरुला अतिशय महत्त्व आहे. वीरशैव परंपरेत पंचाचार्याला जेवढी महती आहे तेवढीच शिख परंपरेत पंचप्यारे साहेबांना आहे.

**१.५.६.७ बांधकाम पद्धती :**

दरगु मोदी वंशातील व्यक्तीनी केलेल्या बांधकामामध्ये एक साम्य पाहावयास मिळते. जसे मोदी वंशाचे कुलदैवत श्री ईश्वर मंदिरातील बांधकाम व श्री गुरुद्वार नंदीग्राम येथील बांधकाम पद्धती जवळपास सारखीच आहे. मंदिरातील गाभारा, सभामंडळ, गर्भगृह, द्वार, कळस इ. बांधकामात साम्य पाहावयास मिळते. याशिवाय वसमत येथील लासिनमठ येथील गुरुची समाधी श्री गुरु गोविंद सिंह यांच्या समाधीची रचना सारखीच आहे.

❒❒❒

# २. वीरशैव समाजाचे धार्मिक जीवन

मनुष्य जसा समाजात राहतो त्याचप्रमाणे तो धार्मिक परंपरेतही वावरत असतो. मनुष्याने समाजामध्ये राहताना योग्य प्रकारे व सर्व बंधनात जीवन जगण्यासाठी धार्मिक प्रवृत्तीची निर्मिती केली आहे. म्हणजेच धार्मिक आचरण पद्धती ही माणसाच्या जीवनाची व कर्तव्याची एक व्यवस्था असते. आचार-विचार, कर्तव्य, निती, सदाचार हीच व्यक्तीची खरी धार्मिक श्रद्धा आहे. या धार्मिक प्रवृत्तीचे त्यांनी योग्य आचरण केले तर समाजाचे स्वरुप सुसंस्कृत बनल्याशिवाय राहणार नाही. "मनुष्य समाजात वावरत असताना कोणत्या तरी धार्मिक व्यवस्थेशी बांधला जातो. म्हणूनच धार्मिक जीवन हे एका व्यक्तिच्या व्यक्तिगत जीवनासाठीच नव्हे तर सामाजिक नैतिक आणि अध्यात्मिक जीवनासाठी अत्यंत उपयुक्त आहे."

## २.१ धार्मिक परिस्थिती

नांदेड जिल्ह्यामध्ये वीरशैव लिंगायत वाणी समाज जिल्ह्यातील वेगवेगळ्या धार्मिक विधी पार पाडतो. वीरशैव लिंगायत समाजाचे तत्त्वज्ञान अष्टावरण, पंचाचार, षट्स्थल या त्रिरत्नावर आधारलेले असून हे तीन रत्न अष्टावरण म्हणजे 'अंग', पंचाचार म्हणजे 'प्राण' आणि षटस्थल म्हणजे 'आत्मा' होय. म्हणजे मनुष्याच्या जीवन जगण्याच्या अंग, प्राण, आत्मा असल्याशिवाय मानवाचे जीवन निरर्थक आहे. नांदेड जिल्ह्यामध्ये वाणी, तेलीवाणी, कोष्टीवाणी, लिंगवत, लिंगवर्ण अशा वेगवेगळ्या पोटजाती असून सर्वाचे आराध्य दैवत शिवच आहे.

धार्मिक भावना मानवाच्या विकासासाठी व चांगले आचार नैतिकतेत बदल करण्यासाठी महत्त्वाचे कार्य बजावतात. धार्मिक तत्त्व व्यक्ती व समाजाच्या भल्यासाठी कार्य करु शकतो. धार्मिक बाबीचा अवलंब केला तर मनुष्याला अज्ञानाकडून ज्ञानाकडे घेऊन जाण्याचे, अनैतिकतेकडून नैतिकतेकडे घेऊन जाण्याचे खऱ्या अर्थाने मनुष्याला मानव बनविण्याचे कार्य करु शकते. कोणताही धर्म व्यक्तीला सदाचारी बनविण्यासाठीच निर्माण झालेला असतो. समाज व देशाच्या घडणीमध्ये व्यक्तीची भूमिका महत्त्वाची असते. कारण व्यक्ती समूह मिळूनच समाज



व राष्ट्र बनतो. त्यामुळे व्यक्तीचे अंतरंग व बहिरंग धार्मिक भावनेशी निगडीत असेल तर ते शुद्ध आचरण करतील. कारण समाज व धार्मिक जीवनाला सदाचाराची जोड असणे अतिशय महत्त्वाचे आहे. वीरशैव लिंगायत समाजाच्या धार्मिक तत्त्वज्ञानातील लिंगधारण, अष्टावरण, पंचाचार, षट्स्थल, संस्कार व्यवस्था, दीक्षा संस्कार अतिशय महत्त्वाचे आहे. संस्कारातून व्यक्ती एका आवरणात राहून सदैव चांगल्या कार्याची निर्मिती करत असतो. वीरशैव लिंगायत समाजाचे दैवत शिव आहे. शिव हे अंतिम सत्य असून जग हा आभास नसून सत्य आहे. कारण माया म्हणजेच ईश्वराची शक्ती आहे. ती शक्ती शिवा शिवाय मिळू शकत नाही. विश्वाची निर्मिती ही मायेच्या - शक्तीपासून होते. वीरशैवाच्या मताप्रमाणे माया हे विश्वाच्या निर्मितीचे कारण आहे. शिव हा सर्व चैतन्यमय व शक्तिमान असला तरी त्याची शक्ती (माया) हेच निर्मितीत महत्त्वाचे कारण आहे. त्यामुळे वीरशैव समाजातील लोक शिवालाच अंतिम सत्य मानतात. भारतातील अत्यंत प्राचीन उपासना पद्धतीपैकी शिवोपासना एक आहे. लिंगपूजा, रुद्र पूजा प्राचीन काळात केल्या जात असत. नांदेड जिल्ह्यातील वीरशैवाचे धार्मिक आचरण हे शिवाच्या भक्ती भोवतालीच फिरते. चंद्रशेखर शिवाचार्य यांच्या मते 'वीरशैव समाजाची स्थापना एकोरामाध्य यांनी केली; सोरटी सोमनाथ मंदिरातील एका शिलालेखावरुन त्याला आधार देता येतो. त्यामुळे वीरशैव समाजाच्या स्थापनेत पंचाचार्यांचाही समावेश करावा लागेल.' प्राचीन काळात शिवलिंग व प्रतिभेच्या रूपात शिवपूजा केली जात असत. सिंधू संस्कृतीच्या उत्खननात सापडलेल्या अवशेषावरुन दिसून येते. प्राचीन महाराष्ट्र हा प्रामुख्याने शिवपूजक होता. लिंग हे शंकराचे प्रतीक आहे. नांदेडचाही परिसर शिवपूजक होता. कारण नांदेडचे नावच महादेवाच्या नंदीवरुन पडले. त्यामुळे सहाजिकच येथे शिवाची उपासना करणाऱ्या लोकांची संख्या असावी कारण नांदेडच्या अनेक परिसरात नटराज, अर्धनारी, नृत्यमूर्ती, लिंगोदभव मूर्ती, शिवमंदिरे नांदेड जिल्ह्यात आढळून येतात. वीरशैव लिंगायत समाजाच्या प्राचीन धार्मिक परंपरेचा येथे विकास झालेला दिसून येतो. लिंगधारणा, अष्टावरण, पंचाचार व षटस्थल हा वीरशैव समाजाचे धार्मिक अविष्कार होय. वीरशैव समाजाचे अष्टावरण सिद्धांत हे धार्मिक व्यवस्थेचे

शरीर पंचाचार हा श्वास तर षटस्थलाचा मार्ग हा आत्मा आहे. वीरशैवांनी कोणत्याही व्यक्तीला वंश, वर्ण, लिंग, जात किंवा धनाच्या आधारावर उच्च स्थान दिले नाही तर सर्वांना समान वागणुक दिली आहे. म्हणजेच मानवतावादी दृष्टीकोन होय. वीरशैवांनी लिंगप्रतिमेची दैनंदीन पूजा हेच धार्मिक नित्यकर्म मानले आहे. समाजात राहून उत्कट शिवभक्ती आणि शुद्ध आचरण यांच्याद्वारे आत्मोद्धार साधावा असे सोपे धार्मिक तत्वज्ञान वीरशैव लिंगायत समाजात आहे. मानवाच्या वर्तमानकाळातील हालचालीवर रितीरिवाजावर आचार-विचार पद्धतीवर गतकालीन घटकांचा स्पष्ट परिणाम दिसून येतो. विशेष करुन धार्मिक बाबतीत हजारो वर्षापूर्वी झालेले धार्मिक स्वरुपाचे बदल आजही आपल्या आचरणात दिसून येतात. सर्व त्या घडलेल्या धार्मिक घटनेचा परिणाम आहे. वीरशैव समाजाचा धार्मिक दृष्टीकोन हा मानवतावादी, अहिंसावादी, समतावादी व विश्वबंधुत्ववादी असून जगात शांतता आणि सुरक्षितता स्थापन करण्याची तत्त्वे वीरशैव समाजाच्या धार्मिक भावनेत आहेत. वीरशैव समाज हा सरळमार्गी, शांतवृत्तीचा, समजून घेणारा, सर्वात मिळून मिसळून राहणारा समजला जातो. तो शिवाला परमदैवत माणून पंचाचार्य प्रणीत धार्मिक विधींना नित्यसेवेमध्ये आचरणात आणत असतो.

व्यक्तीच्या पवित्र गोष्टीवरील श्रद्धा आणि त्यांच्याशी संबंधीत असणारे आचरण हे कोणत्याही समाजाचे धार्मिक अंग असते. हे अंग धार्मिक तत्त्वज्ञानाच्या मूलभूत व्यवस्थेवर आधारित असतात. वीरशैव समाजाचे धार्मिक जीवन पाहत असताना वीरशैवाचे तत्त्वज्ञान पाहणे अत्यंत महत्त्वाचे आहे. वीरशैवाच्या तत्त्वज्ञानामध्ये लिंगधारणा, अष्टावरण, पंचाचार व षट्स्थल या मुलत्वाचा समावेश होतो. लिंगधारणा हे वीरशैव जगताचे पायाभूत धार्मिक तत्त्व आहे. वीरशैव समाजाच्या स्त्री व पुरुष यांच्या अंगावरील नित्य लिंग धारणा हे वीरशैव समाजाचे धार्मिकतेच्या अस्तित्व व अस्मितेचा एक महत्त्वाचा मुलमंत्र आहे. समाजाची प्रगती व विकास त्यांची संस्कृती ही समाजाच्या सिद्धांतावर अवलंबून असते. समाजाच्या तत्त्वज्ञानावरुनच समाजातील लोकांचे आचरण नीतीपूर्ण होईल. समाजाची उन्नती होण्यास व समाज सदाचारी बनण्यास त्याचा उपयोग होईल. वीरशैव समाजामध्ये जीव, जगत आणि जगदीश



यांचे स्वरुप आणि परस्पर संबंध जाणने म्हणजे त्या समाजाचे सिद्धांत होय. शैव सिद्धांतानुसार शिव हा 'निर्गुण' आहे. निर्गुण म्हणजे 'सत्व, रज, तम या प्राकृतिक गुणांचा अभाव असा आहे. त्यामुळेच शिव निर्गुण, निर्मल व तत्पर असा आहे. शिवाच्या ठिकाणी आठ गुण आहेत. ते म्हणजे स्वातंत्र्य, शुद्धी, आत्मज्ञान, सर्वशक्तिमान, मलराहित्य, अनंतप्रसाद, सर्वज्ञत्व, आनंद हे होत. वीरशैव समाजामध्ये शिवाबरोबर शिवाच्या शक्तिलाही महत्त्व प्राप्त झालेले आहे. त्यालाच सिद्धांत शिखामणिमध्ये शिवाद्वैतशब्द, श्रीकरभाष्यात विशेषाद्वैतशब्द, क्रियासारादी ग्रंथात शक्ति विशिष्टाद्वैत शब्द योजिला आहे. या तीन्ही शब्दामागील तात्विक भूमिका सारखीच आहे. वीरशैवांचे विशिष्टाद्वैत तत्त्वज्ञान अतिप्राचीन असून अनेक विद्वानांनी आता ते मान्यही करण्यात आला आहे. "परमपावन अशा वीरशैवाचा दार्शनिक सिद्धांत विशैषाद्वैत, शिवाद्वैत आणि शक्ति विशिष्टाद्वैत अशा सार्थ नावानी ओळखला जातो. या नावाच्या व्यक्तीचे अवलोकन केल्यास वीरशैव समाजाच्या सिद्धांताच्या दार्शनिक तत्वाचे ज्ञान होते."

### २.१.१ विशैषाद्वैत

वीरशैवाचा मार्ग कर्मप्रधान असून तो निष्काम कर्माचा पुरस्कार करतो. म्हणून तो शुराचा, वीराचा मार्ग आहे असे मानले जाते व तो शिवाला अंतिम सत्ता मानत असल्यामुळे त्याला वीरशैव असे नाव मिळाले आहे.

'विश्व शेषश्च विशषौ:
ईशजीवौ; तयोरद्वैतं विशेषाद्वैतम्'

ही विशैषाद्वैत शब्दाची व्युत्पती करण्यात आलेली आहे. याचे तात्पर्य असे की 'विश्वक्षुषि व्योकिन वाते, परमात्मानि, पाक्षिणी'. एकाक्षर कोशात 'वि' : या अक्षराचे डोळे, आकाश, वायु पक्षी, परमात्मा असे पाच अर्थ सांगितले आहे. त्यामुळे 'वाति उत्पादयाति जगदिति विः अशा व्युत्पत्तीने जगाची निर्मिती करणाऱ्या परमात्म्याला 'विः' असे म्हणावे लागेल.

'यतो वा इमानि जायन्ते येन जातानि जीवन्ति
यत्थ्रयन्ति अभिसंविशान्ति तद्विजिज्ञासस्व तद्ब्रम्हा।।'

या उपनिषदाच्या वाक्यावरुन 'वि' हा शब्द उच्चारत असताना परमात्म्याचा 'शेष' शब्द वाय्य अशा जिवास्म्याला मूलस्थितीत अद्वैताचे बदन करणारा हा वीरशैव शब्दात विशैवाद्वैत असे म्हणविला जातो. 'शेष' म्हणजे त्या परमात्म्याचा अंश असलेला जीवात्मा असा अर्थ घेतला आहे. 'यशाऽग्रे क्षुद्रा विस्फुलिंगा (बृहदारण्यक २-१-२०) अशा श्रृतिवचनात अग्निकणाच्या दृष्टांताने जीवात्मा हा परमात्माचा अंश होय असे सांगण्यात आलेले आहे.

'यथा नद्य : स्यंदमाना :
समुद्रे ऽ स्तंगच्छति'

या वृत्तीत अभेद दाखवला आहे. म्हणजे समुद्राला मिळण्यापूर्वी नदी समुद्रापेक्षा वेगळी दिसत असली तरी त्याला मिळाल्यानंतर आपले नाव विसरुन अभिन्न होते. त्याचप्रमाणे संसारदशेत परमात्म्यापेक्षा भिन्न दिसणारा अंग असा जीवात्मा मुक्तीच्या दशेत अभिव्यक्त राहत असतो. अशा जीवात्म्याला मुक्तिस्थितीत अद्वैतात बोधन करणारे हे वीरशैव दर्शनाला 'विशैषाद्वैत' म्हटल्या जाते.

**२.१.२ शिवाद्वैत :**

'शिवश्व शिवश्व शिवौ, तयोरद्वैत' शिवाद्वैतम्' ही शिवाद्वैत शब्दाची व्युत्पती आहे. यामध्ये शिवपद दोनवेळा येते. शिवा या शब्दाचा अर्थ परमात्मा, दुसऱ्या शिव शब्दाचा अर्थ परमात्म्याचा अंश असणारा जीवात्मा' असे आहे. ज्याला वीरशैव परिभाषेमध्ये अंग म्हटले आहे. संसारदशेत जरी भेद असला तरी मुक्ताव्यवस्थेत त्यांच्यातील अद्वैत प्रकट करणाऱ्या वीरशैव सिद्धांतास 'शिवाद्वैत' असे म्हणतात.

**२.१.३ शक्ति विशिष्टाद्वैत :**

'शक्तिश्च शक्तिश्च; शक्तिः ताभ्यां विशिष्टे यौ जीवैशौ तयोरद्वैतं शक्ति विशिष्टाद्वैतम्' या पदाची अशी उत्पत्ती आहे. शक्ती स्थूल सुक्ष्म भेदाने तयार झालेला आहे. यामध्ये सुक्ष्मशक्ती हे ईश्वराचे अंग असून स्थुल शक्ती म्हणजेच 'जीव' होय. सुक्ष्म शक्तीच्या कारणाने शिव 'सर्वज्ञ' सर्वकर्ता आहे. त्यानुसार या सर्वज्ञत्व आणि अल्पज्ञत्वादी धर्माच्या भेदामुळे जीवेश्वरामध्ये भेद दिसतो. शिवाचा अंश असा हा जीवन शिवामध्ये समरस न होता कृतकृत्य होत नाही. जीवात्मा



शिवामध्ये समरस होण्याचा मार्ग उपदेशिणारा वीरशैव धार्मिक सिद्धांत 'शक्तिविशिष्टाद्वैत' म्हणून ओळखला जातो. अल्पज्ञत्वादी संकुचित शक्तीनी युक्त अशा जीवात्म्याला सदगुरु जेव्हा दीक्षा देतात त्यावेळी त्यांच्या ठिकाणच्या आणवादी मलत्रयांचा नाश होऊन त्यांच्या अल्पज्ञत्वादीशक्तीचे भक्तिमध्ये परिवर्तन होते. त्याची साधना वाढेल तसतशी श्रद्धा, निष्ठा, अवधान, अनुभव, आचार-विचार, आनंद आणि समस्त भक्ती साधकाला साध्य होते. भक्तीच्या साह्याने भक्त, महेश, प्रसादी, प्राणलिंगी, शरण आणि ऐक्य अशा स्थलांतून प्रवास करीत शेवटी ऐक्यस्थलात समरस भक्तीच्या प्रभावाने आपल्या संकुचित शक्तीचा पूर्ण विकास झाल्याने विकसित शक्तियुक्त अशा परशिवात त्याचे समरस होणे हीच मूक्ती होय. ह्या मार्गाचा उपदेश करणारा वीरशैव सिद्धांत 'शक्तिविशिष्टाद्वैत सिद्धांत' म्हणविला जातो.

वीरशैव समाजाच्या तत्त्वज्ञानामध्ये संस्कृती, संस्कार, नीतिशास्त्र, वैयक्तिक, कौटुंबिक सामाजिक जीवन या सर्वाच्या दृष्टीने इष्टलिंगाला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. वीरशैव लिंगायत म्हणजे इष्टलिंग धारण करणारा समाज होय. वीरशैव समाजामध्ये अंगावर इष्टलिंग नित्य धारण करण्याची प्रथा आजही आपल्याला दिसून येते. लिंगपूजा भारतताच नव्हे तर असीरीया, बॉबीलोन, इजिप्त इ. प्राचीन संस्कृती असलेल्या देशातही प्रचलित होती. डॉ. मार्शल यांनी सिंधू संस्कृतीत रुढ असलेली लिंगपूजा स्पष्ट केली आहे. महाभारताच्या काळापर्यंत हा लिंगपूजेचा समन्वय झालेला आहे. त्यात शिवाची लिंगरुपात पूजा करावी कसे म्हटले आहे. स्थानू, रुद्र, वृषभध्वज इ. शब्द शिवासाठीच पर्यायी म्हणून आलेले आहेत. त्यामुळे वीरशैव लिंगायत समाजाची लिंग पूजा ही किती प्राचीन आहे हे आपल्याला समजते.

शिवाच्या किंवा शंकराच्या लिंगाची पूजा करण्याची पद्धत फार दीर्घकाळापासून चालत आलेली आहे. महाभारत काळात महेश्वर किंवा रुद्र व वैश्विक पुरुष हे पूर्णपणे एकच असल्याचे समजते. रा.गो. भांडारकर यांनी म्हटले आहे की, 'लिंगाची पूजा करणारे लोक हे भारताचे मूळ रहिवाशी आहेत.' रुद्र-शिवाच्या लोकांनी वनवासी व रानावनात भटकणाऱ्या लोकापासून प्रचलित असलेल्या कितीतरी गोष्टीचा स्वीकार केला आहे. आर्याने लिंगपूजेचा स्वीकार त्यांच्याकडूनच केला आहे.

"अलिंग लिंगमूलं तु अव्यक्तं लिंगमुय्यते
आलिगः शिव इत्सुक्ती लिंग शैवमिति स्मृतम् ।।"

निराकार रुद्राची, शिवाची किंवा महादेवाची पूजा करणे भक्तांना अश्यम्य ठरल्यामुळे त्यांनी त्याचे प्रतीक किंवा खूण म्हणून शिवलिंगाची पूजा प्रचलित झाली.

'लिंग' या शब्दाचा अर्थ केवळ जननेंद्रिय असा संकुचित नसून तसे ते घेणे पण चुकीचे आहे. मेदिनीकोशात 'लिंग' या शब्दाचा अर्थ पुढील प्रमाणे दिला आहे.

"लिंग चिनहे ऽ नुमानेच सांख्योक्त प्रकृतावलिपि।
शिवमूर्ती विशेषेच मेहनेऽपि नपुंसकम्।।"

'लिंग' या शब्दाचा खरा अर्थ हा चिन्हे, अनुमान, संख्या शास्त्रातील प्रकृती शिवमूर्ति विशेष व शिश्न असे वेगवेगळे अर्थ असून तो शब्द नंपुसक आहे. यावरून 'लिंग' या शब्दाचा अर्थ 'जननेंद्रिय' या सोबत लावणे इष्ट होणार नाही. लिंग या शब्दाची 'सुप्रभेदागमा' मध्ये असे दिलेले आहे,

"लयं गच्छति भूतानि संहारे निखिलं यतः
सृष्टिकाले पुनः सृष्टिं तस्मालिंगमुदाहतम्।।"

तात्पर्य असे की, लिंग म्हणजे ज्यात सर्व लय पावते ते होय. प्रलयकाली भूतांसह सर्व जग लिंगाच्या ठिकाणी लय पावते व सृष्टिकाली पुनः त्यातूनच आकाराला येते. म्हणून त्याला लिंग म्हटले आहे. लिंग म्हणजे स्वः शिवच आहे. लिंगधारणाही इतकी प्राचीन आहे. जून्या काळातील लोकांनी स्विकारलेली आहे. याचा पुरावा आपल्याला खालील 'लिंगपुराणातील' श्लोकावरुन समजते.

"विष्णु ब्रम्हादयोदेवा मुनयो गौतमाद्यः
धारयंति सदालिंगम उत्तमांगे विशेषतः"

भारतातील बहुसंख्य ठिकाणी प्राचीन मंदिरातील दैवतांच्या अंगावर लिंगधारणा असलेली आढळून येते. त्यामुळे लिंगधारणेचे प्राचीनत्व आपल्या लक्षात येते. प्राचीन काळातील वीरशैव समाजाची पसरलेली लोक-वस्ती यावरुन ह्या समाजाची प्राचीनता सांगताना पंडित काशीनाथ शास्त्री म्हणतात की, "प्राचीन काळी भरभराटीस



आलेले वीरशैव मत अन्यमतीय राजांच्या जुलुमामुळे कमी होत आहे. परंतु लिंगधारणा करत असल्यामुळे प्राचीन काळी वीरशैव मताचे वैभव केवढे मोठे होते याची महती आपल्याला सांगता येईल. संसाराच्या कार्यामुळे दैनंदीन जीवनात तो धार्मिकतेत विलिन होतो इष्टलिंग म्हणजे शुभ, कल्याणकारक गोष्ट. मनुष्याला जे हवे तसे मनात योजेले त्याला इष्ट असे म्हणतात. इष्टलिंगाच्या धारणेमुळे ऐश्वर्य, सत्ता, मान, सन्मान ही सुख इष्ट असतात लिंगाच्या इष्टतेमुळे पारमार्थिक इष्टाची प्राप्ती होते. वीरशैवात स्त्री-पुरुष दोघांनाही इष्टलिंग धारण व इष्टलिंगपूजा यामध्ये समान अधिकार आहेत. इष्टलिंगधारणेमुळे शरीर शुद्ध मनाने पूजा करते. वीरशैवाचे धार्मिक मुळ हे लिंगधारणा तत्त्व आहे. लिंगधारणेच्या तत्त्वाचा दावा इतर कोणीही करु शकत नाही. आज देखील वीरशैव लिंगायत समाज अंगावरील लिंगाबरोबरच जीवन व्यतित करतात व शेवटपर्यंत लिंगाची पूजा करतात जी की जीवन संपेपर्यंत. म्हणून वीरशैव समाजालाच, लिंगायत, लिंगवंत, लिंगागी, लिंगधर या नावानेही ओळखतात. वीरशैव हा शब्द 'लिंगायत' या शब्दापेक्षा जुना असला तरी आज आपण वीरशैव लिंगायत ह्याच नावाने ओळखतो. आजही बऱ्याच लोकांमध्ये मतभेद आहे की वीरशैव व लिंगायत वेगळे आहेत पण वीरशैव व लिंगायत एकच आहेत. हे लोकांना समजत नाही. हे समाजाचे खरे दुर्दैव होय. वीरशैव समाजाचे लोक आपल्या अंगावर इष्टलिंग धारण करतात म्हणजेच लिंगधारणा करत असताना आत्मिक धन्यता ही लिंगधारणेतून होत असते. म्हणून डॉ. आंबादास माडगुळकर यांनी असे म्हटले आहे की, 'लिंग हे अंतिम सत्याचे प्रतीक, उच्चता, पवित्रता म्हणून देहावर नित्य धारण करावयाचे असते.' सद्‌गुरुकडून दीक्षा घेऊन "इष्टलिंगधारी होऊन शिवजीवाचे एकत्व शिकविणाऱ्या विद्येत जो शिवभक्त सदा रमतो तोच खरा वीरशैव." सद्‌गुरुकडून दीक्षोत्तर इष्टलिंग धारण करणारा शिवभक्त असा विशेष अर्थ घेतला जातो. त्यामुळेच म्हटले जाते की,

"इष्टलिंग वियोगे वा व्रताना वा परिच्युतौ।
तृणवत् प्राण सन्त्याग इति वीरव्रतमतम् ।।
भक्त्युत्साह विशेषो ऽपि वीरत्वमिति कथ्यते।

वीरव्रत समायोगार वीरशैव प्रकीर्तितम्।।"

गुरुने इष्टलिंग दिल्यानंतर शरीरापासून वियुक्त (विरक्त) झाल्यास आपल्या प्राणाचा क्षणात तृणवत् त्याग करण्याचे वीरव्रत पालन करणारे शिवभक्तच वीरशैव होत. गुरु शिष्यांना पंचाक्षरी मंत्रोपदेशाने इष्टलिंग प्रदान करतात म्हणून दीक्षा घेतलेल्या व्यक्तीला -

"प्राणवद्धारणीय तत्प्राणलिंग्डमिद तव।

कदाचित् कुत्रचिद्वापि न वियोजय देहतः।"

गुरुचा हा आदेश चुकुन पाळला गेला नाही आणि अकस्मात प्रमादाने इष्टलिंग शरीरापासून वेगळे झाले असता आपला प्राणत्याग करण्याचे वीरव्रत शिवभक्तच असतो. इष्टलिंग धारणा वीरशैव मनोभावनेने आत्यांतिक निष्ठेने लिंगधारणा करत असतात. कारण ते त्यांच्या धार्मिक श्रद्धेचे लक्षण आहे. नेहमी आपल्या अंगावर लिंगधारणा करणे व लिंगनिष्ठा सद्भावनेने प्रेरित करणे, याला महत्त्व आहे. लिंगधारणा केल्यानंतर तो इष्टलिंग आजन्म वीरशैवाच्या हृदयावर असतो. याच देवाला अहर्निश साक्षी ठेवूनच वीरशैव समाजाची व्याप्ती कोणतेही कार्य पार पाडत असतो. असे इतर कोणत्याही समाजात नाही. लिंगधारणा ही सामाजिक समता, सामाजिक समन्वय, अहिंसा, कायकता ही वीरशैवाची तत्त्वे आहेत. लिंगधारणा केल्यानंतर प्रत्यक्ष महादेवाला किंवा शिवाला साक्षी धरुन काम करत असल्यामुळे तो योग्य ते कार्य करत असतो. अंगावरील लिंगधारणा समाजाचे प्रमुख तत्त्व नव्हे तर वीरशैवाचा पाया असून मुख्य केंद्रबिंदू आहे. शिवाचे प्रतीक म्हणून वीरशैव समाजातील व्यक्ती आपल्या गळ्यात नेहमी 'लिंगधारणा' करत असतो. इष्टलिंगाबाबत कुमारस्वामीजी असे म्हणतात की, "विश्वरचनेच्या दृष्टीकोणातून इष्टलिंग हे विश्वाचे प्रतीकात्मक रुप आहे." मानसशास्त्र दृष्टीकोनातून इष्टलिंग हे विशिष्ट आकाराचे रुप असून गुडशास्त्राच्या पाहण्यानुसार इष्टलिंगाला शास्त्राचे प्रतीकात्मक स्वरुप आहे. इष्टलिंग हे व्यक्तीला विधीवत म्हणजेच गुरुच्या साक्षीने दीक्षा संस्कारातून धारण करण्यास सांगितले जाते. इष्टलिंगधारण केल्यानंतर इष्टलिंग ठेवण्यासाठी पेटी किंवा तांब्याचे, सोन्याचे, चांदीची पेटी किंवा कापडामध्ये सुद्धा लिंग ठेवता येतो. लिंगधारणा करणे



म्हणजे शिवाची सदैव संगती असणे होय. इष्टलिंगाची धारणा म्हणजेच शिवाची आराधना होय. म्हणून शिवाला सर्वश्रेष्ठ देव किंवा 'देवांचा देव' समजण्यात आले आहे. इष्टलिंग हे अध्यात्मिक स्वरुपाचे प्रतीक म्हणून मानल्या जाते. आध्यात्मिक हे निश्चित अमर्त्य, चिरंतर शाश्वत असते. इष्टलिंग हे शाश्वत व अमर आहे. इष्टलिंग वीरशैव समाजाचे पूजा साधन आहे. धार्मिक दृष्टीकोनातून श्रद्धेचे महत्त्वाचे स्वरूप म्हणून इष्टलिंगाची पूजा केली जाते. म्हणून वीरशैव समाजातील व्यक्ती इष्टलिंग धारण केल्यानंतर त्याचे शरीर हे शिवाचे प्रतीक बनत असते म्हणूनच म्हटले जाते की, 'देह हेच शिवालयाचे रुप धारण करते.' इष्टलिंगाची पूजा केल्यानंतर अंगावर भस्म लावून त्या इष्टलिंगावर बेलाचे पान ठेवावे लागते. सकाळी लवकर उठून स्नान करुन इष्टलिंगाची पूजा केली जाते. 'नमः शिवाय' हा मंत्र १०८ वेळा जपला जातो. इष्टलिंग धारण केल्यानंतर शिवाचा प्रत्यक्ष सहवास लाभतो. त्यामुळे इष्टलिंगाच्या पूजेतून शिवशक्तिची मनोभावनेतून आराधना पूर्ण होते. इष्टलिंग धारण केल्यामुळे आत्मज्ञान, सात्विक आनंद, मनोधैर्य, आरोग्य संवर्धन, समस्याजनक परिस्थितीवर मात, सामाजिक एकात्मता, सामाजिक संघटना हे एकत्र येवून शिवाच्या शक्तीच्या प्रसार हा अंगात होत असते. यातूनच चांगले कार्य त्याच्या हातून घडत जाते. इष्टलिंग ही संसारसागर व जीवनसागर पार करण्याची नौका आहे. इष्टलिंग धारण केल्यामुळे जीवनातील एक अमुल्य ठेवा हा शिवशरण व शिवशरणीचे हृदय उजळून टाकणारा व अखंड तेवत राहणारा 'शिवदीप' आहे. इष्टलिंग हा जीवन-मरण फेरा चुकविणारा आणि पर्यायाने लिंग व अंग यामध्ये सामजंस्य घडवून आणणारी संजीवनी आहे. सकाळी स्नान केल्यानंतर स्वच्छ चांगल्या जागेवर बसून मांडी घालून पूजेला बसावे. इष्टलिंग पूजा करताना सर्व पूजेचे साहित्य जवळ घेऊन मध्यमा, अनामिका, करंगळीने कपाळी त्रिपुर, भस्म धारण करावे. तसेच अंगाला, दंडाला, हृदयाला, नाभी, छाती, कोपरे, कंठ आदि ठिकाणावर विभूती लावावी. प्रसन्न भावनेने शिवाची उपासना केली जाते. अशा प्रकारे इष्टलिंग धारण केल्याने वीरशैवाला एक आत्मिक समाधान मिळते व श्रद्धेच्या आचरणात राहून तो आपले मनोबल व मनोधैर्य व्यवहारात, व्यवसायात आत्मसात

करत असतो.

'लिंग' म्हणजे सकल जगाच्या उत्पत्तीचे मुळ, स्थिती आणि लयास कारणीभूत असलेले परशिवब्रम्हा आणि अंग म्हणजे परमेश्वरांशी एकरुपता साधण्याचा प्रयत्न करणारा आत्मा आणि 'संबध' म्हणजे लिंगाचे सामस्य होय. सर्वोच्च सत्य असलेल्या शिवाबरोबर जीवाची एकात्मता हे वीरशैवाचे धार्मिक जीवनाचे अंतिम उद्दिष्ट होय. या ऐक्यामध्ये आत्मा शिवात्म्यात विलीन होतो. आत्म्याच्या या विलीनाला आणि सर्वोत्कृष्ट आनंदाच्या या अनुभवाला वीरशैवाचे लिंगांगसामरस्य' म्हणतात. लिंगागसामस्याला 'शिवयोग' असेही म्हणतात. वीरशैव धार्मिक दृष्टीकोनातून इष्टलिंग उपासनेद्वारेच शिवयोग साध्य होतो. त्यामुळे जगदगुरु पंचाचर्य यांनी इष्टलिंग उपासनेला महत्त्व दिले. वीरशैवानी नित्य इष्टलिंग धारणा केल्यानंतर त्याला शिवाचा सहवास लाभतो. या सहवासातून त्याचे शरीर नित्य सत्कर्म मार्गक्रम करतो. इष्टलिंग धारणेचे प्रमुख वैशिष्ट्ये खालील प्रमाणे.

१) इष्टलिंग धारण केल्यामुळे ते अध्यात्मिक मार्गावरील वाहनाचे कार्य करते व निराकार शिवाचे प्रतिकात्मक रुप असते. २) शिवाच्या शक्तीचा त्यामध्ये संचय असून त्यामध्ये विद्यूत स्वरुपाची प्रकाशनिर्मिती होते. ३) पृथ्वी व मंगळ गृहाचा निकटचा संबंध इष्टलिंगात दिसून येतो इष्टलिंगाचा आकार व पिरॅमिड यांच्या रचनेत विलक्षण साम्य आहे. ४) इष्टलिंगामुळे व्यक्तीला ब्रम्हांडाचे छोटे स्वरूप दिसून येते. ५) इष्टलिंग धारणेतुन मनाला शांती लाभून त्यामुळे निरिक्षण, एकाग्रता, जप, ध्यान, धारणा, आचार-विचारात सुधारणा, समाधी या गोष्टी वीरशैवांना सहज साधता येतात व शिवाची उपासना होते.

## २.२ पंचाचार्य :

नांदेड जिल्ह्यातील वीरशैव बांधव पंचाचार्यांना गुरू मानतो. वीरशैव समाज विविध तत्त्वावर आधारलेला आहे. ज्ञान आणि क्रिया यांचा योग्य समन्वय साधून व्यक्तीला शक्ती, जीवाला शिव आणि अंगाला लिंग करण्याची शक्ती या समाजामध्ये आहे. स्कंदपुराणाच्या प्रमाणवचनाने धर्माला ग्लानी आल्यानंतर भगवान शिव आपले विशेष अंश असलेला शिवगणाच्या रुपात अवतरीत होऊन प्रत्येक युगात अवतार



घेऊन समाजाला योग्य दिशा देण्याचे काम करतो. अशा या परमपुरुषार्थप्रद वीरशैव समाजाचे मुळ जगद्गुरु पंचाचार्य होत. पंचाचार्याच्या उत्पत्तीबाबत असे म्हटले जाते की, शिवाच्या आज्ञेवरुन पंचाचार्यांनी कृतयुग, त्रेतायुग, द्वापारयुग व कलयुग या चारही युगाच्या आरंभी वीरशैव समाजाची स्थापना केली आहे. या पंचाचार्यांनी वीरशैव समाजामध्ये धार्मिक तत्त्वे रुजवली जनमतामध्ये धार्मिक विचाराची पेरणी जगदगुरु पंचाचार्यांनी केली. भारतातल्या वेगवेगळ्या राज्यात त्यांची पीठे आहेत. ती पाच असून ती रंभापुरी, उज्जैन, श्रीशैल, काशी, हिमवत केदार या ठिकाणी असून त्यांचे पंचाचार्य रेणुकाचार्य, दारुकाचार्य, एकोरामाध्य, पंडिताराध्य, विश्वाराध्य अशी नावे आहेत. श्री जगद्गुरु पंचाचार्यांनी गावोगावी जाऊन समाज प्रबोधनाची केंद्रे स्थापन केली व त्यामधून वीरशैव समाजाचा प्रसार झाला. त्यांनी स्थापन केलेले शाखामठ भारताच्या अनेक ठिकाणी पाहावयास मिळतात. पट्टाभिषेक झालेले गुरु (शिवाचार्य) जगद्गुरुच्या आदेशाचे पालन करुन. धार्मिक, अध्यात्मिक कार्य पार पाडीत असतात. गुरुपरंपरा ही प्राचीन आहे. गुरुच्या अंगी शिवाद्वैत सिद्धांताची केंद्रे आहेत. मानवाच्या धार्मिक कार्याची प्रेरणा देवून भक्ताला येणाऱ्या अडचणीला दीपस्तंभासारखे मार्गदर्शक ठरतात. पंचाचार्य हे प्रत्यक्ष भगवान शंकराचे पाच श्रेष्ठ गण आहेत. शिवाच्या पंचमुखातून पाच आचार्य अवतीर्ण झाले. ही पीठे म्हणजे वीरशैव समाजाची धार्मिकता तत्त्वज्ञानाची मुख्य केंद्रबिंदू आहेत.

| पंचाचार्य पीठ | जगद्गुरू | अंतर्गत येणारे मठ |
|---|---|---|
| १) रंभापुरी | रेणुकाचार्य | हणेगाव, मुदखेड, अहमदपूर |
| २) उज्जैन | श्रीमरुळाराध्य | बेटमोगरा, नागठाणा, वसमत, पूर्णा, तमलूर, मुखेड |
| ३) श्रीशैल | पंडिताराध्य | -- |
| ४) काशीपीठ | विश्वराध्य | शिराढोण |
| ५) हिमवत्केदार | एकोरामाध्य | कासराळी |

## २.३ वीरशैवाची अष्टावरणे

वीरशैव लिंगायत धार्मिकतेमध्ये 'अष्टावरण' आचरणाला खूप महत्त्व आहे.

जगातील कोणत्याही समाजाचा विकास होण्यासाठी काही तत्त्व, नियम, आचार, विचार यांचा योग्य समन्वय घडून आला तर समाजाचा धार्मिक गोष्टीतून सर्वांगीण विकास होण्यास मदत होते. धार्मिक आचरणातून मानव सुसंस्कृत व सुसंस्कारित बनण्यासाठी व्यक्तीची कृती, मन, आत्मा यांच्या शुद्धिकरणाच्या प्रक्रियेतून समाजाची प्रगती होत असते. वीरशैव समाजाच्या धार्मिक आचरणत म्हणजेच लिंगपूजा, अष्टावरण, षट्स्थल, पंचाचार यामधून शुद्ध आचरणाची प्रेरणा मिळेल. समाज सुधारला तर गाव सुधारेल, गाव सुधारले तर जिल्हा, राज्य, देश याच बरोबर जगाचा विकास होण्यास मदत होईल. वीरशैव समाज हा मनोभावनेने शिवाची उपासना करत असतो. प्राचीन काळी 'गुडीगल्लम' या ठिकाणी शिवांची लिंग स्वरुपात एक मूर्ती सापडली. यावरुन वीरशैव समाजाची प्राचीनता व धार्मिकता किती प्राचीन आहे हे समजते.

कोणत्याही समाजात आचाराला अधिक महत्त्व आहे. तत्वज्ञान कितीही श्रेष्ठ असले तरी ते जोपर्यंत आचरणात येत नाहीत, तोपर्यंत त्याचा व्यवहारात उपयोग होऊ शकत नाही. धार्मिक दृष्टीकोनातून आचाराला विशेष महत्त्व असते. धर्म, तत्त्व, स्वर्ग, कल्पना इ. गोष्टीना गौणत्व देऊन सत्याचरण व सदाचाराला अतिशय महत्त्व दिले आहे. नांदेड जिल्ह्यातील वीरशैव समाज पाहिला तर जास्त प्रमाणात ग्रामीण भागातच विखुरलेला आहे. त्यामुळे धार्मिक आचार-विचार नित्य करताना दिसतात. वीरशैव समाज दैनंदीन जीवन जगत असतांना कोणत्याही वाम मार्गाला किंवा मर्यादेच्या बाहेर जाऊन कार्य करु नये. यासाठी वीरशैव समाजामध्ये अष्टावरणास पूजनीय स्थान आहे. "वीरशैव समाजाची अष्टावरण म्हणजे एक प्रकारचे आठ आवरणे आहेत. ती श्रद्धातत्त्वे म्हणून पाळली जातात." या श्रद्धातत्त्वामार्फत शिवाची भक्तीमन भावनेने केली जाते. म्हणूनच वीरशैव समाजाची अध्यात्मिक आवरणे म्हणून अष्टावरणाला वेगळेच स्थान आहे. अष्टावरणामुळे अध्यात्मिक, सुसंस्कारीत, आनंदमय, अनुभवाचे आठ खांबे वीरशैव समाजाच्या सभोवताली राहतील. वीरशैव तत्त्वज्ञानाच्या माध्यमातून बहुजन समाजात मानवतेची ज्योत प्रज्वलित होण्यास मदत होईल. त्यामुळेच स्वातंत्र्य, समता, बंधुता, मानवता,



न्याय, दया, अहिंसा, सत्य, या मानवी मुल्याची रुजवण वीरशैव समाजामध्ये झालेली आहे. वीरशैव समाजाला अष्टावरण धार्मिक 'कवच' म्हणून सामोर आले आहे. दीक्षा प्राप्त शिवभक्ताचे काम, क्रोध, मत्सर या दुष्ट प्रवृत्तीपासून रक्षण करणे या अर्थानेच अष्टावरणाचा विचार केलेला आहे. गुरु, लिंग, जंगम ही पूजनीय तर विभूती, रुद्राक्ष, मंत्र ही पूजेची साधने पादोदक आणि प्रसाद ही पूजेची फुले आहेत. ही आठ आवरणे मोक्षप्राप्तीसाठी सहाय्यक बनवून वीरशैव समाजाच्या धार्मिक कल्पना आपल्याला समजते.

अष्टावरण ही वीरशैव व लिंगायत समाजाची धार्मिक आचारसंहिता आहे. या अष्टावरणातून मानवी जीवनाशी कसा संबंध आहे. आठ आवरणाचे मानवी जीवनावर धार्मिक श्रद्धेवर काय परिणाम होतो तो पुढील प्रमाणे अष्टावरणात सांगितला आहे. आचारनियम हे नैतिकतेचे नियम असतात. समाज व्यवहारासाठी सामान्य माणसाला नैतिकतेच्या दृष्टीकोनातून मार्गदर्शन करणे आवश्यक असते. गौतम बुद्धाने जसा अष्टांगमार्ग सांगितला त्याचप्रमाणे वीरशैव समाजामध्ये अष्टावरणाला महत्त्व आहे. अष्टावरण हे भक्ताच्या व्यक्तिमत्त्वाला झाकणारे, लौकिक उपद्व्यापक भक्ताचे रक्षण करणारे वज्र कवच आहे ती गुरू, लिंग, जंगम, पादोदक, प्रसाद, विभूती, रुद्राक्ष व मंत्र आहेत. वीरशैव शिवाचार्यांनी आठ प्रकारची आवरणे सांगितलेली आहेत. ती गुरु शिष्याला उपदेश करुन सांगतात.

'अष्टस्वावरणेषु त्वं श्रद्धां कुरु प्रयत्नतः ।<br>
पर्यतस्व महाबुद्धे पंच्याचारे एवापि क्रमात् ।"

### २.३.१ गुरु

वीरशैव समाजामध्ये गुरुला महत्त्वाचे स्थान आहे. काही विद्वानांनी वीरशैव समाजाला गुरुमार्गी समाज म्हणून म्हटले आहे. आणि ते सत्य ही तितकेच आहे. कारण प्रत्येक वीरशैवाला गुरु असतो व तो त्याच्या कुटूंबाला मार्गदर्शनाचे काम करतो. म्हणजेच तो कुटुंबाचा कुलगुरुच असतो. वीरशैव समाज प्राचीन असून तो जगद्गुरु पंचाचार्यानी स्थापन केला. त्यामुळे पंचाचार्य हे गुरु परंपरेचे मुळ पुरुष होत. गुरु हा अष्टावरणातील पहिला महत्त्वाचा घटक मानला जातो. वीरशैव धार्मिक

दृष्टीकोनातून गुरु जो निर्गुण, निराकार व सर्वश्रेष्ठ शिवपरमात्म्याच्या परिचय करुन देतो. गुरुची परंपरा पंचाचार्यांच्या उपदेशाप्रमाणे चालते. जे पंचपीठे बाळेहल्ली येथील रेणुकाराध्य, श्रीशैलचे पंडिताराध्य, केदारपीठाचे एकोरामाराध्य, उज्जैनचे मरुळाराध्य व काशीपठाचे जगद्‌गुरु विश्वाराध्य यांच्या स्वतंत्र शाखा आणि सुत्र, गोत्र, प्रवरे आहेत. प्रत्येक वीरशैव या पाच पीठापैकी कोणत्याही एका पीठाशी संबंधीत असतो. या पाच पीठाचे उपपीठ, मठ, भारतभर पसरलेले आहे. पंचाचार्यांच्या पटाभिषेकाद्वारे गुरु दीक्षा दिली जाते. त्यानुसार पीठाधिपती, मठाधिपती म्हटले जाते. शिवशक्ति संबंधीचे खरेखुरे ज्ञान देणारा, वीरशैवाचे अंतरंग समजावून सांगणारा, वीरशैव तत्त्वाप्रमाणे आचरण करणारा, भक्ताला योग्य मार्गदर्शन करणारा व वेळोवेळी मार्गदर्शन करणारा गुरु असतो.

डॉ. मल्लेदेवरु म्हणतात की, 'शैवागम व इतर वीरशैव धार्मिकतेनुसार गुरु हा वीरशैव तत्त्वज्ञानामध्ये, सिद्धांतामध्ये, तत्त्वामध्ये, आचरणामध्ये पारंगत सर्व गुण संपन्न, ज्ञानी, अभिलाषा, सत्कर्मी, मत्सर मुक्त असावा.' शिष्यामध्ये ज्ञान जागृत करणारा गुरु असला पाहिजे. साऱ्या जगाचा अंधकार जसे सूर्य दुर करतो. त्याचप्रमाणे गुरु अंतरंगातील काळोख नष्ट करुन ज्ञानज्योती पेटविण्याचे काम करतो. गुरुला प्रथम स्थान देऊन गुरुचे महात्म्य सांगताना उर्लिग पेदी म्हणतात की, "रत्नामध्ये चिंतामणी महारत्न जसे पूज्य असतो धेनुमध्ये कामधेनु जसे पूज्य असतो तसे प्रहा तत्त्वामध्ये श्री गुरु तत्त्वे पूज्य असे." त्यांनी आपल्या वचनामध्ये गुरु तत्त्वाचा महिमा सांगितला लिंग धार्मिकतेत व्यक्तीपेक्षा तत्त्व मुख्य आहे. तत्त्व सिद्धता करणारा गुरु हा शिष्याचा सदगुरु होतो.

'गुणान् रुन्ध इति गुरु'

"गुरुच्या अंगी श्रेष्ठ तत्त्व असणे गरजेचे आहे. म्हणजे शिष्याच्या प्राकृत, राजस, तामस गुणांना शोधून शिवतत्त्वाचा उपदेश करणाराच गुरु होय."

गुरुस्वरुप विशदयति -

"गुणातील गुकारं च रुपातीत रुकारकम्।
गुणातीतमरुपचयो दद्धात् स गुरुः स्मृतः"



'गुरु या शब्दाची फोड केल्यानंतर गुरुच्या शब्दाचे महत्त्व कळते. 'गु' म्हणजे गुणातीत व 'रु' म्हणजे माया रुपातीत अर्थात गुणातीत व माया रुपातीत निर्गुण व निराकार असलेल्या महालिंगाचा उपदेश करणारा तो गुरु होय. करुणायुक्त, वीतराग, निर्मत्सर, शिवाच्या ठायी दृढ निष्ठा असलेला गुरु हा शिष्याला मार्गदर्शन करु शकतो. गुरुला वीरशैव समाजामध्ये तीन प्रमुख कर्तव्य पार पाडावी लागतात. पहिले भक्ताला इष्टलिंग दीक्षा देणे, दुसरे म्हणजे इष्टलिंग पूजाविधी सविस्तर समजावून सांगणे, तिसरे म्हणजे जीवशिव ऐक्याची अर्थात शक्तिविशिष्टाद्वैत तत्त्वज्ञानाची शिकवण देणे म्हणजेच गुरुला दीक्षागुरु, शिक्षा गुरु, ज्ञानगुरुची कर्तव्य पार पाडावी लागतात. गुरुच्या ज्ञानप्राप्तीनंतर प्रत्येक भक्ताला आपल्या आध्यात्मिक साधनेतून आपले अंतकरण शुद्ध करता येते. त्यानंतर गुरु म्हणजे ज्ञान आणि ज्ञान म्हणजे गुरु हे शिवज्ञान प्राप्त होते.

### २.३.२ लिंग

लिंग हे अष्टवरणाचे दुसरे अंग आहे. लिंग गुरुने दीक्षापूर्वक दिलेले इष्टलिंग असते. लिंग, इष्टलिंग, शिव, परशिव, इत्यादी नावांनी संबोधल्या जाते. लिंगधारणा वीरशैवात अनादि काळापासून चालत आलेली आहे. यजुर्वेद, उपनिषदे, यातून वीरशैवाची लिंगधारणा दर्शविणारी वचने आढळतात. लिंग हा 'परशिव शक्तिचे निज विलास' परशिवाची परम ज्ञान ज्योत असते. 'लिंगवंत लिंगाधारी, सदाचारी, ब्रम्हचारी म्हणणारा, तो लिंगाची जाणीव करुन देतो. लिंगविताची प्रिती ही सत्य मुक्ति असते.' लिंगवतांचे आचार सांगत असताना 'परशिवाचे निर अतिशयानंद सुखी असणारा लिंग धारण करणारा मुक्ती दाता.' म्हणून भक्ताचे लिंगकाय म्हणून इष्टलिंग धारण प्रसादाबद्दल सविस्तर वर्णन वरील दृष्टीकोनातून समजतो. स्कंदपुराणातील केदारखंडातील वचनात व्यास महर्षीजी वीरशैवांच्या लिंगधारणेचे स्वरुप सांगितले आहे.

"शैलादेन महाभागा विचित्रा लिंगुधारकाः ।
देहस्योपरि लिंगु तु ध्रीयते ही पुरातनेः ।।
लिंडगे सह पंचत्व लिंग्डेसह जीवितम् ।

एते धर्माः सुप्रतिष्ठाः शैलादन महात्मता।।"

"विश्वाच्या उत्पत्ती, विकास, लय यास कारणीभूत असणाऱ्या परशिवालाच लिंग म्हणतात. सर्व समावेशक स्वभाव वैशिष्ट्यामुळे त्याला ब्रम्हा म्हणूनही संबोधण्यात येते. म्हणूनच लिंग आणि ब्रम्हा हे सापेक्ष शब्द आहेत यावरुन लिंगाची प्रारुपता आपल्याला समजते." गुरुने दीक्षासंस्काराच्या वेळी भक्ताला दिलेला इष्टलिंग भक्ताने मृत्यूपर्यंत आपल्या अंगावर धारण करावयाचे असते. "इष्टलिंग उपासना ही केवळ शिवाची उपासना नसून ती शिव-शक्ति उपासना ठरत असते. ते फक्त इष्टलिंगाच्या माध्यमातून भक्ताला साध्य होते. लिंग ही समस्याचा सागर पार करणारी एक होडी आहे." शरीरावर निरंतर इष्टलिंग धारण करावे लागते. इष्टलिंग शरिरापासून दूर करणे म्हणजे शिवाला दूर करणे होय. इष्टलिंग धारण करताना मस्तक, कंठ, वक्षस्थळ, काख, पोट, तळहात सहा ठिकाणी लिंगधारणेसाठी वापरावेत. जटा, पाठ, मलस्थान, नाभीच्या खालचा भाग इष्टलिंग धारण करू नये. इष्टलिंगधारण केल्यामुळे प्रत्यक्षात शिवाची उपासना होत असते. इष्टलिंग पूजा ही वीरशैव समाजाची नित्य धार्मिक कर्म आहे. इष्टलिंग शुद्ध वस्त्रात, धातुच्या सज्जिकेत अथवा चंदनाच्या पेटीत किंवा चांदीच्या, सोन्याच्या पेटीत ठेवावे. सामान्यतः वीरशैव समाजाचे लोक चांदीच्या लिंगाकार पेटिकेत आपले इष्टलिंग ठेवत असतो. ज्याद्वारे भक्ताच्या सर्व स्वकीय पापांचा नाश होऊन, दिव्य-भाव, परमसिद्धी तथा परमज्ञानाची प्राप्ती होते, त्या प्रक्रियेलाच 'दीक्षा' म्हणावे. दीक्षेने गुरु आपली ज्ञानशक्ती, आत्मशक्ती शिष्याच्या ठिकाणी शक्तिपाताने संचारित करतात. त्यामुळे शिष्य हृदयातील सुषुप्त ज्ञान आणि शक्ती उद्‌बोधित होते. अशी त्या दीक्षेने जागृत झालेली शक्ती शिष्यांच्या सर्व शारीरिक अशुद्धी दूर करुन त्याला शुद्ध करते. यालाच 'दीक्षा प्रभाव' असे म्हणतात.

दीयते परमा सिद्धिः क्षीयते पापसच्त्रयः।<br>
व्यते परमं ज्ञान तेन दीक्षा इतीरिता।।

'दी' - दीव्यभाव देण्यामुळे; आणि 'क्षा' - पापाचे क्षालन करण्यामुळे, या कृतीला 'दीक्षा' असे म्हणतात. दीक्षा संस्कारामुळे व्यक्ती संसार संबंधातूनमुक्त होतो. त्यामुळे हे कार्य केल्यास परम सिद्धी लाभत असते. यामध्ये पापांचा साठा नाहीसा केला



जातो. आणि परमज्ञान प्राप्त होते. म्हणून या संस्काराला 'दीक्षा' संस्कार असे म्हणतात. इष्टलिंग धारण केल्यामुळे कोणतेही कार्य करताना व्यक्ती विचार करतो. म्हणजेच दूर्व्यवहार त्याच्या हातून घडत नाही. मनात धार्मिक भावना असते. सोबत प्रत्यक्षात शिव असल्यामुळे स्थुल, सुक्ष्म , इष्ट, प्राण, भाव याचे रक्षण इष्टलिंगामुळे होते. म्हणून लिंग हे वीरशैव समाजाचे एक प्रकारचे रक्षाकवच असते. शिवाच्या भक्तीचे प्रतीक म्हणून लिंगाला अतिशय महत्त्व आहे."

### २.३.३ जंगम

जंगम हा अष्टावरणातील तिसरे आवरण आहे. वीरशैव समाजामध्ये जंगम सामाजाला गुरुची पदवी दिली जाते. म्हणूनच ती पूज्य व्यक्ती असते. वीरशैव समाजाला धार्मिक व नैतिक मुल्याची शिकवण देणारा म्हणून जंगम समाजाकडे पाहिले जाते. जंगम हे चल किंवा अस्थिर जो की कोणत्याही ठिकाणी भूतलावर वीरशैव समाजाचे धार्मिक प्रसारक म्हणून कार्य करतात म्हणूनच जंगमाविषयी म्हटले जाते की,

"गुरुमुळे झाले शरीर शुद्ध<br>
लिंगामुळे झाले मन शुद्ध<br>
जंगमामुळे झाली संपत्ती शुद्ध<br>
अन् प्रसादामुळे झाला प्राण शुद्ध"

जंगम म्हणजे परमेश्वर, जंगम म्हणजे जिवंत देवता, जंगम म्हणजे चालणारा देव, बोलणारा देव इष्टलिंगत्वाचे प्रचारकच जंगम असतात. भक्ताला लिंग दीक्षा देणारा गुरु पुढे मार्गदर्शन करणारा जंगम गुरु लिंग जंगमामध्ये भेद नाही म्हणून उर्लिग पेद्दी च्या वचनात म्हटले आहे की,

"पूजा सेवत, अर्चन, अर्पण करुन, धर्म, अर्थ, काम,<br>
मोक्ष, सालोन्य, समिप्त, सायुज, सारुप्म असे चार<br>
रुप देणारे गुरु, लिंग, जंगम, प्रसाद हा विश्वास करणे<br>
सत्य शिवा शपथ घोषणा आहे."

वास्तविक गुरु, लिंग, जंगम ही एकच परमात्म्याची तीन रुपे असून वीरशैवाच्या

सिद्धांत शिखामणि मध्ये पुढील महत्त्व सांगितले आहे.

'एक एव शिवः साक्षात सर्वानुग्रहकारक : ।
गुरुजंगमलिंगात्मा वर्तते भूक्तिमूक्तिदः ।।'

जंगम हा वीरशैव समाजातील धार्मिक विधी पूर्ण करणारा धर्मप्रचारक असतो. धार्मिक श्रद्धेमुळे समाजाच्या आदर्श व्यक्तीला पूज्य मानतात. महत्त्वाचे स्थान असते. वीरशैव समाजाच्या धार्मिक भावनेला प्रगतीपथावर नेण्याकरिता कार्यक्षम नि कृतिशील जंगमाची आवश्यकता आहे. कर्माने जंगम असणाऱ्या जंगमाला समाजाने पूजनीय समजले पाहिजे. जंगम हा वीरशैव समाज आणि धार्मिक विधीचा दुवा आहे. मनुष्याने संसारसागर पार करणारी नौका म्हणून माहेश्वर पूजन केले जाते. जंगमाला असणाऱ्या आशेला तृप्त केले की शिवही तृप्त होतो. त्यामुळे जंगमाला भिक्षा देताना अन्नदान करावे. जेणेकरुन त्याच्या उपजीविकेचे अन्न त्याला प्राप्त होईल. जंगम हा पूर्णवेळ समाज सेवेला वाहून घेतलेला जनसेवक आहे.

### २.३.४ विभूती

विभूती हे वीरशैव समाजाचे बर्हिगत व दृश्य स्वरुपाचे प्रतीक आहे. अष्टावरणातील चौथे घटक म्हणून विभूती ओळखली जाते. विभूतीच्या धारणेवरुन स्त्री-पुरुष लहान थोर असा भेदभाव न करता तीन आडव्या पटट्या सर्वानसाठी धारण करणे आवश्यक आहे. विभूती ला 'भस्म' ही म्हणतात. भक्ताच्या क्रिया आचरणासाठी विभूती ही प्रेरणा देणारी शक्ती आहे. तसेच "परमचैतन्याची परम स्वरुप म्हणून विभूती गणल्या जाते." 'धिग् भस्मरहित भाल धिग् ग्रामशिवालयम्' असे शास्त्रवचन म्हणजेच भस्म धारणे शिवाय कपाळ व शिवालयाशिवाय गाव व्यर्थ आहे. त्याचप्रमाणे वीरशैव समाजातील सर्व समाज हा गळ्यात इष्टलिंग, कपाळावर विभूती सदैव लावत असतो. वीरशैव लिंगायत समाजाचे दृश्य प्रतीक म्हणून विभूतीकडे पाहिले जाते. कारण कपाळावर जर विभूती दिसली तर पाहणारा म्हणतो की तुम्ही वीरशैव लिंगायत आहात का ? म्हणजे वीरशैव लिंगायत लोक सदैव कपाळी भस्म लावत असतात. स्त्री-पुरुषाच्या सौंदर्यसंवर्धनात देखील एक प्रतीक म्हणून पाहिल्या जाते त्याचे उदाहरण खालील वचनातून दिल्या जाते.



"कमळामुळे येते पाण्याला शोभा
चारित्र्यामुळे येते स्त्रिला शोभा
चंद्रामुळे येते आकाशाला शोभा अन्
लिंगधारणेमुळे येते गळ्याला शोभा
कपाळावरील विभूतीमुळे येते वीरशैवाला शोभा"

वीरशैव समाजाच्या धार्मिक भावनेला अत्यंत महत्त्व आहे. वरील वचनावरुन दिसू येते. शिष्य आपल्या शरिरावरील विविध भागावर कमीत कमी पाच ठिकाणी विभूती लावत असतो. कपाळावर, दोन्ही कान, गळा, दोन्ही खांदे, दोन्ही बाहु, दोन्ही मनगटे, छातीवर व बेंबीवर विभूती लावली जाते. वीरशैव समाजाचा व्यक्ती सकाळी स्नानानंतर विभूतीधारणा करत असतो. या स्नानाला आग्नेय स्नान म्हणतात. वीरशैव लिंगायत दैनंदीन जीवन जगत असताना सदैव कपाळी भस्म विभूती लावत असतो. विभूतिविरहित कपाळ हे अमंगल व अपवित्र मानले जाते. त्यामुळे स्नान केल्यानंतर विभूतिस्नानाचे किती महत्त्व आहे ते जगदीश शास्त्री नालवार यांनी एका श्लोकातून व्यक्त केले की,

"आग्रेयमुच्यते भस्मस्नान सर्वमलापहम्
अन्येभ्यो वारुणादिभ्यः स्नानेश्यश्चोत्तमोत्तमम्"

अशा शब्दात विभूतीचे महत्त्व सांगितले आहे. भस्म म्हणजे शरीरातील अंतप्रेरणा होय की जी आत्मदान करुन देते. तसेच मायेचा नाश घडवून आणते आज अनेक ठिकाणी अंत्यसंस्कार झाल्यानंतर विभूती लावली जाते. भस्म धारण केल्यानंतर मानसिक पवित्रतेचे रक्षण करणाऱ्या व रोगांची चिकित्सा झाल्याचे समजते कारण आयुर्वेद शास्त्रात रोग्याची चिकित्सा गोमूत्र तथा गोमयाने करण्याचे विधी सांगितले आहे. विभूतीचा महिमाही आध्यात्मिक बरोबरच आचारात्मक महत्त्वाची आहे. भस्म विभूती ही गोमयापासून तयार केली जाते. त्यामुळे गोमय व गोमूत्र यामध्ये रोग्याची चिकित्सा व शक्ती सिद्ध झाली आहे. मानवी देह हा नश्वर आहे. मरणानंतर देहाची जळून राख होणार आहे किंवा देह मातीत जाणार आहे. "जीवन हे क्षणभंगूर आहे. शिवाची उपासना करणे यामधून प्रत्येकाला पवित्र आणि आनंदमयी करण्यासाठी

प्रयत्नरत राहिले पाहिजे. असे विभूती वीरशैव समाजाला धारण केल्यानंतर सूचित करत असते."

### २.३.५ रुद्राक्ष

अष्टावरणातील पाचवे आवरण म्हणून वीरशैव लिंगायत समाजात रुद्राक्षाला स्थान आहे. रुद्राक्ष याचा अर्थ 'रुद्र' म्हणजे 'शिव' आणि 'अक्ष' म्हणजे 'दृष्टी' असा होतो. म्हणजेच शिवाची दृष्टी असा अर्थ रुद्राक्षाचा होतो. शरीरावरील रुद्राक्ष धारणा हे समृद्धीचे प्रतीक म्हणून संबोधल्या जाते. अष्टावरणाशिवाय वीरशैवाची धार्मिक कार्याची सिद्धी होत नाही. नित्य नियमितपणे अष्टावरणातील संस्काराची प्रत्येक व्यक्ती अंगिकार करत असतो. अष्टावरणामुळे रुद्राक्ष धारणेमुळे वीरशैवाच्या भक्तिमार्गामुळेच शिवप्राप्तीचा योग येतो. रुद्राक्षाची निर्मिती कशी झाली हे सांगताना म्हटले जाते की,

'रुद्रस्य अक्षि रुद्राक्षः
अक्ष्युपलक्षितम् अश्रु, तज्जन्यः वृक्षः'

शिवाच्या डोळ्यातून पडलेल्या अश्रु पासून तेथे झाड होऊन. रुद्राक्षाची निर्मिती झाली आहे. शरीरावरील रुद्राक्षधारणा हे व्यक्तीच्या आरोग्यविषयक सामाजिक, नैतिक, धार्मिक, मानसिक लाभ होण्यास मदत होते. रुद्राक्षाच्या दर्शनाने, स्पर्शाने, स्मरणाने, पूजनाने मनाला एक अध्यात्मिक व अंतरिक प्रेरणा मिळते. रुद्राक्ष एकमुखी, द्विमुखी, पंचमुखी अशा ३८ प्रकारचे रुद्राक्ष असतात. त्यामध्ये एकमुखी रुद्राक्षाला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे.

'स्वयमेव कृतं द्वारं
रुद्राक्षं स्थादिहोत्तमयतु
यतु पौरुषयत्नेन कृत तन्मध्यम भवेत् ।

ज्या रुद्राक्षामध्ये स्वयं छिद्र असतो तो अत्यंत महत्त्वाचा असतो. परंतू रुद्राक्ष निर्माण झाल्यानंतर एखाद्या व्यक्तीने रुद्राक्षास छिद्र पाडले तर त्याचे महत्त्व कमी होते. वीरशैव लिंगायतातील प्रत्येक व्यक्ती धार्मिक भावनेतून १०८ रुद्राक्षाची माळ घालतो. या धारणेतून शरीरात एक प्रकारची उर्जा निर्माण होत असते. रुद्राक्ष हे



एका मुखापासून १४ मुखापर्यंत असतात. रुद्राक्षाच्या धारणेतून वेगवेगळे लाभ सांगितले आहे. ज्या रुद्राक्षाला छिद्र नाही, ज्याचा रंग सोन्यासारखा आहे, जो पूर्वी कोणी वापरला नाही. असा रुद्राक्ष उत्कृष्ट मानला जातो. रुद्राक्ष धारण केल्यामुळे शारीरिक, मानसिक दोषाचा नाश होऊन मनुष्यात समताभाव व समाजात शांती प्रस्थापित होते. त्यामुळेच रुद्राक्ष हा समाजाचे रक्षण करतो. वीरशैव समाजातील व्यक्ती हातात व शरीरावर रुद्राक्षाची माळ धारण केल्यानंतर त्याला येणारे व्यावहारिक अडथळे, व्यवसायात प्रगती, त्वचारोग, अपघाती व अकाली मृत्यू, हृदयक्रिया बंद होणे, रक्त ताण-तणाव, लकवा या पासून संरक्षण मिळत असते. रुद्राक्ष गुणकारक बहुगुणी व बहुप्रतापी वीरशैवाच्या प्रमुख श्रद्धा घटकात स्थान आहे. रुद्राक्ष धारण केल्यामुळे मनोधर्य व मानसिक समाधान वाढते. "रुद्राक्षामुळे व्यक्तीला आरोग्यपूर्ण दीर्घायुष्य लाभते."

### २.३.६ मंत्र

'मननात त्रायते,
इति मन्त्रः'

या नुसार ज्या मननाने भक्ताचे रक्षण होते. त्याला मंत्र असे म्हणतात. ज्या मंत्राच्या उच्चारानंतर शिवाचा साक्षात्कार होतो तो पंचाक्षरी मंत्र हा वीरशैवाचा प्रमुख मंत्र आहे. "नम शिवाय" हा पंचाक्षरी मंत्र 'नम' शब्दाने जीवाचा बोध होतो. दीक्षा करताना 'शिवाय नम' हा (पंचाक्षरी) मंत्र १०८ म्हटला जातो. तर गुरु करताना 'ओम नमः शिवाय' (षडाक्षरी) हा मंत्राचा जप १०८ वेळा केला जातो. वीरशैवामध्ये अशी एक श्रद्धा आढळते की हा मंत्र नियमितपणे श्रद्धापूर्वक व निश्चयपूर्वक जो म्हणतो त्याला शिवशक्तिच्या अस्तित्वाचा प्रभावाचा आणि कृपादृष्टीचा लाभ होतो. सुक्ष्मागम मधील श्लोकात मंत्राचे महत्त्व सांगितले आहे. तो पंचाक्षरी मंत्राचे स्वरुप पुढील प्रमाणे -

'तस्मादयि श्रेष्ठतरो म पंचाक्षरः
शिवे अस्य मंत्रस्य चैवान्ये उपमंत्र : प्रकीर्तितः
सर्वसिद्धिप्रदं दिव्य सर्वतत्त्व प्रकाशम्

आद्यबीजमिंद देवि विद्यानामप्यशेषतः
सुक्ष्मात्सुक्ष्म तर चैव वटबीज यथा भूवि
मंत्रो ऽ य वाचि यस्यास्ति स एवाह न संशयः'

वीरशैव समाजाची व्यक्ती धार्मिक दृष्टीकोनातून 'शिवाय नमः' हा मूलमंत्र नेहमी जप करत असतो. कारण यामधून शिवाची उपासना होते. ह्या पंचाक्षरी मंत्राने भक्तांना शिवाबद्दल प्रेरणा मिळते. वीरशैव लिंगायत समाजामध्ये गुरु आपल्या गोत्राच्या अनुयायांना स्त्री-पुरुष दोघांनाही मंत्रदीक्षा करतो. समयी शिवाय नमः हा मंत्र रुद्राक्षाच्या १०८ माळेचे जप करतो. शिवाय नमः हाच आचार लिंग, गुरुलिंग, शिवलिंग, प्रसाद लिंग, चर लिंग, महालिंग होय. ओम नमःशिवाय अनुयायाने उच्चारल्यास परशिवाची मनात जागृती निर्माण होते.

ज्ञानानंतर त्या आत्मचैतन्यावर त्या शिवरुपाचे अनुसंधान ठेवणे हा वीरशैव समाजाचा मुख्य मंत्राचा अर्थ आहे. मंत्र हा शिवाला प्रसन्न करुन घेण्याचा उपाय आहे. श्री गुरु पंचाचार्य आपल्या शिष्याला कानामध्ये गुप्तपणे मंत्र देतात. या मंत्रामुळे भक्ताच्या जीवनाला योग्य दिशा देण्याचे कार्य गुरु करत असतात. हा मंत्र शिष्याच्या आत्म कल्याणासाठी महामंत्र असतो. शिवाय नमः या मंत्रामध्ये 'तत्वमसि' चा संग्रह आहे. मंत्रामध्ये लिंगागसामरस्य विज्ञान पण आहे. त्यामुळेच असे म्हटले जाते की,

"अंग नमः पदमसौ शिव एव लिंग सम्बन्ध एष यदयेतिपदं तदुक्तम्।
लिंगांग संगमपदत्रय बोधनार्थ मंत्रोऽ यमेवमधिस्यति मंत्रराजः।।"

सातकोटी मंत्रामध्ये हाच मंत्र महान असल्याचे समजते. गुरुकडून शिष्याला अध्यात्मसाधनेची सफलतेकडे वाटचाल करुन देणारा प्रारंभ बिंदू सद्गुरुच्या आशीर्वादाने मुखातून सतशिल्याने ग्रहण केलेला मंत्र भक्ताला अध्यात्मिक प्रेरणा देणारा सिद्धांत असतो. मंत्राचा सतत जप केल्याने शिष्याला आत्मिक शांती लाभते. नमःशिवाय मंत्राने शिवाच्या सर्वव्यापी अस्तित्वाचे व प्रभावाचे ते द्योतक आहे की, त्यामध्ये लिंगायताला आणि त्याच्या समाजाला एकत्र बांधण्याची क्षमता ह्या मंत्रामध्ये आहे.



गुरुच्या उद्देशानंतर वाचिक जप, उपांशु जप, मानसिक जप उच्चारल्यानंतर भक्ताला मंत्राच्या मननाने जन्म मरणात्म संसार सागरापासून शिष्यांची रक्षा होते. म्हणून वीरशैव गुरुनी 'पंचाक्षर' मंत्राला अष्टावरणातील महत्त्वाचे आवरण मानले आहे.

### २.३.७ पादोदक

अष्टावरणातील वीरशैव समाजाचे सातवे धार्मिक आवरण म्हणून 'पादोदक' याकडे पाहिले जाते. 'पादोदक म्हणजे पवित्र पाणी होय.' 'पादोदक' या शब्दाची उत्पत्ती अनेक विचारवंतांनी व संशोधकांनी यावर भाष्य केले आहे. मल्लेदेवरु म्हणतात की, 'पादोदकाचा अर्थ 'पा म्हणजे सर्वोच्च ज्ञान, 'दो' म्हणजे सर्व दोषाचा परिहार, 'द' म्हणजे जन्म व मरण यांच्या चक्रातून मुक्ति आणि 'क' म्हणजे कर्मबंधनातून सुटका होय. अशा रितीने 'पादोदक' या शब्दाचा पूर्ण अर्थ शिष्याच्या आज्ञानाचा नाश करण्यास, सर्वमल दूर करण्यास, पुनर्जन्म टाळण्यास व सर्वोच्च शिवज्ञान करुन देण्यास उपयुक्त ठरणारा घटक आहे. 'पादस्य उदक पादोकम्' या नुसार एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीचे पाय धुऊन ते पाणी पिणे किती योग्य आहे; पण आज पादोदक विचाराचे पाणी श्रद्धेच्या भावनेने तयार झालेला असून गुरुच्या कृपेमुळे संपूर्ण जीवन सुखी बनते व त्यामध्ये गुरुबद्दल आदर असतो. लिंगाची गुरुपूजा करतो व तेच पादोदक म्हणून सर्व शिष्याला ते देतात. विधीनुसार वीरशैव समाजांनी इष्टलिंग पादोदक सेवन केल्यास भक्ताचे शारीरिक व मानसिक दोष दूर होऊ शकतात. वीरशैव समाजामध्ये व्यक्ती मध्ये पादोदकाचे स्थान महत्त्वाचे आहे. 'पाद' म्हणजे भगवान शिवाचे आनंदमयी स्वरुपी आणि 'उदक' म्हणजे शिवा विषयीचे ज्ञान होय. 'पादोदक हे आवरण शिवाचा जय करुन पिण्याचे पवित्र पाणी होय.' म्हणून शिवभक्ताचे सदैव रक्षण होते म्हणून 'पादोदक' हे आवरण वीरशैव समाजाचे रक्षाकवच आहे.

### २.३.८ प्रसाद

अष्टावरणातील शेवटचे आवरण म्हणून प्रसादाकडे पाहिले जाते. कारण गुरु, लिंग, जंगम, विभूती, रुद्राक्ष, मंत्र, पादोदक यांचे शिष्याने क्रिया पार पाडल्यानंतर

गुरु त्याला प्रसाद देत असतो. वीरशैव लिंगायत विचारसरणीनुसार वीरशैव समाजाच्या प्रत्येक कृती ही शिवाला साक्षी ठेवून अर्पण करावयाची असतात. प्रसाद याचा गुरुने शिष्याला दिलेली मनाची प्रसन्नता होय. गुरु जंगम याच्या हातून शिष्याला मिळालेल्या भोग्य वस्तू अन्न, जल, वस्त्र, अलंकार हे गुरुकडून भेट किंवा प्रसाद म्हणून भक्ताला मिळत असते.

"तन मन धन एक करुन
तो एक केलेल्या मनाला
ते त्रिविध एक केल्यास
हा लिंग प्रसन्न प्रसाद"

म्हणजेच "गुरु, लिंग, जंगम, प्रसाद परमानंद, परमज्ञान हे गुरुच्या आदेशाने शुद्ध, सिद्ध, प्रसिद्ध असून सर्व भोग गुरुने करुन राहिलेला प्रदाय प्रसाद असतो. प्रसादामुळे केलेल्या कार्याची आत्मिक प्रेरणा मिळते." प्रसाद या शब्दाची फोड केल्याने आपल्याला असे समजते की,

प्र - प्रभूनी म्हणजे शिवाने
सा - साक्षात दिलेले
द - दर्शन होय

'प्रसाद या शब्दाचा अर्थ प्रभूनी शिवांनी साक्षात दिलेले दर्शन होय.'

गुरुप्रसादामुळे अधिभौतिक, अधिवैदिक, अध्यात्मिक भक्ताचे दोष नष्ट होतात. गुरुच्या उपदेशामुळे शिष्याचे मन निर्विकार होते. राग, द्वेष, मोह, मत्सर इ. विकारा पासून शिष्याला प्रसादामुळे मुक्ती मिळते. प्रसाद प्राप्त झाल्यामुळे मनाची निर्मलता प्राप्त होते. मनामध्ये जर असे विकार असतील ते प्रसाद सेवन केल्यानंतर नष्ट होतात. प्रसाद हा आरोग्यदायक आहे. कारण भक्ताला प्रसाद थोडा मिळाला तरी त्याचे मन संतुष्ट होते. आज सगळीकडे कोणत्याही पदार्थाच्या गोष्टीची हाव, लालसा व्यक्तीच्या मनात वाढली आहे. प्रसादामुळे भक्ताचे अंतकरण शुद्ध होते व तो पदार्थभोगीच्या मागे न लागता गुरुच्या प्रसाद भोगाच्या मागे लागतो. प्रसादाच्या सेवनामुळे शिष्याच्या मनातील द्वेष, घृणा आदी जळमटे दूर होतात व सुसंस्कृत



नागरीक म्हणून जगण्यास तो पात्र असतो. अष्टावरण ही वीरशैव लिंगायत समाजाची धार्मिक आचारसंहिता आहे. वीरशैवाचा शिवप्राप्ती करण्यासाठी भक्तिच्या माध्यमातून आठ श्रद्धा तत्त्वाचा समावेश करुन शिवाची प्राप्ती केली जाते. गुरु, लिंग, जंगम हे पूजनीय. विभूती, रुद्राक्ष, मंत्र ही साधने तर पादोदक, प्रसाद हे पूजनीय व साधनेतून केलेल्या सेवेचे फळ असते. एकंदरीत वीरशैव समाजामध्ये धार्मिक व अध्यात्मिक जीवनाला विशिष्ट स्थान व महत्त्व आहे.

अष्टावरणाला बहिरंग अष्टावरण जरी म्हटले तरी आचरण केल्यानंतर ते अंतरंगामध्ये प्रवेश केल्यानंतर यामध्ये ज्ञानोदय म्हणजे गुरु. परब्रम्हाचा अनुभवच लिंग व त्यामुळे निर्माण होणारा आनंदच जंगम आहे. शिव करुणेचा चिद्रस म्हणजे पादोदक व शिवाची प्रसन्नता म्हणजेच प्रसाद होय. शिवाचे तेज म्हणजे विभूती, शिवाची नेत्र म्हणजे रुद्राक्ष व शिवरुपाचे ज्ञान म्हणजे मंत्र होय. अशी व्याख्या वीरशैवाच्या अष्टावरणाची केली आहे. म्हणून वीरशैव समाजाच्या धर्मिक आणि सामाजिकतेला समतेचे द्योतक मानले जाते.

### २.४ पंचाचार :

नांदेड जिल्ह्यातील वीरशैव समाजाच्या धार्मिक तत्त्वातील पंचाचार हे सामाजिकदृष्ट्या अतिशय महत्त्वाचे तत्त्व आहे. कोणत्याही विचाराची पेरणी अगोदर आचारात व्हावी लागते. हा आचार बाह्यांग प्रधान व गुंतागुंतीच्या कर्मकांडाने भरलेला असेल तर त्याचा उपयोग समाजाला होत नाही. उलट हितकारक असेल तर आंतरिक असेल नैतिक पायावर संपूर्ण समाजाचे शुद्धीकरण करता येईल. पंचाचार हे वीरशैव समाजाचे सामाजिक नितिशास्त्र आहे. शिवमय जगाच्या रचनेसाठी वीरशैव समाजाच्या धार्मिक आधार देण्यासाठी शील व नीतीने परिपूर्ण पाच आचार सांगितले. या पाच आचारांना महात्मा बसवेश्वरांनी महत्त्व दिले आहे. "वीरशैव समाजाची सामाजिक नैतिक आचारसंहिता म्हणून पंचाचाराला महत्त्व देण्यात आले आहे." आचार म्हणजे केवळ नियम पालन नसून जाणीवपूर्वक आचरणात आणावयाचे नैतिक पाठबळ आहे. पंचाचार हा वीरशैव समाजाचा कर्ममार्ग आहे. व्यक्ती आणि समाज यांच्या परस्पर संबंधाची जाणीव पंचाचारातून प्रकट होते. हे पंचाचार लिंगाचार, सदाचार,

शिवाचार, गणाचार, भृत्याचार हे वीरशैवाचे पाच तत्त्वे आहेत. जसे बौद्ध धर्माचे पंचशील त्याच प्रमाणे वीरशैव समाजाचे पंचाचार महत्त्वाचे आहेत. 'लिंगाचार' शिष्याला भक्त बनवतो, 'सदाचार' त्याचे नैतिक वर्तन सुधारतो. 'शिवाचार' सर्व शिवभक्त समान आहेत. हे शिष्याच्या मनात बिंबवितो. 'गणाचार' अन्यायाविरोधात लढण्यासाठी आंतरिक आणि बाह्य शक्ती देतो. तो शिष्याला निर्भय बनवतो. 'भृत्याचार' साधकाला व्यक्तीपेक्षा समष्टी श्रेष्ठ असल्याची शिकवण देतो. त्यामुळेच वीरशैव समाजामध्ये समानतेची कल्पना आपल्याला पाहवयास मिळते.' वीरशैव समाजामध्ये आचाराला अलंकार म्हटले जाते. त्याचे महत्त्व पुढील श्लोकावरुन दिसून येते.

'आचार एव सर्वेषा अलंकाराय कल्पते ।
आचारहीनः पुरुषो लोके भवति निन्दितः ।।'

पंचाचार हे वीरशैवाचे नैतिक, आत्मिक, धार्मिक तत्वज्ञान आहे. हे पाच आचरण भक्तानी जीवनात अनुकरण करणे आवश्यक आहे.

"लिंगवंतानी लिंगाचार, सदाचार,
भृत्याचार, गणाचार, शिवाचार,
सर्वाचार संपन्न म्हणून घेता येईल परंतू
भक्त म्हणून घेता येणार नाही"

पंचाचार म्हणजे पाच सामाजिक आचार, पाच वर्तन प्रकार होत. "पंचाचारासंबंधी कुमार स्वामीजीनी महत्त्व सांगताना 'पंचाचार' हे वर्तन विषयीचे पाच नियम आहेत. वीरशैव लिंगायत समाजातील एक सामाजिक प्राणी म्हणून प्रत्येक व्यक्तीने हे पाच वर्तनप्रकार पाळावयाचे असतात." जो भक्त नित्य नियमाने पंचाचाराचे पालन करतो. तोच खरा वीरशैव लिंगायत होय.

### २.४.१ लिंगाचार :

लिंगाचार हा वीरशैव समाजाच्या सामाजिक आचार संहितेतील पहिला आचार होय. लिंगधारक हा शिवच समजून त्यांच्याशी समानतेचे व्यवहार करतो म्हणजेच लिंगाचार होय. म्हणजेच शिवाची पूजा लिंगस्वरुपात केली पाहिजे व ते लिंग उपासकाने आपल्या शरीरावर धारण केले पाहिजे. सृष्टी निर्माता शिव हा अनादि स्वरुप आहे.



तो प्रत्येक जीवात सामावलेला आहे. लिंगाचार हे इष्टलिंगाचे म्हणजेच भगवान शिवशंकराचे तत्त्व होय. लिंगाचार हा इष्टलिंगाचे महत्त्व विशद करणारा आचार वीरशैवाने आपल्या गळयात लिंगधारणा करुन या तत्त्वाचे पालन करावयाचे असते. लिंगाचाराचे मुळ तत्त्व हे की देव एकच असून प्रत्येकात समाविष्ट आहे. लिंगाचारामुळे प्रत्येक वीरशैव व्यक्ती कट्टर एकेश्वरवादी बनली व त्यातूनच इष्टलिंगाची पूजा हीच शिवाची पूजा बनली. लिंग हे उपासकाच्या अंगाचे शिरस्थान होय. मानवाचा देहच देवालय आहे. कारण इष्टलिंगाची पूजा केली तर शिवाची उपासना होईल. भक्ताने शिवप्राप्तीसाठी म्हणजे मोक्षप्राप्तीसाठी वीरशैव समाजाच्या व्यक्तीने लिंगपूजन करणे, मनाने लिंग स्वरुपाचे चिंतन करणे यालाच लिंगाचार असे म्हटले आहे. लिंग म्हणजे शिव आणि अंग म्हणजे भक्त यांचा अन्योन्य संबंध असला तरच भक्ताला लिंगाचार प्राप्त होते. एकंदरीत लिंगाचार म्हणजेच शिवाचार होय.

### २.४.२ सदाचार

सदाचार म्हणजे सदैव शुद्ध आचाराने वागणारा व्यक्तीने आपली वर्तणूक चांगली ठेवून नितिशील मार्गाने अर्थार्जन करणे व त्याचा काही भाग समाजाच्या आणि राष्ट्राच्या कल्याणासाठी उपयोगात असणे होय. सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करुन देणारे हे सदाचाराचे तत्त्व आहे. सदाचार तत्त्वनुसार प्रत्येक लिंगायताने उपजिविकेसाठी एक व्यवसाय स्विकारुन प्रमाणिकपणे व चांगल्या रीतीने आपले जीवन व्यतित करणे. तसेच मिळालेले उत्पन्न स्वकष्टाने केलेल्या अर्थार्जनातून गरजूंना मदत करावी. "भक्ताने न्यायमार्गाने द्रव्य मिळून ते गुरु-लिंग-जंगम यांच्या सेवेत लावणे हा सदाचाराचा मार्ग आहे. एकंदरीत सदाचार म्हणजे प्रत्येक वेळी चांगला विचार करणे सामाजिक दृष्ट्या समाजात वावरत असताना समानतेच्या भावनेने वागणे आणि विश्वबंधुत्व पाळणे म्हणजेच शिवाचा सदाचार होय." वीरशैव समाजासाठी सदाचार करण्यासाठी धार्मिक भावनेतून व सामाजिक समानतेसाठी दहा तत्त्वे सांगितली आहेत. त्यानुसार -

"अहिंसा सत्यमस्तेयं ब्रम्हाचर्य दया क्षमा

दानंपूजा जपो ध्यानमिति धर्मस्य संग्रहः"

वीरशैवाचे विचार तत्त्व सांगतांना मोगलेवार यांनी अतिशय मार्मिकपणे सदाचाराची व्याख्या केली आहे. 'वीरशैवाचा सदाचार म्हणजे जगा आणि इतरांना जगू द्या.' त्यानुसारच वीरशैव समाजानी अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रम्हचर्य, दया, दान, क्षमा, पूजा, जप, ध्यान या दहा तत्त्वांना सामाजिक आचाराचे तत्त्वे आत्मसात करुन जगात शांती प्रस्थापित करण्यासाठी शिवाची उपासना करुन सदाचार नेहमी आचरणात आणले. जेणेकरुन धार्मिकतेचे वातावरण येथे नांदेल तेथे मोक्ष म्हणजेच भक्ताला आनंद निश्चितच मिळेल व जग शिवमय बनेल. त्यासाठी सदाचार वीरशैव समाजामध्ये खूप महत्त्वाचा आहे.

### २.४.३ शिवाचार :

शिवाचार हे वीरशैव समाजाच्या पंचाचारातील तिसरे आचारतत्त्व आहे. शिवाचार आचरणात आणला तर व्यक्तीच्या मनात समभाव, समताभाव, समानता हे तत्त्व शिवाचारामध्ये येते. सर्व समाजासोबत सामाजिकदृष्ट्या समतेच्या भावनेने वागणे आणि सर्व 'विश्वची माझे घर' पाळणे म्हणजेच शिवाचार होय. वीरशैव समाजातील प्रत्येक व्यक्तीने शिवाला परमब्रम्हा स्वरुप मानले आहे. शिवाचीच इष्टलिंग स्वरुपात वीरशैवाने एकनिष्ठेने भक्ती केली म्हणून म्हटले जाते.

'यद् यद् कर्म करोमि
तत् तदखिल शंभो तवाराधनम्'

या भावनेने वागले म्हणजेच शिवाचार होय. वीरशैवानी शिवालाच सत्य स्वरुप मानले आहे. शरीर, मन, वाणी यांच्या शुद्धी बरोबरच बाह्य जगातील उपभोग्य वस्तुच्या शुद्धीला सुद्धा वीरशैव समाजामध्ये महत्त्व आहे. शिवाचार नसेल तर ज्ञान नसणाऱ्याला आचार नाही. आचार नसणाऱ्याला ज्ञान नसते. आत्मसमाजाची निर्मिती करायची असेल तर शिवशरण व्यक्तीचे शील सर्वांगीण प्रगतीची धुरा हाती घेतली आहे. ही धुरा वीरशैव समाज शिवाचार आत्मसात करुन साध्य करु शकेल. "शिवाचारामुळे सामाजिक बंधुभाव व परस्परसहकार्यभाव वाढत जातो. यासाठी शिवाचार खूप महत्त्वाचा आहे."



### २.४.४ गणाचार

वीरशैव समाजाच्या पंचाचारातील चौथे आचार तत्त्व म्हणून गणाचाराकडे पाहिले जाते. वीरशैव समाजाचा व्यक्ती गणाचाराची प्रेरणा घेऊन इतरांनी त्याच्यावर केलेल्या अन्यायाविरुद्ध प्रतिकार करण्यास गणाचारामुळे शक्ती मिळते. गणाचार हे अन्यायाचे परिमार्जन व उत्साह निर्माण करण्याचे प्रतीक मानले जाते. समाजात निर्माण झ ाालेली विषमता, हिंसाचार, अनैतिकता, भ्रष्टाचार इ. अंतरंग व बाह्यांगातील दृष्ट प्रवृत्तीचा प्रतिकार करणे व समाज उपयोग समाजवादी, मानवतावादी, कल्याण असे जीवनमूल्याची पेरणी केली. शिवाच्या उपासनेतून जी श्रद्धा आचरणात आणली जाते त्याची प्रचीती ही गणाचारात होते. व्यक्तीच्या भोग आणि मोक्षाचे एकमात्र साधन म्हणजे गणाचार होय. गणाचारामध्ये कायिक, वाचिक, मानसिक अशा शिलाचा उत्तम आचरणात उपयोग होतो ते गणाचार होय.

सर्वात्तमे गणाचारे सद्यः सिद्धिकरे परे ।
पष्ठिवर्तन्ते तानि संशृणु ।।

शिवभक्ताच्या अंतःकरणात परशिवाबद्दल परम आदर भाव, नितांत श्रद्धा असावी, ती वृद्धिंगत व्हावी यासाठी असणारे आचरण म्हणजेच वीरशैव समाजाचे गणाचार होय. वीरशैव समाजाने गणाचाराचा वापर करुन व्यक्ती व समाज यांचा परस्पर संबंध चांगला राहून त्याचा धार्मिक व नैतिकदृष्टीने विकास व्हावा. म्हणजेच प्राणीमात्रावर दया दाखवून एक विकसित व सुसंस्कृत समाजजीवन घडवावे जे गणाचार व वीरशैवाच्या पंचाचार्यातून स्पष्ट होते. "वीरशैव समाजाचा एक सदस्य म्हणून समाजाच्या उन्नतीसाठी प्रयत्नशील राहणे देखील गणाचार तत्त्व आहे. गणाचार तत्त्व पालनामुळे व्यक्तीमध्ये धाडस, वीरता, स्वाभिमान व चैतन्य निर्माण होते व अन्याया विरुद्ध लढण्याची ताकद गणाचारामधून साध्य होते."

### २.४.५ भृत्याचार

वीरशैव समाजाच्या पंचारातील पाचवा आचार म्हणजे भृत्याचार होय. भृत्याचार म्हणजे सर्व समाजबांधवाबरोबर मानवजाती विषयी दया, मानवता व नम्रतेचे वर्तन करण्यास प्रवृत्त होणे व पृथ्वीतलावर शिवाची भक्ती श्रेष्ठ असून भक्त हा सेवक

भृत्य आहे. अशी भावना, संकल्पन करणे म्हणजे भृत्याचार होय. ज्या ठिकाणी सेवा करण्याची वृत्ती असते त्या ठिकाणी अहंकाराचा नाश होतो. समाजातील लोकांमध्ये स्नेहभाव, सहकारभाव, बंधुभाव रुजवणे व परस्परातील द्वेष, मत्सर कटुता आणि शत्रुता या दूर्गूणांचा नाश करणे त्यासाठी पाचही आचार आत्मसात केले तर अंतःकरण शुद्ध होऊन मोक्षप्राप्तीसाठी त्याचा फायदा होईल. क्रियासार ग्रंथात श्री नीळकंठ शिवाचार्य यांनी भृत्याचाराविषयी असे म्हटले आहे की,

'अष्टावरण विज्ञानी पारायणः ।
वैदिक कर्म कुर्वात ज्ञानै कफल साधनम्।
न कूर्यात् पाशव कर्म वीरशैव कदाचन।।'

पंचाचार फक्त वीरशैव समाजासाठीच महत्त्वाचे नाही. तर समस्त मानवजातीच्या कल्याणासाठी त्याचा उपयोग होऊ शकतो. वीरशैवाने शिवाकडे आणि त्याच्या भक्ताकडे पाहण्याचा परिपूर्ण मानवतावादी दृष्टीकोन म्हणजे भृत्याचार होय. सफल जीवात्म्यावर प्रेम करा ही सर्वांसाठी संदेश दिला आहे. वीरशैव समाजांनी पंचाचाराचे आचरण करुन समस्त मानव जातीला संदेश दिला आहे. भृत्याचार तत्त्वानुसार सर्वाविषयी आदर, दयाशीलता व नम्रता बाळगणे प्रत्येक वीरशैव लिंगायताचे आद्य कर्तव्य आहे. व्यक्तीच्या मनातून अहंभाव जाणून लिंगभाव सर्वत्र निर्माण व्हावा यासाठी भृत्याचार महत्त्वाचा आहे. अशा रितीने वीरशैव समाजाच्या पंचाचाराच्या आचरणाने व्यक्ती व समाज यांचा परस्परसंबंध चांगला राहून धर्मिक व नैतिक दृष्टीने समाजाचा विकास व्हावा व सकल जीवनावर चांगले आचरण पडून सुसंस्कृत समाज जीवन घडावे कारण व्यक्तीपेक्षा समाज हा मोठा असल्यामुळे समाजसेवेसाठी व्यक्तीला व सामाजिक संघटनेला पंचाचारामुळे मजबुती येते. म्हणून वीरशैव समाजाची सामाजिक आचार संहिता म्हणून पंचाचाराला महत्त्व द्यावे लागते. पंचाचार हा वीरशैवाचा शिवप्राप्तीचा कर्ममार्ग, कर्मयोग होय.

## २.५ षट्स्थल

नांदेड जिल्ह्यातील वीरशैव समाजाच्या धार्मिक व्यवस्थेतील तात्विक आणि अध्यात्मिकदृष्ट्या षट्स्थलाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. षट्स्थल हे वीरशैवाचा



अध्यात्मिक आत्मा असून आत्म्याला जाणणे म्हणजे षट्स्थल दर्शन होय. योग आणि भक्तीचा संगम साधणाऱ्या या कल्पनेन जीवाचा शिवाकडे होणारा प्रवासाचे वर्णन यामध्ये करण्यात आले आहे. वीरशैव तत्त्वज्ञानामध्ये षट्स्थल म्हणजे षट्+स्थल 'सहा' स्थळाला अध्यात्मिक महत्त्व आहे. स्थल म्हणजे ठिकाण असून परशिवब्रम्हा असा केला आहे. स्थल हेच सच्चिदानंद परब्रम्हा आहे. म्हणूनच म्हटले जाते,

'स्थीयते लियते यत्र जगदेतय्यराचरम्
तद् ब्रम्हा स्थलमित्युक्त स्थलत्व विशाखैः'

'स्थल' या तील पहिले अक्षर 'स्थ' हे स्थान, आधार दर्शवितो व 'ल' हे लय किंवा अंत दर्शविते. स्थल हे सर्व चराचर वस्तुचे आश्रयस्थान, आधार असून ते सर्व शक्ती, सर्व जीव आणि सर्व तेज यांना धारणा करते. 'स्थल' हे सर्व प्राणिमात्रांचे व सर्व जगांचे विरामस्थान आहे. विरामस्थान हे अध्यात्मिक तत्त्व असून शिवपरमात्म्याशी एकात्म पावण्यासाठी ज्या सहा पायऱ्या आहेत त्याला वीरशैवाचा ज्ञानमार्ग, ज्ञानयोग असे म्हणतात. या ज्ञानमार्गाला षट्स्थलामध्ये भक्तस्थल, महेशस्थल, प्रसादस्थल, प्राणलिंगस्थल, शरणस्थल आणि ऐक्यस्थल असे म्हटले आहे. षट्स्थल हे वीरशैव लिंगायत समाजाचे निश्चित केलेल्या धार्मिक व्यवस्थेच्या आचरणाच्या रचनेतील एक केंद्रीभूत तत्त्व आहे. षट्स्थल या अध्यात्मिक मार्ग असून तो वीरशैव लिंगायत समाजाचा एक प्रभेदक घटक आहे. वीरशैवाचा शिव उपासनेचा एक विशिष्ट प्रकार आहे. षट् म्हणजे सहा स्थले म्हणजे 'अवस्था' असेही भक्ताला ज्ञान प्राप्त करण्यासाठी या अवस्थेची प्रचीती येते. या षट्स्थलातील सहा अवस्थेचे आचरण भक्ताच्या आध्यात्मिक ज्ञानासाठी खूप महत्त्वाचे आहेत.

वीरशैवाच्या धार्मिक तत्त्वानुसार सुरुवातीस उपासक आणि उपास्य यांच्यात भेद असतो. अंग आणि लिंग म्हणून संबोधल्या जाते. म्हणजे अंग व लिंग यामधील भेद हळुहळु नाहिसा होतो. आणि अंग हे लिंगाशी एकरुप होते. देवाच्या अस्तित्वाची अनुभूती येण्यासाठी वीरशैवाला सहा स्थलातून आर्थिक आचार करावे लागते. मनुष्याच्या शरीरामध्ये मुलाधार, स्वधिष्ठान, अनाहत, विशुद्ध, आज्ञा अशी सहा

चक्रे असून ते भेदून समाधी अवस्थेपर्यंत मार्गक्रमण करत असतो. वास्तविकता वीरशैवाच्या धार्मिक दृष्टीकोनातून स्थलाचा उल्लेख सर्वोच्च आत्मा असा केलेला असून वीरशैवाच्या अध्यात्मिक शास्त्रावर आधारलेला आहे. व्यक्तीला षट्स्थलामुळे वीरशैवाच्या अध्यात्मिक दृष्टीने स्वत:च्या म्हणजेच आत्मजाणिवेसाठी षट्स्थलाचे ज्ञान अतिशय महत्त्वाचे आहे. वीरशैव तत्त्वज्ञानामध्ये स्थलाला विशिष्ट प्रकारचे महत्त्व असून स्थल हे भक्ताच्या आत्म्याच्या अध्यात्मिक प्रवासातील वेगवेगळे टप्पे अवस्था आहेत. प्रत्येक टप्प्यामध्ये त्याच्या आत्म्याचा अधिक विकास परिपूर्ण होत असतो व त्याचे आध्यात्मिक ज्ञान वाढतच जात असते. दासगुप्तांनी षट्स्थलाचा दुसरा अर्थ असाही सांगितला आहे की, "आत्म्यापासून आकाराची, आकाशापासून वायू, वायुपासून अग्नि, अग्नीपासून अप् आणि जलापासून पृथ्वीची निर्मिती होते. आत्मा आणि ब्रम्हा यांच्या एकतेला व्योभांग म्हणतात. भक्ताला भूम्यंग, महेश्वराला जंगाल, प्रसादाला अनलंग, प्राणलिंगाला वारस्थांग, असा अर्थ षट्स्थलातील स्थलाना प्राप्त होतो."

**२.५.१ भक्तस्थल :**

भक्तस्थल हे वीरशैव समाजाच्या अध्यात्मिक अंतरंग आणि बहिरंग शुद्धी मार्गातील पहिली पायरी असून भक्तस्थलाचा शिवावरील श्रद्धेशी संबंध व्यक्त केलेला आहे. गुरु,लिंग, जंगम यांना वीरशैव समाजाचे व्यक्ती श्रेष्ठ मानतात त्यांनी पूजा करणे हे भक्तस्थलामध्ये समाविष्ट आहे. सृष्टिचा निर्माता परमशिव असून त्यांच्या भक्तीमध्ये लिन होऊन कामक्रोधी षड्विकारावर मात करण्यासाठी इष्टलिंगाची पूजा करणे अतिशय महत्त्वाचे आहे.

"शैवीभक्ति : समुत्पन्ना यस्यासौ भक्त उच्यते।"

ज्याच्या मनात सदैव शिवाविषयी भक्ती उत्पन्न होते त्याला शिवाचा परम भक्त मानल्या जाते. शिव निराकार असल्यामुळे त्याची पूजा प्रत्यक्ष होत नाही. म्हणूनच भक्ताची शिवाचेच रुप म्हणून गुरु, लिंग, जंगमाची सेवा करावी म्हणजे शिव भक्ती सफल होय. म्हणूनच म्हटले जाते. गुरु आणि लिंग जंगमाची सेवा सदैव घडो. वीरशैवाच्या मनात शिवाची प्रतीमा नेहमी कार्यतत्पर, घरात नेहमी दासोह चालतो



त्याला खऱ्या अर्थाने भक्त म्हटले आहे. गुरुने दिलेल्या लिंगात अचल श्रद्धा ठेवून सदैव क्रियाचारात गुंतलेले हे स्थलाचे लक्षण अहे. गुरुलिंग, जंगम प्रेमी भक्त आणि त्यात गुरुलिंग जंगमाचे आचार न करता भक्ती करणारा अनाचारी तो शिव भक्त नव्हते. म्हणूनच म्हटले जाते

'जाणीव न विसरणारा शिवभक्त
अन् विसरुन जाणणारा शिवभक्त
श्रद्धेने राहणारा शिवभक्त श्रद्धा न ठेवणारा,
विसरुन राहणारा शिवभक्त नव्हे'

भक्ताद्वारे जो धार्मिक आचार आचारला जातो त्याला भक्तस्थल असे म्हटल्या जाते. त्यासाठी निरंअहंकाराला, नैतिका, उद्योजकता, अहिंसा व आत्मसपर्णणाची वृत्ती प्रथमत: भक्तामध्ये असावी लागते. तेव्हाच शिवाविषयीची नि:सीम भक्ती ही षट्स्थलातून साध्य होईल. वीरशैव हे शिवावरील नि:सीम भक्तीला मानसिक परिपूर्णता लाभली तरच साध्य होईल. "भक्तस्थल ही व्यक्तीच्या अंतर्गत व बहिर्गत व जीव-शिव यांच्यातील शिवसेवक असल्याची जाणीव होते. भक्तस्थळ हे वीरशैवाचे धार्मिक स्थळांचे शिवावर नि:सीम भक्ती असणे याचे महत्त्व यामध्ये सांगण्यात आले आहे. भक्तस्थलावरुन भक्ताच्या श्रद्धेचे महत्त्व विषद होते.

**३.५.२ महेशस्थल**

महेशस्थलामध्ये भक्ताच्या श्रद्धेचे ठाम निष्ठेचे रुपांतर भक्तीमध्ये होते. महेश स्थलाचा शिवानिष्ठेशी संबंध असतो. ही निष्ठा इष्टलिंगावरील श्रद्धेचा विकास होऊन निष्ठा दृढ होत असते. विशेष म्हणजे वीरशैव लिंगायत समाजाचे महेशस्थल हे हृदय पावित्र्यतेचे प्रतीक होय. महेशस्थलात परशिवावर आणि गुरुच्या आदेशावर आत्यंतिक निष्ठा ठेवून लिंगांगसामरस्याची म्हणजेच मोक्षप्राप्तीची नंतरची अवस्था गाठते हे या स्थलाचे उद्दिष्टे आहे. शिवाच्या उपासनेने व गुरु, लिंग, जंगम यांच्या पूजनाने व मानव जातीची सेवाने भक्त महेस्थल बनू शकते. कारण स्थलामध्ये भक्तस्थलांनी श्रद्धा निष्ठेमध्ये परिवर्तीत होवून त्यामध्ये दृढता येते. "भक्तस्थलाच्या माध्यमातून महेश्वराने गळ्यातील इष्ट लिंगाशी पूर्णता प्रामाणिक राहून आपल्या

हृदयाचे, मस्तकाचे, हाताचे पावित्र्य राखले पाहिजे. वीरशैव समाजाच्या माणसाच्या केवळ हृदयाचे नव्हे तर मस्तक, हात शुद्धेच्या अग्रात असले पाहिजे तरच भक्ताला महेशस्थलाची जाणीव होईल."

**२.५.३ प्रसादीस्थल**

जो वीरशैव भक्त जंगमाची पूजा केल्याशिवाय आणि शिवाला अर्पण केल्याशिवाय काहीही खात नाही, किंवा लिंगार्पित, जंगमार्पित प्रसादरुपाने सेवन करतो त्याला पारमेश्वरागम, परमरहस्य, शिवरहस्य या ग्रंथामध्ये प्रसादीस्थल म्हटले आहे. मन प्रसन्न आणि आंनदित होण्यासाठी भक्ताचे मन निर्मल व शिवज्ञानाची प्राप्ती करुन घेण्यासाठी शिवाचा प्रसाद अतिशय महत्त्वाचा आहे. जो भक्त शुद्ध विचाराने बेलपत्र, पुष्पफल, पाणी कोणतीही वस्तु शिवाला अर्पित करुन प्रसादरुपाने स्विकारतो त्यामुळे सर्व पातकांचा नाश होतो. शिव हेच परमकर्तव्य म्हणून भक्ताने सतकर्म शिवार्पण करण्याची प्रवृत्ती प्रसादीस्थलात आहे. प्रसाद म्हणजे अवधान, तारतम्य भक्तीचा स्वीकार होय. ज्याच्या अंगी निष्कलंक आणि परमपवित्र जीवनामुळे त्याला स्वत:तील अंत:प्रकाश दिसू लागतो. तोच खरा भक्त. प्रसादी स्थल हे शिवाच्या प्रती असलेली श्रद्धा, भाव याचा योग्य मिलाप करुन तो कार्यात उतरुन नि:स्वार्थबुद्धीने केलेली सेवा प्रसादाचे मुख्य लक्षण बनते.

**२.५.४ प्राणलिंगस्थल :**

वीरशैवाच्या षट्स्थलातील चौथे तत्त्व म्हणून प्राणलिंगस्थलाकडे पाहिले जाते. या स्थळाला अनुभव स्थळ ही म्हणतात. कारण इष्टलिंगावर संपूर्ण विश्वास ठेवून भक्त कार्य करत असतो. तो शिवलिंग म्हणजे प्राणलिंगाचे रुप अनुभवतो. प्राणलिंगाच्या मार्फत तो अंतर्मुख होऊन शरिर, मन, बुद्धी स्थिर होऊन त्याला शिवमयता जाणवू लागते. भक्ताला इष्टलिंग म्हणजे प्राण आणि प्राण म्हणजेच इष्टलिंग असा अनुभव येत असतो. भक्त प्राणलिंगाची पूजा अंतरिक प्रेरणेने करत असतो. प्राणलिंगी स्थलामध्ये तो क्षमा हेच अभिषेक जल समजतो. विवेक त्याचे वस्त्र असते, सत्यवचन हा त्याचा श्रेष्ठ अलंकार असतो, समाधी ही गंध, अक्षता हे निरहंकारता, श्रद्धा ही धुप असते, महाज्ञान म्हणजे दीप असते, विषय भ्रमदूर ठेवणे



म्हणजे भक्ताची प्रदक्षिणा असते. त्याच्या बुद्धीचे इष्टलिंगामध्ये लिन होणे म्हणजे त्याचा शिवाशी नमस्कार असतो. अशा तऱ्हेचा 'प्राणलिंगस्थळ' तो शिवाला अर्पण करुन प्राणलिंग अवस्थेत मन हे अंतर्यामी पावते. "भक्ताला या अवस्थेमध्ये शांति, दुरदर्शित्व व सत्यशीलता या सद्‌गुणाची वाढ प्राणलिंग स्थलातून होत असते."

**२.५.५ शरणस्थल**

षट्स्थलातील पाचवे स्थल म्हणून शरणस्थल म्हटले जाते. "वीरशैवाच्या धार्मिक दृष्टीकोनातून समर्पण भावाने पूर्णपणे शरण गेलेल्या भक्ताला शरण म्हणतात. इष्टलिंगामध्ये शिवस्वरुप अनुभवता अनुभवता भक्ताला आपली अध्यात्मिक प्रगती साधून शिवाच्या आनंदमयी रुपाची जाणीव या अवस्थेत होत असते." व सर्व विसरुन शिवाच्या उपासनेत शरण जातो. शिवाची कास धरुन बाह्य विश्वातील पाश विसरुन कार्य करत असतो. ज्या भक्ताने शिवाची उपासना करताना धर्म, अर्थ, काम हे तीन स्वार्थ सोडले आहेत. त्याला एकांतावस्थेत शिवाचे ध्यान साध्य होते. शरण स्थल प्राप्त होते. शिवाची व लिंगाचा आराधना यामध्ये अंतर पडत नाही व ताटातूट आयुष्यभर होत नाही. त्याला परमरहस्य ग्रंथात शरणस्थल म्हटले आहे. अशा रितीने भक्ताला हा श्रेष्ठ-कनिष्ठ, गर्व-अहंपणा, पूर्वग्रह स्थिती यासारख्या विकारापासून दूर होतो. तो भक्त परिपूर्ण समर्पण व भगवान शिवावरील दृढ श्रद्धेने मोक्षप्राप्तीच्या अवस्थेकडे जातो.

**२.५.६ ऐक्यस्थल**

भक्तानी साधनमार्गात परिक्रमण करणारा अंतिम सत्य ऐक्य स्थल या स्थितीत भक्त भक्तीच्या भावनेने लिंगामध्ये एक होऊन स्वयं लिंगरुपी होतो. ही अवस्था म्हणजे ऐक्य स्थल होय.

'एक्स्थ भाव ऐक्य'

या उक्तीनुसार भक्ताला जेव्हा शिवा सोबत एकता प्राप्त होते शिवयोगाचा तो अनुभव घेतो तेव्हा शिवतत्त्वाचा अनुभव करतो. जीव हा शिवसमान असल्याने ज्याप्रकारे जलामध्ये जल, अग्नीमध्ये अग्नी मिसळून जाते. त्याचप्रमाणे भक्ताचा जीव शिवामध्ये समरस होतो. "ऐक्यथल म्हणजे भक्त भक्तीमध्ये अंग, लिंग, आत्मा,

परमात्मा, मानव, देव, जीव, शिव यांचे आनंदमयी एकात्मीकरण होय." जीव-शिव ऐक्याचे वर्णन ज्ञानेश्वरांनी अत्यंत मार्मिकपणे सांगितले आहे.

"जीव तोच शिव होऊनिया ठेला
शब्द तो मुराला निःशब्दा माजी
आता मी तू कै चा सर्व एकाकार
जाहला ज्ञानेश्वर स्वयं ब्रम्हा"

'लिंगागसामस्य म्हणजे आत्मा आणि परमात्म्याचे मिलन होय.' षट्स्थल ज्ञान हाच खरा शिवयोग आहे. हे तत्त्वज्ञान व अनुभव या दोन्हीशी निगडीत आहेत. "भक्ताला त्याच्या जीवनामध्ये सहा अवस्थातून मोक्षप्राप्ती होऊ शकते. वीरशैवाचा षट्स्थल सिद्धांत हा मानशास्त्रीय दृष्टीकोनातून भक्कमपणे उभारलेला आहे." वीरशैव लिंगायत समाजाच्या षट्स्थल ज्ञानाचा गौरव संत शिरोमणी मन्मथस्वामी यांनी पुढील अभंगात केला आहे.

"षट्स्थल ज्ञान हाचि अहायोग।
भक्ताचा अनुराग सर्वकाल।।
म्हणे मन्मथ बसवभक्तादिक ।।
सर्वश्रेष्ठ देखा षट्स्थल ।।"

म्हणूनच म्हटले जाते की, 'षट्स्थल हे वीरशैव लिंगायत धार्मिक अध्यात्मिक शास्त्रातील व नितिशास्त्रातील सर्वोच्च तत्त्व आहे. यामधून भक्ताला शिवाची आराधना करुन षट्स्थलाची प्राप्ती होते."

### २.६ वीरशैव समाजाची संस्कार व्यवस्था

नांदेड जिल्ह्यामध्ये वीरशैव लिंगायत शिवाचार्याच्या आदेशानुसार वेगवेगळे संस्कार केले जातात. जीवनात संस्काराचे खुप महत्त्व आहे. 'संस्कार' हा धार्मिकतेचा महत्त्वपूर्ण भाग आहे. संस्काराशिवाय जीवन शुन्य असते. संस्कारच मनुष्याला श्रेष्ठ बनवून, उत्तम आकार देतात. सर्वोत्तम जीवनाचा पाया उत्तम संस्कारावरच अवलंबून असतो. संस्काराशिवाय मानवाचे जीवन समुद्रात भरकटलेल्या जहाजाप्रमाणे असते. "एक चांगला मानव, आदर्श समाज बनविण्यासाठी संस्कारची फार मोलाची



भूमिका असते." 'संस्कार' म्हणजे ज्या क्रियेच्या आचरणाने मनुष्याच्या ठिकाणी सद्गुणाचे विकसन व संवर्धन होते. त्या क्रियेला 'संस्कार' म्हणतात. जीवनात संस्कारांना फार महत्त्व आहे. कारण चांगले संस्कार घडले तर व्यक्ती श्रेष्ठ होतो. संस्कार माणसाच्या शारीरिक व मानसिक स्थित्यंतराचे द्योतक आहे. व्यक्तीच्या विशिष्ट प्रसंगी, विशिष्ट वस्तूचा, विशिष्ट क्रमाने ज्या पद्धतीचा वापर विधिवत केला जातो ला 'संस्कार' म्हणतात. मनुष्याच्या धार्मिक आचरणाची सुरुवात आणि शेवट अनेक संस्कारानीच होत असते. संस्काराचा मुळ उद्देश व्यक्तीच्या आचरणात शुद्धीकरण, धर्ममूल्याचा परिचय, अध्यात्मिक विकास हा असतो. एखाद्या पदार्थातील नैसर्गिक उत्कृष्ट गुणांची प्रयत्नपूर्वक प्राप्ती करुन घेणे यास 'संस्कार' म्हटले जाते. प्रत्येक समाजात त्यांचे-त्यांचे धार्मिक संस्कार असतात. त्या संस्कारांना अनन्यसाधारण महत्त्व असते. संस्काराचा घनिष्ठ संबंध हा धार्मिक बाबी बरोबरच समाज व संस्कृती यांच्याशीही येत असतो. समाजाची मूल्यव्यवस्था ही संस्काराद्वारे निश्चित, नियंत्रीत व विकसित होत असते. संस्कार हा धार्मिक तत्त्वाचा आशय असतो. त्यामुळे कोणताही समाजाची संस्कृती अभ्यासताना संस्कार व्यवस्थेतील ज्ञान अवगत करणे महत्त्वाचे असते. संस्कार एक मुल्यवर्धक प्रक्रिया आहे. मनुष्य, मनुष्येतर, प्राणी, वनस्पती आणि निर्जीव वस्तू यांचा मूळ स्वभाव म्हणजे प्रकृती, तिच्यात होणारी बिघाड म्हणजे विकृती आणि ज्या क्रिया प्रक्रियाद्वारा मुळ स्वभाव बिघाड न होऊ देता, उलट चांगले रुप दिले जाते. त्यांना 'संस्कार' म्हणतात. मनुष्य हा बुद्धिशील प्राणी असल्यामुळे ज्ञानार्जन ही बौद्धिक गरज आहे. संस्कारातून व्यक्तीच्या वृत्तीला चांगले वळण लागते व त्यातूनच सत्प्रवृत्त, सुसंस्कृत, सुज्ञ होत असतो. प्रत्येक संस्कार वेगवेगळ्या प्रकारचा असतो. "एकाच संस्कारात संस्कार्य व्यक्तीला अनेक शुभफले प्राप्त व्हावीत व अशुभ फलांचे निराकरण व्हावे यासाठी संस्कार प्रयोगात विविध कृत्ये गुंफलेली असतात." वीरशैव समाजाची संस्कार व्यवस्था ही अत्यंत साधी आणि सोपी आहे. वीरशैवाची संस्कारव्यवस्था पूर्णतः स्वतंत्र असून कोणत्याही धर्माच्या संस्कारासारखी नाही. व्यक्तीचे अंग हे लिंगस्वरुप होण्यासाठी लिंगवंतावर जन्मापासून त्याच्या मृत्यूपर्यंत लिंगधारणा, नामकरण,

लिंगदीक्षा, लग्नकार्य, गर्भधान संस्कार, जातकर्म संस्कार, प्रसाददीक्षा, गृहप्रवेश या नऊ संस्काराची पूर्तता वीरशैव समाजाकडून होत असते. परंतू त्यातील मोजकेच संस्कार केले जातात. त्यामध्ये गर्भधान, जातकर्म, नामकरण, दीक्षा, लग्नविधी मध्ये गुग्गुळ, विवाह त्याचबरोबर शेवटचा संस्कार अंत्येष्टी आचरण केले जाते.

### २.६.१ गर्भाधान संस्कार :

वीरशैव समाजामध्ये 'गर्भाधान' संस्काराला अतिशय महत्त्व आहे. हा संस्कार व्यक्तीच्या जन्मपूर्व अवस्थेत होत असतो. तो शरीर उत्पत्तीचा पहिला आणि अत्यंत महत्त्वाचा संस्कार ठरतो. स्त्री गर्भवती झाल्यानंतर सातव्या किंवा आठव्या महिन्यात हा विधिवत संस्कार करावयाचा असतो. गर्भाधान संस्कारामध्ये एक छोटेसे लिंग जन्म होणाऱ्या मुलाच्या नावाने त्याच्या आईच्या दंडाला, पोटाला बांधतात. वीरशैव समाजात गर्भधारी स्त्रिला आठव्या महिन्यात गुरू किंवा जंगमाने इष्टलिंग विधिवत बांधले जाते. दुसरे इष्टलिंग मुलाच्या जन्मानंतर गळ्यात बांधावयाचे असते. इष्टलिंग संस्काराचे दोन प्रकाराद्वारे व्यक्तीला संस्कार केला जातो. एक 'लिंगधारणा' व दुसरे 'लिंगदीक्षा' यांचा जन्म झाल्यानंतर गुरु त्या मुलास साध्या विधीने त्याच्या गळ्यात लिंग बांधतो.

"आहाराचार्य चेष्टाभिर्यादुशीभिः शमान्विती।'
स्त्रीपुं सो समुपेताया तयोः पुत्रो ऽ पि तादृशः।।"

गर्भसंस्कारामध्ये स्त्री-पुरुष यांचे आचार-विचार खुप महत्त्वाचे असतात. गर्भाधारण केल्यानंतर त्यांच्या विचाराचा प्रभाव हा त्या जन्मणाऱ्या बाळावर होत असतो. जसा आहार सेवन केला जाते. त्याच प्रमाणे मुलाची / मुलीची गर्भधारणा होते. त्यामुळे स्त्री-पुरुष यांचे संस्कार मुलांच्या गर्भावर पडत असतात.

### २.६.२ जातकर्म संस्कार :

दोषाचे पतन होण्यासाठी 'जातकर्म संस्कार' केला जात असतो. काही व्यक्ती बाळाचा जन्म झाल्यानंतर सुतक / विटाळ मानत असतो, पण वीरशैव समाजामध्ये पंचसुतकांचा निषेध केला आहे. वीरशैव समाजामध्ये आईला व बाळाला स्नान घालून भस्म लावून आठव्या महिन्यात गुरुने दिलेले लिंग बाळाच्या गळ्यात बांधतात.



म्हणजेच बाळाच्या जन्माच्या अगोदर त्यांनी इष्टलिंगाचे शिवसंस्काराचे तत्त्व स्विकारुन जन्मानंतरही शिवसंस्काराशी एकरुप राहावे यासाठी 'गर्भलिंग धारणा' केली जाते. वीरशैव समाजामध्ये 'लिंगधारणा संस्कार' हा जातकर्म संस्काराचेच अंग मानले जाते.

### २.६.३ नामकरण संस्कार :

नामकरण संस्कार वीरशैव समाजाच्या संस्कारामध्ये अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. बाळाचा जन्म झाल्यानंतर अकराव्या व बाराव्या दिवशी हा विधी केला जातो. काहीवेळेस वेळेच्या नियोजनानुसार मुलाच्या जन्मानंतर एका महिन्याच्या आत सुद्धा हा संस्कार केला जातो.

मुला-मुलीची नावे ठेवताना वीरशैव समाजातील थोर व्यक्तीची थोर स्त्री पुरुषांची नावे ठेवण्यात येत असतात. काही ठिकाणी वीरशैव समाजातील आपल्याच पिढीतील कर्तबगार व्यक्तीची नावे ठेवली जातात. नामकरण करत असताना त्या नावामधून चांगला अर्थ निघून तो भविष्यात ते कार्य सिद्ध करेल या उद्देशाने थोर व्यक्तीची नावे ठेवली जातात. व्यक्तीची नावे ही वीरशैव संस्कृतीच्या जिवंतपणाची व प्रभावाची प्रतीक समजली जातात. अर्थात इतरही नावाची प्रथा प्रचलित आहे. शिवाच्या नावातून संस्कृती व्यक्त होत असते.

### २.६.४ दीक्षा संस्कार

वेगवेगळ्या शिवाचार्याच्या कृपेने मठात सार्वजनिक ठिकाणी दिक्षा संस्कार लिंगदीक्षा विधी, शिवदीक्षा, इष्टलिंग दीक्षा केल्या जातात. या संस्कारात शरीराबरोबर मन व प्राणावर संस्कार केला जातो. या संस्कारामुळे व्यक्ती शिवाच्या जवळ येवून त्याला धार्मिक, अध्यात्मिक प्रवास सुरु होतो. 'लिंगदीक्षा संस्काराव्यतिरिक्त लिंगायत समाजामध्ये इतर धार्मिक संस्कार नाहीत. दीक्षा संस्कारामधून भक्ताला आध्यात्मिक आंतरदृष्टी व शिवाची उपासना देण्याचा प्रयत्न असतो. दीक्षा संस्कार हा कुलाच्या गुरुकडून केला जातो. बाळाला जन्म वेळी दिलेले लिंग, विभूती, श्रीफळ, नवीन वस्त्र, रुद्राक्ष, पूजेचे साहित्य घेवून दीक्षा संस्कारासाठी तयार केले जाते. दीक्षा संस्कार करत असताना तो मठात किंवा सामुहिक ठिकाणी दीक्षेचा कार्यक्रम असेल

त्या ठिकाणी दीक्षा दिली जाते. इष्टलिंग घेवून गुरु (शिवाचार्य)' विधिवत लिंगाची पूजा करतात. गुरु बालकाला जवळ बोलावून लिंग उजव्या हातावर ठेवून त्याच्या उजव्या कानात पंचाक्षरी मंत्र "नमः शिवाय" मंत्र सांगला जातो. तो मंत्र दररोज स्नान केल्यानंतर किवा इष्टलिंगाची पूजा करता वेळेस किमान १०८ वेळा जप करायला सांगितला जातो. "ह्या संस्कारामुळे दीक्षा घेणाऱ्याला जगात चारित्र्य संपन्न जीवन जगण्याचा पहिला पाठ शिकवला जातो." लिंगपूजा करण्यापूर्वी शिवज्ञान आवश्यक असते. ज्ञानातुन क्रिया, क्रियातून ज्ञान असे वर्तुळ असते. ह्या वर्तुळाचे शिवज्ञान गुरुकडून दीक्षा घेतेवेळी गुरुने भक्तास अथवा शिष्यास द्यावयाचे असते. वीरशैव समाजाच्या व्यक्तीचा हाच धार्मिक संस्कार मानला जातो. "दीक्षा या शब्दाची फोड केली तर आपल्याला असे जाणवते की, 'दी' म्हणजे शिवज्ञान प्रदान करणे आणि 'क्ष' म्हणजे मलप्रयाचे निर्मूलन करणे होय. व्यक्तीच्या अंगी लिंगसंबंध घडवून आणण्यासाठी मलत्र्याचा नाश करणे ही शिवदीक्षा होय." मलत्रयाचा नाश म्हणजेच आणवमल, मायामल, कार्मिकमल त्यालाच व्यक्तीच्या अंगी जी अशुद्धता असते त्यालाच 'मलमय' म्हणतात. "दीक्षेमुळे याचा नाश होऊन जीवात्मा हा शुद्धात्मा, लिंगात्मा बनतो. मांस पिंडाचे मंत्र पिंडात रुपांतराची प्रक्रिया म्हणजे दीक्षा होय." दीक्षा संस्कारामुळे पूर्ण शरीर हे शिवमय बनते. देहामध्ये शिवाची उर्जा निर्माण होऊन परिवर्तन घडवून आणण्यासाठी व्यक्तीला मन:शाती व धार्मिक उन्नतीही घडवून आणता येते ते फक्त दीक्षा संस्कारामुळेच साध्य होऊ शकते.

**२.६.५ लग्नविधी**

वीरशैव समाजामध्ये लग्नविधी मध्ये अनेक धार्मिक विधी केले जातात. वीरशैव समाजाच्या गोत्रानुसार विधी केल्या जातात. गोत्रानुसार विधी करुन ज्यामध्ये पंचकलसपूजा, गुग्गुळ, महादेवाची गादी या सारख्या विधी विवाह संस्काराच्या अगोदर पार पाडल्या जातात.

गुग्गुळ हा वीरशैवाच्या विवाहाच्या अगोदर मुहुर्तमेढ रोवण्याच्या दिवशी किंवा ग्राम देवतेला पूजन करण्याचे कार्य आहे. ज्या वीरशैव समाजाचे कुलदैवत आहे त्या देवतेप्रीत्यर्थ हा संस्कार केला जातो. 'विरभद्र' हा शिवाचाच अवतार आहे.



गुग्गुळ विधी करत असताना धर्मिक विधीच्या अर्धाघागरीच्या आकाराची मातीची भांडी तयार करुन गोलाकार भाग काढला जातो. छिद्र पडलेल्या भागात लाकडी खुंटी बसवून त्यात तेलात भिजविलेल्या चिंध्या टाकल्या जातात. वरचेवर त्यावर तेल सोडले जाते. गुग्गुळ पेटवून अजीव विरभद्र म्हणजेच 'पुरवंत' ते गुग्गुळ घेऊन वधु-वराच्या व आईवडिलाच्या हाताने पूजा करुन बाहेर काढतात. पुरवत हे पितांबर घालून सात पुरवंत मिरवणुकीमध्ये भाग घेतात. पेटलेला गुग्गुळ घेऊन परवंत बेभान होऊन नाचतात. गुग्गुळ नाचवताना रुद्रमहिमा, रुद्रसुत्रे, रुद्रस्तवन कवन रुपात गायले जाते. त्याला 'वडप' असे म्हणतात. तसेच 'व्हलम शिवा' - 'व्हलम शिवा' अशी शिवाची पण स्तुती करतात. 'पूर्वी गुग्गुळ हा विधी विरभद्राला वाहून घेतले असता, केला जात असे. मात्र नंतर वीरशैव लिंगायत कुटुंबाचे कुलदैवत असेल तर विवाहसमारंभ प्रसंगी 'गुग्गुळ' हा विधी केला जात असतो. काही ठिकाणी गुग्गुळाला ग्रामीण भागात 'इरफळी' सुद्धा म्हणतात. ही इरफळी शेवटी देवळाच्या परावर ठेवून आरती केली जाते. शांती करुन पूजेचे विसर्जन केले जाते. विरभद्राच्या कृपेने जीवनातील अरिष्ट गळून जावीत असाच त्याचा अर्थ असतो. गुग्गुळ विधी झाल्यानंतर गुळ, खोबरे, प्रसाद म्हणून वाटतात. कार्यक्रमस्थळी आल्यानंतर सर्व पुरवंताच्या व वराच्या करवलीच्या पायावर पाणी घालून लिंबु कापून दहीभात टाकून नंतर घरामध्ये प्रवेश करुन देवाला व गुरुला नमस्कार करुन सर्वांना भोजन देवून 'गुग्गुळ' हा विधी पार पाडला जातो. गुग्गुळ हा विधी वराच्या घरी देवकार्याच्या कुलधर्म कुलाचाराचा अपरिहार्य विधी असतो. विरभद्र विषयी लोक समुहात वाटणारा आदर व अभिमान व अद्‌भूताच्या स्वरुपात गुग्गुळाविधीतून व्यक्त होतो. हा विधी कुलदैवत विरभद्र आहे अशा वीरशैवात रुढ आहे.

वीरशैव समाजामध्ये शिवाला आराध्य दैवत मानले आहे. त्यामुळे कोणत्याही मंगलमय प्रसंगी त्याची मनोभावनेने पूजन केले जाते. त्यामुळे लग्नविधीच्या अगोदर देवकार्याच्या दिवशी वरच्या घरी 'महादेवाची गादी' केली जाते. महादेवाच्या गादीची स्थापना करुन चौरंगावर विधिवत पूजा मांडली जाते. कलश स्थापन करुन त्यावर पांढरे रुचकीचे फुल ठेवले जाते. जंगमाद्वारे कलशासमोर शंखनाद करुन जो पर्यंत

त्या गादीवरचे रुचकीचे फुल पडत नाही तोपर्यंत एकसारखा शंखनाद गुरु जंगम करत असतात. फुल पडल्यानंतर आरती करुन गुरु जंगम गादीला नैवद्य दाखवून भोजनाला सुरुवात करण्यास सांगतो. महादेवाच्या गादीचे सर्व जन पूजा करतात. अशा रितीने 'महादेवाची गादी' विधी संपन्न होतो. वीरशैवाच्या संस्कारामधील परिवर्तनाचा संस्कार म्हणून 'विवाह' संस्काराकडे पाहिले जाते. विवाह हे सर्व कौटुंबिक संस्काराचे मुळ केंद्र असते. राष्ट्राची, समाजाची संस्कृती, सभ्यता ही विवाह विषयक आदर्शावरुन ओळखल्या जाते. प्रत्येक व्यक्तीने विवाह करुन कौटुंबिक जीवन व्यतित करुन वीरशैव समाजाची कुटुंबाची अपेक्षा असते. विवाह हा एक पवित्र शरीर संस्कार मानला जातो. विवाहाचे वय जरी निश्चित नसले तरी साधारणत: वीरशैव समाजामध्ये शिक्षणाला महत्त्व देताना यामध्ये तरुण २५-३० वर्षाच्या नंतरच विवाह करण्यास तयार होत आहेत. संपूर्ण मानव समाजाचे शारीरिक व मानसिक स्वास्थ्य या विवाहसंस्काराशी निगडीत आहे. आत्मनिग्रह, आत्मत्याग आणि परस्पर सहयोगाची शिक्षा देवून समाज सुव्यवस्थित ठेवणे हा विवाह संस्काराचा उद्देश असतो. विवाह संस्कारामुळे देहासक्ती कमी होऊन शारीरिक, मानसिक, बौद्धिक, इहलौकीक, पारलौकीक आणि अध्यात्मिक उन्नती करणे हा उद्देश असतो. विवाहापूर्वी सर्व देवकार्य करुन महत्त्वाची विधी केल्या जात असतात. विवाह संस्काराच्या अगोदर गुग्गुळ, महादेवाची गादी या विधी धर्मिक उन्नतीसाठी केल्या जातात. विवाह संस्काराच्या अगोदर विवाह संपन्न होण्याच्या अगोदर गणेशाचे पूजन, पंचकलशाचे पूजन करावे लागते. पंचकलश हे पंचाचार्याचे प्रतीक म्हणून विवाह प्रसंगी मांडले जाते. नंतर वरवधुच्या हाती पंचसुत्र व पत्रिका देवून त्यांना खुर्च्यावर बसवले जाते. याला 'कंकणधारणा' विधी असेही म्हणतात. वधु वराच्या परस्परसंबंधाचे शुद्धीकरण व दृष्टीकरण याचे प्रतीक पंचकलशपूजन विधीला महत्त्व आहे. पंचकलश हा विधी सत, चित, आनंद, नित्य, परिपूर्ण या परमेश्वराच्या पंच महागुणाचे प्रतीक असते. म्हणून हिरेमठ म्हणतात, 'अव्यक्त परमेश्वराचे पंचलक्षणयुक्त व्यक्त स्वरुप म्हणजे पंचकलस होय.' पंचकलश हे नारळावर पाच वेगवेगळ्या कपड्यामध्ये तयार करतात. ते पाच नारळातील कपडे पाच पीठाचे प्रतीक म्हणून संबोधल्या जाते. त्यामध्ये



हिरवा-रंभापूरी, तांबडा-उज्जैन, काळा-हिमवत्केदार, पांढरा-श्रीशैल पर्वत पिवळा-काशीपीठाचे प्रतीक म्हणून पंचकलशाचे पूजन केल्या जाते. अशा रितीने मंगलाष्टकानंतर एकमेकांना हार घालून हा पंचाचार्याच्या, गुरुच्या, जंगमाच्या, लिंगाच्या उपस्थित विवाह हा विधी संपन्न होतो.

### २.६.६ अंत्येष्टी

वीरशैवामध्ये व्यक्तीच्या जन्मापासून मृत्यूपर्यंत संस्कार केले जातात. वीरशैवाच्या शेवटच्या टप्यातील अंत्येष्टी म्हणजेच मृत्यू संस्कार पार पाडला जातो. अंत्येष्टी हे जरी दु:खद संस्कार असला तरी शेवटी व्यक्तीला 'शिवऐक्य' व्हावेच लागते. हा संस्कार म्हणजे जीवन हा मृत्यनंतर शिवाशी, लिंगाशी, लिंगैक्य परमेश्वराशी जीव एकरुप होतो. आज देखील वीरशैव समाजातील लोक मृत्यूऐवजी 'लिंगैक्य, शिवैक्य असाच शब्द प्रयोग करतात.' शरीर नश्वर, आत्मा अमर, शरीर अचर, आत्मा चर, शरीर जड, आत्मा कर्ता हा कर्ता असलेला आत्म जड शरीर सोडून निघून गेल्यावर ते शरीर नष्ट होते. आपल्या चिंतनातून देहातील चैतन्य संपल्यावर देह पाण्यात न टाकता किंवा जाळून वातावरण प्रदूषित न करता मृत देहाची समाधीच केली जाते. शिवसंस्कृतीमध्ये देहावर इष्टलिंग धारण केलेले असते. त्यामुळे देहाला न जाळता त्याला पुरले जाते. ते प्रेत मातीमध्ये पुरल्यामुळे त्याच्या अंगावरील इष्टलिंग तसाच असतो व त्या प्रेताला मांडी घालून बसवून पुरले जाते. क्वचित अपघात, विषप्राशन आधारीत अशा घटना घडल्यावर प्रेताला जाळले जाते. वीरशैव समाज अनेक खेडे गावात राहत असल्यामुळे त्याच्या अनेक ठिकाणी स्मशानभूमी नाहीत. अनेक समाजाचे लोक एकत्र अत्येष्टी करताना दिसतात. काही ग्रामीण भागात तर शेतात प्रेत नेल्याशिवाय पर्याय नाही. अशा अनेक अडचणी ग्रामीण भागात येताना दिसतात. अत्येष्टी झाल्यानंतर वीरशैव समाजातील लोक सुतकप्रथा पाळत नाहीत. अंत्येष्टी झाल्यानंतर भस्म लावून तो बाहेर पडत असतो व तीन दिवसापर्यंत तो कोणतेही कार्य न करता चौथ्या दिवशी इष्टलिंगाची पूजा करुन आपले दैनंदीन कार्य सुरु करतो.

## २.७ कायकाची श्रमभक्ती

नांदेड जिल्ह्यातील वीरशैव समाज हा ग्रामीण भागात जास्त प्रमाणात असल्यामुळे त्याचा प्रमुख व्यवसाय शेतीच आहे. देशाची अर्थव्यवस्था ही कृषी, व्यापार, उद्योगावर अवलंबुन राहिलेली आहे. नांदेड जिल्ह्यातील शेती पावसाच्या पाण्यावर अवलंबून असून गोदावरी, पैनगंगा, मांजरा, मन्याड, लेंडी, आसना या नद्याच्या प्रवाहाने बराचसा भाग हा ओलीतीखाली आला आहे. त्याच बरोबर इसापूर येथील प्रकल्पाचे पाणी कॅनॉलद्वारे नांदेड जिल्ह्यातील बऱ्याच तालुक्याला पाणी पुरवठा केला जातो.

'प्रत्येक समाजामध्ये कर्माविषयी संकल्पना स्पष्ट केलेली आहे.' श्रमभक्ती हा दारिद्र्य निर्मूलनाचा सर्वश्रेष्ठ उपाय आहे. ज्या समाजाची आर्थिक परिस्थिती चांगली त्या समाजाचा विकास झपाट्याने होत असतो. कारण जगाची उत्क्रांती ही व्यक्तीच्या क्रियाशीलतेतूनच झालेली आहे. व्यक्तीच्या जिज्ञासुवृत्ती, धडपड, कार्यप्रवणता व सक्रियता कार्यावरची निष्ठा, चिकाटी, परिश्रमाचे सातत्य कारणीभूत झालेले आहे. मनुष्याने जर आपले कार्य जर कर्तव्यबुद्धीने केल्यास कार्याचे पृथ्वीवर नंदनवन, कैलास निर्माण होऊ शकतो. 'कायक' चा अर्थ महात्मा बसवेश्वरांनी वीरशैव लिंगायत समाजाला स्वयंपूर्ण जीवन जगण्यासाठी कायक या विचाराचे प्रतिपादन केले. कायक या शब्दाची व्युत्पती संस्कृतमध्ये 'काया' या शब्दापासून तयार झालेली आहे. 'काया म्हणजे शरीर, शरीराद्वारे केले जाणारे कर्म म्हणजे 'कायक होय'. कार्याविषयी महात्मा बसवेश्वरांनी आपले कर्म म्हणजेच ईश्वर व कर्म हीच पूजा, श्रम हाच देव, श्रम हेच सर्वस्व. त्यामुळे व्यक्तीच्या कार्यावरुन त्याला समाजामध्ये मान मिळत असतो. कार्यावरुनच त्याला प्रतिष्ठा मिळत असते. म्हणूनच महात्मा बसवेश्वरांच्या 'कायक वै कैलास' या तत्वानुसार वीरशैव लिंगायत समाजाचे कार्य करताना दिसतात. श्रमातूनच सर्व सुख समावले आहे. व्यक्तीच्या शारीरिक श्रमातून प्राप्त वस्तूच तुम्हाला सुखाच्या परमोच्च शिखराची अनूभुती देऊ शकतात. कर्म हाच स्वर्ग, स्वतःच्या नीतिशील कर्तव्यपूर्तीपेक्षा जगात कोणतीच गोष्ट श्रेष्ठ नसते. 'कायक' हे व्यक्तीच्या क्रिया प्रवणीतून समाज कल्याण साधण्याचे एक महत्त्वपूर्ण साधन म्हणून ती प्रत्येक व्यक्तीची जीवनशैली व्हावी. असा उद्देश कर्माचा कार्यातून होत असतो. व्यक्तीने कार्य फक्त स्वयंकेंद्री नसून ते समाजभिमुख कार्य असावे. त्या



कार्यामधून स्वहितापेक्षा समाजहित सामावलेले असावे. म्हणूनच त्यांनी 'कायक वै कैलास' हा जीवनाचा मुलमंत्र दिला. श्रमाशिवाय कोणत्याही व्यक्तीचा विकास होणार नाही. व्यक्तीचा चरितार्थ चालण्यासाठी प्रत्येकाला उपजिविकेसाठी कोणते तरी कार्य गरजेचे आहे. जीवन जगण्यासाठी श्रम व कार्यशील राहणे हे प्रत्येकाचे नैतिक कार्य आहे. नैतिक मूल्याची जोपासना करुन कोणतेही कार्य केले असताना मानसन्मान आपोआपच मिळत असतो. कोणतेही कार्य हे श्रेष्ठ अथवा कनिष्ठ नसतात. समाजजीवनासाठी आवश्यक असणारी सर्वच कर्म महत्त्वाची असतात. म्हणून म्हटल्या जाते,

'ज्याने आपल्या परिश्रमाने राबविला देह,<br>
ज्याने आपल्या घामाने भिजविली माती,<br>
ज्याने श्रमातून साधली शिवपूजा<br>
तेचि एक सिद्ध पुरुष'

म्हणूनच कर्माविषयी अतिशय महत्त्व बसवेश्वरांनी सांगून प्रत्येकांनी कार्य करुन सदैव कार्यतत्पर राहणे महत्त्वाचे आहे. 'कायक' या शब्दाचा अर्थ स्पष्ट करताना डॉ. के. ईश्वरन असे म्हणतात की, कायक म्हणजेच सामाजिक श्रम अशा शब्दप्रयोग कायकाबद्दल केला आहे. व्यक्तीची अंतरंग शुद्धी आणि बहिरंग शुद्धी ही व्यक्तीच्या कर्मावर अवंबून असते. कायकाला व्यक्तिगत, सामाजिक, धार्मिक जीवनात महत्त्वपूर्ण स्थान आहे. 'कायक' हे भौतिक व अध्यात्मिक विकासाला चालना देणारे अर्थतत्त्व आहे. व्यक्तीने नैतिक व न्यायमार्गाने व्यवसाय करण्यास सांगितले आहे. प्रामाणिक, नैतिकमार्गाने घाम गाळून मिळविलेला पैसाच माणसाला श्रमाप्रती मनःशांती मिळवून देतो.

"नाही होणार मान्य पापींचे धन। प्राशस्त्रिला शिवाय सत्पात्रास<br>
नाही योग्य श्वानाचे दूध। तिच्या पिल्लाशिवाय पंचामृत।।"

"कायकाला ईश्वर कल्पनेपेक्षा जास्त महत्त्व देऊन कर्मकांडात अडकलेल्या समाजाला मुक्त करुन आर्थिक उत्पादनासाठी समाजातील सर्व लोकांनी सामुहिक शक्ती उपयोगाला आणण्याचा प्रयत्न केला आहे." प्रमाणिक श्रमाचा, निर्मितीशील

कष्टांचा उपयोग हा व्यक्तीच्या नवसमाज निर्मितीला पायाभूत ठरणारा आहे. कायकातून शारीरीक श्रमाचे महत्त्व विशद होते. श्रम प्रतिष्ठा हा शब्दही निर्माण झाला नव्हता. तेव्हा 'कायक' ही श्रम प्रतिष्ठेची कल्पना स्वीकारलेली आहे. 'कष्टकऱ्यांचे जीवन अर्थपूर्ण असते.' "कायक हे अध्यात्मिक साधने पेक्षा श्रेष्ठ असते. कायक म्हणजे त्यांचे दैनंदीन कार्य व्यवसाय, गुरुची सेवा, धंदा याला महत्त्व दिल्यास व्यक्तीचा विकास होईल." कर्म करत असताना मनामध्ये शुद्ध आचरण ठेवून कार्य करावे. कार्य करताना कोणत्याही व्यक्तीची हत्या किंवा दुःख होता कामा नये. असे कर्म व्यक्तीला मनशांती देवू शकत नाहीत. इतरांना विनाकारण न दुखवता, इतरांना अपमान न करता, सद्वर्तनाने अपण शुद्धता टिकवून ठेवली पाहिजे. ईश्वरप्राप्तीसाठी शुद्ध आणि शुद्धीसाठी नैतिक आचरणाची आवश्यकता असते.

"नको करु चोरी, नको करु हत्या, नको बालु असत्य,
नको धरु मनी द्वेष, नको करु आत्मस्तुती, नको करु निंदा नालस्ती,
नको मानू कोणा तुच्छ, हीच खरी अंतरंग शुद्धी हीच बहिरंग शुद्धी"

वीरशैवाच्या कर्म विचारसरणीमध्ये कायकाला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. व्यक्तीचे जे कर्म समाजहिताच्या दृष्टीने योग्य व नैतिक असेल ते 'पूण्य' आणि व्यक्तीचे जे काही कर्म समाजहिताच्या दृष्टीने अयोग्य व अनैतिक ते 'पाप' होय म्हणून कर्माला कैलास बनवायचे असेल तर नैतिक दृष्टीकोनातून कार्य होणे महत्त्वाचे आहे. तेव्हाच 'कैलास' प्राप्त होऊ शकतो. थोडक्यात महात्मा बसवेश्वराच्या कार्यकर्तृवाचा सिद्धांत धार्मिकता, सामाजिक व आर्थिकता यांचा सुंदर मिलाप करणारा आहे. व्यक्ती, समाज व देशाचा विकास हा आर्थिकतेवर अवलंबून असल्याने प्रत्येकाने प्रामाणिकपणे श्रम करुन अर्थार्जन करुन स्वतःच्या विकासा बरोबर समाजाचा विकास करणे गरजेचे आहे. त्यासाठी शारीरिक कार्यातून श्रमाचे महत्त्व पटने गरजेचे आहे. श्रमाला जर प्रतिष्ठा आणि किंमत मिळाली तरच 'कायक वै कैलास' होऊ शकतो व या विचारसरणीचा व्यक्तीने अवलंब केला तर त्याचे जीवन कैलासमय होऊ शकते. 'कायक वै कैलास' च्या माध्यमातून व्यक्तीचा उन्नतीचा सरळ व सोपा



मार्ग त्यामधून शारीरिक श्रमाला अध्यात्माची जोड देवून समाजाला शारीरिक श्रमाचे महत्त्व पटवून दिले. समाजाची व राष्ट्राची सर्वांगीण प्रगती करायची असेल तर शारीरिक श्रमाशिवाय तरणोपाय नाही हे वीरशैव समाजाला कळाले आहे. म्हणून त्यांनी महात्मा बसवेश्वरांच्या कायकला महत्त्व देऊन 'कायक वै कैलास' हा महामंत्र स्विकारला आहे. "म्हणूनच समतेवर आधारीत समाज निर्मितीचे कार्य पूर्ण करतांना हा श्रम समतेचा विचार व्यक्तीला उच्च शिखरावर नेण्यास महत्त्वाचा ठरेल."

वीरशैव समाजाने महात्मा बसवेश्वरांच्या 'कायक' व 'दासोह' यांना अतिशय महत्त्वाचे स्थान दिलेले आहे. दासोह ही वीरशैवाची एक प्रथा, परंपरा, वैशिष्ट्ये व संस्कृती बनलेली आहे. त्यामुळेच वीरशैव समाजाने 'दासोहला' महत्त्व दिले आहे. सामान्यतः 'दासोह म्हणजे आपल्या समाजबांधवासाठीचे अन्न समर्पण होय.' या दासोह बदल माता महादेवी म्हणतात की, 'दासोह म्हणजे पवित्र अन्न होय.' म्हणून दासोहचे पालन करताना व्यक्तीला संतुष्टता लाभते. त्यामुळे दासोह ही एक श्रेष्ठ पूजा समजली जाते. 'अन्न संपूर्ण हा दासोहचा मर्यादित अर्थ नसून दासोह म्हणजे व्यक्तीला समाज हिताच्या दृष्टीकोनातून सर्वच प्रकारचे सहकार्य होय.' 'आपण जे कार्य केले त्यामधून मिळालेला धनसंचय समाजाच्या हितासाठी लावणे म्हणजेच दासोह होय.' धनसंचय हा नैतिक श्रमातून असावा तरच तो दासोह होऊ शकतो. दासोहामध्ये सामुदायिक सहभाग आणि सहकार्य यांचा निर्देश आहे. व्यक्तीने तिच्या प्रामाणिक कार्यातून म्हणजेच सामाजिक श्रमाच्या उत्पन्नातून काही भाग उत्स्फूर्तपणे समाजासाठी खर्च करावा. दासोहामध्ये दानवस्तू सामाजिक व सामुदायिक संसाधन स्वरुपाची असते. सामाजिकता ही भावना दासोहला अभिप्रेत आहे. हा विचार आधुनिक काळातील सामाजिक व सामूहिक मालकीच्या म्हणजेच समाजसत्तावाद संकल्पनेशी जवळीकता साधणारा आहे. 'दासोह' हा कन्नड शब्द असून त्याचा अर्थ 'प्रामाणिकपणे मिळविलेल्या स्वतःच्या कमाईतून मिळकतीचा काही वाटा समाजासाठी, गरजूसाठी, मदत करणे असा होतो. 'दासोह' हा दान यासारखा असला तरी दान व दासोह यामध्ये खूप फरक आहे. कारण दानामध्ये देणारा व घेणारा असतो परंतू दासोहमध्ये देण्यास मध्ये कोणत्याही प्रकारचा दातृभाव नसतो. देणाऱ्याच्या मनात 'मी देतो'

घेणाऱ्याच्या मनात 'मी घेतो' ही भावना नसल्यामुळे परस्पर उपकाराची भावना राहत नाही. 'निसर्ग आपल्याला न मागता खूप काही देत असतो. परंतू निसर्गाला देण्याची व घेण्याची जाणीव नसते हा भाव ज्या ठिकाणी अभिप्रेत असतो त्याला 'दासोह' म्हणतात. 'दासोह म्हणजे अहंकार विरहित दानवृत्ती सेवावृत्ती म्हणजे दासोह होय.'

महात्मा बसवेश्वरांनी वीरशैव लिंगायत समाजाला दासोह करण्यासाठी त्रिदासोहची संकल्पना मांडली आहे ती म्हणजे आपल्या मनोभावनेने तन गुरुला अर्पण करणे. मन लिंगाला आणि सत्कर्म धन जंगमाला अर्पण करावे असा अभिप्रेत आहे. व्यक्तीच्या दासोहात समर्पणाची भावना असते. मनाने लिंगाला जसे मनोभावे शरणजाणे महत्त्वाचे असते, तसेच धन हे जंगमाला सदवृत्तीने समर्पण करणे गरजेचे आहे. वीरशैवामध्ये दासोहाला धार्मिक, शारीरिक, मानसिक, अध्यात्मिक, सांस्कृतिक व सामाजिक असे बहुविध दृष्टीने महत्त्व लाभलेले आहे. महात्मा बसवेश्वरांच्या मते, अहिंसा, दया, करुणा, प्रेम, समता, सहानुभूती मानवता हाच मानवाचा सामाजिक धर्म आहे. प्राणीहत्या करणाऱ्याचा निषेध त्यांनी केला आहे.

व्यक्तीच्या अंगी दया करुणा, प्रेम, ममता, सहानुभूती असणे गरजेचे आहे. कारण दासोह हा या सर्व बंधनाना एकत्र आणण्याचे कार्य करतो. डॉ. फडकुले म्हणतात की, "आत्मकल्याण साधावयाचे असेल तर प्रपंचाचा त्याग करावा. सन्यास धारण करुन रानावनात राहून लोकसंपर्क सोडून द्यावा ही निष्क्रियतेची शिकवण बसवेश्वरांनी इच्छूक समाजाला घाम गाळणारा, प्रामाणिक माणूस जीवन केवळ आपल्या वैयक्तिक सुखासाठी नसून समाजाचे काही देणे आहे या उदात जाणीव त्याच्या ठायी निर्माण केली. समाज प्रेम हा त्याचा उत्कट धर्म बनवला व मानवतावादी दृष्टीकोन समाजात रुजवला." स्वार्थी मनोवृत्ती बदलून परमार्थ म्हणजेच समाजाचे हीत जोपासणे आवश्यक आहे. प्रत्येक शिवभक्ताने आपल्या कमावलेल्या संपत्तीतून आवश्यक निधी समाजहितासाठी खर्च करावा. डॉ. जवरेगौडा म्हणतात, "समुद्रातील पाणी वाफ होऊन आकाशात गेले तरी पावसाच्या रुपाने आभाळातून परत येते. वेलीसुद्धा फुले, फुळे देतात म्हणजेच निसर्ग सर्व देण्याचे कार्य करतो. त्याच प्रमाणे



मनुष्याने सुद्धा आपल्या जवळील शिल्लक असलेले धन समाजाल 'दासोह' म्हणून अर्पण करावा त्यामधून मानवप्राण्याला त्याचा फायदा होईल व सामाजिक दृष्टीकोणातून समाजाचा सर्वांगीण विकास होईल."

## २.८ पदयात्रा :

नांदेड जिल्ह्यातील अनेक मठातील शिवाचार्यानी धर्मप्रचारासाठी, श्रेष्ठ कनिष्ठ भेदभाव नष्ट करण्यासाठी पदयात्रा व तीर्थयात्रा काठलेल्या पाहावयास मिळतात. डॉ. शिवलिंग शिवाचार्यांनी मन्मथ स्वामी कपिलधार यात्रा सुरु केली. नांदेड जिल्ह्यातील अनेक मठातून आज ७०-७५ पदयात्रा दिंडी कपिलधारला जातात. कपिलधार येथे संत शिरोमणी मन्मथ स्वामी यांची संजीवन समाधी आहे. तेथे भक्त नेहमी पदयात्रा करत असतात. या दिंडीमध्ये अनेक गुरू आपल्या क्षेत्रातील शिष्यासोबत सहभागी होतात. या पदयात्रेतून वीरशैव समाजाच्या वारसा समानतेचा दिसून येतो. या पदयात्रेला ६४ वर्षाची परंपरा आहे. या पदयात्रेला अहमदपूरचे डॉ. शिवलिंग शिवाचार्य सतत येत असतात. दिंडी म्हणजे 'पताका' नद्या जश्या नद्याला मिळतात त्याच प्रमाणे अनेक दिंड्या एकमेकाला मिळून कपिलधारला पोहचतात. दिंडीमध्ये भक्ताजवळ छोटा पताका असतो. अस्था, श्रद्धा, प्रेम, दृढविश्वास याचा संगम या पदयात्रेत असतो. मन्मथ स्वामी, महात्मा बसवेश्वर वीरशैव समाजाचे प्रेरणास्थान आहेत. त्यामुळे त्यांच्या विचाराची रुजवण होणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी बसवेश्वर जयंती, व्याख्याने, संमेलने आयोजित करुन त्यांच्या विचाराची सर्वसामान्यांना ओळख होणे गरजेचे आहे. काही ठिकाणी जगदगुरू पंचाचार्य यांच्या जयंत्या साजऱ्या केल्या जातात गुरूपौर्णिमेला गुरूच्या मठात वेगवेगळे कार्यक्रम होत असतात. "बेटमोगरा, मुखेड, नागठाणा, शिराढोण या ठिकाणी गुरुपोर्णिमेच्या दिवशी गुरू शिष्याला मार्गदर्शन करतात व सर्वांना सहभोजनाचा लाभ देतात."

## २.९ महाशिवरात्र

वीरशैव समाजाच्या सर्व सणाचे उगमस्थान म्हणून महाशिवरात्रीकडे पहिले जाते. परमपिता परमात्म्याचा हा दिव्य अवतार दिवस परमात्मा शिवभगवंताचे सर्व मानव प्राण्यांना अज्ञानाच्या अंधकारातून शांततामय प्रकाशात येण्यासाठी जे मार्गदर्शल

केले त्या कर्तव्याची जाणीव आठवण म्हणजे महाशिवरात्र होय. मनाने, वाचेने, कर्माने सतत शिवाचे ज्ञानार्जन करणे व जीवनामध्ये कर्मयागी बनून कर्तव्य परायण बनून मनात आचरणात आणणे म्हणजे शिवरात्रीचा उपवास होय. आपले विचार मन, बुद्धी, परमात्मा शिवाच्या ठिकाणी समर्पण करुन त्याच्याशी मनाची एकरुपता साधणे हा शिवरात्रीच्या सणाचा अर्थ आहे. व्यक्तीला दुःख, सुख, मान-अपमान, राग-लोभ, स्नेह, मत्सर या गोष्टी व्यक्तीच्या मानसिक प्रवृत्तीवर अवलंबून असतात. आजच्या विज्ञान युगात सुद्धा महाशिवरात्रीचे महत्त्व कमी झाले नाही. शिवाय हे एक शिवव्रत असून त्यात शिवाची उपासना, जागरण, अभिषेक, पूजा, जप आदिचा यामध्ये अंतर्भाव केला जातो. 'शिव याचा अर्थ शुभ्र, समूद्र, मोक्ष, आनंद आहे. महाशिवरात्र हा पूण्यपर्वकाल आहे. महाशिवरात्रीला वीरशैव समाजामध्ये खुप महत्त्व असते. हा वर्षातील महान पूण्यपावन दिवस असतो. पवित्र नदीवर स्नानास जाऊन शिवशंकराचे भक्त वात्सल्य कपूर गौराचे दर्शन घेऊन आपले जीवन कृतार्थ करुन घेतात. महाशिवरात्रीच्या दिवशी भक्त उपवास ठेवतात. 'उप' म्हणजे जवळ 'वास' म्हणजे राहणे, मनाने आणि बुद्धीने परमात्म्याच्या सानिध्यात राहणे म्हणजे उपवास करणे होय. परमात्मा शिव सर्व मनुष्य आत्म्यांना ईश्वरीय आदेश देतात की सतत, मन आणि बुद्धीने योगयुक्त होऊन माझे स्मरण करा. म्हणजे तुमच्या आत्म्याची जन्म जन्मांतरीची पापे नष्ट होतील व तुमचा आत्मा सूवर्णाप्रमाणे सत्त्वप्रधान बनेल. मनाने, वाचेने, कर्मात सतत माझे ज्ञानार्जन करुन भक्ताला शांती देण्याचे कार्य या दिवशी होत असते.

मद्य वद्य चतुर्दशी साऱ्या भारतात शिवाची महाशिवरात्र म्हणून साजरी केली जाते. वेद काळापासून भारतात शिवोपासना भारतात रुढ आहे. मानवाच्या मुखातून नकळत शिवाचे नाव प्रकट झाले तर त्याच्या पापाचे नाश होते. लोखंडाला नकळत परिसाचा स्पर्श झाला तरी त्याचे सूवर्णात रुपांतर होते. तसे मुखातून नकळत हरिनाम प्रकट झाले तरी जीवन आनंदमय बनून जाते. हरीचे नाम भक्ताच्या अंतःकरणातून, हृदयापासून प्रकटलेले प्रेमच असते. माणसाच्या जीवनात सातत्याने संकटे येत असतात. सात्विक, राजस, तामस या गुणांनी विश्वातील सारे कार्य होत असते.



प्रत्येकाच्या हृदयात तीन गुण भरलेले असतात. माणूस कधी दुखी असतो तर कधी सुखी असतो. समाजात आपण कार्य करत असल्यामुळे अनेक प्रकारच्या सुख दु:खाशी सामना करावा लागतो. त्यासाठी मन शांत ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. शिवाची उपासना केली तर भक्ताचे अनेक संकटे दूर होतात. शिवाची आराधना करताना भक्त महादेवाच्या शिवलिंगावर बेल अर्पण करत असतो. श्रावण आणि भाद्रपद ऋतूमध्ये सगळीकडे हिरवेगार असते. असे वाटते सगळ्या सृष्टीनेच हिरवा शालू नेसला की काय, याच काळात अनेक धार्मिक सण, उत्सव येतात. धार्मिक पूजा विधी लोक करत असतात. वीरशैव बांधव शिवांच्या पूजेसाठी बेलाचे पान मनोभावे अर्पण करत असतात. महादेवाच्या पूजेतील मानाचे स्थान म्हणून बेलाकडे पाहिजे जाते. याची पाने संयुक्त पद्धतीच्या मांडणीची त्रिदले असतात. बेलाचे महत्त्व शास्त्रीय दृष्टीकोनाबरोबर धार्मिक दृष्टीकोनातून महत्त्वाचे आहे. बेलाच्या अंगी असणाऱ्या महत्त्वाच्या गुणधर्मामुळेच आपल्या पूर्वजांनी त्याला पूजेच्या पंक्तीत बसवले आहे. शिवाय या वृक्षात अनेक देवदेवतांचे वास्तव्य असते. म्हणूनच त्याचे संवर्धन, जतन केले पाहिजे. 'पानाचा रंग हिरवागार असून हा रंग शंकराच्या साधेपणाचा व पावित्र्याचा द्योतक आहे.' बिल्वपत्रास शंकराचा त्रिशुल तर बेलाला साक्षात लक्ष्मी मानले जाते. स्कंदपूराणातही याचे महत्त्व वर्णिले आहे. त्रिदळातील डावे पान म्हणजे ब्रम्हदेव, उजवे विष्णू, मधले पान शिव-पार्वती आहेत. बेलाच्या पानास महाशिवरात्रीला फार महत्त्व आहे. बेलाचे पान त्रिदल असून ही त्रिकाल, त्रिशक्ती आकाराच्या तीन मात्रा यांचे द्योतक आहेत. बेलाची धार्मिक विधी शिवरात्र, श्रावण, प्रदोष, यावेळी बेलाचे महत्त्व जास्त असते. पुराणामध्ये म्हटले आहे की, दहा सोन्याच्या नाणीपेक्षा बेलाचे एक पान वाहण्यासारखे आहे. ऐवढे महत्त्व बेलाच्या पानाला आहे.  बेलाचे पान अर्पण केल्यामुळे व्यक्तीच्या 'सत्व, रज आणि तम अंगी उत्पन्न होते. यामध्ये कौमार्य, यौवन, जरा या अवस्थाचे प्रतीक म्हणून शंकराला बेलाचे पान व्हावे, म्हणजे या तिन्ही अवस्थांच्या पलीकडे जाण्याची इच्छा प्रकट करावी. कारण त्रिगुणातीत झाल्याने ईश्वर भेटतो. शिवाला त्रिदल बेल आवडतो, म्हणजे तो आपले सत्व, रज आणि तम हे तीनही गुण शिवाला अर्पण करुन

समर्पण बुद्धीन भक्तकार्य करतो, त्याच्यावर शिव संतुष्ट होतो. शिवाची उपासना करत असताना पंचाक्षरी मंत्राचा जप करुन बेलाचे पान शिवलिंगावर अर्पण केल्या जात असते. सत्व, रज, तम याचे प्रतीक म्हणून शिवाला मंत्र बोलून बेलाचे पान अर्पण केले जाते. त्यामुळे म्हटले जाते की,

"त्रिदलं त्रिगुणाकरं त्रिनेत्र व त्रिधायुतम्
त्रिजन्म पाप संहार बिल्व पत्र शिवार्पणम्"

या मंत्राने मनोभावनेने शिवाला बेल अर्पण केले तर भक्ताला येणाऱ्या समस्याचे निरसन होत असते. भक्ताला आपल्या आशा, आकांक्षा, लाभासाठी शिवाची मनोभावनेने पूजा करतो. वीरशैव समाजातील लोक शिवाला आपला परम आराध्य दैवत मानत असतो. आणि सर्वात प्राचीन म्हणून भगवान शिवाला पूजले जाते. सोमवार, शिवरात्र, महाशिवरात्र या दिवशी भक्त भगवान शिवाला बेल अर्पण करुन आपले मनोकामना पूर्ण करण्याचा प्रयत्न करत असतात. 'ओम नमः शिवाय' भगवान शिवाला पूजन करत असताना हा मंत्र म्हटल्या जातो. व तो मुळ मंत्र आहे. शिवाचा प्रत्येक भक्त या मंत्राचा जप करत असतो. हा मंत्र जप केल्यामुळे त्याचे शरीर शुद्ध पाण्यासारखे स्वच्छ होते. ह्या मंत्राने भक्ताच्या शरीरात एक प्रकारची उर्जा निर्माण होवून जगाच्या कल्याणासाठी सहकार्य करता येईल.

"ओम त्र्यंबक यजामहे सुगन्धि पुष्टिवर्धनम्
उर्वारुकमिव बन्धनान्त् मृत्योर्मुक्षीय मामृतात्"

असे म्हटले जाते की, महामृत्युंजय मंत्राचा जप केला तर भगवान शिव भक्ताला प्रसन्न होतात व शिवाची कृपा सदैव भक्तावर राहते. हा मंत्र भक्तांनी 'सव्वा लाख' वेळेस निरंतर जप केला तर त्याला येणाऱ्या अडचणी वर्तमानकाळातील व भविष्यकाळातील शारीरिक अडचणी अनेक वाईट परिणाम दूर होऊ शकतात. या मंत्राचे सदैव निरंतन उच्चारण केले तर भक्ताच्या सर्व मनोकामना पूर्ण होऊ शकतात. जो भक्त मनोभावे शिवाची पूजा करतो तो भक्ताच्या संकटाला धावून येतो. भगवान शिवाला १०८ नावे आहेत. त्यापैकी भक्तांनी जरी एका नावाचा जप केला तर त्याचे संकटे दूर होतात. शिव हा त्रिनेत्रधारी आहे. या तीन नेत्रालाच सूर्य, चंद्र, नदी असे



म्हणतात. दोन नेत्र सूर्य, चंद्र आहेत. संपूर्ण ब्रम्हांडाची हलचले, परिवर्तन भगवान शिवाच्या दर्शनातून होते. शिवाला बेलाचे पान, मंत्र, रुद्राक्ष याचे जो भक्त दैनंदीन शिवाच्या पिंडीवर मनोभावनेने आराधना करतो, त्याला शिवाची कृपा लाभत असते. रुद्राक्ष हे शिवाच्या डोळ्यातून पडलेल्या अश्रुतून तयार झाले आहे.

'रुद्रस्य अक्षि रुद्राक्षः
अक्ष्यूपलक्षितम् अश्रु,
तज्जन्यः वृक्षः'

रुद्राक्ष अंगावर धारण केल्यानंतर तन-मनाची शुद्धता होत असते. रुद्राक्ष धारण केल्यामुळे भक्ताच्या पापाचा नाश होऊन शिवाची कृपा लाभत असते. वीरशैव समाजातील व्यक्ती रुद्राक्षाची माळ धारण करुन १०८ वेळा मंत्राचा जप करत असतो. रुद्राक्षामुळे अनेक आजार दूर होतात. रुद्राक्ष एकमुखी पासून चौदामुखी पर्यंत आहेत. जो भक्त शिवाची पूजा सदैव करत असतो. त्याला शिवाची कृपा लाभून येणारा संकटांना तोंड देण्यासाठी शक्ती मिळत असते. म्हणून शिवाची आराधना, पूजा करताना भक्तगण, बेलाचे पान, ओम नमः शिवाय म्हणून रुद्राक्ष धारण कतो. शिवाच्या त्रिमुखाचा वापर केला तर शिवाची कृपा भक्ताच्या सदैव सोबत असतो.

### २.१० वीरशैव लिंगायत समाजाचे प्रेरणास्थान - महात्मा बसवेश्वर

महात्मा बसवेश्वर हे वीरशैव व लिंगायत समाजाचे प्रेरणास्थन असणारे महान विभूती आहेत. कर्नाटक ही त्यांची कर्मभूमी. त्यांनी धर्म, समाज, तत्त्वज्ञान, वाङ्मय, राजकारण इ. क्षेत्रात केलेले कार्य क्रांतिकारक स्वरुपाचे आहे. महात्मा बसवेश्वर हे मध्ययुगातील भारताच्या धार्मिक, सांस्कृतिक, साहित्यिक, शैक्षणिक, राजकिय व सामाजिक जीवनातील जेष्ठ समाज परीवर्तनासाठी परिवर्तनवादी युगपुरुष होते. समाजसुधारणेच्या बाबतीत त्यांनी आपल्या कार्याचे सर्वोच्च स्थान प्राप्त केले आहे. म्हणूनच त्यांना आद्य भारतीय समाजसुधारक, क्रांतीयोगी व युगपुरुष मानले जाते. महात्मा बसवेश्वरांचा उदय होण्यापूर्वी हिंदू, जैन, बौद्ध, कापालिक, कालामुख, शाक्त, ही संयुक्त धर्मपरंपरा भ्रष्ट व अवनत अवस्थेत. त्या पार्श्वभूमीवर बसवेश्वरांनी

शिव हा एकमेव ईश्वर असल्याची घोषणा करुन शिवोपासनेचा पुरस्कार केला. त्यांच्या उत्कट शिवभक्तीमुळे त्यांना भक्तिभंडारी नावाने ओळखतात. कुडलसंगम या ठिकाणी त्यांना संगमेश्वराचे निष्ठावंत भक्तिभंडारी नावाने ओळखत. त्यांनी ज्ञान, भक्ती व कर्म यांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. ओम नमः शिवाय हा षडक्षरी मंत्र त्यांना अत्यंत प्रिय होता. त्यांनी दया, अहिंसा, सत्य, सदाचार, नीती, शील इत्यादीचा प्रचार केला. एकच देवाची भक्ती करा, प्रेमाने वागा, परोपकार करा अशी त्यांची शिकवण होती. धर्म व समाज व्यवस्थेमध्ये कर्मकांड, दैववाद, यज्ञप्रथा, स्त्रिवाद, विषमता, स्पृश्य-अस्पृश्य भेद यासारख्या कुप्रथाचे म्हणजेच अधर्माचे वर्चस्व प्रस्थापित झाले होते. त्याला त्यांनी दूर केले. महात्मा बसवश्वेरांनी समतावादी दृष्टीकोनातून मानवतावादी समाजाचा शुभारंभ केला. "महात्मा बसवेश्वरांनी जीर्ण झालेली तत्त्वे आणि मूल्ये यांना नवे रुप देऊन नवनवी मूल्ये निर्माण केली. लोक कल्याणासाठी त्यांनी समतावादी व मानवतावादी दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवला."

महात्मा बसवेश्वरांना अभिप्रेत असलेल्या समाजाच्या पुर्नघटनेचे प्राणसुत्र समता हेच दिसते. त्यांचे संवेदनशील मन माणसा माणसातील स्त्री पुरुषातील आणि गरीब श्रीमंतातील भेदाविरुद्ध आणि विषमतेविरुद्ध बंड करुन उठले. परपंरागत वर्णाश्रमधर्मविरुद्ध त्यांनी भक्तीने सर्वांना समपातळीत आणणाऱ्या विचाराचा पुरस्कार केला. अस्पृश्यतेचा संबंध जन्मसिद्ध जातीशी त्यांनी कधीच जोडला नाही. तर माणसाच्या वागण्याच्या दुराचाराशी जोडला. भक्तिशील अस्पृश्य त्यांना पवित्र वाटतात. आपले रक्तसंबंधी बांधव वाटतात.

महात्मा बसवेश्वरांनी कल्याण येथे निर्माण केलेली 'शिवानुभव मंटप' म्हणजेच 'अनुभव मंटप' ही संस्था जागतिक धर्मेतिहासातील अनन्यसाधारण संस्था आहे. वेगवेगळ्या जातीतील व वेगवेगळ्या व्यवसायातील भक्तांना म्हणजेच शिवशरणांना त्यांनी एकत्र केले. परीसंवादाच्या माध्यमातून लोकामध्ये जनजागृती निर्माण केली. अनुभव मंटपातून त्यांनी वेगवेगळ्या जातिजमातीच्या लोकांमध्ये बंधुभाव आणि विचार स्वातंत्र्याची प्रेरणा निर्माण केली.



महात्मा बसवेश्वरांचा वीरशैव लिंगायत समाज हा प्रामुख्याने दलित संवेदनेवर आणि मानव जातीच्या तत्त्वावर आधारित होता. 'समता' हे तत्त्व त्यांच्या प्रसाराचे प्रमुख सुत्र होते. कर्माला महत्त्व देवून 'कायक वै कैलास' चे महत्त्व सांगितले. कोणतेही काम, श्रेष्ठ कनिष्ठ नाही ते उत्कृष्टपणे करणे हीच जनसेवा आहे. तीच ईश्वरसेवा आहे. शिवशरणाने कोणतेही काम प्रामाणिकपणे, सचोटीने, शिवापर्णाला वृत्तीने करावे. महात्मा बसवेश्वरांनी बंधुभाव व समतावादी विचार आत्मसात करुन आपण जे कमवतो त्यात ईश्वरांचा वाटा आहे. म्हणून 'दासोह' प्रथेचा आरंभ केला. दासोहतूनच दीन, दलित, दुखी मानवाच्या जीवन कल्याणासाठी दानधर्म केला पाहिजे. यावर त्यांनी भर दिला. 'माणूस हा त्याच्या जन्माने नव्हे तर समाजात केलेल्या कर्माने मोठा होत असतो. असा संदेश त्यांनी दिला.' महात्मा बसवेश्वरांनी स्त्री पुरुष भेदाला महत्त्व दिले नाही. कारण वीरशैवामध्ये दीक्षा संस्कारामध्ये स्त्री पुरुष या दोघानाही दीक्षा घेता येत होती. म. बसवेश्वरांचे विचार व कार्य हे क्रांतीकारक स्वरुपाचे होते. विशेष वैचारिक वारसा नसताना त्यांनी फ्रेंच क्रांतीच्याही आधी भारतामध्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता प्रस्थापित केली. स्त्री पुरुष समानतेसाठी ते आग्रही होते. जाती निर्मुलनासाठी त्यांनी कल्याणक्रांती घडवून आणली. स्त्रिच्या विचारांना एक हक्काचे व्यासपीठ निर्माण व्हावे यासाठी त्यांनी अनुभवमंटपाची स्थापना करुन स्त्रियांना गुलामीच्या बंधनातून मुक्त केले. "स्त्रिला धार्मिक, सामाजिक, आर्थिक दृष्टीकोनातून सशक्त करण्याची मोहीम त्यांनी हाती घेतली."

महात्मा बसवेश्वरांनी निर्माण केलेली नवसामाजिक व आर्थिक उत्थानाच्या चळवळीच्या माध्यमातून समाजाला आधुनिक दृष्टी त्यांनी प्राप्त करुन दिली. तीच दृष्टी आजही नांदेड जिल्ह्यातील वीरशैव बांधवाला दीपस्तंभाप्रमाणे प्रकाशित करीत आहे. महात्मा बसवेश्वरांच्या प्रत्यक्ष कृती, गती, सत्यता, समता या तत्त्वातुन त्यांनी समाजाला प्रेरणा दिली. त्यांच्या क्रांतीकारी विचाराने समाज व्यवस्थेत झालेले बदल अभूतपूर्व असेच आहेत. म्हणून महात्मा बसवेश्वरांचे विचार वीरशैव लिंगायत समाजाच्या लोकांना प्रेरणादायी ठरतात. म्हणूनच वीरशैव समाज महात्मा बसवेश्वरांना आजही आपले प्रेरणास्थान मानून त्यांच्या विचारांची प्रेरणा घेण्याचा प्रयत्न हा समाज

करताना दिसत आहे.

**२.११ वीरशैव लिंगायत समाजाचे श्रद्धास्थान : संत शिरोमणी मन्मथस्वामी**

मराठवाडा ही संतांची भूमी आहे. अनेक संताच्या जन्माने ही भूमी पावन झालेली आहे. यामध्ये संत नामदेव, संत मन्मथ स्वामी यांनी मराठवाड्याच्या मातीत जन्म घेऊन आपल्या कार्यातून व साहित्यातून भक्ती मार्गाने नवसंजीवनी देण्याचे कार्य केले. "पंधराव्या शतकात मराठवाड्यातील ज्या वीरशैव लिंगायत संतांनी मराठीत ग्रंथरचना केली. त्यापैकी कपिलधारचे मन्मथस्वामी हे फार मोठ्या योग्यतेचे सत्पुरुष होऊन गेले. त्यांनी अनुभवानंद, स्वयंप्रकाश, ज्ञानबोध, गुरुगीता, परमरहस्य अशा अनेक ग्रंथांची त्यांनी निर्मिती केली." त्याची एकूण ग्रंथसंपदा किती आहे ती निश्चित एकमत नाही. त्यानी काही अभंगरचनाही केल्या. त्यामध्ये 'मन्मथगाथा' नावाची एक गाथा उपलब्ध आहे. त्यांच्या नावावर काही स्फुट रचनाही आहेत. मन्मथ स्वामींनी वीरशैव लिंगायत तत्त्वाचा प्रचार व प्रसार मराठी भाषेतून मराठी भूमीमध्ये करण्याचा प्रयत्न केला. वीरशैव समाजाच्या अनुययांना स्वधर्माची जाणीव करुन देताना सांगतात की,

'निजु नका जागा,
आपल्या स्वधर्माने वागा'

अशी हाक घालून वीरशैव समाजामध्ये नवचैतन्य देवून स्वधर्माचे महत्त्व पटवून दिले. वीरशैवांनी आपल्याच आचार तत्त्वाचे पालन करुन स्वधर्माने वर्तन केल्याशिवाय मानवी जीवनाला गती व मुक्ती नाही असा संदेश दिला. कपिलधार हे क्षेत्र अतिशय प्राचीन आहे. या क्षेत्री कपिल मूनीनी योग साधना केली. त्यामुळे या क्षेत्राला कपिलधार असे नाव पडले आहे. मन्मथ स्वामीनी या ठिकाणी जाऊन मानवाच्या कल्याणासाठी योग साधना केली. मन्मथस्वामीनी अशा विविधतेने नटलेल्या निसर्गरम्य स्थळी जीवनाच्या वाटेवर वीरशैव तत्त्वज्ञानावर भाष्य करुन आपल्या समाजातील अनुयायाची जीवन प्रणाली, आचार, विचार अतिशय सुट-सुटीत व सोप्या भाषेत सांगणारा अत्यंत महत्त्वाचा असा ग्रंथराजा 'परमरहस्य' तयार केला. सकल मानव जातीच्या कल्याणासाठी त्यांनी परमरहस्य या ग्रंथातून



आपले विचार प्रकट केले ते असे,

"वाढी लोकी सदाचार,
सद्यविद्येचा भडीमार
होओ प्रसा आवडे"

अशा प्रसाद भगवान शिवा जवळ मागणारे संत शिरोमणी मन्मथ माऊली होते. संत मन्मथ स्वामींनी आपल्या अमुल्य साहित्यातून वीरशैव लिंगायत समाजाचे तत्त्व विशद करताना वीरशैव - लिंगायत संस्कृतीत कोणताही भेद पाळला जात नाही. यावर अभंगातून व्यक्त करतात की,

'जाती कुळ गोत्र, नपाहे शंकर
भक्तांचे माहेर, स्वामी माझा'

म्हणजेच या ठिकाणी जो कोणी शिवाला आपले दैवत मानतो त्याची जात, धर्म, कुळ, गोत्र, सुत्र विचारण्याची गरज नाही. असा महात्मा बसवेश्वरांसारखाच समतेचा संदेश संत शिरोमणी मन्मथ स्वामीनी दिला. त्यापुढे जाऊन श्रेष्ठ कनिष्ठ असा भेदभाव न करता सर्वांना समान वागणूक देणारा वीरशैव समाज आहे, असा ते सांगतात. मानवतावादी संदेश आयुष्याच्या शेवटच्या काळापर्यंत त्यांनी दिला. मन्मथ स्वामीनी भाद्रपद शुद्ध तृतीयेस संजीवन समाधी कपिलधार येथे घेतली. मन्मथस्वामी हे श्रेष्ठ शिवभक्त व प्रतिभावान कवी होते. मन्मथस्वामीचे व्यक्तिमत्त्व बहुरंगी होते. त्यांनी विविध प्रकारची काव्यरचना केली. त्यामध्ये ओवी, अभंग, भारुडे, लावण्या, पदे, फटके या सर्व रचना त्यांनी अत्यंत यशस्वीपणे हाताळल्या आहेत. एक भाष्यकार म्हणून त्यांनी केलेले कार्य वीरशैव लिंगायत समाजाच्या दृष्टीने अलौकिक असे आहे. म्हणूनच असे म्हटले जाते की, 'मन्मथ स्वामी हे वीरशैव लिंगायत समाजाचे ज्ञानेश्वर होते.' त्यांचे वाङ्मय मराठी भाषिकांना खरोखरच प्रेरणा देणारे होते. मराठवाड्यातील, बीड, उस्मानाबाद, लातूर, परभणी, हिंगोली, नांदेड या भागात मन्मथ स्वामीची भक्ती परंपरा आहे. श्री संत शिरोमणी मन्मथ स्वामी यांनी ग्रंथाद्वारे कपिलधार ही भूमी पावन केली. आज वीरशैव लिंगायत समाजाच्या विधीप्रमाणे त्यांच्या संजीवन समाधीला भस्म आणि बेलाच्या पानांची संपूर्ण शरीर झाकलेले व

शिवाच्या नामाचा जयजयकार केला जातो. अशा पद्धतीने प्रतिवर्षी कार्तिका शुद्ध पौर्णिमेला शिवभक्त मोठ्या संख्येने संजीवन समाधीचे कपिलधार येथे दर्शन घेतात. वीरशैव समाजाचे मन्मथ स्वामी हे श्रद्धास्थान असून नांदेड जिल्ह्यातील भक्तगण आपापल्या मठाच्या परिक्षेत्रातून मन्मथ स्वामीच्या पदयात्रेत सहभागी होतात. मन्मथ स्वामींनी समतेचा पुरस्कार केला. त्याच्या या पदयात्रेत सर्व समाजाचे लोक मनोभावनेने भाग घेतात. राष्ट्रसंत डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज यांच्या प्रयत्नामुळे ६४ वर्षापासून मन्मथस्वामीची पदयात्रा अविरतपणे नांदेड जिल्ह्यातील अनेक मठातून निघून शेवटी कपिलधार येथे सर्व दिंड्या एकत्र येतात. या पदयात्रेत समाजातील सर्व लोक मन्मथ स्वामीच्या भक्तिभावाने एकत्र येतात. म्हणूनच ते वीरशैव लिंगायत समाजाचे श्रद्धास्थान आहेत.

❒❒❒



# ३. वीरशैव समाजाचे आर्थिक जीवन

जगाची उत्क्रांती ही मानवाच्या गतिमान क्रियाशीलतेतूनच झालेली आहे. त्यामुळे मानवाची जिज्ञासू वृत्ती, धडपड, कार्य करण्याची तत्परता या सर्वामधून मानवजातीचे कल्याण होण्यास सर्व गोष्टीची आवश्यकता लागते. प्राचीन काळापासून मानवाच्या कार्यातूनच जगाचा विकास होण्यास चालना मिळाली आहे. ज्या समाजाची आर्थिक स्थिती चांगली त्या समाजाचा विकास झपाट्याने होत असतो. समाजाचा विकास हा त्या समाजाच्या आर्थिक परिस्थितीवर अवलंबून असतो. म्हणूनच असे म्हणता येईल की 'आर्थिक परिस्थिती ही समाजाचा आरसा आहे.' समाज हा माणसांचा बनलेला असतो. माणसे सुधारली तर समाज सुधारेल जोपर्यंत आर्थिक परिस्थिती सुधारणार नाही तोपर्यंत समाज कसा सुधारेल ! त्यामुळे परिश्रमाला महत्त्व देवून कर्म करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. कर्म करतांना गरीब-श्रीमंत हा भेदभाव न करता कार्यानुसार मेहनत करणे आवश्यक आहे. सामाजिक जीवनाच्या सर्व अंगावर आर्थिक स्थितीचा प्रभाव असतो व त्यातूनच त्या समाजाची विचारधारा निर्माण होण्यास सुरुवात होत असते. आर्थिक बदलातूनच सामाजिक बदलाची पार्श्वभूमी तयार होते. म्हणूनच मॅक्स वेबर यांनी म्हटले की, "अर्थव्यवस्था समाजव्यवस्थेचा, समाज रचनेचा एक भाग होय."

आर्थिक परिस्थिती चांगली होण्यासाठी मानवाच्या अंगी त्यांनी स्विकारलेल्या कार्यावरची निष्ठा, चिकाटी, परिश्रमाचे सातत्य यावरुन त्यांच्या कार्याची प्रचिती येते. कोणत्याही देशाची आर्थिक सुधारणा चांगली असेल तर तेथील मानवाच्या कल्याणासाठी अनेक नवनवीन योजना आखण्यास मदत होते. जर अर्थव्यवस्थाच कोलमडली तर विकास होणार नाही.' वीरशैव समाज हा आर्थिकदृष्ट्या विकसनशील समाज आहे. महात्मा बसवेश्वरांनी मांडलेल्या 'कायक वै कैलास' या मुलमंत्रानुसार कार्य करत असतो. कायक वै कैलास या तत्त्वज्ञानातूनच श्रमनिष्ठा या जीवनाभूतीचा जन्म झाला. 'श्रम हाच परमेश्वर' मानुन वीरशैव समाजांनी आपल्या कार्याची सुरुवात केली आहे. महात्मा बसवेश्वरांनी मांडलेल्या 'कायक आणि कैलास' दोन शब्दामध्ये

'कायक' हा शब्द जरी कन्नडमध्ये जास्त वापरला गेला असला तरी तो मुळ शब्द संस्कृत आहे. त्याचा अर्थ-कर्म, क्रिया, श्रम, उद्योग, व्यवसाय मोलमजुरी असा आहे. आणि 'कैलास' म्हणजे शाश्वत आनंद होय. महात्मा बसवेश्वरांनी हे दोन्ही शब्द एकत्र करुन जगाची आर्थिक स्थिती कशी सुधारेल यासाठी "कायक वै कैलास" हा महामंत्र दिला. मानवाच्या जीवनाची मुलभूत आवश्यकता अर्थ आहे. परंतु शारीरिक श्रमातूनच प्राप्त झालेले कर्म योग्य कार्यासाठी उपलब्ध करता येते. शरीर हे आपले कार्य साध्य करण्याचे महत्त्वपूर्ण साधन आहे. उत्तम आरोग्य म्हणजे व्यक्तिचा दैहिक, मानसिक, सामाजिक, संतुलित विकास होय. व्यक्तिमत्त्व विकासातूनच आदर्श समाजाची उभारणी होत असते. आचार संबंधीचा विचार कर्म विचारात येतो. मानवाने आचरणात आणून योग्य कर्म केले तर त्याचे कार्य सत्कर्मी लागते. सत्कर्मी मनुष्याच्या अध्यात्मिक जीवनाच्या विकासासाठी पोषक असते व दुष्कर्माने परमार्थिक जीवनाचा नाश होतो. हा विचार कर्मविचारात येतो. म्हणून तुकाराम महाराजांनी असे म्हटले आहे की,

'इंद्रियांचा जय साधुनिया मन।<br>
निर्विषय कारण असे तेथे।।<br>
उपवास पारणीं अक्षराची आटी।<br>
सत्कर्मा शेवटी असे फळ।।'

मानवाच्या केलेल्या कार्याची प्रचिती ही त्यांच्या योग्य कर्मातून होते. 'चांगले कार्य सत्कार्यास लागावे जेणेकरुन समाजाच्या विकासा बरोबरच जगाचा विकास होईल. वीरशैव समाज हा ग्रामीण भागात जास्त वसलेला आहे. त्यामुळे त्यांचा मुख्य व्यवसाय शेतीच आहे. शेतीबरोबरच अनेक जोडधंदे करुन आपल्या कुटुंबाचा ते उदरनिर्वाह करत असतो.

कोणत्याही प्रादेशिक संस्कृतीचा अभ्यास करीत असताना तेथील प्रादेशिक विशेष बाबीचा विचार करावा लागतो. प्रादेशिक संस्कृतीवर त्या समाजाचा, समुह्चा व्यक्तीच्या संस्कृतीचा विकास होताना दिसून येतो. असे म्हटले जाते की, 'कोणत्याही प्रादेशिक भूगोलाच्या रंगमंचावर संस्कृतीचा विकास होत असतो.' नांदेड जिल्हा हा



औरंगाबाद विभागातील ऐतिहासिक जिल्हा म्हणून ओळखला जातो. पवित्र गोदावरी नदीवरील नांदेड जिल्हा मध्यवर्ती क्षेत्र असल्यामुळे त्यास गोदावरीचे नाभीस्थान म्हटले आहे. गोदावरी नदीच्या पावन स्पर्शाने नांदेड जिल्ह्याच्या सुपिकतेत भर पडली आहे. जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ १०५२८ चौ.कि.मी. असून ते महाराष्ट्र राज्याच्या ३.४१% आहे. जिल्ह्यामध्ये गोदावरी नदी बरोबरच, पैनगंगा, मांजरा, लेंडी, आसना नद्यामुळे सुद्धा नांदेड जिल्ह्याचा बराच भाग ओलिताखाली आला आहे. नांदेड जिल्ह्यामध्ये एकूण क्षेत्रापैकी २४१.३१ (२.२९%) चौ.कि.मी. नागरी भागात असून १०२९८.९ (९७.७१%) ग्रामीण भागात राहतात.

### ३.१ नांदेड जिल्ह्याची भौगोलिक परिस्थिती :

नांदेड जिल्हा हा दख्खनच्या पठारावर वसलेला आहे. येथील प्रदेश हा जवळपास सपाट मैदानी प्रदेशांतर्गत जरी असला तरी डोंगराळ भागसुद्धा नांदेड जिल्ह्यामध्ये असलेला दिसून येतो. जिल्ह्यात आढळून येणाऱ्या डोंगराच्या रांगा ह्या प्रामुख्याने उत्तर-पश्चिम (वायव्य) दक्षिण-पूर्व (आग्नेय) ह्या दिशेला एकमेकांना समांतर अशा पसरलेल्या आहेत. काही ठिकाणी ह्या उत्तर-पश्चिम (वायव्य) रांगा दक्षिण-पूर्व (आग्नेय) डोंगराच्या छोट्या डोंगराच्या रांगेत काटकोनात छेदत जातात. नांदेड जिल्ह्यामध्ये सातमाळा डोंगररांगा, निर्मल डोंगररांगा, बालाघाट डोंगररांगा, हरिश्चंद्र डोंगररांगा अशा छोट्या, मोठ्या पर्वत रांगा नांदेड जिल्ह्याच्या सीमा ठरवतात. साधारपणे गोदावरीच्या उत्तरेकडील व दक्षिणेकडील लागून असणाऱ्या भागातील डोंगररांगाची उंची कमी आहे. या डोंगररांगाना भोकर आणि हदगाव तालुक्यात 'वाखड' म्हणतात. तर कंधार आणि मुखेडमध्ये उंचीने छोट्या असणाऱ्या रांगांना 'बालाघाटचा डोंगराळ प्रदेश' म्हणतात.

पैनगंगा आणि गोदावरी नद्यांना विभागत जाणाऱ्या सावरगाव पठारावरील डोंगराच्या रांगा अखंडपणे १३ कि.मी. पर्यंत पसरलेल्या आहेत. ह्या डोंगर सीमा जल विभाजक म्हणून ओळखल्या जातात. पुढे ह्या डोंगर रांगा तीन रांगात विभागल्या जातात. एकरांग पूर्वकडे पसरत जाते. तर दुसरी रांग दक्षिण पूर्वेकडे (आग्नेय) तर तिसरी रांग दक्षिणेकडे पसरत जाते.

## ३.२ वीरशैव समाजाची आर्थिक स्थिती

कोणत्याही देशाची, राज्याची, विभागाची, जिल्ह्याची आर्थिक संपन्नता जास्त त्या देशाचा विकास झपाट्याने होत असतो. आर्थिक संपन्नता समाजाचा आधारस्तंभ असतो. आर्थिक संपन्नता उच्च प्रतीची तेवढे जास्त चांगले राहणीमान त्या समाजाचे असते. महाराष्ट्रातील वीरशैव लिंगायत समाज ग्रामीण भागात जास्त आढळतो. त्यामुळे त्यांचे उपजिवीकेचे साधन शेती आहे.

महात्मा बसवेश्वरांनी कर्माविषयी जो मुलमंत्र दिला त्याच मुलमंत्राचा वापर वीरशैव लिंगायत समाज आचरणात आणून 'कर्म हेच कैलास' हा मंत्र प्रत्यक्ष कर्म करुन आचरणात आणतात. वीरशैव लिंगायताची आर्थिक जीवनाची मूलभूत विचारधारा आहे. 'कर्मालाच कैलास' मानून प्रत्येक व्यक्तीने आपल्या समाजातील आपले स्थान आणि दर्जा पाहून नित्य नियमाने आपले कर्तव्य पार पाडणे हाच कैलास आहे. त्यामुळे श्रमाविषयीचा दृष्टीकोन, विचार, प्रेम, तत्त्व, आचार, आचरण हेच आर्थिक सिद्धांत दिसून येतात. महात्मा बसवेश्वरांच्या या तत्त्वानुसार बरेच वीरशैव लिंगायत बांधव आपले कार्य करताना दिसतात.

प्रत्येक वीरशैव लिंगायत या सिद्धांताची अमलबजावणी कार्य करु लागले तर इतरही समाज त्याच प्रमाणे कार्य करतील व जिल्ह्याच्या विकासात भर पडेल. आज कार्याशिवाय कोणालाच महत्त्व नाही. प्रत्येक व्यक्ती आपआपल्या परीने कार्य करतो. काळाच्या प्रवाहात राहायचे असेल तर आपली कार्य तत्परता आमलात आणावीच लागते. नांदेड जिल्ह्यातील वीरशैव लिंगायत समाज ७५% ग्रामीण भागात २५% शहरी भागात राहतो. मुंबई, पुणे, औरंगाबाद भारतातील वेगवेगळ्या भागात आपल्या कुवतीप्रमाणे कार्य करत असतात. आज ग्रामीण भाग सुधारलेला दिसून येतो. शेतकऱ्याचे मुले शिक्षण घेवून वेगवेगळ्या तंत्रज्ञानाचा वापर शेतीमध्ये करतांना दिसत आहेत. आधुनिक शेती वेगवेगळी सुधारित बियाणे ते वापरत आहेत व त्यामधून आर्थिक भरभराट होत आहे. वीरशैव लिंगायत समाजाला वाणी असेही म्हणतात. वाणी म्हटले की वाण्याचे दुकान आलेच, त्यामुळे शेती, व्यापार, हे ग्रामीण भागात चालत आलेले व्यवसाय वीरशैव लिंगायत समाज करत होता यावरुन



हे सिद्ध होते.

वीरशैव लिंगायत समाज शेतीबरोबर व्यापार, उद्योग धंद्यात सुद्धा अग्रेसर आहे. नांदेड जिल्ह्यातील अनेक शेतकरी, व्यापारी, उद्योजक मोठ्या कार्यक्षेत्रात आपले नाव कमावत आहेत. शुन्यातून विश्व निर्माण करणारे अनेक उदाहरणे आपल्याला देता येतील. दुकानात नोकर कार्यापासून सुरुवात करणारे आज हजारो कोटीचा व्यवहार ते करतात याचे सर्व श्रेय कर्माला कैलास मानल्यामुळे झाले. ग्रामीण भागातील समाज हळुहळू शहराकडे स्थलांतरीत होत आहे. कोणत्याही व्यवसायाचे बंधन नसल्यामुळे ते कोणत्याही क्षेत्रात आपले कार्यक्षेत्र निवडत आहेत. आपल्या कर्माच्या जोरावर ते वेगवेगळ्या कार्याची पाहणी ते करत आहेत. त्यामुळे व्यवसायात उत्तुंग शिखरावर समाजातील काही व्यक्ती पोहचले आहेत. त्यामध्ये श्री गणपतराव मोरगे, श्री राजेंद्रअप्पा हुरणे, श्री अनिल शेटकार असे कितीतरी वीरशैव लिंगायत आहेत जे कर्माला महत्त्व देतात. ६०-६२ वर्षाच्या व्यवसायाची परंपरा सोबत घेऊन ते नव्या उमेदीने कार्य करतात. शेती, व्यापार, उद्योगाबरोबर वेगवेगळ्या क्षेत्रात प्राध्यापक, डॉक्टर, इंजिनियर, शिक्षक, अधिकारी अशा क्षेत्रात कार्य करताना ते महात्मा बसवेश्वरांचा आर्थिक मुलमंत्र लक्षात ठेवूनच आर्थिक कार्य करताना दिसतात. भारतातील सर्व परिवर्तनवादी संतांनी, विचारवंतांनी व्यक्तीच्या श्रमाला अतिशय महत्त्व दिले आहे. समाजसेवा करणारे, समाजसेवेसाठी सतत कार्यशील ध्येयवेडे लोक सतत कामामध्ये, श्रमामध्ये व्यस्त असतात. उद्योग, कष्ट, कर्म हाच सर्वोत्कृष्ट व्यायाम म्हणून ते कार्यशील असतात. महात्मा बसवेश्वरांनी 'कायक' म्हणजे कर्माला सिद्धांत मांडून वीरशैव लिंगायत समाजाला सतत कार्यशील राहण्यासाठी कायक, श्रम याला महत्त्व देण्यास सांगून कायकातूनच ईश्वराची प्राप्ती होते हा कार्याचा मुलमंत्र दिला. शारीरिक श्रम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला व्यायाम, प्राणायाम, योग करण्याची गरज पडत नाही. ते त्याच्या शारीरिक श्रमातून साध्य होते. शारीरिक कष्ट न करता आजच्या लोकांना श्रीमंत होण्याची प्रवृत्ती आज वाढत आहे. शारीरिक श्रम न करता केलेले कार्य त्यांना वेगवेगळ्या आजारांना निमंत्रण देत आहेत. सतत कार्यशील राहिल्याने व्यक्तीला थकवा येतो, भूक लागते, अन्न पचन होते. व रात्री

शांत झोप लागते. मन उत्साही, तेजस्वी राहते. हे सर्व शारीरिक श्रमातून साध्य होऊ शकते. कार्यात मन कार्यमग्न असल्यामुळे ते मंगलमय बनते. म्हणून व्यक्ती व समाज यांचा राष्ट्र उभारणीसाठी प्रत्येकाने आपल्या कुवतीप्रमाणे कार्य केले पाहिजे. अशी शिकवण महात्मा बसवेश्वरांनी लोकांच्या मनात कार्याविषयी आत्मीयता निर्माण केली.

मानवाची प्रगती ही कार्यशील राहिल्यामुळेच होत असते. तो कार्यशील नसेल तर त्याची प्रगती थांबेल जसे मानवी शरीरातील हृदय शेवटच्या क्षणापर्यंत काम करते. ज्या क्षणी त्याचे कार्य थांबले त्याच क्षणी आपले शरीर प्रेत बनते. शरीर जीवंत ठेवण्यासाठी हृदयाला सतत कार्यशील रहावे लागते. त्याचप्रमाणे व्यक्तीला आपले पद, प्रतिष्ठा, मान मिळवायचा व समाजात उच्च स्थान मिळवायचे असेल तर सतत कार्यशील राहणे गरजेचे आहे. प्रत्येक व्यक्तीने प्रमाणिकपणे कार्य केले तर समाजाचा व राष्ट्राचा विकास होण्यास वेळ लागणार नाही. प्रत्येक व्यक्तीने कर्माला शिव कैलास मानले तरच हे साध्य होऊ शकते; अथवा नाही. म्हणून महात्मा बसवेश्वरांनी कर्मालाच अग्रक्रम दिला.

नांदेड जिल्ह्यातील वीरशैव लिंगायत समाजातील व्यक्ती महात्मा बसवेश्वरांच्या 'कायक' सिद्धांतानुसार प्रामाणिकपणे कार्य करत असतात. प्रत्येक व्यक्ती सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत 'कायक' करत असतो, परंतु तो 'कायक' महात्मा बसवेश्वरांना अभिप्रेत नाही. ज्या कायकातून आत्मशांती, आत्मशुद्धी, शरीरश्रम, सत्यशुद्ध व नित्य कर्तव्य साध्य होतो तेव्हाच 'कायक' साध्य होऊ शकतो. कायक सत्य, शुद्ध, समाजोउपयोगी, समाजहितकारक, आत्मदेही व निरंतर केलेले पाहिजे तरच तो 'कायक' तत्त्वात बसतो. 'कायकाचा मुळ अर्थ शरीराद्वारे केले जाणारे कार्य होय.''कायक' सिद्धांत हा जीवनमुल्य सिद्धांत आहे. समाजसेवा करण्याचे प्रभावी माध्यम म्हणजे आपला नित्य कायक करणे होय. प्रत्येकांच्या कायकामुळे समाजाच्या गरजा भागविल्या जातात. व्यक्ती शारीरिक श्रमाने व बौद्धिक प्रमाणे कायक करु शकतो. कायकामधूनच व्यक्तीच्या कलागुणांचा, कलेचा अविष्कार दिसून येतो. त्याचे विचार, नेतृत्व, सृजनशक्तीचा विकास कायकातून बाहेर येतो.



आज नांदेड जिल्ह्यातील वीरशैव लिंगायत समाजातील व्यक्ती जे नित्य नियमाने कार्य करून अनेक गरजुना कायकाद्वारे विकास करतात. 'हजारो लोकांच्या हाताला ते काम देतात. यातच खरा कैलास आहे. म्हणून महात्मा बसवेश्वरांनी कायकाला जीवनाचा मुलमंत्र म्हटले आहे.' कायक हे व्यक्तीच्या कर्मातून समाज कल्याण साधण्याचे एक महत्त्वपूर्ण साधन मानून ती प्रत्येक व्यक्तीची जीवनशैली व्हावी यासाठी 'कायक' संकल्पना महत्त्वाची आहे. कायक सज्ञेला, कार्य, काम, कर्तव्य, कार्यशील राहून कार्य करताना स्वकेंद्री न राहून समाजभिमुख कार्य करणे महत्त्वाचे आहे.

'कायक' करणाऱ्याला व्यक्तिगत, सामाजिक, धार्मिक जीवनात महत्त्वपूर्ण स्थान आहे. समाजाचा आर्थिक विकास हे नैतिकतेचे अधिष्ठान प्राप्त करुन देते. कायकामुळे भौतिक व अध्यात्मिक विकासाला चालना देणारे अर्थतत्त्व ठरते. कष्टकरी कर्माच्या अस्तित्वामुळे येणाऱ्या सत्तेचा विचार त्यांच्या विचारातून अभिव्यक्त होतो. 'कायकाला ईश्वरापेक्षा जास्त महत्त्व देवून कर्मकांडात अडकलेल्या समाजाला नवी दिशा दाखवून कर्माची आर्थिक विकासासाठी समाजातील सर्व लोकांची सामुहिक शक्ती उपयोगाला आणण्याचा प्रयत्न केला.' इतकेच नाहीतर श्रमातूनच ईश्वराचे वस्तीस्थान निर्माण होते. म्हणून व्यक्तीने 'श्रम हेच परम कर्तव्य' मानून श्रमोपासना करण्याचा आग्रह धरावा व 'कार्य हीच पूजा' श्रेष्ठ मानावे. कायक या आर्थिक विचारसरणीतून व्यक्ती विकास आणि सामाजिक विकासाला परस्परपुरक करुन भौतिक व आध्यात्मिक विकासाचा संगम घडवून कायक विचाराने आर्थिक विकासाला एक व्यापक नैतिक आशय प्राप्त करुन दिला आहे. आर्थिक विचारातून समृद्ध समाजाची निर्मिती होत असते. 'समाजाला दैनंदीन जीवन जगत असताना जगण्यासाठी अर्थार्जन करावे लागते. आर्थिक क्षेत्रात संतुलित समाज निर्माण करण्यासाठी वास्तववादी विचारसरणीमध्ये श्रमाला महत्त्व दिले जाते.' आर्थिक क्षेत्रात समानता निर्माण झाल्यास समाजात सदैव शांतता टिकेल. श्रेष्ठ-कनिष्ठ असा भेदभाव राहणार नाही. कायकातून कर्मदाय धर्म, कर्तव्य हेच प्राप्त, कर्तव्यशीलता हीच धर्मशीलता 'वृत्ती हीच मुक्ती', 'कर्तव्यपूर्ती हीच ईश्वर पूर्ती', 'काम हेच राम', 'श्रम एव जयते', 'काम

हाच रहिम', work is workship, Duty is Deity, 'सेवा हाच मेवा', 'प्रयत्न हाच परमेश्वर', 'श्रम हेच सर्वस्व' यातूनच व्यक्तीला 'कायक वै कैलास' प्राप्त होते. हे लक्षात ठेवून व्यक्तीने कार्य करावे. एकंदर स्वश्रमामुळे व शारीरिक श्रमामुळे मनुष्याला आत्मज्ञानाची प्रचिती येते व त्यामधूनच चांगले कष्ट करण्याची सवय लागते. स्वतःच्या गरजा तो पूर्ण करु शकतो. हे फक्त कायकातून साध्य होऊ शकते. त्याच्या गरजा पूर्ण झाल्या की तो समाजासाठी कार्य करेल. म्हणून वीरशैव लिंगायत समाजातील बरेच लोक महात्मा बसवेश्वरांनी सांगितलेल्या 'कायक' तत्त्वाचा स्विकार करतात व आपला आर्थिक विकास करतात. कायकातूनच म्हणजेच समाजहितासाठी व अर्थार्जनासाठी, सत्य, शुद्ध, उद्योग, व्यवसाय, कामधंदा, रोजगार, प्रत्येकाने कर्तव्य करणे गरजेचे आहे.

आर्थिक वास्तव अथवा कौटुंबिक आधार प्रत्येक मनुष्य स्वतःसाठी व आपणावर अवलंबून असणाऱ्याच्या रक्षणासाठी राबुन, कष्ट करुन धन कमावतो. हे निखळ सत्य आहे. पद प्रतिष्ठा मान सन्मान ह्या सर्व आपल्याला आपण उच्च पदावर असलो तरच मिळत असते. 'मन, बुद्धी आणि चित्त शुद्ध असेल तर मनुष्याच्या हातून चुका होत नाहीत. कारण आपल्या कमाईमध्ये प्रामाणिकपणा, शुद्धभाव, देण्याची प्रथा, सहकार्याची जाणीव असेल निश्चितच आपले कार्य सिद्धीस जाते.' कायकाने निष्ठेने, सदभावनेने व कर्तव्यबुद्धीने कार्य पार पाडले तर पृथ्वीवरच साक्षात नंदनवन अर्थात कैलास निर्माण होईल. म्हणून म्हटले जाते -

"ज्याने आपल्या घामाने ही काळी माती भिजवली, अखंडश्रमाने ज्याने आपला देह राबवला, कष्ट उपसले पोटासाठी, ज्याने आपले तन आणि मन श्रमपूर्वक झिजवले श्रमाची पूजा करुन ज्याने शिवाची पूजा केली, श्रमिकाच्या झोपडीला जो कैलास मानतो ज्याची वाणी तशी करणी तोच जगतगुरु झाला."

### ३.३ नांदेड जिल्ह्यातील व्यवसाय

जिल्ह्यातील जमीन सर्वसाधारण काळी सुपीक व कसदार आहे. जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यामध्ये काळी जमीनेचे प्रमाण कमी जास्त प्रमाणात आहे. चांगल्या प्रतीची काळीची जमीन मांजरा व मन्याड नदीच्या काठाकाठाने बिलोली तालुक्यात



आढळते. टेकड्याच्या पायथ्याशी लागून असलेल्या भागात मात्र हलक्या प्रतीची आढळून येते. जिल्ह्यात जमिनीखालील पाण्याचा थर वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या अंतरावर म्हणजेच जमिनीपासून सर्वसाधारणपणे १८ फुटापासून २०० फुटापर्यंत आहे. जिल्ह्याच्या एकूण १०,४४,३५४ हेक्टर भौगोलिक क्षेत्रापैकी ९१,७४८ हेक्टर वनक्षेत्र असून त्याची एकूण भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी ८.७८ आहे. शेती योग्य नसलेले एकूण क्षेत्र ५८,६४४ हेक्टर असून पडीत जमीनीव्यतिरिक्त लागवडीलायक जमीन ३२,४६१ हेक्टर असून पडीक जमीन पैकी ८०,३३४ हेक्टर चालू पडीक व इतर पडीक ६,६६० हेक्टर आणि निव्वळ असलेले क्षेत्र ७,७४,४५४ हेक्टर एवढे आहे. वर्ष २०१०-११ नुसार जिल्ह्यात ५,८२,२०० खातेदार असून त्यांनी धारण केलेली जमीन ८,२६,९६८ हेक्टर एवढी आहे. त्यापैकी १ हेक्टरच धारण असलेले. शेतकरी एकूण २,४९,११२ आहेत व त्यांनी धारण केलेली जमीन १,४२,८२५ हेक्टर आहे. त्याचप्रमाणे १ ते २ हेक्टर पर्यंत जमीन धारण करणारे एकूण २,११,२३२ असून त्यांच्याकडे २,९७,८१७ हेक्टर एवढी जमीन आहे. याचाच अर्थ की, जिल्ह्यात एकूण ४,६०,३४४ अत्यल्प व अल्प भुधारक शेतकरी असून त्यांनी ४,४०,६४२ हेक्टर जमीन ऐवढी धारण केली आहे. त्याचे प्रमाण एकूण धारण क्षेत्राशी ७९.०६% आहे. त्याच्याकडे असलेले जमिनीचे प्रमाण फक्त ५३.२८% आहे. नांदेड जिल्ह्यामध्ये वर्ष २०१५-२०१६ या वर्षी लागवडीखाली असलेल्या क्षेत्राच्या अभ्यासावरुन असे दिसून येते की, एकूण लागवडी खालील क्षेत्रापैकी ज्वारी ८.०७% गहू, ०.९२% तांदुळ ०.००६७%, बाजरी ०.००४% क्षेत्र तर एकूण तृणधान्याखालील ९.१४% क्षेत्र होते. कापूस पिकाचे क्षेत्र २९.०७% आहे.

नांदेड जिल्ह्यातील अनेक वीरशैव समाजाचे लोक ग्रामीण भागात राहत असल्यामुळे त्यांच्याकडे १ हेक्टर ते २ हेक्टर पर्यंत जमिनी आहेत. या जमीनीवर आपल्या कुटूंबाचा उदरनिर्वाह करत असतात. 'ग्रामीण भागातील मुख्य व्यवसाय शेतीच असून शेतीला जोडधंदा म्हणून ते पशुपालन करतात.' वीरशैव समाज हा शुद्ध शाकाहारी असल्यामुळे पिकाचे उत्पादन त्याच प्रकारचे तो घेत असतो.

'गावामध्ये अनेक ठिकाणी शेतमजूर सुद्धा असून शेतीवर कामे करुन तो आपले पोट भरतात.'

नांदेड जिल्ह्यातील वीरशैव समाज ग्रामीण भागात जास्त असल्यामुळे छोटे-मोठे लघु उद्योग करुन आर्थिक उत्पन्न वाढवत असतात. कापड दुकान, किराणा दुकान, हळदीचे व्यापारी, कापसाचे व्यापारी, भुसार मालाचे व्यापारी असे छोटे मोठे व्यवसाय तालुका पातळीवर ते करत असतात. पिकांच्या उपलब्धतेवर त्याचा व्यापार अवलंबून असतो. केळीचे व्यापारी, सोयाबीनचे व्यापार ते उपलब्ध पिकानुसार त्याचा व्यापार चालत असतो. व्यापाराबरोबर छोटे-मोठे उद्योगाची निर्मिती करुन आपला व्यवसाय ते करत असतात. नांदेड जिल्ह्यातील नव्हे तर मराठवाड्यातील एक प्रतिष्ठित उद्योजक म्हणून 'शारदा कन्स्ट्रक्शनचे' नाव घेतले जाते. श्री गणतपराव मोरगे साहेबांनी शुन्यातून आपला व्यवसाय सुरु केला आणि आज त्याचा उद्योग एवढा वाढला की, नांदेड, लातूर, कर्नाटकापर्यंत त्यांच्या उद्योगाची छाप पडलेली आहे. त्याच बरोबर श्री अनिल शेटकार, श्री राजेंद्रअप्पा हुरणे यांनी सुद्धा नांदेड जिल्ह्यामध्ये आपले नाव कमविले आहे.

सामाजिक जीवनासाठी सर्व प्रकारचे उद्योग, व्यवसाय आवश्यक आणि महत्त्वाचे असतात. उद्योग व्यवसाय करणाऱ्या व्यक्तीचा सामाजिक दर्जा समान असतो. कोणत्याही कामाची अवहेलना करू नये. कार्य हे अर्पित असावे स्वार्थासाठी नसावे. कायकातून म्हणजे कर्तव्यपूर्तीतून सामाजिक समता, सामाजिक समतेतून सहकार्य, सहकार्यातून आर्थिक उन्नती आणि आर्थिक उन्नतीतून सामाजिक परिवर्तन तसेच सामाजिक प्रगती व्हावी. "कायकत्वाची व्यापक अर्थगार्भितता समजावून घेऊन काही पावले उचलून निश्चितच आधुनिक विज्ञानयुगातील बऱ्याच समस्याच्या सोडवणूकीसाठी एक नवा प्रकाश एक नवी दिशा लाभू शकले तरच कायक खऱ्या अर्थाने साध्य होऊ शकेल." नांदेड जिल्ह्यातील आंबेगाव, लोहा, अर्धापूर, उमरी, चाभरा, शिबदरा, हदगाव, करमोडी, लहान, मुखेड, देगलूर, नायगाव, नादेड येथील अनेक शेतकऱ्यांच्या मुलाखती घेऊन वीरशैव समाजातील शेतकरी कुटुंबाची माहिती घेतली. शेतकरी कुटुंबातील वीरशैव समाजातील व्यक्ती मुलाखत देताना निसंकोचपणे



आपल्या शेती विषयी माहिती सांगू लागले. पाटनूर येथील देशमुख घराणे केळीचे मोठ्या प्रमाणात उत्पन्न काढतात. लोण येथील भुस्से, कापसे, लासीनकर, बुटले आपल्या शेतामध्ये हळदीचे उत्पन्न घेतात. तर आंबेगाव, बारड, बारसगाव येथील शेतकरी आपल्या शेतात ऊसाचे उत्पन्न घेतात, देगलूर, मुखेड, नायगाव भागातील शेतकरी कापुस, सोयाबीन, ज्वारीचे उत्पादन घेतात. वीरशैव लिंगायत समाज ग्रामीण भागात आहे. त्यामुळे त्यांच मुख्य व्यवसाय शेतीच आहे. शेतीबरोबरच जोडधंदा म्हणून अनेक व्यवसाय करतात. नांदेड जिल्ह्यातील बऱ्याच शेतकऱ्यांना भेटून त्यांच्या जमिनी विषयी माहिती घेतली. काही शेतकऱ्यांच्या शेतात विहिरी आहेत तर काही शेतकऱ्यांच्या शेतात बोरच्या साह्याने सिंचन करतात. पांडागळे, बेळगे, बुटले, बन्नाळीकर, केसराळे असे माजकेच वीरशैव शेतकरी नांदेड जिल्ह्यात आहेत. त्यांना २०-२५ एकर जमीनी आहेत. 'मध्यम शेतकरी १० एकरच्या मध्ये आहेत. शेतकरी आपल्या मालाची विक्री नांदेड येथे करतात. तर केळी, हळद आपल्या सोयीने बाजारात नेतात.' अर्धापूर तालुक्यात केळी, हळदीचे उत्पादन जास्त प्रमाणात होते. हळदीचा व्यापार सातारा, सांगली इथपर्यंत पोहचला आहे. तर केळीचा बाजार भारतातील चंदीगड, हैद्राबाद, अहमदनगर पर्यंत केळीचा व्यापार केला जातो. शेती चांगली असल्यामुळे बरेच व्यक्ती शेतामध्येच काम करतात. परंतु कुटुंबाचे विभक्त कुटुंबात रुंपातर झाल्यानंतर अनेक मोठे शेतकरी ५-१० एकर वर आले आहेत. शेती बरोबरच शेतीला जोडधंदा म्हणून ते फुलशेती, भाजीपाला, टरबुज, संत्रे, असेही पिके आपल्या शेतात घेतात. व्यापाराबरोबर छोटे उद्योगधंदे तो गावात करत आहेत. अनेक गावात फक्त वाण्याचे दुकान होते. आता प्रत्येक समाजातील व्यक्ती उद्योगधंदे करत आहेत. 'व्यापार, दळणवळण, वाहतुकीचे साधने यामुळे ग्रामीण भागातील व्यक्ती शहरासी जोडला गेला आणि जास्तीत जास्त उत्पादन तो नवनवीन तंत्रज्ञान वापरुन आपले उत्पन्न वाढवू लागला. शेतकरी सधन असल्यामुळे आपल्या मुलांनी शेतीबरोबर उद्योगधंद्यात पदार्पण करावे असे त्यांना वाटू लागले.' अनेक शेतकरी कुटुंबातील मुले जिल्ह्याच्या ठिकाणी शिक्षण घेऊन डॉक्टर, इंजिनियर, शिक्षक, प्राध्यापक, अधिकारी होण्याचे स्वप्न पाहू लागले.

वीरशैव लिंगायत समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार झाल्यामुळे अनेक जण नांदेड जिल्ह्याच्या ठिकाणी राहत आहेत. महात्मा बसवेश्वरांच्या विचारसरणीचा प्रभाव तरुण पिढीवर पडत आहेत. त्यामुळे वेगवेगळे विचार ते आत्मसात करत आहेत व वेगवेगळ्या क्षेत्रात आपल्या समाजाचे नाव करत आहेत.' नांदेड जिल्ह्यातील वीरशैव लिंगायत समाजाची आर्थिक परिस्थिती ही ग्रामीण भागातील असून शेती, व्यापार, उद्योग व नोकरी करुन ते आपली आर्थिक परिस्थिती बदलत असतात.

**३.४ उद्योगी, कष्टाळू, श्रद्धा आणि भक्ती जोपासणारे, बेधडक, मनमिळावू व्यक्तिमत्त्व : श्री गणपतराव मोरगे**

गरज ही शोधाची जननी आहे. म्हणजे जेव्हा माणसाला प्रगतीची गरज असते तेव्हा तो त्यासाठी हातपाय हलवतो. दुरदृष्टीच्या माणसाला परिस्थितीची जाणीव चटकन येते. काय निर्णय घ्यायचा हेही तो ठरवतो. उद्योग व्यवसायात व्यक्तीचा निर्णय हीच फार महत्त्वाची गोष्ट असते. याचे मुर्तीमंत उदाहरण म्हणजे श्री गणपतराव मोरगे. स्वत:ची बुद्धी, कर्तबगारी आणि श्रमशक्तीवर प्रचंड विश्वास असणारे, स्पष्टवक्तेपणा आणि सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमात प्रचंड कामाचा व्याप असूनही वेळ देणारे, उद्योग क्षेत्रातील अजोड कार्यामुळे कर्मयोगी व्यक्ती मात्र प्रसिद्धी त्यांच्या पाठीमागे आपोआपच धावत येते. एवढे थोर त्यांचे कार्य आहे. जीवनाच्या सर्वच क्षेत्रात त्यांनी अक्षरशः चौफेर कार्य केले. मात्र त्या बदल्यात समाजाकडून काहीही मिळायचे नव्हते. माणसानं जन्माला यावं आणि आपला देह सत्कारणी लावावा एवढेच उद्योगाच्या माध्यमातून माणस जोडून त्यांच्या समस्या, अडीअडचणी सोडवित समाजसेवेची कास धरणारे, परिस्थितीच माणसाला घडविते, मनात जिद्द ध्येय, कष्ट करण्याची तयारी असली की हे साध्य होते. जीवनाच्या विकास प्रक्रियेत माणसाने एखादे विकासाचे ध्येय पहावे आणि कालांतराने ते ध्येय पूर्ण व्हावे अशा स्वरुपाचे काम करणारे समाजातील विविध क्षेत्रात उच्चतम काम करुन समाजमनावर आपली छाप पाडणारे स्वकष्टाने व्यक्तिमत्त्व निर्माण करणारे क्वचीत भेटतात. अशाच खडतर प्रवासातून बांधकाम व्यवसायात गुणवत्तेचे शिखर गाठणारे. शून्यातून विश्व निर्माण करणारे 'शारदा कन्स्ट्रक्शनचे' संचालक श्री



गणपतराव मोरगे यांचा प्रवास असाच उद्योगी, कष्टाळू, श्रद्धा आणि भक्ती जोपासणारे बेधडक, बिनधास्त, मनमिळावू व्यक्तिमत्त्वाचा समाजासाठी आदर्श असलेल्या त्यांच्या जीवनाचा परिचय करुन देणे हे संशोधकाचे कर्तव्य आहे. श्री गणपतराव मोरगे म्हटले की, त्यांचे व्यक्तिमत्त्व लगेच डोळ्यासमोर येते. पांढरा स्टार्चचा शर्ट, पांढरीच पँट, त्यासारखेच त्यांचे व्यक्तिमत्त्व कुठेच कृत्रिमतेचा लवलेश नाही. सारेकाही दणकेबाज, तसाच त्यांचा व्यवहारही रोखठोक. श्री गणपतराव बळवंतराव मोरगे यांचा जन्म लातूर जिल्ह्यातील चाकूर तालुक्यातील 'मांडूरकी' या छोट्या खेड्यात झाला. वडीलांचा व्यवसाय शेती. तेही कोरडवाहू त्यामध्ये बळवंतरावाचा परिवार ५ मुले १ मुलगी परिस्थिती जेमतेम. पण मुलांनी शिकावे ही वडिलांची इच्छा. २० जून १९५६ रोजी 'मांडूरकी' या खेडेगावात जन्मलेले श्री गणपतराव मोरगे यांचे प्राथमिक शिक्षण तेथेच झाले. पुढे चौथीसाठी बोथी याठिकाणी ते गेले. त्यानंतर ७ वी पासून चाकूरच्या 'जगत् जागृती विद्या मंदिरात' ते शिकू लागले. त्यानंतर १९७३ मध्ये उदगीरच्या 'हावगीरस्वामी महाविद्यालयात' दाखल झाले. पुढे १९७७ मध्ये 'अर्थशास्त्र' विषय घेऊन त्यांनी बी.ए. ची पदवी घेतली. परंतु त्यांना डी.एड. करुन शिक्षक व्हायचे होते. पण मार्क कमी पडल्यामुळे डी.एड. ला त्यांना प्रवेश मिळाला नाही. म्हणून त्यांनी बी.ए. केले. अशा शिक्षणाचा बदलता प्रवास त्यांना बरेच काही शिकवून गेला.

श्री गणपतराव मोरगे यांचे बी.ए. चे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर उदरनिर्वाहासाठी नोकरीसाठी त्यांची शोध मोहिम सुरु झाली. त्याचवेळेस अहमदपूर याठिकाणी मुक्काम ठोकून 'उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेसाठी' दैनंदीन रक्कम गोळा करण्यासाठी 'पिग्मी एजंट' ची नोकरी केली. ती त्यांची गरज होती. त्यांचा गरजेनुसार प्रवास सुरु झाला. १९७८-७९ मध्ये त्यांनी दरमहा एक हजार रुपये कमवता एवढा व्यवसाय मिळविला. पण कामात स्थैर्य नव्हते त्याचे जीवनच प्रवासमय होते. शिक्षणासाठी, नोकरीसाठी त्यांना प्रवास करावा लागला तसाच नोकरीसाठी पण प्रवास, धावपळ यामुळे मोरगे साहेब स्थैर्यासाठी नोकरीच्या शोधात होते. त्यामध्येच 'महाराष्ट्र राज्य निवड मंडळामार्फत' १९७९ च्या राज्यशासनाच्या जलसिंचन विभागात

'क्लर्क' म्हणून नेमणुक झाली. त्यावेळी त्यावेळी त्यांना नोकरीचा पगार ४७२ रु. होता. परंतु त्यांच्या 'पिग्मी एजंट' च्या तुलनेत खूप कमी होता. पण स्थैर्य देणारी सरकारी नोकरी म्हणून त्यांनी नोकरी स्विकारली व नोकरीचा प्रवास सुरु झाला. त्यांना प्रथम यवतमाळ जिल्ह्यातील 'मुळावा' या गावी ते रुजू झाले. त्यानंतर १९८१ मध्ये मुळाव्याहून नांदेड जिल्ह्यातील भोकर तालुक्यात 'भोसीला' बदली झाली. सन १९८२ मध्ये त्यांचा विवाह झाला. विवाह झाल्यानंतर त्यांनी ठरवले की, निवांतपणे नोकरी करणे आणि फावल्या वेळेचा सदूपयोग घेऊन काही काम करता येईल का असा विचार त्यांनी केला. त्यामध्येच एक दिवस 'दैवाने' त्यांच्यासाठी दरवाजा उघडला. तो म्हणजे भोसी या ठिकाणी नोकरी करीत असतांना 'जलसिंचन' च्या कामासाठी लागणारे जवळ जवळ २५ हजार सिमेंटचे पोते गोदामात आले होते. पावसाळा तोंडावर आलेला होता. आणि हे सिमेंट साठविलेल्या गोदामावरील पत्रे पाऊस-वादळात उडून गेले, तर सारे सिमेंट मातीमोल होईल. यावर उपाय म्हणजे या पत्रावर वजन ठेवणे. तेव्हाचे तेथील अधिकारी एम.ए. रऊफ साहेब यांनी हे काम कोणी करेल का असे विचारले असता ज्यांनी पोत्याची काळजी घेतली त्यांनीच काम करावे असे गणपतरावांना सांगून टाकले. "एक वेगळा अनुभव म्हणून त्यांनी आपल्या भावाच्या नावाने व्यवसाय सुरु केला. याच ठिकाणी खऱ्या अर्थाने 'शारदा कन्स्ट्रक्शनची' सुरुवात झाली. हे कार्य म्हणजे त्यांच्या भाग्याची रेषाच ठरली. हे त्यांचे काम त्यांच्या जीवनाला कलाटणी देणारे ठरले". एका दिवसात दीड वर्षाच्या पगाराएवढी कमाई हा त्यांच्यासाठी सुखद धक्का होता. त्या दिवसानंतर मात्र त्यांनी डोळसपणे ह्या उद्योगाकडे पाहिले. तेव्हापासून त्यांची कार्य करण्याची शोध मोहिम सुरु झाली व त्यांचा तो छंदच बनला. सन १९८९ मध्ये त्यांनी भाऊ शंकररावाच्या नावाने 'कॉन्ट्रॅक्टरशिपची' नोंदणी करुन टाकली आणि सन १९९३ पर्यंत असे छोटे मोठे काम हाती घेऊन त्यांनी आपल्या उद्योगाचे २ लाख भांडवल जमा केले. योगायोगाने १९९३ मध्येच जागतिक बँकेने 'अप्पर पैनगंगा' प्रकल्पासाठी निधी मंजूर केला होता. ती कामे सुरु झाली. 'तिरकसवाडी' शाखा कालव्याची धारण ७ ते ८ लाख किमतीची कामे त्यांना मिळाली. दोन लाखाच्या भांडवलावर त्यांनी आपल्या



उद्योगाची पायाभरणी करण्यास सुरुवात केली. या कामामधुन त्यांना मोठा आत्मविश्वास निर्माण झाला. सन १९९६ मध्ये 'कृष्णा खोरे महामंडळ' स्थापन झाले. पाटोदा तालुक्यात खडकत बंधाऱ्याच्या 'कुकडी प्रकल्पाचे' कालव्याचे काम त्यांनी केले. त्यांच्या कामाची गुणवत्ता, निष्ठा, कार्यकारणीची जिद्द यामुळे त्यांचा कार्याची प्रचिती येऊ लागली. अनेक कामे त्यांना मिळू लागली. अकरा खेड्याची पाणीपुरवठा योजनाही त्यांना मिळाली व ते १९९८ मध्ये कमी वेळात पूर्ण झाली. त्यांच्या कार्याची गुणवत्ता व पूर्णत्वाची जिद्द यामुळे कार्यक्षेत्र वाढू लागले. त्यामध्येच सन १९९९ मध्ये महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून विलासराव देशमुख यांची नेमणूक झाली. लातूर जिल्ह्यातील विविध तलावाची कामे त्यांच्या काळात झाली. अप्पर पैनगंगा प्रकल्पातील आणखी कामे त्यांना मिळत गेली. १९९३ ते २००३ या कालावधीत त्यांच्या कार्याचा आलेख वाढत गेला व त्यांचे काम पूर्णत्वास आले. या कालावधीत त्यांचा उद्योग ५-६ लाखावरुन ५-६ कोटीवर येवून पोहोचला. हे सर्व त्यांच्या कार्याबद्दलची निष्ठा व गुणवत्तामुळे हे साध्य होऊ शकले. तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख त्यानंतर नांदेडचे मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या कार्यकाळात लातूर-नांदेड भागात अनेक विकासाची कामे शारदा कन्स्ट्रक्शनने पूर्ण केली. सन २००४ नंतर त्यांनी २-३ वर्ष अनेक बंधाऱ्याची त्यांनी कामे केली. २००७ मध्ये त्यांनी नांदेडचा चेहरा-मोहरा बदलणाऱ्या गुरु-ता-गद्दीच्या कामांना प्रारंभ केला. आणि नांदेड शहराच्या सुशोभिकरणाचे काम 'शारदा कन्स्ट्रक्शनला' मिळाले. त्याच बरोबर त्यांनी गोदावरी घाटाच्या सुशोभीकरणाचे काम केल्यामुळे त्यांचा राष्ट्रीय पातळीवर गौरव झाला. 'एल अँड टी' सारख्या मातब्बदार कंपनीच्या सोबत शारदा कन्स्ट्रक्शनची गुणवत्ता व दर्जा सिद्ध होऊन १०८ कोटीचे काम त्यांना मिळाले. असे अनेक कार्य त्यांनी दर्जेदार करुन पार पाडले. गोदावरी घाटाचे काम एवढे सुंदर करण्यात आले की, त्यांच्या कार्याचा गौरव काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी, पंजाबचे राज्यपाल शिवराज पाटील चाकूरकर, यांच्यासह अनेक मान्यवरांनी त्यांच्या कामाचे कौतुक केले. आता फक्त शासकीयच कामे नव्हे तर मोठी धरणे, बॅरेजेस, उड्डाणपूल, उपसा सिंचन, सोनखेड येथे पेट्रोल पंपाची निर्मिती

केली. अशा अनेक योजनांची यादीच त्यांच्या नावासमोर आहे.

बांधकाम क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल मुंबई येथील 'मराठवाडा टेक्नॉलॉजिस्टर असोसिएशनच्या' वतीने २००८ मध्ये 'मराठवाडा भूषण' देवून एक 'यशस्वी उद्योजक' म्हणून त्यांच्या कार्याची दखल घेतली. गोदावरीवरील घाटाचे बांधकामाबाबत औरंगाबाद येथील 'कलावैभवच्यावतीने विकासभूषण' पुरस्काराने त्यांना गौरविण्यात आले. केवळ बांधकाम व्यवसायच नाही तर सामाजिक व कृषीक्षेत्रातही गणपतरावांनी आपल्या कामाची गती दाखवून दिली. ते म्हणतात, कोणतेही कार्य असो, आपण हाती घेतलेली कामे चांगलीच झाली पाहिजेत. मेहनतीला आपण कुठेही कमी पडता कामा नये. संधीचे सोने करता आले पाहिजे. त्याच बरोबर महत्त्वाचे म्हणजे संधी ओळखता आली पाहिजे. त्यासाठी प्रचंड मेहनत व नशिबाची साथ असायला हवी. भोसी येथील शेतीमधून त्यांनी हे कार्यसिद्ध केले. त्यामुळे त्यांना 'नांदेड जिल्हा परिषदेतील 'कृषी विभागानेही' जाने. २०१२ मध्ये 'कृषिनिष्ठ शेतकरी' हा पुरस्कार प्रदान केला. बांधकाम व कृषी क्षेत्राबरोबरच सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमात व वीरशैव लिंगायत समाजाच्या प्रत्येक कार्यक्रमात ते सहभागी होतात. श्री गणपतराव मोरगेच्या ह्या सर्व यशांमध्ये त्यांच्या पत्नीचाही सिंहाचा वाटा आहे. पहिल्या पत्नीच्या निधनानंतर त्यांनी १९९१ मध्ये त्यांनी दुसरा विवाह केला. त्यांच्या सर्व कामाला त्यांच्या कुटुंबाचे सहकार्य मिळाले. त्यांचे भाऊ त्यांच्या ३ मुली १ मुलगा यांनी उद्योगाच्या कामासाठी भक्कम पाठींबा दिला. म्हटले जाते 'एका यशस्वी पुरुषामागे एक स्त्री असते.' त्याची साक्ष मोरगे साहेबांच्या पत्नी वंदनाताई मोरगे यांनी ते सिद्ध केले आहे. अनेक अडचणी, सुख-दु:खामध्ये त्या साहेबांच्या खांद्याला खांदा लावून उभे राहतात. अनेक दुखापासून साहेबाला दुर करण्याचे काम त्यांच्या पत्नी करत असतात. त्यांच्या भक्तीभावनेतून, श्रद्धेतून गणपतराव मोरगे साहेबांना 'रक्षाकवच' निर्माण केले. अशा महान देवीचा वाटा साहेबांच्या कार्यामध्ये तेवढाच आहे.

श्री गणपतराव मोरगे साहेबांची जन्मभूमी जरी लातूर जिल्ह्यातील असली तरी त्यांची कर्मभूमी ही नांदेड जिल्हाच आहे. त्यामुळेच नांदेड नगरीचा विकास त्यांच्या



कार्यातून दिसून येतो. त्यांच्या कार्याच्या गुणवत्तेचा दर्जा व कार्य करण्याची पद्धत यामुळे अनेक मोठमोठे कार्य त्यांच्या हातून घडून नांदेड जिल्ह्याच्या विकासाच्या वैभवात त्यांनी भर टाकली आहे. साहेबांनी नांदेडच्या शारदा कन्स्ट्रक्शनच्या माध्यमातून लातूर येथील शाखेमधून २००० च्यावर रोजगार निर्माण करुन दिला आहे. हे त्यांचे विशेष आहे. त्यांचे कार्य हे नोकरी मागण्यापेक्षा नोकरी देणाऱ्याचे पुण्य त्यांना या रोजगारातून मिळत असते. शारदा कन्स्ट्रक्शनच्या माध्यमातून हजारो लोकांना ते अन्नदानाचे कार्य करत असतात. साहेबांच्या कार्यालयामध्ये जे निष्ठावंत कार्यशील कर्मचारी आहेत त्यांना निवाऱ्याची सोय सुद्धा साहेब करत असतात. अशा दानशुर व्यक्तीच्या कार्याची प्रचिती पाहिल्यानंतरच येते. श्री गणपतराव मोरगे साहेबांनी नांदेड जिल्ह्यामध्ये गोदावरी नदीवरील 'आमदुरा येथील उच्च पातळी बंधारा' बांधून हजारो एकरची जमीन ओलिताखाली आणली आहे. या कार्यामधून त्यांची उच्चता दिसून येते. त्याचबरोबर लेंडी धरणाच्या वक्रदरवाज्याचे काम त्यांनी पूर्ण करुन देगलूर वासीयांचे प्रश्न सेडवण्याचे काम केले आहे. गोदावरी नदीवरील 'वाजेगाव' येथील बंधाऱ्यामुळे वाजेगाव परिसरातील पाणी पातळी वाढली आहे. उमरी तालुक्यातील 'बळेगाव' येथील बंधाऱ्यामुळे उमरी परिसरातील हजारो एकर जमिनी ओलीताखाली आली असून तेथील लोकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला आहे. असे अनेक समाजोपयोगी कार्य निस्वार्थपणे आपल्या कामाची गुणवत्ता टिकवत ते करत असतात. नांदेड शहरातील ड्रेनेजचे पाणी शुद्ध करण्यासाठी 'बोंढार' येथे पाणी शुद्धीकरण प्रकल्प त्यांनी सुरु केला आहे. नांदेड जिल्ह्यातील उमरी तालुक्यातील बोगद्याचे काम त्यांनी केले. असे अनेक कार्य त्यांनी पार पाडली आहेत. नांदेड जिल्ह्यामध्ये वैभवात भर टाकणारे नांदेडचे विमानतळ, यात्री निवास असे अनेक कार्य त्यांनी गुणवत्ता टिकवून केली आहेत. श्री गणपतराव मोरगे साहेब जसे व्यावसायिक आहेत त्याच प्रमाणे ते धार्मिकही आहेत. ज्या ठिकाणी त्यांचे काम चालू असते. त्याठिकाणी त्या परिसरातील लोकांच्या सांगण्यावरुन मंदिराची निर्मिती ते करुन देत असतात. "राष्ट्रसंत डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपूरकर म्हणतात की, श्री गणपतराव मोरगे म्हणजे भाग्यवान कष्टाळू, धार्मिक

व्यक्तीची काळाला गरज आहे.' त्यांचा आशीर्वाद सदैव मोरगे कुटुंबावर असतो. मोरगे साहेबांच्या सर्व महत्त्वाच्या कामावर अहमदपूरच्या महाराजाचा आशीर्वाद असतो."

श्री गणपतराव मोरगे साहेबांनी नांदेडमध्ये 'भक्ती लॉंस' हे मंगल कार्यालय सुरु करुन सर्व सोयीयुक्त असे मंगलकार्यालय कमी पैशात उपलब्ध करुन देण्याचे कार्य केले आहे. हे मंगल कार्यालय वीरशैव लिंगायत समाजाचा वधु-वर परिचय मेळावा व गुणवंताचा सत्कार यासाठी दरवर्षी मोफत दिले जाते. ह्या कार्यातून त्यांची समाजाबद्दलची आपुलकीच दिसून येते. नांदेड जिल्ह्यातील अनेक महत्त्वाची कामे शारदा कन्स्ट्रक्शनच्या माध्यमातून श्री गणपतराव मोरगे साहेबांनी नांदेड जिल्ह्याचा चेहरा-मोहरा बदलण्याचे कार्य केले आहे. अशा विकासात्मक कार्याची दखल घेऊन त्यांना 'इंदिरा गांधी सद्भावना राष्ट्रीय पुरस्कार २००९' चा दिल्ली या ठिकाणी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. नांदेड जिल्ह्याबरोबर जन्मभूमी असलेल्या जिल्ह्यातही त्यांनी अनेक विकासात्मक कार्य केले आहे. काशी विश्वरैया मंदिराच्या सभा मंडपाचे बांधकाम त्यांनी केले आहे. असे अनेक धार्मिक, सामाजिक कार्य सदैव त्यांच्या हातून घडत असतात. महाराष्ट्राच्या विकासाबरोबर त्यांनी कर्नाटक व लातूर जिल्ह्यातील 'पाणचिंचोली' येथे सौर उर्जा प्रकल्पाची निर्मिती हजारो कोटी रुपये खर्च करून हा प्रकल्प पूर्णत्वास नेला आहे. एक प्रकारे ही त्यांची देशसेवाच म्हणावी लागेल. श्री गणपतराव मोरगे साहेबांना कार्यासाठी मदत करणारे हजारो हात आहेत. त्यामध्ये त्यांचा मुलगा सुमित साहेब उच्च विद्याविभूषित असून त्यांनी अभियांत्रिकीबरोबर एम.बी.ए. चे शिक्षण घेऊन वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवून 'शारदा कन्स्ट्रक्शनचे' अनेक कार्य हाती घेतले असून त्यांचा विकास करण्याचे कार्य सुरु केले आहेत. मोरगे साहेबांच्या २ मुली डॉक्टर असून त्यापैकी एक नामांकित महाविद्यालयात शिक्षण घेत असून एका मुलीने सर्वसोयीयुक्त हॉस्पिटलची निर्मिती केली आहे. हे सर्व मोरगे साहेबांची कार्याची श्रद्धा व सामाजिक, धार्मिक कार्याची पूर्ती आहे. म्हणूनच काशीचे जगद्गुरु श्रीश्रीश्री १००८ डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महाराज म्हणतात की, 'श्रद्धा, भक्ती, दातृत्व हे गणपतराव मोरगेचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये



आहेत.' त्यांचे गरीबावर प्रेम आहे, परिश्रम करतात, अहंकार अभिमान नसलेल्या कार्यशील व्यक्तीला जगद्गुरुचा सदैव आशीर्वाद असतो. त्याचप्रमाणे श्री श्री श्री १००८ केदार जगतगुरु यांचा सुद्धा आशीर्वाद साहेबांना असतो. ते साहेबा विषयी म्हणतात की, 'गणपतराव मोरगे म्हणजे सचोटी, श्रद्धा आणि भक्ती जोपासणारे व्यक्तिमत्व होय.' गणपतराव मोरगे धार्मिक कार्यात जसे सहभागी होतात त्याचप्रमाणे सामाजिक कार्यात अग्रेसर असतात. समाजाच्या अडचणी सोडविण्यासाठी व त्यांनी समता नागरी पतसंस्थेची निर्मिती करुन गोरगरिबांना कमी दरात पैसा उपलब्ध करुन देण्याची सोय केली आहे. ते समता नागरी पतसंस्थेचे अध्यक्ष आहेत. समाजाचे कोणतेही कार्यक्रम असोत त्यांचा सहभाग असतोच. वीरशैव समाजातील गुणवंत विद्यार्थ्यासाठी पुरस्कार ११००० पारितोषीक कै. बळवंतअप्पा मोरगे यांच्या नावाने देत असतात. अनेक सामाजिक कार्यातून ते गरजू व्यक्तीच्या मदतीचा हात ते बनत असतात. अशा दानशूर व्यक्तीच्या कार्यातून समाजाला प्रचिती होत असते. अंबेकरनगर मधील मारोती मंदिर किंवा साईबाबा मंदीर अनेक कार्याक्रमात ते सहभागी होतात. म्हणूनच त्यांच्या घराचे नाव 'शिवालय' आहे. साक्षात 'कैलास पर्वताप्रमाणे' त्यांचे 'शिवालय' असून साक्षात 'शिव-पार्वतीचे' वास्तव्य या ठिकाणी असल्याचे वीरशैव लिंगायत समाजातील लोकांना अनुभव येतो. श्री गणपतराव मोरगे साहेबाप्रमाणेच सुमित साहेबांच्या पत्नी सौ. ऐश्वर्याताई ही सुमित साहेबाबरोबर राहून यशस्वी पत्नीची भूमिका निभावतील यात शंकाच नाही.

श्री गणपतराव बळवंतराव मोरगे साहेबांच्या आजवरच्या वाटचालीवरुन असे लक्षात येते की समाजातील विकासात्मक कार्य करायचे असतील तर राजकिय आधार आवश्यक आहे. त्याशिवाय मोठ-मोठे कामे करणे शक्य आहे. परिसराच्या विकासात राजकिय नेतृत्वाची महत्त्वाची भूमिका असते. त्यांच्या आजवर मिळालेल्या यशाबद्दल मत व्यक्त करतांना ते म्हणतात की, 'पैसा कधीही सर्वस्व मानला नाही, गुणवत्तेला महत्त्व दिले. नेकीने व्यवहार केला. कामे घेताना आणि करताना दर्जाला महत्त्व दिले. आपण हाती घेतलेली कार्ये चांगलीच झाली पाहिजेत. मेहनतीला आपण कुठेही कमी पडता कामा नये.' असे ते आपल्या मिळालेल्या यशाबद्दल विचार

व्यक्त करतात. ते म्हणतात कोणत्याही परिणामांची फारशी फिकिर न करता तुमच्या कार्यात दर्जा व गुणवत्ता असेल तर यश आपोआप पायी लोळण घालते. याचे उदाहरण जर पाहायचे असेल तर नांदेड जिल्ह्यामधील अशोकनगर भागातील 'शारदा कन्स्ट्रक्शनच्या' कार्यालयाला भेट देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. श्री गणपतराव मोरगे साहेबांचा असा प्रवास आज वाढतच आहे. दरमहा ४७२ रुपये पगारावर रुजू झालेले श्री गणपतराव आज उद्योग क्षेत्रामध्ये महाराष्ट्रात नामवंत उद्योगापैकी शारदा कन्स्ट्रक्शनचे नाव घेतले जाते. हे फक्त साहेबांच्या प्रचंड मेहनतीचे, निस्वार्थ सेवेचे, कार्यशील व्यक्तिमत्त्वाचे, दानशुर वृत्तीची ही जादू मानावी लागेल. अशा समाजशील व्यक्तीचे वीरशैव लिंगायत समाजामध्ये एक आदर्श व्यक्ती म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. अशा वीरशैव लिंगायत समाजातील 'कर्मवीर' व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व अशा दोन-चार पानावर रेखाटण्यासारखे नाही. त्यांच्या कार्याचा अल्प परिचय देण्याचे भाग्य संशोधकाला लाभले हे संशोधकासाठी भाग्याचीच गोष्ट आहे. श्री गणपतराव मोरगे साहेबांचे जगणे चंदनासारखे ! त्यांच्या जगण्याचा सुगंध अनेकांना जगण्याची प्रेरणा प्रदान करतो. आज ते नाहीत व्यक्तीचे शरीर नष्ट होते. पण आत्मत्व कधीही नाही. या जगात चिरकालासाठी त्यांनी आपले नाव कोरले आहे. जोपर्यंत आजची मानवजात अस्तित्वात असेल तोपर्यंत तुमचे अस्तित्व तुमचे नाव लोकांच्या मुखावर असेल या विश्वाच्या चिरंतन पोकळीत तुम्ही विसावले आहात. समाजातील गोरगरीबांना जगण्याचा आधार तुम्ही दिला असंख्य परिवारांना जगवित त्यांचे स्वप्न साकार तुम्ही केलेत. नांदेड जिल्ह्यातील वीरशैव लिंगायत समाजाचे फार मोठे नुकसान झाले. त्यांनी साहेबांन सारखा हिरा गमावला. श्री गणपतराव मोरगे साहेबांच्या हातून जे विकासात्मक कार्य झाले व तसेच कार्य त्यांचा मुलगा सुमित मोरगे यांच्या हातून व्हावीत व समाजाचा विकास व्हावा हीच अपेक्षा... !

### ३.५ डॉक्टर घडविणारा मार्गदर्शक : प्रा. गणेश हनुमंतराव चौगुले

नांदेड जिल्ह्याचे भाग्य प्रा. चौगुले गणेश सारखे शिक्षक या जिल्ह्याच्या मातीमध्ये जन्माला आले. लोहा तालुक्यातील खडकमांजरी या ग्रामीण भागात गणेश चौगुलेचा जन्म झाला. घरची परिस्थिती जेमतेम डोळ्यात खुप स्वप्न होती, मात्र खिशात पैसा



नव्हता खुप काही करण्याची धडपड उर्मी होती. पण या धडपडीला बळ देणारे कोणाचेच हात डोक्यावर नव्हते. अशाच परिस्थितीत त्यांनी आकाशाला गवसणी घालणारे यश संपादन केले. आजचे जे 'आयडीयल इन्स्टिट्युट ऑफ बायोलॉजी' ची निर्मिती प्रा. गणेश चौगुले यांनी सावकाराकडून व्याजाने पैसे काढून' चौगुले कोचिंग क्लासची' मुहूर्तमेढ रोवली. स्वतःचा स्वतःवर विश्वास असला की संकटे सावलीलाही थांबत नाहीत, याचा प्रत्यय अगदी चौगुले सरांना आला. प्रा. चौगुले यांची आजवरची वाटचाल थक्क तर करणारी आहेच, पण इतरांना खुप काही प्रेरणादायीही आहे. स्वतःवर विश्वास असला की, यशाच शिखर गाठता येते. याचे ताजे उदाहरण प्रा. गणेश चौगुले आहेत. व्यक्तीच्या आयुष्यात पैशाच ध्येय असू शकत नाही, या विचारावर श्रद्धा ठेवणारे चौगुले आणि श्रद्धेय बाबा आमटे, सिंधुताई सपकाळ यांच्या तेजोमय विचाराशी आपलं नातं सांगणारे गणेश चौगुले !

सामाजिक प्रश्नांचे भान, नकाराच्या विचारातही होकार शोधणारा, अंतरीच्या जखमाना शिवून माणसं जोडणारा, एखाद्याच्या निरागस हास्यात पाण्यामधल्या साखरेसारख विरघळणारे त्यांचे व्यक्तिमत्त्व, हजारो विद्यार्थ्यांचे स्वप्न साकार करणारा, विचारांना कृतीच बळ देणारा, अनेकांच्या मनाच्या गाभाऱ्यात एखाद्या पणतीसारखा तेवत राहणारा, विद्यार्थ्यांचा दिपस्तंभ, जमिनीवर दोन्ही पाय ठेवून संपूर्ण आकाश कवेत घेणारा तो खरा युवकाच आयकॉन आहे. हजारो मुलांना पैकीच्या पैकी मार्क घेवून 'बायोलॉजी' विषयामध्ये देशात प्रथम येणारे विद्यार्थी आयडीयलचेच आहेत. प्रा. गणेश चौगुले यांच्या चौगुले कोचिंग क्लासेसचे आज मोठ्या वटवृक्षात रुपांतर झाले आहे. देशाच्या यशात या कोचिंग क्लासेसने आपली सिद्धता सिद्ध केली आहे. नांदेडच्या आयडीयचे आज लातूर या ठिकाणी शाखा स्थापन करण्यात आली आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील अनेक विद्यार्थ्यांचे डॉक्टर होण्याचे स्वप्न साकार करण्याचे कार्य चौगुलेची टिम करत आहे. आज प्रा. चौगुले सरांचे हजारो विद्यार्थी वैद्यकीय क्षेत्रात कार्य करताना आपल्याला दिसतात. या प्रक्रियेमागे त्यांची अपार कष्ट, प्रचंड मेहनत, वेळेचे नियोजन, आत्मविश्वास व गुणवत्ता हा आधारभूत घटक आहे. गुणवत्ता ही सतत तेजोमय असते. त्यामुळे ते गुणवत्तेला प्राधान्य देवून

पाठपुरावा करणाऱ्या 'आयडीयल इन्स्टिट्युटच्या' विद्यार्थी व पालकांनी घोषीत केलेल्या आजवर ५२०० पेक्षा जास्त विद्यार्थी वैद्यकीय क्षेत्रातल्या विविध शाखासाठी पात्र ठरले आहेत. म्हणूनच आदराने त्यांना 'बायोलॉजीचा बाप' म्हणून ओळखतात. ही आकडेवारी त्यांची गणेश चौगुले यांच्या प्रयत्नाला अधोरेखीत करणारी आहे. प्रा. चौगुले सरांनी विद्यार्थ्यांना बायोलॉजी हा विषय एवढा सोपा करुन दिला आहे की, हजारो विद्यार्थी पैकीच्या पैकी बायोलॉजी विषयात मार्क घेतात. शिक्षण म्हणजे डोक्यात कोंबले जाणारे आणि गोंधळ उडवून देणारे, न पचणारे ज्ञान नव्हे, शिक्षणामुळे कल्पना आत्मसात होवून जीवनाला योग्य दिशा देणारे शिक्षण अशी त्यांनी शिक्षणाची व्याख्या केली आहे. 'आयडियल इन्स्टिट्युट ऑफ बायोलॉजी' मार्फत विद्यार्थ्यांना जे आर्थिक दुर्बल घटकातील हुशार, होतकरु विद्यार्थी आहेत त्यांना शिष्यवृत्ती योजना सुरु केली आहे. ही शिष्यवृत्ती ना जातीवर ना शिफारशीवर, फक्त गुणवत्तेवर आधारलेली आहे. प्रा. चौगुले यांच्या क्लासेसचा वेगळेपणा. प्रा. चौगुले यांच्या मार्गदर्शनातून विद्यार्थी प्रेरणा मिळत असते. विद्यार्थ्यांच्या जीवनाचे शिल्पकार म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. प्रा. चौगुले अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत नाही तर अनेक कार्यक्रमातून त्यांनी स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांनासुद्धा मार्गदर्शन करत असतात. त्यांच्या व्याख्यानातून व्यक्तिमत्त्वातून हजारो विद्यार्थ्यांचे ते 'आयडीयल' बनले आहेत. त्यामुळेच विद्यार्थ्यांचे मुख्यत: होतकरु वैद्यकीय क्षेत्रातील विद्यार्थ्यांचे तेच खरे आयकॉन आहेत. हे तेवढेच खरे. आयडीयल इन्स्टिट्युट ऑफ बायोलॉजी मधुन विद्यार्थ्यांच्या फिसमधून उभे राहिलेले पैसे प्रा. गणेश चौगले यांनी ग्रामीण भागात प्राथमिक व अद्यावत वैद्यकीय सुविधा मिळाल्या पाहिजेत या उद्देशाने 'समर्पण' या सेवाभावी संस्थेचा पाया रचला आहे. या माध्यमातून त्यांनी खेड्यापाड्यात फिरते रुग्णालय सुरु केले आहे. त्यामुळे या संस्थेच्या मार्फत हजारो रुग्णांना मोफत उपचार मिळाला आहे. नांदेड जिल्ह्यामध्ये दोन मुलीवर शस्त्रक्रिया करणाऱ्या दाम्पत्याला प्रा. चौगुले यांनी स्वत:च्या खिशातून आर्थिक मदत केली आहे. हे सर्व करत असताना ज्या समाजात आपण जन्मलो त्या समाजाच देणे लागतो. समाजन दिलेलं समाजाला परत केलं पाहिजे. असा निस्वार्थी व्यक्ती ज्यांची



भूमिका सदैव देतच जाण्याची स्वच्छ भूमिका आहे. यामधून त्यांच्या समाजाविषयीची संवेदनशीलता त्याच्या जाणीवेतून दिसून येते. "व्यक्तिमत्त्वाला असलेलं वैचारिक अधिष्ठान 'नाणे गुरुजी' होण्यापेक्षा 'साने गुरुजी' होऊन शिक्षणाचा प्रकाश तेजोमय करणारे त्यांचे व्यक्तिमत्त्व गरजुच्या मदतीला धावणे हे त्याचं महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे." प्रा. गणेश चौगुले अनेक सामाजिक कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात. गुणवंतांचा सत्कार, महापुरुषांचे व्याख्याने, संगीत कार्यक्रम अशा अनेक विषयावर वरदहस्त असणारे व्यक्तिमत्त्व खरच विद्यार्थ्यांना जगण्याची कलाच शिकवतात. शिक्षणाची जशी आवड आहे तशीच चौगुले यांना संगीताची आवड आहे. त्यांनी २०१२-१३ मध्ये 'कोलावरी गाण्यावरुन नांदेडच्या गोदावरी' नदीचे गाणे जोडले होते. ते ऐकण्यासारखे आहे. त्यामध्ये विद्यार्थ्यांच्या वास्तवाचे चित्रण त्यांनी त्या गाण्यावरुन केले आहे. शिक्षणाबरोबरच निसर्गाची काळजी घेणारे निसर्गप्रेमी ज्यांनी अनेक वृक्षांची लागवड केली. वृक्षसंवर्धन मोहिम हाती घेतली. प्रा. चौगुले शिकवणीच्या काळात १२-१२ तास शिकवणी घेतात. त्यांच्या चेहऱ्यावर कधीही थकवा येत नाही. सकाळी पहिल्या तासाला जी उर्जा असते ती शेवटच्या तासापर्यंत तशीच असते. त्यांच्या उर्जाशील व्यक्तिमत्त्वामुळेच विद्यार्थ्यांमध्ये उर्जा निर्माण होऊन गुणवत्तेच शिखर गाठता आले. सी.ई.टी. बरोबरच आता देशपातळीवर नीट मार्फत नांदेड येथून सुद्धा देशाच्या पातळीवर अनेक डॉक्टर तयार करत आहेत. यामागे त्यांच्या आयडीयल टिमची मेहनत आहे. शेकडो विद्यार्थ्यांच्या डॉक्टर होण्याच्या स्वप्नाला आकार देण्याचे काम ते करत असतात. हजारो रुग्णांच्या चेहऱ्यावर हसू फुलविताना त्यांच्या वेदनेवर मलम ते लावत असतात. सामाजिक प्रश्न जाणून घेताना रेशमी वस्त्रासारखे तलम होते. "विद्यार्थ्यांच्या स्वप्नात व यशात सत्यात उतरविणारा मार्गदर्शक हाच डॉक्टर घडविणारा मार्गदर्शक असतो. ते म्हणजे आदराने ज्यांचे नाव घेता येईल असे, आयडीयल इन्स्टिट्युट ऑफ बायोलॉजीचे संचालक प्रा. गणेश चौगुले होत.

### ३.६ व्यापारातून समाजसेवा करणारे बहुआयामी व्यक्तिमत्त्व - श्री राजेंद्रअप्पा विश्वनाथ हुरणे

माणूस जन्माला येतो कर्म करतो पण काही माणसे आपल्या कर्मातुन एक आदर्श प्रस्थापित करुन समाजातील लोकांना एक आदर्श जीवन जगण्यास मदत करतात. त्यांचे स्वप्न साकार करण्यास हातभार लावतात आणि जीवन समृद्ध करण्यासाठी प्रेरणा देतात. त्यापैकी एक श्री राजेंद्रअप्पा हुरणे आहेत. त्यांचे अनेक राजकीय, सामाजिक व्यक्तीबरोबर सलोख्याचे संबंध आहेत. पण या परिचयाचा त्यांनी स्वतःसाठी किंवा स्वतःच्या फायद्यासाठी कधीच वापर करुन घेतला नाही; तर तो समाजासाठी करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यामुळेच वीरशैव लिंगायत समाजामध्ये त्यांचे स्थान उच्चस्थानावर आहे. पांरपारिक व्यवसायातूनही नवा दृष्टीकोन निर्माण करुन एखादे भव्य व्यापार विश्व उभारता येते. आयुष्याच्या विकास प्रक्रियेत माणसाने एखादे विकासाचे ध्येय पाहिल्यानंतर सामाजिक दृष्टीकोनातून सामाजिक कार्य करुन प्रेरणाप्रिय व्यक्तिमत्त्व नांदेड जिल्हा 'महाराष्ट्र वीरशैव सभा शाखा' नांदेड जिल्ह्याचे अध्यक्ष, थोर समाजसेवक, सुप्रसिद्ध कापड व्यापारी नांदेड भूषण, मराठा भूषण, समाज भूषण, मराठवाडा भूषण, मराठवाडा रत्न, धर्मरत्न श्री राजेंद्र हुरणे यांनी आपल्या अत्यंत सरळ, हसतमुख आणि प्रेमळ स्वभावाने व्यवसायाचा व्याप असतांना सुद्धा वीरशैव लिंगायत समाजासाठी वेळ काढून अत्यंत निष्ठेने समाजासाठी ते कार्य करत असतात. वडीलांच्या व्यापारातून सामाजिक कार्याचा वारसा गेली ६३ वर्षापासून ते सांभाळत आलेले आहेत. वडीलांच्या निधनांतर त्यांनी 'दत्तात्रय विश्वनाथ हुरणे होलसेल व रिटेल कापड' दुकानाच्या मार्फत ३७ वर्षापासून समाजसेवा करण्याचे काम त्यांनी घेतले आहे. नांदेड जिल्ह्यातील समाजप्रिय व्यक्ती म्हणून त्यांचा अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. गुरुरत्न पुरस्कार, नांदेड रत्न अशा अनेक पुरस्काराने सन्मानित केलेले सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक आणि व्यावसायिक अशा सर्वच क्षेत्रावर अग्रेसर असणारे वीरशैव लिंगायत समाजाचे भूषण भविष्यातही अशीच वाटचाल करतील हीच समाजाची अपेक्षा आहे. श्री राजेंद्र विश्वनाथ हुरणे यांचा जन्म ३ जानेवारी १९६० रोजी नांदेड येथे झाला. वडीलांचा व्यवसाय असल्यामुळे त्यांचे बालपण हसत-खेळत गेले. त्यांचे मुळ गाव हे हिंगोली जिल्ह्यातील आखाडा बाळापूर. परंतू वडील व्यापाराच्या



निमित्ताने नांदेडला आले आणि नांदेड जिल्ह्यातील एक प्रतिष्ठित व्यापारी म्हणून नावारुपाला आले. वडीलांच्या व आई मनकर्णिका यांच्या छत्र-छायेत त्यांचे बालपण गेले. श्री राजेंद्र हुरणे यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पहिली ते दहावी पर्यंत प्रतिभा निकेतन, होळी, नांदेड या ठिकाणी झाले. त्यानंतर अकरावी ते बी.कॉम. पीपल्स कॉलेज मध्ये झाले. शिक्षणात गुणवत्ता असूनही त्यांनी आपल्या वडिलांच्या व्यवसायाला अति उच्च शिखरावर नेण्यासाठी शिक्षणापेक्षा व्यापाराला महत्त्व दिले. ते त्यांनी साध्यही केले. व्यवसायाच्या माध्यमातून अनेक पदावर आपले नाव कोरुन पदापेक्षा समाज कार्याला जास्त महत्त्व देणारे 'समाजसेवक' त्यांचे समाजासाठी योगदान सांगण्यासारखे आहे. श्री राजेंद्र हुरणेचे कार्य लिहिणे म्हणजे संशोधकाच्या दृष्टीकोनातून महासागरातून ओंजळभर पाणी घेण्यासारखे आहे. अशा महान सागराचे कौतूक करावे तेवढे कमीच. वीरशैव लिंगायत समाजातील सर्वच कार्यक्रमात सहभागी होतात. नांदेड जिल्ह्यातील अशा एक ही कार्यक्रम नाही की जो श्री हुरणे यांच्या उपस्थिती शिवाय होतो. आज समाजाला एकत्र आणण्याचे मोठे काम ते करत आहेत. अनेक सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, व्यावसायिक कार्यक्रमातून ते समाजाला एकत्र आणण्याचे कार्य ते सतत करत असतात. श्री राजेंद्र हुरणे समाजातील अनेक अतिउच्च पदावर असून त्यांचे हे यश त्यांच्या कार्यशील कार्यामुळे, निस्वार्थ कष्टामुळे, सामाजिक बांधिलकीतून हे सर्व करता आले आहे. आज त्यांच्याकडे महाराष्ट्र वीरशैव सभा जिल्हा शाखा नांदेड अध्यक्षपद, दि. क्लॉथ मर्चन्ट, वेलफेअर असोसिएशन, श्री संत नंदी महाराज संस्था, नांदेड प्रदेश अध्यक्ष महाराष्ट्र वीरशैवसभा पुणे, कार्याध्यक्ष मर्चन्टस ॲन्ड इन्डस्ट्रीज असोसिएशन ऑफ नांदेड, व्यापारी महासंघ, गंगा गोदावरी ट्रस्ट नांदेड, उपाध्यक्ष समता नागरी पतसंस्था, सुंदरलाल सावजी अर्बन बँक, लायन्स क्लब नांदेड, इंडियन मेडीकल फाऊंडेशन, नंदीग्राम लॉयन्स ट्रस्ट, पुसद अर्बन बँक, अशा वीरशैव इंटरनॅशनल असोसिएशन अनेक पदावर ते अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य, संचालक, बॉड मेंबर, ट्रस्टी, मुख्य समन्वयक, कार्याध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. श्री राजेंद्र हुरणे समाजातच कार्यशील नसून प्रत्येक क्षेत्रामध्ये कार्यशील असतात. म्हणूनच त्यांना मराठा समाजाने 'मराठा भूषण'

हे पुरस्कार दिला. कदाचीत ते पहिले व्यक्ती आहेत. त्यांना समाजा व्यतिरिक्त हा पुरस्कार मिळालेला आहे.

श्री राजेंद्र हुरणे यांचे सामाजिक धार्मिक, व्यापारिक, सांस्कृतिक, क्रिडात्मक क्षेत्रातील योगदान, परंपरा आणि संस्काराची जाणीव असलेल्या प्रामाणिक, सत्शील, स्वाभिमानी, निगर्वी, निस्वार्थी, अजातशत्रु अशा व्यक्तिची दखल नांदेड जिल्ह्यातील तसेच जगद्‌गुरु सुद्धा घेत असतात. आई-वडिलांचा आशीर्वाद, श्री वैराग्य सिहासनी धीश्वर रावल पदवी विभूषित श्री श्री श्री १००८ जगद्‌गुरु भीमाशंकरलिंग शिवाचार्य, केदार तसेच काशी जगद्‌गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांचाही आशीर्वाद त्यांना सदैव असतो. नांदेड जिल्ह्यातील अनेक प्रतिष्ठीत राजकारणी माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण साहेब सुद्धा श्री राजेंद्र हुरणेंच्या कार्याची दखल घेतात. अशा बहुआयामी व्यक्तिमत्त्वाच्या हातून सदैव समाजिक कार्यक्रम पार पडत असतात. विश्वनाथअप्पा हुरणे यांचा संपन्न वारसा मागील अनेक वर्षापासून ते चालवत आहेत. ग्राहकांना दैवत समजून त्यांच्याशी नम्रतेने, प्रमाणिकपणे, पारदर्शीपणे व्यवहारी करुन त्यांनी समाजामध्ये पैसा न कमवता आपली समाजात 'पत' वाढविली आहे. पदापेक्षा समाज कार्याला महत्त्व देणारा दुकानातील सतत गर्दीच्या कार्यातूनही समाजकार्यासाठी वेळ काढणारा, समाजाचे आपण काही देणे लागतो या वृत्तीतून सदैव समाजासाठी ते कार्यशील असतात. माणसाने धन गोळा करावा, पण तो व्यवहार प्रामाणिक असावा. "माणसाने सन्मार्गाने वैभव मिळवावे हे वैभव मिळवितांना कोणाचेही शोषण होणार नाही. हा त्याचा कटाक्ष असतो. सन्मार्गाने मिळविलेले धन उदार अंतःकरणाने सत्कार्यासाठी, सामाजिक कार्यासाठी खर्च करतात. व्यापार क्षेत्रातील काही मोजकीच लोक निष्काम आणि उदात्त भावना ठेवून काम करणारे असतात. त्यापैकी राजेंद्रअप्पा हुरणे एक आहेत." जनतेच्या जिव्हाळ्याचे कोणतेही प्रश्न असोत, उपक्रम, आंदोलने, कार्यक्रम, शिबीरे, संमेलने यामध्ये सदैव सहभागी व अग्रेसर असतात. नांदेड जिल्ह्यातील कोणतेही कार्य असो त्यामध्ये स्वच्छता मोहीम असो, सदभावना पद यात्रा असो, सर्वधर्म रॅली असो अशा अनेक कार्यक्रमातून त्यांचे व्यक्तिमत्त्व फुलतच राहते. महाराष्ट्र वीरशैव सभेच्या माध्यमातून वीरशैव



लिंगायत समाजाचे वेगवेगळे कार्यक्रम यांचे सर्व नियोजन श्री राजेंद्र हुरणे योग्यपणे प्रकारे लावत असतात. वधु-वर परिचय मेळावा, गुणवंताचा सत्कार, वीरशैव लिंगायतच्या समस्या सोडवण्यासाठी सदैव तत्पर असतात. गरीब, होतकरु विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी धावून जाणारे सामाजिक कार्य त्यांच्या सेवेतच बसलेली असे समाजप्रिय व्यक्तिमत्त्व वीरशैव लिंगायत समाजाचे भाग्यच आहे. प्रख्यात पु.ल. देशपांडे यांच्या उद्योगाविषयी व कलेविषयीचा ओळीचा त्यांच्यावर परिणाम झाला आहे. ते म्हणतात की, 'आयुष्यात घेतलेले शिक्षण उपजीविकेसाठी व आवश्यक असणाऱ्या विषयाचे जरुर घ्या पण पोटापाण्याचा उद्योग तरी, कलेशी मैत्री जमवा, पोटापाण्याचा उद्योग तुम्हाला जगविल पण कलेशी तुमची जमलेली मैत्री तुम्हाला का ? जगायत ते शिकवील.' श्री राजेंद्रअप्पा विश्वनाथ हुरणे यांनी माणुस घडवण्याचे काम केले. ते म्हणतात, एक व्यक्ती घडला की, कुटुंब घडते. एक कुटुंब घडले की समाज घडतो आणि त्यातुनच राष्ट्राची प्रगती होते. व्यक्ती घडवण्यासाठी त्याला योग्य मार्गदर्शन पाहिजे, त्यांच्या परिवाराला उत्पन्नाचे साधन पाहिजे. आणि हे जर तो व्यक्ती करु शकला तरच त्यांच्यात स्वतःला प्रगतीपथावर घेवून जाण्यास ताकद येईल. हे मोलाचे कार्य ते आपल्या व्यवसायातून समाजात करत असतात. फुलाचा सुगंध केवळ वाऱ्याच्या दिशेने पसरतो. परंतु चांगल्या व्यक्तीचा चांगुलपणा सर्व दिशेने पसरतो. हे विचार सत्य आचरणात आणणारे श्री राजेंद्र हुरणे अनेक कार्यक्रम घेतात. त्यामध्ये संगीत दरबार असो, वेळ अमावस्या असो असे अनेक संगीताचे कार्यक्रम आपला वेळ काढून कार्यक्रम घेत असतात. श्री राजेंद्रअप्पा हुरणे वीरशैव चळवळीचे नेतृत्त्व करणारे आहेत. सर्व धर्मियाशी आणि समाज घटकही ते संबंधीत आहेत. पण प्रत्येकाचा जन्म कुठल्याही समजात होतो. तोच त्या समाजाचा म्हणून ओळख निर्माण होते. वीरशैव या समाज घटकाचे ते चळवळीचे नेतृत्व करणारे तत्वचिंतक आहेत. वीरशैव संस्कृतीची परंपरा जोपासणारे तसेच महात्मा बसवेश्वराच्या विचाराची पेरणी करणारे बसवप्रेमी त्यांचाच वारसा घेवून जयंती, वधुवर परिचय मेळावे, सामुदायिक विवाह, गुणवंतांचा सत्कार समाजाबद्दल आत्मियता या विचारातून त्यांनी सुरु केली आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन

महाराष्ट्रातील वीरशैव लिंगायत समाजातील नेत्यांनी त्यांच्यावर समाजाच्या कार्याची जबाबदारी सोपवली आहे. वीरशैव समाजाचे खंबीर नेतृत्व करीत माणसातील माणुसकी जोपासणाऱ्या आणि निस्वार्थ, त्यागी व भावनिक मनाचे धुरंधर व्यक्तिमत्त्व असलेले श्री राजेंद्र हुरणे हे समाजासाठी कार्यशील असतात. म्हणूनच त्याच्याविषयी म्हणावे वाटते.

'स्वत:साठी जगाव, दुसऱ्यांसाठी झिजावं
हे जीवनाचे गुपित, चंदनाच्या वृक्षाकडून शिकावे'

असेच व्यक्तिमत्त्व राजेंद्र हुरणेचे आहे. हे जणू त्यांच्या सामाजिक कार्यातून सिद्धीस आणले आहे. म्हटले जाते की, प्रत्येक यशस्वी पुरुषामागे स्त्री असते. हुरणे यांच्या पत्नी सौ. राजश्री हुरणे हे त्यांना सतत कार्यशील राहण्यासाठी प्रेरणा देतात. महाराष्ट्र वीरशैव सभा दृढ बनविण्यासाठी युवा आघाडी व महिला आघाडीची स्थापना नांदेडमध्ये सर्वप्रथम त्यांनी केली. 'थोर व्यक्तीची गावे तितके गोड भटवी, काय लिहावे त्यांचे करवी, अपुरे संशोधकांची शब्द पुरवी' असे व्यक्तिमत्त्व श्री राजेंद्र हुरणे आहेत. संत तुकाराम महाराजांच्या उक्तीप्रमाणे कृती करणारे,

"जोडोनिया धना उत्तम व्यवहारे
उदास विचारे। वेच करी ।।"

या उक्तीचा स्वत: आचरणात आणणारे श्री राजेंद्र हुरणे हे नांदेड व मराठवाड्यातील एक अनुकरणीय बहुआयामी व्यक्तिमत्त्व आहे. व्यापार हे त्यांचे मुख्य कार्यक्षेत्र जरी असले तरी सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, क्रीडा क्षेत्राशी त्यांचे संबंध आपुलकीचे व मदतीचे आहेत. नांदेड जिल्ह्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी त्यांचे योगदान लक्षणीय आहे. वीरशैव समाजाच्या संस्कृतीशी असणारी परंपरा महात्मा बसवेश्वरांच्या विचाराची घालून दिलेल्या नितिनियमांचे व शिकवणुकीचे पाईक म्हणून एक समाजहितैषी, समाजचिंतक, कार्यशील त्यांचे कार्य. समाजऋण फेडणे प्रत्येकाचे आद्य कर्तव्य ते फेडणारा व्यक्ती दुर्बल घटकाला केंद्रबिंदू मानून त्यांच्या उन्नतीसाठी तळागाळातील समाजात जाऊन सहकार्य करण्याची भावना व तळमळ त्यांची राहिली आहे. श्री राजेंद्रअप्पा हुरणे एक दाता म्हणून देखील ओळखले



जातात. नांदेड मेडिकल फाऊंडेशनच्या कॅन्सर हॉस्पिटलमध्ये आणि काशी येथील जंगमवाडी मठात त्यांनी राहण्यासाठी व भक्तांना खोली बांधून दिली आहे. औरंगाबाद येथील घाटी दवाखान्याजवळील जगतगुरु पंडीताराध्य मंदिर मकाई गेट येथील स्वामी मठात देखील रुग्णांची निवास व्यवस्था केली आहे. तसेच आई मनकर्णाबाई विश्वनाथअप्पा हुरणे यांच्या स्मरणार्थ दरवर्षी मोफत नेत्र तपासणी केली जाते. तसेच नांदेड जिल्ह्यातील हुशार, गरिब होतकरु मुलांना पुणे येथील लिंगायत सेवा मंडळाच्या हॉस्टेलमध्ये समाजातील गरजू विद्यार्थ्यांना राहण्याची व्यवस्था ते करत असतात. काही दिवसापूर्वीच त्यांनी शिफारस केलेल्या वसतीगृहातील मुलांचे UPSC व MPSC परीक्षेत घवघवीत यश मिळाले आहे. सामाजिक कार्यातून ज्यामध्ये भुकंप व पुर परिस्थितीत मदत, हॉस्पिटलला मदत, गरीब व होतकरु विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत, परिचय मेळावे, सत्कार, गरीब विद्यार्थ्यांना सायकल, गणवेश, महिला प्रोत्साहन, रक्तदान शिबीर, सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये सहभाग, रुग्णासाठी सभेमार्फत ॲम्ब्युलन्सची व्यवस्था, खेळाडुंना प्रोत्साहन, कर, उपकर, सक्रिय आंदोलनात सहभाग, सार्वजनिक उत्सव, दांडीया, नवरात्र, सद्भावना रॅली, मंदिर निर्मिती, सायकल रॅली अशा अनेक सामाजिक, व्यापारिक, धार्मिक सांस्कृतिक कार्यातून सहभागी होऊन कार्य करणारे श्री राजेंद्र अप्पा हुरणे खरच कार्यशील 'नांदेड भुषण' आहेत. श्री राजेंद्र अप्पा हुरणे यांच्या व्यक्तिमत्त्वात शालीनता, विनम्रता, सर्वसमावेशकता आढळून येते. व्यापार क्षेत्रातून समाजसेवा करणारे ते आयामी व्यक्तिमत्त्व आहेत. गेल्या ३०-३५ वर्षापासून वेगवेगळ्या सभा, संघटना, संस्थाच्या मार्फत अनेक पदावर यशस्वी कार्य करत आलेले आहेत. आपल्या कार्याच्या सिद्धीतून समाजाला शोभण्यासारखे तुमचे मार्गदर्शन व कार्याबद्दलची आत्मीयता समाजात श्रेष्ठत्व सिद्ध करणारे आहे. यापुढेही वीरशैव लिंगायत समाजासाठी त्यांचे असेच मार्गदर्शन लाभावे हीच अपेक्षा... !

### ३.७ 'कायक वै कैलास' मानणारा उद्योजक : श्री अनिल नागनाथ शेटकार

नांदेड जिल्ह्यातील वीरशैव लिंगायत समाजातील श्री अनिल शेटकार हे सामाजिक,

धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक क्षेत्रातील नावलौकीक पावलेले उत्तुंग असे व्यक्तिमत्त्व. महात्मा बसवेश्वरांच्या सामाजिक विचाराने प्रभावित झालेले 'कायक वै कैलास' मानणारे नांदेडमधील गोरगरीबांचे स्वप्न साकार करुन त्यांना निवारा निर्माण करुन देण्याचे काम त्यांनी केले आहे. नांदेडमध्ये 'बसवेश्वर लँड डेव्हलपर्स या फर्मची' स्थापना करुन आपल्या कार्यातून समाजसेवा करण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. महापुरुषांची चरित्र प्रेरक असतात, संजीवक असतात, चैतन्यदायी असतात. महात्मा बसवेश्वरांच्या विचाराने समाजाला त्यांनी गती प्राप्त करुन दिली. त्यामुळे जनसामान्याचे ते प्रेरणादाची ठरले. या महापुरुषांच्या कार्यातून जे परिवर्तन घडून आले ते अत्यंत लक्षणीय आहे. या विचाराचा वारसा घेऊन नांदेडमध्ये श्री अनिल शेटकार यांनी जीवनाचा गहन अर्थ उकलून समाजसेवा वृत्ती हाती धरुन 'बसवेश्वर लँड डेव्हलपर्सच्या' माध्यमातून गेल्या २७ वर्षापासून गोरगरीबांना, मध्यमवर्गीयांना सवलतीच्या दरात पैसे भरण्याची सोय करुन निवारा उपलब्ध करुन देण्यामध्ये त्यांचा मोलाचा वाटा आहे. महात्मा बसवेश्वरांच्या कार्याप्रती असलेल्या 'कायक वै कैलास' तत्त्वाचा वापर करुन श्री अनिल शेटकार आपल्या व्यवसायात उत्तुंग झेप घेतली आहे. श्री अनिल शेटकार यांनी निवारा देवून हजारो कुटूंबाचे ते सहारा बनले आहेत. त्यामुळे त्यांचे हजारो कुटुंबाशी नाते जुळाले आहे. असे 'कुटुंब वत्सल' नेतृत्व आणि माणसाला मनाशी जोडणारा कार्यकर्ता प्रेमाचा, अपुलकीचा, कोणताही सामाजिक कार्यक्रमात ते कोणतेही असो बसवयात्रा असो, वधुवर परिचय मेळावा, गुणवंताचा सत्कार, इतर सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये त्यांचा सहभाग असतो. हे विशेष समाजप्रिय व्यक्ती नांदेड जिल्हा वासियांचा हृदयस्पर्शी माणूस बनला आहे. त्यांच्या यशाचे गमक सांगताना म्हणतात की, 'यशासाठी क्षमता, नियोजन, नेतृत्त्वाचे गुण, कष्ट करण्याची तयारी या सोबत दृष्टीकोणही आवश्यक असतो. व्यक्तीला आपल्याजवळ किती संपत्ती आहे किंवा किती मालमत्ता आहे या गोष्टीवर आपले सुख असवलंबून नसते, तर आपण त्यांच्यापासून किती आनंद उपभोगू शकतो यावर ते अवंबून असते." अशा विचारावर विश्वास ठेवणारा उद्योजक अनिल शेटकार आजच्या तरुणांना मार्गदर्शक ठरत आहेत. नांदेड जिल्ह्यातील



देगलूर तालुक्यातील आध्यात्मिक व निसर्गाच्या कुशीत वसलेले 'करडखेड' हे गाव एका सधन व संस्कृत कुटुंबाचा वारसा लाभलेल्या घरामध्ये दिनांक २३ एप्रिल १९६३ मध्ये अनिल शेटकार यांचा जन्म झाला. आईचे नाव साखऱ्याबाई व वडिलांचे नाव नागनाथराव. तसे पाहिले तर 'शेटकार' हे गावचे वतनदार पाटील होते. प्राथमिक शिक्षण जन्मभूमीतच झाले. गुरु सेवेशी एकनिष्ठ असणारा, गुरुंना दैवत मानणारा. शालेय जीवनात खोडकर असले तरी महाविद्यालयीन जीवनात हुशार व देगलूर महाविद्यालयातून वाणिज्य शाखेची पदवी प्रथम श्रेणीत घेऊन चाणाक्ष, चौकस बुद्धिमत्तेच्या अनिल शेटकारांनी आपले भावी नशीब अजमावण्याच्या उद्देशाने सन १९८५ मध्ये करडखेड गाव सोडले व नांदेड या ठिकाणी स्थायीक झाले. 'द महाराष्ट्र स्टेट को ऑप. फायनान्स कार्पोरेशन मधून आपल्या कार्याचा श्री गणेशा केला. त्यामुळे ते परभणी, औरंगाबाद, ठाणे, मुंबई अशा अनेक सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या संपर्कात व कामाचा प्रत्यक्ष अनुभव आला. याच कार्यातून त्यांच्या जीवनाला कलाटणी आणणारे अनेक मार्गदर्शक भेटले त्यामध्ये परभणीचे मा. खासदार देशमुख, कोल्हापूरचे सबनिस, लातूरचे माने व नांदेडचे माजी आमदार ॲड. गंगाधर पटने या मातबदारीची ओळख झाली. त्यामुळेच त्यांच्या मनात आदर्श जीवन जगण्याची जिद्द निर्माण झाली. नांदेडच्या अनेक सांस्कृतिक, धार्मिक, साहित्यिक, सामाजिक विचारातून त्यांचे व्यक्तिमत्त्व फुलत गेले व आज नांदेडच्या क्षितिजावर एक आदर्श सुसंस्कारीत व्यक्तिमत्त्व त्यांच्या नावारुपाने उदयास आले.

श्री अनिल शेटकार म्हणतात की, 'कोणताही व्यवसाय सुरु करावयाचा असेल तर त्यासाठी विवेक, चातुर्य, चिकाटी, इच्छा, नियोजन, ध्येयशक्ती, महत्त्वाकांक्षा, निर्णय घेण्याची क्षमता असेल तर व्यक्ती कोणत्याही व्यवसायात आपले व्यक्तिमत्त्व फुलले.' ही सर्व बलस्थाने शेटकारांच्या व्यक्तिमत्वामध्ये होती. म्हणूनच अपार कष्ट, साहस, उत्साह, आत्मविश्वास यांच्या जोरावरच त्यांच्या कार्याची नांदेड जिल्ह्यामध्येच नाहीतर 'महाराष्ट्रातील नामवंत उद्योजक' म्हणून त्यांची ओळख नावारुपाला येत आहे. बसवेश्वर लँड डेव्हलपर्सच्या माध्यमातून प्लॉटींगच्या क्षेत्रात उडी घेऊन पाहता-पाहता उत्तुंग शिखरावर विराजमान झाले आहेत. प्रत्येकांना

सहकार्याची भावना ठेवून कार्य करणारे श्री अनिल शेटकार यांच्या मध्ये कधीही स्वार्थीपणाचा लवलेस दिसला नाही. प्रत्येकाला आपुलकीच्या नात्यातून हजारो माणसांचा हा लक्षाधिश व उदार अंतःकरणाचा बसवप्रिय प्रत्येकाच्या सुख-दुखाला धावून जाणारा समाजप्रिय संपूर्ण जिल्हाच आपले कुटुंब मानणारे 'कुटुंबवत्सल' व्यक्तिमत्त्व समाजातल्या असंख्य माणसांना मदत करीत जणुकाही 'वसुधैव कुटुंबकम्' हे 'विश्वची माझे घर' मानणारा समाजहितचिंतक सर्वच क्षेत्रात अग्रेसर असणारा कोणत्याही कामात सदैव मदत करणारा कार्यशील व्यक्ती खरच म. बसवेश्वरांच्या विचाराची प्रेरणा करताना त्यांच्या कार्यातून दिसून येत असते. 'पृथ्वी ही शेषाच्या मस्तकावर तरलेली नसून श्रमिकांच्या तळहातावर तरलेली आहे.' हे साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या शाश्वत विचार महात्मा बसवेश्वरांच्या कार्यकतृत्वाद्वारे कार्य करणारे त्यांच्या कार्यातून उत्कृष्ट व्यवस्थापन, उत्कृष्ट नियोजन व उत्कृष्ट निरीक्षण क्षमता असणारे अनिल शेटकार यांची ध्येय आज पूर्णत्वाला येत आहेत.

श्री अनिल शेटकार व्यवसाया बरोबरच प्रत्येक सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमात अग्रेसर असतात. सद्विचार, संस्कृतीवर, प्रेम करणारे, सर्व धर्मांना एकच समजणारे, सामाजिक समतेचा संदेश देणारे, बसवसंदेश, बसवेश्वर जयंती, व्याख्याने, आषाढी एकादशी, गुरुपौर्णिमा, निसर्गप्रेमी, झाडे लावा पृथ्वी जगवा असा विश्वसंदेश देणारे आचार-विचार, कृतीतून स्वर्ग निर्माण करणारे सामाजिक, सांस्कृतिक, राष्ट्रीय व धार्मिक सुधारणेचे अग्रदूत आहेत. बसवेश्वरांच्या स्वातंत्र्य, समता, बंधुता या त्रयीचा विचार समाजाच्या शेवटच्या थरापर्यंत माणसापर्यंत पोह्चेचवणारे मानवतावादी विचाराचे बोलते विद्यापीठ अशी त्यांची ओळख आहे. बसवेश्वर लँड डेव्हलपर्सच्या माध्यमातून नांदेड शहरामध्ये बसवेश्वर नगर, महादेव नगर, शंकर नगर, हरिओम नगर ही यशस्वी नगरे त्यांच्या कार्यातून उदयास आली. विशेष म्हणजे या नगरात सर्व जाती धर्मियांना सामावून सामाजिक व राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश त्यांनी आपल्या व्यवसायातून दिला आहे. ती नगरे वसवताना निस्वार्थपणे त्यांनी ही सेवा केली. हे यश त्यांच्या प्लॉटिंग व्यवसायातील खर यश म्हणावे लागेल. कामाच्या निमित्ताने ते भारतभर फिरले पण सृष्टी सौंदर्याचा आस्वाद घेण्यासाठी



त्यांनी हाँगकाँग, मलेशिया, थायलँड, दुबई येथे सहकुटूंब यशस्वी दौरे केले. त्यामुळेच त्यांचे जीवन कृतार्थ ठरते. जीवनात कनक, कांता, संपत्ती, सत्ता, किर्ती या सर्वाची जरी प्राप्ती झाली तरी काही लोकांना यशस्वी जीवन जगता येत नाही. जो स्वतः सुखी होऊन इतरांना सुखासाठी सतत कार्यशील असतो तोच खऱ्या अर्थाने यशस्वी ठरतो. त्याचे उदाहरण म्हणजे श्री अनिल शेटकार होत.

कष्टाची गुणवत्ता आणि समोरच्या व्यक्तीच्या विश्वासाला प्राधान्य देणाऱ्या कृतीमुळे त्यांच्या कार्यपद्धतीला अनेक लोकांनी पसंती दिली. व्यवसायातील यश मिळवतांना त्यांनी कधीही पैसा कमविण्याचे साधन म्हणून व्यवसायाकडे कधीच पाहिले नाही. आपल्या सेवेने समोरचा व्यक्ती समाधानी व्हावा. हेच त्याचे कार्याप्रती भावना होती. त्यांनी सांगितले की, 'जे वाचले ते समजले पाहिजे, जे समजले ते उमजले पाहिजे व त्यानंतर ते सत्य कृतीतून दिसले पाहिजे. कुठल्याही विचाराला कृतीची जोड असावी तरच समाजाचे देणे फिटते अन्यथा संधी मिळूनही अपेक्षित कार्य आपल्या हातून होत नाही.' त्यासाठी काम कोणतेही असो ते निष्ठेने करावे म्हणून त्यांनी बसवेश्वर लॅन्ड डेव्हलपर्सच्या कार्याचा केंद्रबिंदू ग्राहक मानला व त्यांच्या सुखातच आपले सुख त्यांनी मानले. त्यांच्या व्यवसायातील यश हे त्यांच्या कुटूंब वत्सलपणाचे एक आदर्श उदाहरण त्यांनी सर्व समाजासमोर ठेवले. उद्योगाच्या कार्यालयामध्ये फाईली सोबत पुस्तकाचे कपाट असणारे अनिल शेटकार हे प्रथम उद्योजक आहेत. त्यांच्या कार्याचा आलेख अशा एक दोन पानात समाविष्ट करण्याजोगे नाही. कोणत्याही पदाची अपेक्षा नाही. केवळ सामाजिक सेवा, आडल्या नडलेल्यांना रस्ता दाखवण्याचे काम श्री अनिल शेटकार करत आहेत. ते खऱ्या अर्थाने नांदेड जिल्ह्याचे वीरशैव लिंगायत समाजाचे रत्न असून त्यांचे कार्य समाजासाठी प्रेरणा देणारे आहे.

### ३.९ इतिहास संशोधक श्री समुद्रगुप्त भिमराव पाटील

ध्येयवेडी माणसं स्वीकारलेल्या कार्यात स्वतःला झोकून आपले संपूर्ण आयुष्य कार्यास देतात. ध्येयाशिवाय अशा व्यक्तीला दुसरे काहीही सुचत नाही. कालांतराने अशा ध्येयवेडी माणसे समाजातील चेष्टेचा विषय बनत जातो पण तरीही ते आपले

कार्य अविरतपणे आपल्याच धुंदीत कार्य तत्पर असतात. अशाच पैकी वीरशैव लिंगायत समाजाचे ध्येयवेडे संशोधक समुद्रगुप्त पाटील एक आहेत. समुद्रगुप्त भिमराव पाटलाचा जन्म इ.स. १९४२ रोजी झाला. मुळ गाव शेवाळा होते. त्यांचा जन्म त्यांच्या आजोळी म्हणजेच हंगरगा या ठिकाणी झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण बेटमोगरा येथे झाले. बेटमोगरा या गावाला फार प्राचीन वारसा लाभलेला आहे. याच गावात शिवलिंग बादशाहा मठ आहे. अशा पावन भूमीत समुद्रगुप्ताचा प्राथमिक काळ व बालपण गेले. इ.स. १९५५ मध्ये बेटमोगऱ्यात नरहर कुरुंदकर गुरुजीचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यांच्या व्याख्यानाचा प्रभाव हा समुद्रगुप्त पाटलावर पडला. त्यांच्या हाताखाली शिक्षण घेण्यासाठी इ.स. १९५७ साली नांदेडच्या प्रतिभा निकेतन हायस्कुलमध्ये प्रवेश घेतला. प्रवेश घेतल्यानंतर समुद्रगुप्त पाटलांनी इतिहास विषयाचा तास चालू असताना गुरुजीना प्रश्न विचारला की, इतिहास संशोधन म्हणजे काय ? आणि नेमके संशोधन कसे केले जाते ? त्याच दिवसापासून समुद्रगुप्त पाटलाच्या एका इतिहास संशोधकाबद्दलची चुणुक दिसली व तेव्हापासून इतिहास विषयाची त्यांना आवड निर्माण झाली. नरहर कुरुंदकर गुरुच्या आज्ञेने व संशोधनाचा खरा मार्ग दाखविणारे गुरुवर्य प्रा. डॉ. गो.ब. देगलूरकर यांच्या दृष्टीतून व मार्गदर्शनातून एका संशोधकाची भ्रमंती सुरु झाली. समुद्रगुप्त पाटील यांचा जन्म सधन कुटुंबात इ ाला होता. त्याची आर्थिक परिस्थिती चांगली होती पण त्यांचे मन संसारात न रमता एका संशोधनाच्या वाटचालीकडे रमत गेले. ते १९५९ साली मॅट्रीक परीक्षा पास इ ााले. त्यांनी मनात आणले असते तर त्या काळी चांगली नोकरी लागली असती पण त्यांनी नोकरीमागे न लागता त्यांनी आपल वेगळं ध्येय निश्चित केलं आणि इतिहास संशोधनासाठी स्वतःला समर्पित केलं. इतिहास संशोधनासाठी केलेला भ्रमंतीत त्यांनी पूर्ण महाराष्ट्र व आंध्रप्रदेशचा काही भाग अक्षरशः पिंजून काढला. संशोधन करत असताना त्यांना खडतर प्रसंग वाट्याला आले. पण या संशोधकांनी त्याचा रस्ता काही सोडला नाही. आजही समुद्रगुप्त पाटील अनेक इतिहास परिषदेला, शिबीराला पुरातत्त्व कार्याला स्वतः झोकून देवून कार्य करत असतात. मराठवाड्यात फिरत असताना जे अनुभव त्यांना आले त्याचे संकलन डॉ. भगवान अंजनीकर



यांनी एका इतिहास संशोधकांची भ्रमंती म्हणून नावारुपाला आणले आहे. अनेक ठिकाणाहून ताम्रपट, नाणी, भांडी, पत्रे, सनदा त्यांनी जमा केल्या आहेत. आणि आजही ते अविरतपणे चालू आहे. वयाची पंच्याहत्तरी ओलांडली असली तरी हा संशोधक थकत नाही. कुठेही इतिहास परिषद असो त्याची उपस्थिती त्या ठिकाणी असतेच.

इतिहासाचार्य राजवाडे यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून इ.स.१९९१ मध्ये त्यांनी 'भारतीय इतिहास मूलभूत शोध' संस्थेची स्थापना नांदेडमध्ये केली. त्यांच्या या संशोधनातून नवीन संशोधकाला प्रेरणा मिळत असते. समुद्रगुप्त पाटलासारखा माणूस अविरतपणे संशोधन करतो त्यामुळे निश्चित भावी संशोधकाला त्यांच्याकडून प्रेरणा मिळेल.' समुद्रगुप्त पाटील यांनी खेड्या पाड्यात जावून आजपर्यंत नांदेड जिल्ह्यातील ७०० व महाराष्ट्रातील ५०० गावांना भेटी दिल्या. नांदेड जिल्ह्यामध्ये महात्मा बसवेश्वर पूर्व कन्नड भाषा बोलली जात असते. ती उदगिरी व देगलूरी म्हणून ओळखली जाते. कोणत्याही संशोधकाला त्याच्या आडनावाचा अर्थ व घराण्याचा इतिहास तसेच गावातील इतिहास समजणे गरजेचे आहे. यासाठी पाटीलांनी अथक संशोधन केले आहे. नांदेड जिल्ह्यातील निजाम राजवटीत बराच लिंगायत समाज तेलंगणा राज्यात गेला आहे. त्यामुळे लिंगायताची संख्या नांदेड जिल्ह्यातील बरीच कमी झाली आहे. प्रत्येक गावामध्ये समुद्रगुप्त पाटीलांनी भेट दिली आहे. त्यांच्या मार्गदर्शनानुसार ३० प्राध्यापकांनी पीएच.डी. केली आहे. समुद्रगुप्तांच्या मार्गदर्शनानुसार जे.ए. कुलकर्णी यांनी 'निजाम राज्यातील ग्रंथालय चळवळ' या विषयी मार्गदर्शन केले. समुद्रगुप्त पाटील यांनी पुरातत्व शाखेमधील ताम्रपट, नाणी, हस्तलिखित पोथ्या, यासंदर्भाची ग्रंथ साहित्य 'नरहर कुरुंदकर' प्रगत अध्यासन केंद्रामध्ये ही सर्व शिदोरी म्हणजेच त्यांच्या ३०-३५ वर्षाचा पूर्ण लेखा जोखा त्यामध्ये त्यांनी सुरक्षित ठेवला आहे. "नांदेड जिल्ह्याचा अभ्यास करत असताना उर्लिंगदेव व उर्लिंगपेद्दी पहिला कन्नड कवी होता. महात्मा बसवेश्वरांच्या काळात येथे नांदेडला वास्तव्य होते. असे मत कै. ईश्वर अंबादास कानडे यांनी मत व्यक्त केले आहे."

अहमदपुरचे महाराज यांनी कपिलधार यात्रा सुरु करण्या अगोदर समुद्रगुप्त

पाटीलाची भेट घेतली होती. त्यांनी पदयात्रे विषयी असे सांगितले की, वीरशैव लिंगायत समाजाची शिखर शिंगणापूर येथे प्रत्येक गावातून वारी जात असे. 'वारी' हा शब्द शैव परंपरेतूनच आला आहे. संशोधकांनी समुद्रगुप्त पाटील यांच्या सोबत चर्चा करुन त्यांच्या संशोधकवृत्तीचा पूर्ण इतिहास त्यांनी उलगडला. कै. नरहर कुरुंदकर यांचा सहवास त्यांना १९५८-१९८२ पर्यंत लाभला. त्यांचा विद्यार्थी म्हणून धन्यता मानतात. देगलूरकर गुरुजीचे सहकार्य मिळाले. त्याचबरोबर लक्ष्मीकांत तांबोळी, कोतापल्ले, भु.द. वाडीकर असे अनेक मित्र मंडळीचे सहकार्य त्यांना मिळत असते. अशा अनेक गोष्टीचा उलगडा त्यांनी केला. समुद्रगुप्त पाटील यांनी व्यक्तीच्या हालचालीवरुन त्यांच्या बोलण्यातून तो कुठला आहे हे लगेच सांगू शकतात. विशेष म्हणजे आर्थिक आधार नसताना अविरतपणे कार्य ते करत असतात. औंढा नागनाथ मंदिराची मूर्तीभंजका विषयी त्यांनी माहिती सांगितली धनगराच्या मुलाने मुर्तीभंजक करणाऱ्याला कसे पळवले हे सांगितले. कालभैरवाची परंपरा नांदेडमध्ये होती. त्याचे साक्ष सांगणारे ताम्रपट त्यांना सापडले आहेत. अनेक घटनेवर प्रकाश त्यांनी टाकला. समुद्रगुप्त पाटलांनी भावी संशोधकाला आव्हान केले आहे की, "तुम्ही ज्यावेळेस संशोधन करता त्यावेळेस तुमच्या परीसराचा अभ्यास तुम्हाला असणे आवश्यक आहे. त्यामुळे संशोधकांनी जागरुक राहून आपल्या परिसराचा अभ्यास करणे गरजेचे आहे. असे मत व्यक्त केले." समुद्रगुप्त पाटील यांनी इच्छा होती की पी.बी. देसाई, इरावती कर्वे, हेमचंद्र धर्माधिकारी, डी.डी. कौशंबी यांची भेट घ्यायची त्यांची ही इच्छा अपुरी राहिली. त्यांचा पत्रव्यवहार प्रकाशचंद्र व्यास यांच्या सोबत पत्र व्यवहार होता तो त्यांच्या मुलगा चेतन प्रकाशचंद्र व्यास यांच्याकडे सोपवला आहे. समुद्रागुप्त पाटील यांनी संशोधन करत असताना गोष्ट सांगितली ती म्हणजे संशोधन करत असताना तो पगारी शिक्षक असावा त्यांचे स्वतःचे घर असावे. पाटला जवळ ४००० नाणींचा संग्रह होता. विश्वनाथ हंगरगेकर यांच्या मृत्युमुळे नाण्याचा संग्रह नाहीसा झाला. समाजाची बांधणी करण्याची आवश्यकता आहे ते महात्मा बसवेश्वरांनी केली होती. त्यांच्या विचाराची खरी गरज आहे. महात्मा बसवेश्वरावर अनेक जण पीएच.डी. करतात पण त्यांची प्रत्यक्ष



अमलबजावणी कोणी करत नाहीत. अशी खंत समुद्रगुप्त पाटील यांनी व्यक्त केली. सामाजिक कार्यामध्ये समुद्रगुप्त पाटील यांनी अनेक लोकांचे मतपरिवर्तन करुन त्यांनी समाज परिवर्तन बरेच लोकांचे घडवून आणले आहे. अशा निस्वार्थी संशोधकांची भटकंती आजही चालूच आहे, हे विशेष मानावे लागेल.

❒❒❒

# ४. वीरशैव समाजाचे राजकीय जीवन

राजकीय विचारांना नैतिकतेचा आधार हा मुलाधार असतो. मनुष्याला सद्‌गुणी करुन मानवी जीवन सदाचारी समृद्ध, सुखी करण्यासाठी राजकीय विचाराची मांडणी केली आहे. त्यासाठीच वैचारिक बदल होत असतात. मानवाच्या विचाराप्रमाणे त्यांच्या आचरणात राजकीय विचार आणने आणि तशी अमलबजावणी करावी व सामाजिक व राजकीय संस्थाची जडण-घडण व्हावी अशी अपेक्षा राजकीय व्यक्तीकडून असते. राजकीय तत्त्वज्ञानच भविष्यातील बदलाचे साधन ठरत असतात. राजकीय तत्त्वज्ञानातुनच व्यक्तीला क्रांती व परिवर्तनाची नवी प्रेरणा मिळत असते. राजकीय विचारवंत लेस्ली स्टीफनने म्हटले आहे की, 'राजकीय तत्त्वज्ञानास भविष्यात होणाऱ्या क्रांतीचे सुचक मानले आहे.' राजकीय विचार किंवा तत्त्वज्ञानापासून व्यक्तीची राजकीय स्थितीची जाणीव होते. तत्वज्ञानातून अस्तित्वात येणारी क्रांती ही मानव जातीच्या कल्याणासाठी आणि मानवतावादी मुल्यासाठी व सामाजिक प्रस्थापनेसाठी महत्त्वाची असते. त्यामुळे व्यक्तीला आपल्या सर्वांगीण विकासासाठी वैयक्तिक स्वातंत्र्य असणे गरजेचे असते. त्यासाठी राजकीय हक्क मिळाले तर 'स्व' चा विचार नसल्यास भक्ती, तृप्ती व ज्ञानप्राप्ती होऊच शकत नाही. त्यासाठी सामाजिक बांधीलकी ची नाळ जोडून सामाजिक राजकारणाची मुहूर्तमेढ रोवणे गरजेचे आहे. राजकीय सत्तेशिवाय समाजाचा विकास होणार नाही. 'जसा राजा तशी प्रजा' अस्तित्वात येत असते. राजकीय अधिकारामुळे समाजाचा विकास होण्यास मदत होते. विचारांची उत्पत्ती मनुष्याच्या अंतरंगात सुक्ष्म स्वरुपात होत असते. राजकीय विचारांची प्रेरणाच मनुष्याच्या कार्याप्रती उत्तेजना निर्माण करते. समाजात जेव्हा जेव्हा वैचारिक परिवर्तन घडून आलेत तेव्हा सामाजिक, राजकीय, आर्थिक विचारसारणीत आमुलाग्र बदल झालेला असून विचारांमध्ये परिवर्तन घडून आले आहे. व्यक्तीच्या विचार व व्यवहार त्यांच्या वाटचालीतून परिवर्तनशील समाजाच्या कार्याची उत्पत्ती झाली असते. राजकीय इच्छाशक्तीतुनच सामाजिक



सुधारणा व सामाजिक परीवर्तन घडून येत असते. कोणतेही तत्त्वज्ञान एका व्यक्तीकडून किंवा व्यक्तीच्या समुहाकडून निर्माण करण्याची आवश्यकता असते. क्रांतीचे स्वप्न पाहणाऱ्या लोकांनी राजकीय तत्त्व समाजातील सर्व सामान्य माणसाच्या अनुभवातून गठीत झाले पाहिजे. अशा उदात्त भावनेने महात्मा बसवेश्वरांनी अनुभव मंटपाची स्थापना केली. ज्या समाजात विचारांची मुक्तपणे देवाण-घेवाण करण्यासाठी आणि समाजाला मार्गदर्शन करण्यासाठी लोकजीवनाशी संबंधीत असणाऱ्या व्यक्तीच्या संघटना त्यांनी अनुभव मंटपाच्या रुपानी तयार करुन अनुभव मंटपाच्या माध्यमातून महात्मा बसवेश्वराच्या काळात जगातील पहिली विद्वानांनी व विचारक्तांनी एकत्र येवून राजकीय संस्था स्थापन केली. नांदेड जिल्ह्याचा विस्तार पाहता लोकसंख्येच्या मानाने वीरशैव लिंगायत समाजामध्ये राजकीय वर्चस्व नाही. विधानसभेमध्ये ॲड. गंगाधर पटणे, ॲड. ईश्वरराव भोसीकर या व्यतिरिक्त कोणताही राजकीय व्यक्ती उच्च पदावर गेले नाही. त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील वीरशैव लिंगायत समाजाची राजकीय विचारसरणी म्हणावी तशी भरभराटीला आली नाही. राजकीय वारसा ज्या समाजाला लाभला तो समाज विकासाच्या वाटचालीत सर्वात पुढे आलेला असतो. राजकीय व्यवस्था ही व्यक्ती व समाज जीवनाशी निगडीत असल्यामुळे राजकीय व्यवस्थेचा व्यक्ती व समाज जीवनावर मोठा प्रभाव पडत असतो. त्यामुळे राजकीय व्यवस्थे शिवाय व्यक्ती, समाज, राष्ट्र यांचा विचार करता येत नाही. आज पाहिले तर राजकीय क्षेत्र आणि सामाजिक क्षेत्र हे परस्परांचे स्वाभाविक अंग बनून समाजावर राजकारणाचा प्रचंड प्रभाव निर्माण झालेला आहे. राजकीय व्यवस्थेवर वातावरणाचा परिणाम होत असतो. प्रत्येक राजकीय व्यवस्थेची एक राजकीय जीवनपद्धती असते. वातावरणानुसार राजकीय व्यवस्थेमध्ये काही मुल्याची रुजवण केली जाते. "राजकीय व्यवस्थेचा विशिष्ट व्यक्तीच्या नव्हे तर समाजातील सर्व लोकांच्या विकासासाठी व कल्याणासाठी राजकीय व्यवस्थेचा वापर होऊ शकतो."

समानता, सहानुभूती आणि मानवता या आधारावर भारतीय समाजाची पूर्ननिर्मिती होण्यासाठी राजकीय व्यवस्था चांगली असणे आवश्यक आहे. वीरशैव लिंगायत समाज महात्मा बसवेश्वरांनी स्थापन केलेल्या अनुभव मंटपास आपल्या

राजकीय जीवनाचा कणा मानत असतो. मानवी मूल्यावर आधारीत नवीन समाजाच्या निर्मितीसाठी अनुभव मंटपाची स्थापना ही राजकीय विचाराची एक प्रेरणा बनली. अहिंसा, सत्य, समता, बंधुभाव यासारख्या उच्च तत्त्वावर आधारलेल्या मानवधर्माचा प्रसार करण्याकरिता व नवसमाज निर्मितीसाठी मुहूर्तमेढ या अनुभव मंटपातून रोवली. मंटपामध्ये सर्व सदस्यांना सामाजिक स्थान देवून श्रेष्ठ कनिष्ठ भेद न करता समान वागणूक दिली जाते. समाजाच्या विकासामध्ये धार्मिक, आर्थिक राजकीय विचार करावा लागतो. राजकीय हक्क हे विकासाचा पाया असतो. त्यामुळे राजकीय अधिकार जेवढे जास्त तेवढा फायदा समाजाचा होत असतो. नांदेड जिल्ह्यातील राजकारणात वीरशैव लिंगायत समाजातील काही व्यक्तींनी आपल्या कर्तृत्वाने स्वतःचा ठसा नांदेड जिल्ह्याच्या राजकारणावर उमटविला आहे. धर्माबाद तालुक्यातील बाबा पाटील बन्नाळीकर यांचा एकेकाळी राजकारणात दबदबा होता. त्यांच्या नंतरच्या पिढीतील काही कार्यकर्ते राजकारणात नावारुपास आले. विश्वनाथ पाटील बन्नाळीकर हे काही दिवस धर्माबादचे नगराध्यक्ष राहिले. त्याच बरोबर किशोर केसराळे यांनी भोकर मतदार संघात आताचा नायगाव मतदार संघात राजकारणात आपली ओळख निर्माण केली होती. बिलोलीचे माजी आमदार गंगाधर पटणे, कंधारचे माजी आमदार ईश्वरराव भोसीकर, मुदखेडचे माजी नगराध्यक्ष सुनिल शेटे, मिसाळे गुरुजी, बबनराव बारसे, हरिहरराव भोसीकर माजी जि.प. उपाध्यक्ष, संजय बेळगे यांनी सुद्धा नांदेड जिल्ह्यातील राजकारणात आपली ओळख निर्माण केली आहे.

सामाजिक परिवर्तनाची चाके जर गतीमान करायची असतील तर त्या जिल्ह्याची राजकीय लोक सामाजिक जीवनात मिसळली पाहिजे. तरच ते लोकजीवनाचे निरीक्षण करुन समाजातील उणीवाची त्यांना जाणीव होईल. ह्या उणीवा कमी करण्यासाठी वीरशैव लिंगायत समाजातील लोक राजकारणात राहणे अतिशय गरजेचे आहे. समाजातील रचनात्मक आणि क्रियात्मक परिवर्तनाचे व नवसमाज निर्मितीचे कार्य होऊ शकते. समाज परिवर्तनाची व्यक्तीची स्वतंत्रता, समानता, वैचारिकता, सामाजिकता यांची आवश्यकता असते. सर्वाच्या समन्वयातून सामाजिक परिवर्तन तेव्हाच होऊ शकते. राजकीय वारसा लाभेल म्हणून वीरशैव लिंगायत समाजांनी



सामाजिक समता व राजकीय क्षेत्रामध्ये आपले वर्चस्व निर्माण करण्यासाठी एकत्र येवून समाजाचा विकास करण्यासाठी संघटन घडवून येणे गरजेचे आहे. कारण संघटन हे एकसुत्री असते. वीरशैव व्यक्ती नेहमीच विशाल मनोवृत्तीच्या व इतर धार्मिक व जातीय अल्पसंख्यांना सामावून घेणारा आहे. "वीरशैव समाज हा आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक बाबतीत तुलनात्मकदृष्ट्या प्रगत असल्यामुळे देशाच्या लोकशाही व्यवस्थेमध्ये या समाजाच्या सहभागाला विशेष अर्थ व मदत प्राप्त होण्यास मदत होईल."

### ४.१ वीरशैव समाजाच्या राजकीय जीवनाचा कणा : अनुभव मंटप

वीरशैव लिंगायत समाजाचा राजकीय पाया हा अनुभव मंटपापासून सुरुवात होते. महात्मा बसवेश्वरांनी स्थापन केलेली सर्व धर्मासाठी एकत्र बोलण्यासाठी या संघटनेची स्थापना केली. विचाराच्या आधारावर नांदेड जिल्ह्यातील वीरशैव लिंगायत समाजातील राजकीय व्यक्ती या तत्त्वानुसार आपले कार्य करतात. अनुभव मंटपाची निर्मिती ही व्यक्तीच्या अनुभव, विचार, लेखन, संघटना व स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारी संस्था आहे. ही संस्था लोकानुभवातून सामाजिक आचरणासाठी एक संहिता म्हणून कार्य करते. अनुभाव मंटपाच्या माध्यमातून लोकशाहीवादी संस्था आणि सामुहिक विचारांचा अविष्कार करणारे सभागृह म्हणून पाहिल्या जाते. "अनुभव मंटपही मुख्यत्वेकरुन मानवाला विश्वासाच्या योजनेतील स्वतःच्या स्थानाचा विचार करण्यास, विचार स्वातंत्र्य देण्यास, समान प्रतिष्ठा देण्यास, व्यवसाय व शारीरिक श्रम यांना प्रोत्साहन देण्यास व्यक्तीच्या आंतरिक नेतृत्त्वाचा विकास करण्यासाठी अनुभव मंटप प्रेरणादायी आहे." आजच्या राजकारणाचा विचार करता असे दिसून येते की, ज्या समाजाचा सक्रिय राजकीय सहभाग आणि प्रभाव अधिक असतो, त्या समाजाच्या गरजांची व समस्यांची तातडीने सोडवणूक होते. वीरशैवाचा राजकीय जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन, वीरशैवांना लाभलेली राजकीय पार्श्वभूमी यातूनच समाजाचा विकास अवलंबून असतो. समाजाच्या राजकीय हस्तक्षेप हा विकासवादी स्वरुपाचा असावा. अहिंसा, सत्य, प्रेम, समता, बंधुभाव यासारख्या उच्च तत्त्वांवर आधारलेल्या मानवतावादी धर्माचा प्रसार हा राजकारणातून व्हावा. परिवर्तनाच्या

कार्याला संघटित करण्यासाठी नवा आयाम देण्यासाठी महात्मा बसवेश्वरांनी वीरशैव लिंगायत समाजाला 'अनुभवमंटप' व 'शिवानुभव मंटप' अशा समतावादी मंटपाची स्थापना केली. शिवानुभव मंटप हे मुक्त विचारपीठ होते. तसेच वीरशैव लिंगायत समाजातील परिवर्तनवादी चळवळीने शक्तिपीठे होते. मुक्त विचार करण्याचे ज्ञानपीठ होते. अनुभवमंटपातून समतावादी विचाराची गंगोत्री वाहण्यास सुरुवात झाली. पहिल्या संसदीय लोकशाही व्यवस्थेची जननीचे प्रतिरुप होते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बहुजनांच्या उन्नतीसाठी दिलेल्या आरक्षणाचा आधार अनुभव मंटपात पाहावयास मिळतो. शिवानुभव मंटपात राजा-रंक, श्रीमत-गरीब, स्त्री-पुरुष, श्रेष्ठ-कनिष्ठ, उच्च-निच असा कोणत्याही प्रकारचा भेद नव्हता. शिवानुभव मंटपाची स्वतःची एक संहिता होती. अनुभव मंटपात आलेल्या प्रत्येक सदस्यास कपाळी विभूतीचे त्रिपुंड आणि गळ्यात इष्टलिंग धारण करणे अनिवार्य होते. गळ्यात इष्टलिंग धारण करताच सर्व सदस्य समान होत असत. अनुभव मंटपात सर्व सदस्य एकत्र बसून सामाजिक, धार्मिक, आर्थिक विषयावर आप-आपले अनुभव सांगत असत व त्यावर चर्चा होऊन शिवानुभव मंटपात झालेला निर्णय समाज स्विकार करुन निर्भयपणे तो निर्णय अंमलात आणीत असत. अनुभव मंटप हे प्रत्यक्ष अनुभवातून साकारलेले तत्त्व होते. सर्व लोक आपली आत्मानुभूती व विचार मांडत. तत्त्व आणि व्यवहार याचा मेळ घालण्याचा प्रयत्न अनुभव मंटपातून केला जात. या अनुभव मंटपात स्त्री-पुरुष समानता, प्रत्येक मानवाला अध्यात्मिक आणि सामाजिक प्रश्नाबाबत मुक्त चिंतन करण्याची मुभा आहे. त्याचे अनुभाव आणि कारण हे मार्गदर्शक तत्त्व मुक्त चिंतनासाठी आणि अध्यात्मिक प्रगतीसाठी आहे. सर्व व्यक्तीच्या उन्नतीसाठी मानवतावादी दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून कार्य करणे. "अनुभव मंटपाची स्थापना ही निष्क्रीय कर्मकांडाला आणि अधोगतीला आलेल्या समाजाला गतीशील करण्यासाठी, आत्मबोध, समाजबोध करण्यासाठीच अनुभव मंटपाची स्थापना केली." "व्यक्तीच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक क्षेत्रात प्रजाप्रभुत्व नसल्यास राजकीय प्रजाप्रभुत्व यशस्वी होणार नाही." त्यासाठी अनुभव मंटपाच्या माध्यमातून व्यक्तीचा सर्वांगीण विकास करणे गरजेचे आहे.



## ४.२ वीरशैवांचे अहिंसावादी राजकारण

वीरशैव लिंगायत समाज हा अहिंसावादी आणि शांतताप्रिय समाज आहे. हिंसा, दंगल, अराजकता, कटकारस्थान या मार्गाचा अवलंब वीरशैव समाजाने कधीही स्विकारलेले नाही. दया, शांती, क्षमा, सहानुभूती व अंहिसा या तत्त्वाचे वीरशैव लिंगायत समाजाने समर्थन केले आहे. या समाजाने सर्वधर्म समभाव या संकल्पनेची बीजे रोवली आहेत. म्हणून व्यक्तीवाद, समाजवाद, स्वातंत्र्य, समता, बंधुता इत्यादी तत्त्वे वीरशैव समाजाच्या राजकीय तत्त्वज्ञानामध्ये समावेश झालेला आहे. वीरशैवाच्या राजकारणामध्ये लोकशाही तत्त्वाचा पुरस्कार केला आहे. तसेच अनुभव मंटपाच्या प्रेरणेतुनच लोकांच्या विचारांना, अनुभवांना प्राधान्य दिले आहे. नांदेड जिल्ह्यामध्ये अनेक राजकारणी व्यक्ती आहेत की लोकांच्या आग्रहामुळे राजकारणात आले आहेत. समाजाचा पाठींबा मिळाला तरच ते राजकारणात उत्सुक असतात. सध्या पाडापाडीचे राजकारण सुरु झाले तरी पण वीरशैव हा कधीही दुसऱ्याचे वाईट स्वतःचा फायदा कधीच बघत नाही. असे अनेक उदाहरणे आहेत. अनुभव मंटप हे अहिंसावादी राजकारणाची जननी होती. व्यक्तीच्या विचारांना येथे स्थान होते. कोणत्याही व्यक्तीच्या विचारांना जेथे स्थान असते तिथे खरी लोकशाही नांदत असते. लोकशाहीची महत्त्वाची जी अट असते ती म्हणजे सर्व समाजामध्ये समता असावी ती अनुभव मंटपात आहे. समतेशिवाय आपण लोकशाहीची कल्पना करुच शकत नाही. लोकशाहीमध्ये व्यक्तीच्या विचारांचा म्हणजेच प्रजाहित महत्त्वाचे असते. सर्व प्रजेच्या हितासाठीच ही व्यवस्था कार्यरत असावी लागते. अनुभव मंटपाचा हाच मुख्य उद्देश होता. निसर्गशक्तीने भुतलावर निर्माण केलेल्या सर्व प्राणीमात्राबद्दल प्रेम, जिव्हाळा व त्याचा उद्धार करणे हे अनुभव मंटपाचे महत्त्वाचे तत्त्व होते. अनुभव मंटपामध्ये नितिमान, चारित्र्यसंपन्न, सदगुणी, स्वावलंबी, स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, न्याय या तत्त्वावर विश्वास असणारे, लोकशाही व्यवस्थेला मानणारे लोक या ठिकाणी अनुभव मंटपातून अनुभव घेवून तयार होत. म्हणूनच अनुभव मंटप हे वीरशैव लिंगायत समाजाचा राजकीय कणा समजला जातो. आजच्या लोकशाही विचारधारणेनुसार कार्य करणारी संसद आणि मानवाच्या सर्वांगीण

उन्नतीसाठी लोकसहभागातून चालविली जाणारी अनुभव मंटप नावाची व्यवस्था ही ध्येय व आदर्शाच्या संदर्भात समान असल्याचे दिसून येते. अनुभव मंटप हे जनकल्याणाची तळमळ असणारे विचारपीठ व खरे लोकशाही मूल्याची जोपासना करणारे व्यासपीठ आहे. म्हणूनच वीरशैव लिंगायत समाजाचे लोक अहिंसावादी राजकारणाचा स्वीकार करुन अनुभव मंटपाला राजकीय पाया मानतात. महात्मा बसवेश्वरांचे राजकीय विचाराची प्रेरणा ते अनुभव मंटपातून घेत असतात.

### ४.३ समाजातील राजकीय व्यक्तिमत्त्व :

#### ४.३.१ श्री ॲड. गंगाधर महालाप्पा पटणे (माजी आमदार, बिलोली)

नांदेड जिल्ह्यामध्ये राजकारणात वीरशैव लिंगायत समाजातील काही व्यक्तीनी आपल्या कर्तृत्वाने कोणताही राजकीय वारसा नसताना स्वतः ठसा उमटविला आहे. नांदेड जिल्ह्यातील बिलोली येथील ॲड. श्री गंगाधर पटणे हे राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रातील नावलौकीक पावलेले जेष्ठ व्यक्तिमत्त्व होय. समाजवादी विचाराने प्रभावित होऊन 'जनतादल' या पक्षामार्फत ते विधानसभेत बिलोली मतदार संघातून निवडून गेले व त्यांच्या काळात अनेक समाज उपयोगी कार्य आपल्या आमदारकीच्या काळात त्यांनी केले. महात्मा बसवेश्वरांच्या चिंतनधारा, सामाजिक, आर्थिक, राजकीय विचारधारा या तत्त्वाचा त्यांनी आपल्या जीवनात आमलात आणून समाजसेवा करण्याचे कार्य त्यांच्या हातून घडले आहे. ॲड. श्री गंगाधर पटणे यांचा जन्म स्वातंत्र्यसैनिक व वकिली परंपरा असलेल्या कुटुंबात दि. १४ एप्रिल १९४१ रोजी बिलोली या ठिकाणी झाला. पत्रकार म्हणून त्यांनी आपल्या कार्याची सुरुवात केली. त्याचे दहावीचे शिक्षण १९५७ रोजी व बी.ए. १९६६-६७ मध्ये झाले. त्यानंतर त्यांनी मराठवाडा विद्यापीठामध्ये लॉ ची डिग्री घेतली. व्यवसायाने ते वकील असले तरी त्यांना वाचनाचा छंद होता. त्यांनी 'जनक्रांती' या साप्ताहिकाचे आता दैनिक 'जनक्रांती' ची स्थापना केली. ते आज 'दै. जनक्रांतीचे' मुख्य संपादक आहेत. वयाची ७७ वर्षे झाली तरी आजही ते वाचन करुन 'जनक्रांती' दैनिकांमध्ये बातम्या स्वतः लावतात हे विशेष म्हणावे लागेल. ॲड. श्री गंगाधर पटणे साहेबांचा राजकीय प्रवास सन १९६७ पासून सुरु झाला. विद्यार्थी दशेपासूनच



त्यांना पत्रकारिता क्षेत्रात आवड होती. 'लोकसेवा' व 'रचना' साप्ताहिकाचे प्रमुख उपसंपादक होते. बिलोली नगर परिषदचे ते जवळपास १२ वर्ष अध्यक्ष राहिले होते. स्वामी रामानंद तीर्थ यांच्या सोबत त्याचा रेल्वे मध्ये प्रवास झालेला आहे. त्यामुळे ते स्वामी रामानंद तीर्थचा वारसा चालवताना दिसत आहेत. ॲड. गंगाधर पटणे या कर्मयोगी व्यक्तीने अनेक पदावर कार्य करुन एक कार्यसिद्ध व्यक्ती म्हणून आपली आगळी वेगळी ओळख निर्माण केली आहे. महाराष्ट्र 'राज्य तमाशा' परिषदेचे अध्यक्षपद त्यांनी सांभाळले. गेली अनेक वर्ष ते महाराष्ट्र ग्रंथालय परिषदेचे अध्यक्ष आहेत. महाराष्ट्राच्या ग्रंथालयीन चळवळीत त्यांचे कार्य विलोभनीय आहे. माजी पंतप्रधान श्री चंद्रशेखर हे जनता दलाचे अध्यक्ष असताना त्यांनी संपूर्ण देशात कन्याकुमारी ते राजघाट पदयात्रा काढली होती. त्यामध्ये ॲड. पटणे साहेबांचा सक्रिय सहभाग होता. बिलोली येथील सहकारी सोसायटीचे ते ४०-४५ वर्ष बिनविरोध चेअरमन होते. महाराष्ट्र को-ऑप हाऊसिंग फायनान्स कॉरपोरेशनचे ते डायरेक्टर म्हणून त्यांनी १५ वर्ष काम केले. १९७८ ते १९८० या कालावधीमध्ये बिलोली जनता दलाचे आमदार झाले. त्यानंतर १९९८ ते २००४ अशा कालावधीत ते विधान परिषदेवर आमदार म्हणून निर्वाचित करण्यात आले. कोणताही राजकीय पिंड नसतांना अशा अनेक पदावर पटणे साहेबांना जनतेनी संधी दिली ती फक्त त्यांच्या कार्यामुळेच त्यांचे कार्य पाहून लोकांनी अनेक पदावर त्यांना विराजमान केले. काही दिवस हुतात्मा पानसरे महाविद्यालयाचे उपाध्यक्ष म्हणून कार्य केले. पण त्यांचा वाढत्या वयामुळे त्यांनी राजकारणापासून दुर राहून व कौटुंबिक दुखामुळे ते सध्या कोणत्याच राजकीय पक्षाशी त्यांचा त्यांनी संबंध ठेवला नाही. यांनी आपल्या कार्यामुळेच अनेक पदे मिळाली त्यांच्या विषयी म्हटले जाते की 'मूर्ती लहान पण किर्ती महान' असा महात्मा बसवेश्वरांच्या विचारांनी प्रेरणा घेऊन 'कायकालाच कैलास' मानणारा कार्यशील व्यक्ती खरच कौतूक करावे तेवढे कमीच. नांदेड जिल्हा ग्रंथालय व मराठवाडा मुक्ती संग्रमामध्ये तसेच महाराष्ट्र चळवळीचे ते अध्यक्ष राहिले आहेत. शिक्षणाची गंगा बिलोलीमध्ये पसरविण्याचे काम त्यांनी केले. आंतर भारती संस्थेची स्थापना करुन बालवाडी ते दहावी पर्यंतचे शिक्षण देण्याचे काम

त्यांनी बिलोलीमध्ये केले आहे. त्यांनी बिलोली या ठिकाणी पुज्य साने गुरुजी प्राथमिक विद्यालय, जयराम अंबेकर विद्यालय, पूज्य साने गुरुजी विद्यामंदीर, आंतर भारती विद्यालय, जनक्रांती सार्वजनिक वाचनालय, म. फुले, डॉ. आंबेडकर वसतिगृह, महात्मा गांधी बालक मंदीर, पाळणाघर, म. बसवेश्वर संगणक शिक्षण केंद्र अशा अनेक शिक्षणाच्या ज्ञानगंगेची निर्मिती त्यांनी केली आहे ते स्वतः संस्थापक अध्यक्ष आहेत. जनक्रांती दैनिकाच्या माध्यमातून लोकांच्या विचाराचे प्रबोधन करण्याचे कार्य ते जनक्रांती मधून करत आहेत. त्यांच्या जनक्रांतीचे ब्रीदवाक्यच आहे. 'देशात हवी जनक्रांती' हे दैनिक जनतेला न्याय मिळवून देणारे, अन्याय अत्याचाराविरुद्ध आवाज उठविणारे भ्रष्टाचाऱ्याचा कर्दनकाळ ठरेल व ग्रामीण भागाला न्याय देईल असे कार्य जनक्रांती या दैनिकामार्फत करण्याचे कार्य ते करत आहेत. ॲड. पटणे साहेब कार्याला फार महत्त्व देतात म्हणून ते 'कायक वै कैलास' मानतात त्यांना देवावर विश्वास नाही तर कर्मावर विश्वास आहे.

महात्मा बसवेश्वरांच्या विचाराने प्रभावित झालेले कार्यशील व्यक्ती आहेत. महात्मा बसवेश्वरांचे तत्त्वज्ञान समाजात सांगण्याचे काम ते अहोरात्र करतात. महात्मा बसवेश्वरांची प्रथम कर्मभूमी ही बसवकल्याण नसून मंगळवेढा आहे. हे त्यांनी सिद्ध केले. यासाठी त्यांनी महाराष्ट्रातील अनेक तालुक्यात पदयात्रा, रथयात्रा, सभा, संमेलने घेऊन महात्मा बसवेश्वरांच्या कर्मभूमीचे पुरावे त्यांनी दिले. म्हणून महाराष्ट्र शासनाने सुद्धा कबुल केले आहे की, "महात्मा बसवेश्वरांची कर्मभूमी ही मंगळवेढा आहे. हे फक्त ॲड. पटणे साहेबामुळेच सिद्ध होऊ शकले. खऱ्या अर्थाने बसवेश्वरांच्या विचारांची ते पेरणी करतात." बिलोली तालुक्यातील भुमिहीनाचे प्रश्न सोडवण्याचे प्रयत्न त्यांनी केले. आमदार असताना ॲड गंगाधर पटणे साहेबांनी आपल्या मतदार संघातील अनेक समस्या सोडवण्याचा प्रयत्न केला. सतत कार्यशील राहून मतदार संघाबरोबर नांदेड जिल्ह्यातील अनेक समस्या सोडवण्याचे काम त्यांनी केले. बिलोली तालुका खरेदी विक्री संघ कुंडलवाडी कृषी उत्पन्न बाजार समिती १९६६-६७ चिटणीस म्हणून त्यांनी कार्य केले. तालुका व जिल्हा सोशालिस्ट पार्टी १९७७ संघटक व सरचिटणीस अशा अनेक पदावर विराजमान झालेले पटने



कधी पदाची लालसा निर्माण झाली नाही. सदैव निपक्षपणे त्यांनी कार्य केले. त्यांनी केलेल्या कार्याची पावती म्हणून महाराष्ट्र शासनाने अनेक पुरस्काराने त्यांना भुषविले आहेत. असे २०० च्या आसपास पुरस्कार त्यांच्या पूर्ण कार्यकाळामध्ये त्यांना मिळाले आहेत. त्यापैकी काही मोजके पुरस्कार १) महाराष्ट्र राज्य ग्रंथलय संचालनालयामार्फत दिला जाणारा 'डॉ. एस.आर. रंगनाथ ग्रंथमित्र पुरस्कार २०१२-२०१३' माननीय मुख्यमंत्र्याच्या हस्ते देण्यात आला. २) बिलोली तालुका 'ग्रंथालय भूषण' पत्रकार संघामार्फत देण्यात आला. ३) बिलोली तालुक्याच्या वतीने अमृत महोत्सवामध्ये 'जीवनगौरव' पुरस्कार देण्यात आला. ४) हिरेमठ भालकी संस्थानामार्फत 'बसव विचार प्रचारक' म्हणून गौरविण्यात आले. सामाजिक, सांस्कृतिक, चळवळीतील २०० च्या आसपास पुरस्कार देवून त्यांच्या कार्याची प्रचिती होते. बसवकल्याण या ठिकाणी अनुभव मंटपातर्फे गदगचे जगद्‌गुरु श्री सिद्धलिंगेश्वर स्वामी, डॉ. पट्टदेवरस यांच्या हस्ते गंगाधर पटणे यांचा सत्कार करण्यात आला. महात्मा बसवन्नांच्या समतावादी विचारांचा प्रभाव ॲड. गंगाधर पटणेवर पडलेला आहे. त्यांची अपार निष्ठा विचारावर असून कौटुंबिक आघाततही त्यांनी सामाजिक बांधीलकी निष्ठेने जोपासलेली आहे. सुख दुःखाचा समभावनेने स्वीकार करुन त्यांची स्थिर प्रज्ञा व स्थान प्राप्त केले आहे. उतारवयातही त्यांचा प्रवास आणि कार्यमग्नता आजच्या तरुणाईला प्रेरणा देणारी आहे. महात्मा बसवेश्वरांच्या विचारांची पेरणी अशीच त्याच्या हातून घडो व त्यांना उदंड निरोगी दीर्घायुष्य लाभो हीच शुभकामना....!

### ४.३.२ ॲड. ईश्वरराव नारायण भोसीकर (माजी आमदार, कंधार)

नांदेड जिल्ह्यामध्ये वीरशैव लिंगायत समाजामध्ये दोनच व्यक्तीनी आपल्या राजकीय कार्याचा ठसा आपल्या स्वकष्टातून निर्माण केला आहे. जनसामान्याची प्रेमाची साथ मिळाल्यामुळे महाराष्ट्राच्या विधानपरिषद व विधानसभेवर अशा दोन वेळेस कार्य करणारे ॲड. ईश्वरराव भोसीकर व्यवसायाने वकिल होते. त्याच्या वकिली व्यवसायातून समाजातील गोर-गरीबाचा संबंध आला त्यामधूनच त्यांचे समाजाबद्दलची कळकळ लक्षात घेऊन जनतेच्या पाठींब्याने विधान परिषद व

विधानसभा पदावर आपले कार्याची प्रचिती दिली. ॲड. ईश्वरराव नारायणराव भोसीकर हे मुळचे पानभोसीचे त्यांचा जन्म दि. २७ ऑक्टोबर १९३७ रोजी पानभोसी या गावी झाला. प्राथमिक, माध्यमिक शिक्षण पानभोसी येथेच झाले. कंधार या शहराला ऐतिहासिक परंपरा लाभलेली आहे. अशा ऐतिहासिक शहरामधुन कंधार येथून ॲड. ईश्वरराव भोसीकर यांचा राजकीय प्रवास सुरु झाला. त्यांनी एलएल.बी. ही पदवी औरंगाबाद येथून प्राप्त करुन तेव्हापासून देशसेवा करण्याचे व्रत त्यांनी हाती घेतले. याच उद्देशाने त्यांनी कंधार मधूनच आपल्या कार्याची सुरुवात केली. इ.स. १९६२ मध्ये त्यांचा राजकीय प्रवासाला सुरुवात झाली. तो म्हणजे काँग्रेसच्या तालुकाध्यक्ष पदावरुन त्या दिवसापासून त्यांनी आपला राजकीय पक्ष काँग्रेस मानून देशसेवा करण्याचे कार्य हाती घेतले - कंधार तालुक्यातील त्यांचे कार्य पाहून त्यावेळेच्या राजकिय पक्षातील व्यक्तींनी त्यांना काँग्रेस मार्फत विधानपरिषद आमदार म्हणून संधी दिली. तो काळ १९६६ चा होता. १९६६ ते १९७२ पर्यंत ते विधानपरिषदेचे सदस्य होते. या काळात मतदार संघातील अनेक योजना, आमदार निधीचा खर्च केला. समाजाचा विकासाच्या दृष्टीकोनातून मतदार संघातील अनेक समस्या त्यांनी महाराष्ट्राच्या विधानपरिषदेत मांडल्या हे त्यांचे महत्त्वाचे कार्य म्हणावे लागेल. विधानपरिषदेचा कार्यकाल त्यांचा मतदार संघातील कार्य करण्यामध्ये गेला त्यामुळे जनतेने त्यांना १९८० मध्ये विधानसभेवर पाठवले. विधानपरिषदेच्या कामाचा अनुभव यामध्ये विधानसभेवर त्यांनी काँग्रेस मार्फत आपले कार्य केले. तो त्याचा काळ १९८०-१९८५ असा होता. १९८०-१९८५ या काळामध्ये त्यांनी कंधार मतदार संघातील अनेक कार्य केली. अनेक समाजमंदिरे, तालुक्याचा विकासाला प्राधान्य देवून मतदार संघाचा विकास केला. त्यांनी विधानपरिषद सहा वर्ष व विधानसभेचे पाच वर्ष असे एकूण अकरा वर्ष कंधार मतदार संघाची आमदार म्हणून सेवा केली. १९७३-१९८९ पर्यंत ते अनेक महत्त्वाच्या कमिट्यावर त्यांनी सचिव म्हणून कार्य केले. त्यांच्या कार्याची दखल शासनाने सुद्धा घेतली आहे. गेली अनेक वर्षापासून ते 'मराठवाडा खादी ग्रामोद्योग समिती' चे सचिव आहेत. स्वामी रामानंद तीर्थच्या खादी ग्रामोद्योग प्रसाराची जी मोहिम होती घेतली आहे. त्यांचा वारसा गेली अनेक



वर्षापासून ॲड. ईश्वरराव भोसीकर करत आहेत. महात्मा गांधीच्या विचारातून निर्माण झालेली रोजगार मिळून देणारी खादी ग्रामोद्योग समिती ही ईश्वरराव भोसीकर साहेबांच्या काळात सुद्धा दरवर्षी ५ कोटीच्या आसपास उत्पन्न करताना दिसून येते. खादी ग्रामोद्योगामार्फत राष्ट्रीय ध्वज, उच्च प्रतीचे कपडे, सतरंज्या अनेक खादीग्रामोद्योगाची निर्मिती या समिती मार्फत तयार केली जाते व त्यामधून अनेक गोरगरीबांच्या हाताला काम व रोजगार मिळालेला आहे. ॲड. ईश्वराव भोसीकर साहेबाचा मुळ पिंड हा राजकीय आहे. त्यामुळेच कोणत्याही क्षेत्रातून त्यांच्या हातून देशसेवाच घडत असते. वेगवेगळ्या योजना आखून ते मराठवाडा खादी ग्रामोद्योगाचे उत्पन्न वाढवत असतात. त्यांचे हे कार्य एक प्रकारची देशसेवाच आहे. त्यांचे चिरंजीव निळकंठराव भोसीकर हे सुद्धा व्यवसायाने डॉक्टर असून तेही एक प्रकारची रुग्णांची सेवा करुन वडीलांच्या परंपरेला साथ देतात. त्यांच्या बरोबर त्यांच्या सुनबाई सुद्धा जिल्ह्यातील नामवंत बालरोगतज्ञ आहेत. देशसेवेचे वृत्त घेतलेले भोसीकर घराणे हे वीरशैव लिंगायत समाजाला प्रेरणा देणारे आहे.

### ४.३.३ श्री हरिहरराव विश्वनाथ भोसीकर (माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष, नांदेड)

श्री हरिहरराव भोसीकर हे कंधार तालुक्याचे रहिवासी. कंधार तालुक्याला प्राचीन वारसा लाभलेला आहे. कंधार हे राजधानीचे शहर म्हणून ओळखल्या जाते. एका चांगल्या सधन कुटूंबात जन्मलेल्या हरिहररावांनी १९८० साली राजकीय क्षेत्रात प्रवेश केला. त्याआधी त्यांनी १९३९ साली वडीलांचे निधन झाल्यामुळे त्यांना एल.एल.बी. शिक्षण सोडून गावाकडे शेती व्यवसाय सांभाळण्यासाठी गावामध्ये राहावे लागले. गावाकडे गेल्यानंतर १९८० साली ते सर्वप्रथम कंधार तालुका खरेदी विक्री संघाचे संचालक म्हणून निवडून आले. तत्पूर्वी नांदेडला शिकत असताना बाबासाहेब गोरठेकर, गंगाधर कुंटूरकर या मुरब्बी राजकारणी नेत्याच्या सहवासात राहण्याची संधी त्यांना मिळाली. १९९२ साली जि.प. निवडणुकीत कलंबर मतदार गटातून ते विजयी झाले. जि.प. सदस्य या नात्याने त्यांनी आपल्या जि.प. सर्कलमध्ये अनेक समाज उपयोगी कार्य समर्थपणे पार पाडली. त्यानंतर ते जि.प. चे उपाध्यक्ष,

नांदेड जिल्हा मध्यवर्ती सह. बँकेवर संचालक म्हणून ते निवडून आले. त्यांच्या कार्याचा वाढता आलेख आजही तसाच चालू आहे. सध्या त्यांच्याकडे अनेक महत्त्वाची पदे त्यांच्याकडे आहेत. श्री हरिहरराव भोसीकर राजकारणात यशस्वी झालेले भोसीकर त्यांच्याकडे सध्या बँकेची जबाबदारी सोपवली आहे.

### ४.३.४ विश्वनाथ पाटील बन्नाळीकर (माजी नगराध्यक्ष, धर्माबाद)

नांदेड जिल्ह्यामध्ये एकूण १६ तालुके असून त्यामध्ये काही ठिकाणी नगरपालिका तर काही ठिकाणी नगरपंचायत आहेत. धर्माबादचे बाबा पाटील बन्नाळीकर यांचा एकेकाळी राजकारणात दबदबा होता. त्यांच्यानंतरच्या पिढीतील काही कार्यकर्ते राजकारणात नावारुपास आले. विश्वनाथ पाटील बन्नाळीकर हे धर्माबादचे काही काळ 'नगराध्यक्ष' म्हणून त्यांनी कार्य केले. त्यांच्या कार्याकाळामध्ये धर्माबादचा अनेक उपक्रमांना त्यांनी प्राधान्य देवून धर्माबाद नगरपालिका चांगल्या नावारुपाला आणली. विश्वनाथ पाटील बन्नाळीकर हे शरद पवारांच्या राष्ट्रवादी विचारसरणीचे राजकिय नेते होते. राजकिय कार्याचा वारसा असलेले बन्नाळीकर यांनी राजकीय कार्याबरोबरच पानसरे विद्यालयाची स्थापना करुन शैक्षणिक विकास करण्याचा प्रयत्न केला. गोर-गरीब विद्यार्थ्यांना ज्ञानमंदिरातून शिक्षण देण्यास सुरुवात केली. बन्नाळीकर पाटील हे नगरसेवक म्हणून १० वर्ष कार्य पाहिले तर नगराध्यक्ष म्हणून एक टर्म त्यांनी पूर्ण केला. त्यांच्या कार्यकाळात नगरपरिषदेमध्ये अनेक समाज उपयोगी कार्य त्यांनी शासनाच्या मार्फत पार पाडले. गरजुना मोफत घरे, पाणी पुरवठा, नगरपरिषदेच्या रस्त्याचे प्रश्न, नागरिकांचे प्रश्न सोडविण्याचे काम त्यांनी केले. नगरपरिषदेला मिळालेल्या अनुदानाचे विभाजन वेगवेगळ्या विभागाला वाटून शासनाचा सर्व पैसा जनहितास त्यांनी लावला.

### ४.३.५ श्री सुनिल जगन्नाथ शेटे (मा. नगराध्यक्ष, मुदखेड)

मुदखेड हे मतदार संघ हा माननीय माजी मुख्यंमत्री अशोकराव चव्हाण यांचा मतदार संघ आहे. शंकरराव चव्हाण साहेबांच्या दृष्टीतून पाणीदार झालेला तालुका अनेक बाबीसाठी प्रसिद्ध आहे. सुनिल शेटे यांनी मुदखेड तालुकयामध्ये काँग्रेस पक्षामार्फत अनेक राजकीय कार्याद्वारे जनतेची कामे केली आहेत. श्री सुनिल



शेटे यांनी मुदखेडच्या नगरसेवकपदी १५ वर्षे व नगराध्यक्षपदी अडीच वर्ष कार्य केले आहे. मुदखेडच्या मार्केट कमिटीमध्ये त्यांचे अतुल्य कार्याद्वारे मार्केट कमिटीला चांगले दिवस आले. त्यांच्या कार्य काळामध्ये मुदखेड नगरपरिषदेला स्वच्छतेच्या बाबतीत चांगले कार्य केल्यामुळे 'संत गाडगेबाबा पुरस्कार' देण्यात आला. नगराध्यक्ष असताना त्यांनी अनेक समाज उपयोगी कार्य केले. त्याच बरोबर गुणवंतांचा सत्कार, जयंत्या, रक्तदान शिबीरे, अनाथाना आर्थिक मदत देण्याचे कार्य मुदखेडमध्ये शेटे यांनी केले. नगराध्यक्ष असतांना सामाजिक, धार्मिक, आर्थिक कार्य बरोबरच राजकिय विकास केला. धार्मिक कार्यामध्ये अपरंपार स्वामी मठामध्ये होणारे सामाजिक प्रबोधन, श्रावणमासात वेगवेगळे कार्यक्रम ते घेताना दिसतात. तत्कालीन मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनानुसार अध्यक्ष असतांना शेटे साहेबांनी मुदखेड नगरपालिकेमध्ये अनेक विकासाची कामे केली. त्यांच्या काळात मुदखेड नगरपालिकेला उत्कृष्ट नगरपालिका म्हणून बहुमान मिळाला ते त्यांच्या कार्यामुळेच. मतदारांच्या अनेक समस्यांना योग्य न्याय देवून जनतेच्या हिताच्या दृष्टीने अनेक कार्य केली आहेत. जनतेच्या समस्या बरोबरच शहरातील पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी नगरपालिकेच्या परिसरात अनेक झाडे लावली आहेत. सुनिल शेटे यांनी कोणताही राजकीय वारसा नसताना सुद्धा आपल्या कार्यामधून जनतेमध्ये एक वेगळीच ओळख निर्माण केली आहे. नगरपालिकेच्या विकासाच्या कार्यात सतत कार्यशील असल्यामुळे मुदखेड नगरपालिका नांदेड जिल्ह्याच्या विकासाच्या उच्च शिखरावर होती. समाजाबद्दल बांधिलकी म्हणून अनेक सामुहिक कार्यक्रमामध्ये ते नेहमी सहभागी असतात. गुणवंताचा सत्कार, रक्तदान शिबीर, इफ्तार पार्टी, बसवजयंती, भिमजंयती, नगराचा प्रमुख या नात्याने ते सर्व समाज बांधवांच्या कार्यक्रमामध्ये ते नेहमी अग्रेसर असतात. त्यांच्या प्रेरणेतूनच निराधार लोकांना घरकुलामार्फत अनेक घराचा आसरा मिळाला. मुख्यमंत्री साहेब यांच्या मर्जीतला अप्पा म्हणून त्यांना एक वेगळे स्थान आहे. कारण चव्हाण साहेबांचा मतदार संघ हा मुदखेड आहे. त्यामुळे नगराध्यक्ष सुनिल शेटे साहेबांची सर्वांगीण बाबतीमध्ये विशेष नजर येथील परिसरावर असते. राजकीय कामाबरोबरच सामाजिक, धार्मिक,

आर्थिक कामातून आपल्या कार्याची एक वेगळी प्रतिमा त्यांनी वीरशैव लिंगायत समाजामध्ये निर्माण केली आहे. नगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील अनेक रहिवाश्यांनी त्यांनी वेगवेगळ्या योजनेमार्फत त्यांनी अनाथ मुलीच्या भविष्यासाठी अर्थसहाय्य योजना राबवून गरीबांना आर्थिक मदत देण्याचे कार्य नगराध्यक्ष असतांना केली आहे.

### ४.४ नांदेड जिल्ह्यातील जिल्हा परिषद सदस्य :

नांदेड जिल्ह्यामध्ये एकूण १६ तालुके असून नांदेड जिल्ह्यामध्ये ६३ जि.प. सर्कल आहेत. त्यापैकी वीरशैव लिंगायत समाजातील चार जि.प. सदस्य नांदेड जि.प. निवडून आले आहेत. त्यापैकी संजय बेळगे हे दुसऱ्यांदा जि.प. मध्ये निवडून आले आहेत. माधवराव मिसाळे, बबनराव बारसे, अनुराधाताई खानापुरकर पाटील हे वीरशैव लिंगायत समाजाचे जि.प. सदस्य आहेत.

### ४.४.१ श्री संजय माधवराव बेळगे

श्रीमान संजय बेळगे साहेब मुळचे नायगावचे. नायगावमध्ये काँग्रेस पक्षामार्फत ते दोन वेळा जि.प. सदस्य म्हणून लोकांनी त्यांच्या कार्याची पावती म्हणून नांदेड जि.प. मध्ये पाठवले आहे. संजय बेळगे यांनी या आगोदर शिक्षण सभापती म्हणून अनेक कार्य केले आहेत. अनेक सामाजिक, धार्मिक, राजकिय कार्यामध्ये यांचा सक्रिय सहभाग असतो. गुणवंतांचा सत्कार, जि.प. चे कार्यक्रम, त्यांचा सहभाग महत्त्वाचा असतो. नांदेड जिल्ह्यातील अनेक सदस्याचे मुल्यमापन करुन जनतेच्या कामाला प्राधान्य देत असत. त्यामध्ये त्यांनी नायगाव व लोहगाव जि.प. सर्कल मधीन जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी अनेक प्रयत्न केले आहेत.

### ४.४.२ श्री माधवराव गंगाराम मिसाळे

श्री मिसाळे माधवराव हे देगलूर तालुक्याचे रहिवासी त्यांनी आपल्या कार्याची सुरुवात शिक्षकी पेशामधून केली आहे. सेवानिवृत्ती नंतर त्यांना शिक्षकांच्या समस्या सोडविण्यासाठी जि.प. मध्ये शिक्षण सभापती व आरोग्य सभापती पदी विराजमान करण्यात आले आहे. मिसाळे माधवरावांना जि.प. नांदेड सर्वजण गुरुजी म्हणून ओळखतात. त्यांच्या अनुभवावरुन त्यांना जि.प. च्या शिक्षण सभापतीपदी अनेक



शिक्षकांच्या समस्या सोडविण्यासाठी व शिक्षकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी हा पदभार दिला. शिक्षकांच्या अनेक समस्यांना योग्य ते न्याय देण्यासाठी त्यांनी अतिशय चोखपणे आपले कार्य त्यांनी बजावले आहे.

### ४.४.३ बबनराव रामराव बारसे

श्री बबनराव बारसे हे बारसगाव येथील रहीवाशी गावातील सरपंचापासून राजकारणाची सुरुवात झाली. गावातील राजकारणावर वर्चस्व निर्माण केल्यानंतर तालुका प्रमुख म्हणून शिवसेनेचे कार्य त्यांनी केले. अर्धापूर तालुक्यामध्ये बबनराव बारसे यांचे कार्य अतिशय महत्त्वाचे आहे. मागच्या विधानसभेच्या निवडणूकीमध्ये शिवसेनेमार्फत उभे राहून आपल्या कार्याची पावती देण्यासाठी ते उभे राहिले होते. पण नांदेड जिल्ह्यातील जाती धर्माच्या राजकारणामुळे जनतेचा जास्त पाठींबा त्यांना मिळू शकला नाही. येळेगाव जि.प. सर्कल मधुन शिवसेनेच्या पक्षा मार्फत त्यांना तिकिट देण्यात आले. व जनतेची त्यांना भरगोस मतदान देवून नांदेड जिल्ह्याच्या जि.प. मध्ये बारसगावच्या वाघाला जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी पाठवले. श्री बबनराव बारसे तरुण व्यक्तिमत्त्व आहे. तालुक्याच्या राजकारणामध्ये त्यांची चांगली ओळख निर्माण झाली आहे. अनेक सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, राजकीय कार्यामध्ये आपला सहभाग नोंदवत असतात. कार्यक्रम हा कोणत्याही व्यक्तीचा असो ते सदैव कार्यक्रमाला हजर असतात. जनसामान्यात मिसळणारा माणूस म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांनी नांदेड जिल्ह्यामध्ये व वीरशैव लिंगायत समाजामध्ये आपल्या कार्याचा एक चढता आलेख निर्माण केला आहे. त्यांनी जि.प. सदस्य पदी निवड झाल्यानंतर येळेगाव सर्कलमधील अनेक विकासाची कामे हाती घेतली व अतिशय कमी वेळेत ते पूर्णत्वास नेली आहेत. बबनराव बारसे राजकिय कार्याबरोबरच समाजातील धार्मिक कार्यामध्ये सुद्धा सहभागी होतात. त्यामुळेच नांदेड जिल्ह्यातील अनेक गुरुवर्याचा शिवाचार्याचा त्यांना आशीर्वाद लाभत असतो. वेदांतचार्य दिगांबर शिवाचार्य म्हणतात की, "राजकीय क्षेत्राबरोबरच सामाजिक, धार्मिक क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटविणारे तरूण राजकारणी क्वचितच भेटतात. त्याला बबनराव बारसे अपवाद आहेत." बबनराव बारसे यांचे येळेगाव जि.प. सर्कल बरोबरच

आंबेगाव, लहान, लोण, अर्धापूर याठिकाणी त्यांच्या कार्याचे वर्चस्व निर्माण केले आहे. वीरशैव लिंगायत समाजाचे कोणतेही कार्य असो त्यांचा सहभाग सर्वात पुढे असतो. रक्तदान शिबीरे, वृक्षारोपण यासारखे अनेक सामाजिक कार्यक्रम ते घेतात व तेही गावाच्या सहकार्याने त्यामुळे त्यांच्या कार्यक्रमाला सामुहिकतेचे स्वरुप येते. त्यामुळेच हजारो शिवसैनिक त्यांच्या पाठीमागे सतत कार्यशील असतात. जनतेच्या प्रश्नांना प्रथम स्थान देवून जि.प. मध्ये अनेक प्रश्नांची त्यांनी मांडणी जनतेच्या समस्या सोडवल्या आहेत. आज ते नांदेड जिल्ह्याच्या अनेक समितीवर आहेत. त्यामध्ये महत्त्वाची म्हणजे नुक्तेच त्यांची नेमणूक जिल्हा नियोजन समितीवर झालेली आहे. ही नेमणूक म्हणजे त्यांच्या कार्याची पावतीच आहे. वीरशैव लिंगायत समाजातील तरुण तडफदार राजकीय नेता म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. बबनराव बारसे यांच्या जवळ माणसे जोडण्याची व संघटन करण्याची क्षमता असल्यामुळे नांदेड जिल्ह्यातील जनता त्यांच्याकडे भावी आमदार म्हणून आशेने पाहत आहे.

### ४.४.४ अनुराधाताई पाटील खानापुरकर

नांदेड जिल्ह्यातील वीरशैव लिंगायत समाजातील एकमेव महिला म्हणून जि.प. गटातून निवडून आल्या आहेत. त्यांनी काँग्रेस पक्षामार्फत आपल्या राजकीय प्रवास सुरु केला आहे. जि.प. सर्कल मधील जनतेच्या समस्यांना प्रथम प्राधान्य देवून त्यांच्या समस्या जि.प. च्या अध्यक्षापर्यंत पोहचविण्याचे काम अनुराधाताई करताना दिसत आहेत. अनुराधाताई अनेक धार्मिक कार्यात सहभागी होवून समाजातील अनेक प्रश्न त्या सोडविण्याचा प्रयत्न करत आहेत. खानापुर जि.प. गटातून त्यांनी आपल्या कार्याची सुरुवात केली आहे.

❒❒❒



# ५. वीरशैव समाजाची मठ परंपरा

इतिहासाचे अध्ययन करताना आपण कोणत्याही भूभागामध्ये राहणाऱ्या लोकांचे अध्ययन करत असतो. त्या भूभागाचा इतिहास आपण कधीच बघत नसतो. कोणत्याही प्रदेशाचा इतिहास बघत असताना फक्त त्या प्रदेशाचा राहणाऱ्या लोकांचा, समाजाचा इतिहास पाहत असतो. चांगला समाज घडवायचा असेल तर चांगल्या विचाराची गरज आहे. समाज परीवर्तन घडवून आणावयाचे असेल तर समाजातील प्रत्येक व्यक्तीने सकारात्मकरित्या बदलले पाहिजे. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनामध्ये धर्माला अतिशय महत्व प्राप्त झालेले आहे. धार्मिक प्रसंग हे आत्ममांगल्य आणि लोकमांगल्याचे सतत समर्थक, पोषक, प्रचारक आणि संरक्षक असतात. समाज हा महान असतो त्याच्या धार्मिक विचाराचे तत्त्वज्ञान पवित्र असतात. प्रत्येक धर्मसंस्थापक हा त्या समाजाचा पूज्यनीय असतो. सर्व समाजाची पूजागृहे, उपासनागृहे, मंदिरे, मशिदी, गुरुद्वारे, विहार त्या-त्या व्यक्तीच्या जीवनाच्या आत्मशांतीची केंद्रे असतात. ही केंद्रे विश्वकल्याणासाठी आत्मोद्धाराची संस्कार केंद्रे असतात. त्याचा उपयोग मानव समाजकल्याणासाठी करत असतो. समाज ही परिवर्तन घडवून आननारी अनुभूती आहे. तो ईश्वर विषयक सिद्धांत नाही ती एक अध्यात्मिक जाणीव आहे. कोणत्याही समाजामध्ये श्रद्धा, आचरण, विधी, समारंभ यामध्ये विज्ञान व विवेकाचा पुरस्कार केला तर ते वास्तवाशी नाते जोडतील तेव्हाच खऱ्या अर्थाने कोणत्याही समाजाचे संघटन होऊ शकेल.

### ५.१ नांदेडची ऐतिहासिक परंपरा :

नांदेड हे शहर गोदावरी नदीच्या काठी वसलेले असून शिवाच्या नंदीमुळे नंदीग्राम हे नाव धारण केले आहे. त्यामुळे या शहराला अतिशय महत्त्व प्राप्त झाले आहे. नांदेड जिल्ह्याचे अध्यात्म, कला, विद्या, सांस्कृतिक, समाजकारण, राजकारण, साहित्य यांच्या क्षेत्रात जिल्ह्याचा मोलाचा वाटा आहे. अभिलेखातून नांदेडचा उल्लेख इसवीसनाच्या चौथ्या शतकापासून आढळत असला तरी मानवी जीवनाच्या वस्तीच्या पाऊल खुणा खुप प्राचीन दिसून येतात. काही विद्यवानांच्या मते नांदेड शहराला

'नांदेड' हे नाव शिवशंकराच्या वाहनाचे नाव नंदी आहे, त्यावरुन नंदी पासून नांदेड झाले असावे. म्हणजेच नंदीतट, नंदीग्राम, नवनंदडेश अशा प्राचीन नावावरुन 'नांदेड' हे नाव तयार झाले. प्राचीन वारसा लाभलेल्या ह्या जिल्ह्यामध्ये शिवाला आराध्य दैवत मानणाऱ्या वीरशैव लिंगायत हा समाज येथे अस्तित्वात असावा असे काही तज्ञाच्या मते सांगता येईल, कारण शिवाच्या नंदीची पूजा वीरशैव भक्त नित्य नियमाने करत असतात. देगलूर तालुक्यातील होट्टल येथील चालूक्य कालीन मंदिरे, कंधार ही ऐतिहासिक उपराजधानी, सातवाहन कालीन साम्राज्य विस्तार त्याचबरोबर कल्याणीचे चालुक्य घराणे यांचा वारसा ह्या जिल्ह्यामध्ये अधिकच वैभवात भर घालते. नांदेड जिल्ह्यामध्ये प्राचीन संस्कृतीची मुहुर्तमेढ रोवली गेलेली आहे. ऐतिहासिक वारसामध्ये भर टाकणारे नांदेड जिल्ह्यातील वीरशैव समाजाचे मठ नांदेड जिल्ह्यामध्ये आहेत. या मठाला अध्यात्मिक ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. वीरशैव समाजामध्ये शिवाचार्याच्या मठाला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. वीरशैवाचे मठ हे सर्वात जास्त ग्रामीण भागात आहेत. त्यामुळे ते ग्रामीण भागातील संस्कार केंद्र म्हणून कार्य करतात.

नांदेड जिल्ह्यामध्ये वीरशैव समाजाचे संस्कारकेंद्र बेटमोगरा, मुखेड, तमलुर, हणेगाव, कंधार, शिराढोण, मुदखेड, नागठाणा, कासराळी या ठिकाणी मठ आहेत. नांदेड जिल्ह्याबरोबरच वीरशैव समाजाचे नांदेड जिल्ह्यातील भक्तगण वसमत, पूर्णा, अहमदपूर या मठाचे सुद्धा नित्य नियमाने सेवा करतात. त्यामुळे ही मठे सुद्धा नांदेड जिल्ह्याच्या मठ संस्कारकेंद्रामध्ये अध्यात्मिक विचाराची देवाण-घेवाण या मठातून होत असते. वीरशैव समाजाची धर्मपीठे पंचपीठे या नावाने ओळखली जातात. पुरातन काळापासून या पीठाचे धर्माचार्य आहेत. वीरशैव समाजाचे मुळ संस्थापक हे पंचाचार्य असून परशिवाच्या आदेशानुसार भूलोकावर अवतार घेवून वीरशैव मठ स्थापन केले आहेत. रंभापुरी, उज्जैनी, हिमवतकेदार, श्रीशैल, काशी या पाच ठिकाणी शिवक्षेत्र विराजमान आहेत. पाचही शिवलिंगापासून अनुक्रमे रेवणाराध्य, मरुळाराध्य, एकोरामाराध्य, पंडिताराध्य, विश्वाराध्य या नावाने पाच आचार्य प्रत्येक युगात वेगवेगळ्या नावानी अवतरीत होऊन वीरशैव समाजाची



स्थिती सुधारुन अध्यात्मिक विचार बिंबवत असतात. श्री जगद्गुरु शिवाच्या आदेशानुसार समाजाचा प्रचार करत असतात. या पंचपीठाच्या मार्फत अनेक मठाची स्थापना करण्यात आलेली आहे. "पंचपीठे समाजाला संस्कारमय बनविण्यासाठी त्याच्या शाखामठामार्फत हे कार्य करावयास सांगतात." नांदेड जिल्ह्यातील मठ हे ह्याच पंचपीठाचे शाखा मठ आहेत. जो पर्यंत जगदगुरुच्या साक्षीने पट्टाभिषेक होणार नाही तो पर्यंत त्या मठाला शिवाचार्य पद प्राप्त होत नाही. "जगद्गुरु श्री १००८ यांच्या कृपा आशीर्वादाने मठाचे शिवाचार्य श्री १०८ पदी विराजमान होतात." त्यामुळे ही मठे कोणत्या ना कोणत्या पंचपीठाशी संलग्न असतात. त्यामुळे मठाचा इतिहास, कार्य, उद्देश पाहण्याच्या अगोदर पंचाचार्यची माहिती जाणून घेणे अतिशय महत्त्वाचे आहे.

### ५.२ पंचपीठे

१) श्री श्री श्री १००८ रंभापूरी सिंहासन मठ - वीरगोत्र
२) श्री श्री श्री १००८ उज्जैनी सिंहासन मठ - नंदीगोत्र
३) श्री श्री श्री १००८ श्रीशैल सिंहासन मठ - वृषभगोत्र
४) श्री श्री श्री १००८ काशी सिंहासन मठ - स्कंदगोत्र
५) श्री श्री श्री १००८ हिमवतकेदार सिंहासन मठ - भृगीगोत्र

ही पंचपीठे वीरशैव समाजाची आचरण पीठे आहेत. त्यानुसारच धार्मिक, संस्कार वीरशैव समाजामध्ये जगद्गुरुच्या आदेशाने केले जातात. सहजासहजी कोणताही वीरशैव भक्त जगदगुरुच्या आदेशाचे पालन नाकारत नाही.

वीरशैव समाजामध्ये श्रीमद् जगद्गुरु पंचाचार्य लिंगोद्भव झाल्याचे उपनिषदांत घंटानादाने सांगितले आहे. १) शंकर - महेश प्रेषित पंचाचार्य देशाच्या निरनिराळ्या भागात प्रकट होऊन सोयीनुसार पीठे स्थापन करत असतात. कोलनुपाक क्षेत्रामध्ये म्हणजे (आंध्र प्रदेश) याठिकाणी जगद्गुरु स्वाक्षर शिवाचर्य प्रकट होऊन कर्नाटकाच्या भद्रा नदीच्या तीरावर 'वीरपीठ' स्थापन करुन त्यांच्या वस्त्राचा रंग हिरवा असून आंध्र, कर्नाटक तसेच महाराष्ट्र या ठिकाणी त्यांचे शेकडो शाखा मठ अस्तित्वात आहेत. २) मध्यप्रदेशच्या उज्जैनला प्रकट झालेले द्रवमठ शिवाचार्य यांनी तेथेच

'श्रद्धापीठाची' स्थापना करुन विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रामधून कर्नाटकमध्ये प्रवेश केला. जगद्‌गुरु रंभापुरी पीठाधीश्वरांचा तसेच अनेक राज्यांच्या संमतीने त्यांनी 'सद्धर्मपीठ' स्थापन केले. त्या पीठास उज्जैनी हे नाव दिले. महाराष्ट्रामध्ये या पीठाचे मोठ्या संख्येने मठ आहेत. ३) त्र्यक्षर शिवाचार्यानी उत्तर प्रदेशच्या गढवाल जिल्ह्यातील 'हिमत्व केदार' क्षेत्रात आपले वैलयपीठ स्थापन केले. यदुनाथ सरकारच्या 'गढवाल का इतिहास' या पुस्तकात या विषयी सविस्तर विवेचन केलेले आहे. या पीठाला 'उषामठ' म्हणतात. अनिरुद्ध आणि उषा यांचा विवाह या पीठातच झाल्यामुळे 'उषादेवीला ते गुरुमठ बांधून दिले. म्हणूनच या ठिकाणी तिची आठवण राहावी म्हणून 'उषामठ' हे नाव याठिकाणाला देण्यात आले. ४) श्रीमद् जगद्‌गुरु, चतुरक्षर शिवाचार्यांनी श्री शैव पर्वतावरील मल्लिकार्जून ज्योतिर्लिंगाच्या शेजारी स्वतंत्र 'सूर्यपीठ' स्थापन केले आहे. ५) वाराणसीच्या हरिकेशनंद वनात पंचाक्षर शिवाचार्यानी आपल्या 'ज्ञानपीठाची' स्थापना केली आहे. तेथील जंगमवाडी मठ नावाने ओळखला जातो.

काशी ज्ञानसिंहासनाचे द्वारपरयुगातील आचार्य असलेले श्री जगद्‌गुरु विश्वकर्ण शिवाचार्यांनी भगवत्पादानी सुप्रसिद्ध दूर्वास महर्षीना 'वीरशैव तत्वोपदेश' केला होता. श्री जगद्‌गुरू विश्वकर्णानी उपदेश केलेले स्थान आज 'ज्ञानपीठ' अर्थात जंगमवाडी म्हणून ओळखले जाते. सुप्रसिद्ध 'काशी खंडात' हे स्थान 'हरिकेश नंदनवन' म्हणून उल्लेखिलेले आहे. अनेक महर्षीनी या स्थानावर तपश्चर्या करुन शेवटी अंतकाळी आपल्या नावाची शिवलिंगे या ठिकाणी स्थापन केली. जंगमवाडी मठाची स्थापना इ.स. च्या सहाव्या शतकापेक्षा पूर्वी झालेली आहे. अत्यंत प्राचीन कालापासून श्री विश्वनाथ देवस्थानानंतर श्री जंगमवाडी मठच प्रेक्षणीय स्थळ आहे. यावरुन वीरशैव लिंगायत समाजाच्या पंचाचार्याची परंपरा ही फार प्राचीन काळापासून आलेली आहे. हे आपल्याला समजते. "आज जरी वीरशैव लिंगायत वाद होत असला तरी वीरशैव लिंगायत एकच असून वीरशैव तत्त्ववाचक शब्द असून लिंगायत हा रुढीवाचक शब्द आहे. म्हणून वीरशैव लिंगायत हे वेगळे नसून एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. असे पंचाचार्य, शिवाचार्य सांगत आलेले आहेत."



जगाच्या आरंभापासून श्रीमंत जगद्‌गुरु पंचाचार्याचा इतिहास नजरेसमोर आणल्यास पंचाचार्य हे चतुदर्श भवनाचे नव्हे तर सर्व देवाचे गुरु (देवगुरु) जगद्‌गुरु असल्याचे शंकराने पार्वतीला सांगितले हे सुप्रबोध गमावरुन स्पष्ट होते. याचाच अर्थ भगद्‌वाद पंचाचार्य जगद्‌गुरु होते; आणि त्यांच्या पीठावरील परंपरेतील पंचाचार्यपण जगद्‌गुरु आहेत. कैलासात शंकराने पार्वतीस जी तत्त्वे सांगितली त्याला 'शिवागम' म्हणतात. अशी एकूण २८ शिवागमे आहेत. वीरशैव समाजाच्या धार्मिक तत्त्वज्ञानाला फार प्राचीन वारसा लाभलेला आहे. पंचाचार्य व त्यांच्या पंच पीठाचे प्राचीनत्व ताम्रपट, शिलालेख, सनदा यांच माहितीवरुन प्राचीनतेचा उल्लेख आपल्याला करता येतो. भगवानपाठ पंचाचार्यानी सर्व ऋषी मुनीना शिवलिंग धारण करण्यासाठी वीरशैव दीक्षा दिली. अगरुप, दूर्वास, दधिची आणि व्यास हे त्यातील प्रमुख महर्षि होत. महर्षि व्यास आर्ध शिवद्वेषी होतो परंतु केदार पीठाधीश्वर घटकानी शिवाचाऱ्याकडून त्यांनी वीरशैव दीक्षा घेतली. वृषभ पंडितानी तैतिरीय उपनिषदावर केलेल्या भाष्यात वेदण्यास सुत्रकार दुर्वास वृत्ती कारकम / भाष्यकृत्पडिताराध्य प्रणचे पाशुमुक्ताचे हा श्लोक आहे. यावरुन असे स्पष्ट होते की, ब्रह्मसुत्र रचणारे व्यास हे महाज्ञानी होते तर ब्रम्हसुत्रावर भाष्य करणारे पंडिताराध्य हेही गाढे विद्वान होते. वृत्ती लिहिणारे दुर्वासही पंडीत होते. आचार्य रेणुकांनी रेणुकभाष्य, आचार्य बसवांनी दारुक भाष्य लिहिल्याचा उल्लेख काही ग्रंथातून आपल्याला दिसून येतो. हिमवत केदार पीठाधीश्वर श्रीमद्‌जगद्‌गुरु घंटाकर्ण शिवाचार्य महान विद्वान होते. म्हणूनच महर्षि व्यासांनी त्यांचे शिष्यत्व पत्कारले होते. वीरशैव लिंगायत समाजामध्ये पंचाचार्याच्या पीठानुसार पंचपीठाची गोत्र परंपरा आहे. वीरशैव लिंगायतामध्ये वीर, नंदी, भृंगी, वृषभ, स्कंद अशी पाच गोत्रे आहेत.

### ५.२.१ श्री श्री श्री १००८ जगद्‌गुरु रेवणाराध्य :

श्री जगद्‌गुरु रेवणाराध्य शिवाच्या आदेशानुसार वीरशैव समाजाच्या स्थापनेसाठी प्रत्येक युगात आंध्रप्रदेशातील कौल्ली-पाक क्षेत्रातील सोमेश्वर लिंगापासून अवतार घेत आलेले आहेत. त्यांनी धर्म प्रचारासाठी कर्नाटकातील बळ्ळेहोन्नुर येथे पीठाची स्थापना केली आहे. ते 'रंभापुरी पीठ' म्हणून प्रसिद्ध आहे. ह्या पीठाची 'रेणुक

शाखा' आहे.

"श्रीमद्रेव गसिद्धस्य कुल्लपाक पुरोत्तमे
सोमेशलिंग जनमावास : कदलीपुरे"

कलियुगाच्या आरंभी रेणुकाचार्य अवतीर्ण झाले. त्यांनी रेवणसिद्ध नाव धारण करुन चौदाशे वर्षे भूतलावर वास केला. या काळात त्यांनी असंख्य टीका केल्या. विक्रम राजाला विजय खंडण प्राप्त करुन देणे, कांचीच्या विजयेंद्र चौल राजाला अनुग्रह करणे. कोल्हापूरच्या गोरक्षणाचे गर्व हरण करुन जगद्‌गुरु आदि शंकराचार्यांना 'चंद्रमोलिश्वर लिंग' देणे तसेच रत्नगर्भ गणपती प्रदान करणे इत्यादी लिला त्यांच्या प्रसिद्ध आहेत. निटुर मग्जनाचार्यानी स्त्रोत रुपाने लिहिलेल्या 'वेदांतसार शैव चिंतामणी' या लेखात दिलेल्या माहितीनुसार रेणुकाचार्याचा दुसरा अवतार रेवणसिद्ध यांच्याकडून आद्य शंकराचार्यांना चंद्रमोलिश्वर लिंगाची प्राप्ती झाली होती ते 'शृंगेरी पीठ' आणि रेवणसिद्धाचे 'रंभापुरी पीठ' ही दोन्ही पीठे परस्पराजवळ आहेत. श्री श्री श्री १००८ जगद्‌गुरु रेवणाराध्य या पीठाचे सिंहासन वीर सिंहासन आहे. हे वीरगोत्राचे आद्यगुरु होत. ह्या पीठाच्या झेंड्याचा रंग हिरवा आहे, दंड अश्वात्य (पिवळा) दंड असून कमडलू वेद ऋग्वेद आहे. ह्या आचार्याचे सुत्र पडावदे सुत्र आहे. ह्या शाखेचे तत्त्व पृथ्वी असून आज या पीठावर प.पु. श्री श्री श्री १००८ जगद्‌गुरु वीर सोमेश्वर शिवाचार्य महास्वामीजी अधिकारावर आहेत.

| | | |
|---|---|---|
| कृतयुगात | - | एकाक्षर शिवाचार्य |
| द्वापारयुगात | - | एकवत्र शिवाचार्य |
| त्रेतायुगात | - | रेणुका शिवाचार्य |
| कलियुगात | - | रेवणाराध्य शिवाचार्य |

### ५.२.२ श्री श्री श्री १००८ जगद्‌गुरु मरुळाराध्य : (कर्नाटक)

श्रीमद्‌ जगद्‌गुरु मरुळाराध्य वीरशैव समाजाच्या स्थापनेसाठी शिप्रा नदीच्या काठी विराजमान असलेल्या वरक्षेत्रातील सिद्धेश्वर लिंगापासून प्रत्येक युगात अवतार घेत आहेत. कृतयुगात द्वयक्षर शिवाचार्य, त्रेतायुगात द्विकल्प शिवाचार्य, द्वापारयुगात दारुक शिवाचार्य, कलियुगात मरुळाराध्य शिवाचर्य अशा प्रकारे प्रत्येक युगात



शिवाचार्य जन्म घेऊन वेगवेगळ्या नावानी समाजाचा प्रसार केला आहे. स्वायुभव आगमनाच्या वाचनाप्रमाणे त्यांनी धार्मिक प्रचारासाठी मध्यप्रदेशातील 'उज्जैनी' येथे पीठाची स्थापना केली आहे. अलीकडे हे पीठ कर्नाटकातील बल्लारी जिल्ह्याच्या उज्जयिनीनगरात स्थलांतरीत झालेले आहे. आचार्य दारुकाचार्य या पीठाचे प्रमुख होते. कलियुगातील मरुळराध्य हे 'नंदी' या गोत्राचे आद्यगुरु आहेत. त्यांची शाखा दारुकाशाखा आहे. सद्धर्मसिंहासन या नावाने त्यांचे प्रसिद्ध सिंहासन आहे. श्रीमत्‌ जगद्‌गुरु मरुळाराध्य आपल्या कालखंडात सर्वत्र संचार करुन वीरशैव समाजाच्या स्थापनेबरोबर आपली शिष्य संपत्ती ही वाढवली आहे. ह्या पीठाचे वष्टीसुत्र आहे. वेद यजुर्वेद आहे. तत्व आप आहे. आज या पीठावर प.पु. श्री श्री श्री १००८ जगद्‌गुरु सिद्धलिंग राजेंद्र केंद्रे शिवाचार्य महास्वामीजी विराजमान आहेत. त्यांनी काशी विद्यापीठात 'वीरशैव धर्मदर्शन' या विषयावर संशोधन केले आहे. गेल्या अनेक वर्षापासून उज्जैनी पीठाच्या उन्नतीसाठी झटत आहेत. मौखिक ग्रंथाचे प्रकाशन, पीठाचा जार्णोद्धार आदी कामे त्यांनी हाती घेतले आहेत.

| | | |
|---|---|---|
| कृतयुगात | - | द्वक्षर शिवाचार्य |
| द्वापारयुगात | - | द्विकल्प शिवाचार्य |
| त्रेतायुगात | - | दारुक शिवाचार्य |
| कलियुगात | - | मरुकाराध्य शिवाचार्य |

### ५.२.३ श्री श्री श्री १००८ जगदगुरु एकोरामाध्य : (उत्तरांचल)

श्रीमत्‌ जगद्‌गुरु एकोरामाध्य यांनी वीरशैव मताच्या स्थापनेसाठी द्राक्षाराम क्षेत्रातील श्रीरामनाथ लिंगातून अवतार घेतला. कृतायुगात त्र्यक्षर शिवाचार्य, त्रेतायुगात त्रिवक्य शिवाचार्य, द्वापारयुगात घण्टाकर्ण शिवाचार्य आणि कलियुगात एकोरामाराध्य ही त्यांनी अवतार घेतलेली नावे आहेत.

"द्राक्षारामे रामनाथ लिंग घुंग चतुष्ये
एकोरामाध्य जनन मावास हिमालय"

स्वायंभुव अनुभव आगामाच्या वचनानुसार वीरशैवमताच्या प्रचारासाठी हिमालयात स्थापन केलेले पीठ 'केदारपीठ' नावाने प्रसिद्ध आहे. त्या पिठाला 'वैराग्य सिंहासन'

असेही म्हणतात. या पीठाचे पुरातन फार वर्षाचे आहे. केदारपीठाची गुरुपरंपरा अनादी काळापासून चालत आली आहे. श्री श्री श्री १००८ जगदगुरु नीळकंठ शिवाचार्यांनी ओखीमठ आणि गुप्तकाशीच्या मध्यभागी उत्तराखंड विद्यापीठ नावाच्या शिक्षण संस्थेची स्थापना केली. संस्कृत, हिंदी, आयुर्वेद इत्यादी शिक्षण देण्यात येते. त्यांच्या स्मरणार्थ विद्यापीठात रावरा श्रीमद् १००८ जगद्गुरु निळकंठ शिवाचार्याच्या अमृतशिलेची प्रतिष्ठापना झाली आहे. देहरी नरेश या पीठाचे शिष्य होते. नरेशच्या तिलोकोत्सवाच्या समारंभात 'रावल' ही उपाधी बहाल करत होते. म्हणून या पीठाच्या जगद्गुरुना 'रावल' या उपाधीनेही संबोधतात ह्या पीठाचा झेंड्याचा रंग निळा असून वेद सामवेद आहे. हे भृगी गोत्राचे आद्यगुरु होत. ह्यांचा दंड वेणुचा आहे. आज या पीठावर प.पू. श्री श्री श्री १००८ रावल भीमाशंकरलिंग शिवाचार्य महास्वामीजी अधिकारावर असून ते शिराढोण मठाचे शिवाचार्य आहेत.

| | | |
|---|---|---|
| कृतयुगात | - | त्र्यक्षर शिवाचार्य |
| द्वापारयुगात | - | घंण्टाकर्ण शिवाचार्य |
| त्रेतायुगात | - | त्रिवक्य शिवाचार्य |
| कलियुगात | - | एकोरामाराध्य शिवाचार्य |

### ५.२.४ श्री श्री श्री १००८ जगदगुरु पंडिताराध्य : (आंध्रप्रदेश)

शिवाच्या आज्ञेनुसार प.पू. जगदगुरु पंडिताराध्य यांनी वीरशैव मताच्या प्रचारासाठी श्री शैल क्षेत्रात मलीकार्जुन ज्योतिर्लिंगातून आंधप्रदेशातील श्रीशैल पीठाची स्थापना केली. कृतायुगात चतुरक्षर शिवाचार्य, त्रेतायुगात चतुक्कम शिवाचार्य, द्वापार युगात धेनुकर्ण शिवाचार्य आणि कलियुगात पंडिताराध्य शिवाचार्य या नावाने ते ओळखले जातात. ह्या पीठाची 'धेनुकर्ण शाखा' आहे. ह्या पीठाच्या झेंड्याचा रंग 'पांढरा' आहे. ह्या पीठाचा वेद 'अथर्ववेद' आहे. ह्या पीठाचे सिंहासन 'सूर्य' आहे. महर्षी सानंद यांनी या पीठाचे द्वापार युगातील आचार्य धेनुकर्ण शिवाचार्य यांच्याकडून शिवत्वाचा बोध घेऊन आपले जीवन कृतार्थ केले. आज या पीठावर प.पू. श्री श्री श्री १००८ जगदगुरु डॉ. चन्नसिद्धराम पंडीताराध्य महास्वामीजी अधिकारावर आहेत. या पीठामध्ये अनेक शैक्षणिक कार्यक्रम घेतले जातात. विद्यार्थ्यासाठी अनेक वसतिगृहाची निर्मिती



केली आहे. जगद्गुरुच्या नावाने शिक्षण संस्थाची निर्मितीही केली आहे. अनेक महाविद्यालय, वैद्यकीय महाविद्यालय, संस्कृत पाठशाळा अनेक शैक्षणिक संस्थाची निर्मिती पीठात केली आहे. भक्तांनी दिलेल्या दानाचा उपयोग शिक्षणाच्या प्रसारार्थ करण्याचा प्रयत्न या पीठाने केला आहे. त्याला प.पू. श्री श्री श्री १००८ जगदगुरु डॉ. चन्नसिद्धराम पंडीताराध्य महास्वामीजीचे सहकार्य लाभले आहे.

| | | |
|---|---|---|
| कृतयुगात | - | चतुरक्षर शिवाचार्य |
| द्वापारयुगात | - | चतुक्कम शिवाचार्य |
| त्रेतायुगात | - | धेनुकर्ण शिवाचार्य |
| कलियुगात | - | पंडिताराध्य शिवाचार्य |

### ५.२.५ श्री श्री श्री १००८ जगदगुरु विश्वाराध्य : (उत्तर प्रदेश)

वीरशैव तत्त्वाच्या प्रचारासाठी शिवाच्या आदेशानुसार जगद्गुरु विश्वाराध्य काशी क्षेत्रातील विश्वनाथ ज्योतिर्लिंगातून अवतार घेतला आहे. हे काशीपीठ म्हणून नावारुपाला असून 'काशीपीठ' सध्या जंगमवाडी मठ म्हणून प्रसिद्ध आहे. काशीतील अत्यंत पवित्र 'आनंदकानन' नावाने प्रसिद्ध असलेल्या क्षेत्रात हा मठ आहे. प्राचीनकाळी अनेक महर्षीनी तपश्चर्या करुन आपापल्या नावानी शिवलिंगाची स्थापना केली आहे. दुर्वास ऋषिला या पीठाचे जगद्गुरु शिवाचार्यानी 'शिवद्वैत' सिद्धांताचा उपदेश केला होता. या पीठाचे जगद्गुरु सुदगोत्र आणि विश्वकर्ण शाखेचे आद्यगुरु मानले जातात.

काशीच्या जंगमवाडी मठाला हुमायु, अकबर, जहागिर, शहाजहान, औरंगजेब आणि मुहम्मद शाह यांनी वेळोवेळी दिलेली दानपत्र आजही जीर्ण स्थितीत जपून ठेवली आहेत. हुमायुने मठाच्या मदतीसाठी ३०० बिघा जमीन दान दिली होती. अकबराने ४८० बिघा जमीन दानाचे फर्मान काढले होते. नेपाळमध्ये (भक्तपूर) भातगावला शाखामठ आहे. या मठात देखील नेपाळचे नरेश विश्वमल यांनी जमीन दान दिली आहे. अशी प्राचीन परंपरा लाभलेली जंगमवाडी मठ आहे. जंगमवाडी मठात वीरशैव समाजाच्या तत्त्वाचे एक स्वतंत्र अभ्यास केंद्र चालविले जाते. पीठाचे विश्वकर्ण शाखा आहे. ह्या पीठाचा झेंड्याचा रंग 'पिवळा' आहे. स्कंद गोत्राचे

आद्यगुरु मानले जातात. ह्यांचा दंड बिल्व दंड आहे. हे ज्ञान 'सिंहासन पीठ' आहे. सध्या या पीठावर ज्ञानसिंहासन नावाप्रमाणे ज्ञानी असलेले प.पू. श्री श्री श्री १००८ जगदगुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी विराजमान आहेत.

| | | |
|---|---|---|
| कृतायुगात | - | पंचाक्षर शिवाचार्य |
| त्रेतायुगात | - | पंचवका शिवाचार्य |
| द्वापारयुगात | - | विश्वकर्ण शिवाचार्य |
| कलियुगात | - | विश्वाराध्य शिवाचर्य |

वीरशैव लिंगायताची ही पंचपीठे असून या पंचपीठाच्या मार्फत वीरशैव समाजाचे धार्मिक तत्त्वज्ञान चालत असते. या पीठाचे शाखा मठ नांदेड जिल्ह्यात कार्यरत आहेत. वीरशैव लिंगायत समाजामध्ये पंचाचार्याला अतिशय महत्तवाचे स्थान आहे. पंचाचार्याचे प्रतीक म्हणून विवाहप्रसंगी पंचकलशाचे पूजन केले जाते. पंचीपीठे ही वीरशैवाची एक धार्मिक, सामाजिक परंपरा आहे. मठामध्ये समाजाचे सांस्कृतिक मूल्य जोपासले जाते. वीरशैव समाजाचा धर्मप्रसार व समाजामध्ये समाजसंघटन व्हावे या उद्देशाने ही पंचपीठे मोलाचे कार्य करतात. वीरशैवाचे एकूण ५ धर्मपीठे असून त्यापैकी एक चित्र दुर्गचे शून्यपीठ (विश्वपीठ) असून असे एकूण ६ पीठे अस्तित्वात आहेत. पंचाचार्याची जगद्गुरु पीठ परंपरा असे पंचपीठ आणि महात्मा बसवेश्वरांचे शुन्यपीठ विरक्त मठ परंपरा असे वीरशैव लिंगायत असमाजचे ६ पीठे अस्तित्वात आहेत. ह्या ६ पीठातून वीरशैव लिंगायत समाजाच्या धार्मिक तत्त्वज्ञानाचा प्रसार केला जातो.

१) रंभापुरी जगद्गुरू रेणुकाचार्यांचा अवतारदिन - फाल्गुन शुद्ध १३ मघा नक्षत्र
२) उज्जैनी जगद्गुरू दारुकाचार्यांचा अवतारदिन - वैशाख शुद्ध पंचमी
३) केदार जगद्गुरू एकोरामाराध्यांचा अवतारदिन - वैशाख शुद्ध अक्षयतृतीया
४) श्री शैल जगद्गुरू पंडिताराध्यांचा अवतारदिन - माघ वद्य १४ महाशिवरात्री
५) काशी जगद्गुरू विश्वाराध्यांचा अवतारदिन - माघ वद्य १४ महाशिवरात्री

### ५.२.६ विरक्त मठ

वीरशैव लिंगायत समाजामध्ये मठपरंपरा असली तरी पंचाचार्याची 'जगद्गुरु



पीठपरंपरा' आणि महात्मा बसवेश्वराची 'शून्यपीठ परंपरा' दक्षिण भारतातील बसवकल्याण या वीरशैव लिंगायत समाजाच्या राजधानीच्या ठिकाणी ही शून्यपीठ परंपरेची स्थापना झाली. नांदेड जिल्ह्यामध्ये विरक्त मठ परंपरेचा एकही मठ नाही. विरक्त लोक मात्र बसवकल्याणच्या अनुभव मंटपात अलंकृत केलेल्या सभापती सिंहासनाची 'शून्यपीठ' समजून तेच मुलस्थान मानतात. शून्य पीठाच्या परंपरेत प्रभु संप्रदाय, सिद्धलिंगेश्वर संप्रदाय, नंदिकेश्वर संप्रदाय असे तीन गुरुवंश कल्याणच्या शिवशरणाच्या सिद्धांत तत्वज्ञानाचा कवटाळून राहिले आहेत. नांदेड जिल्ह्यामध्ये पंचाचार्य मठाची संख्या पूर्वीपासूनच अधिक आहे. त्यामुळे एकूण महाराष्ट्रात विरक्तांचे मठ मोजकेच आहेत. नांदेडमध्ये एकही शाखा नाही.

**श्री जगद्गुरू पंचाचार्य उत्पत्ती पट, श्री वीरशैव सूत्रगोत्रादी वंशावली-पट**

**(गोत्र, सुत्र, शाखा, प्रवरादि कलितः)**

| परमेश्वराची पाच मुखे | सद्योजात | वामदेव | अघोर | तत्पुरूष | ईशान |
|---|---|---|---|---|---|
| मुखांचे रंग | हिरवा | तांबडा | काळा | पांढरा | पिवळा |
| दिशा | पूर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर | उर्ध्व |
| पंच गणाधीश्वर | रेणुक | दारूक | घंटाकर्ण | धेनुकर्ण | विश्वकर्ण |
| पंचाचार्याची नावे | रेवणाचार्य | मरूळाचार्य | एकोरामाचार्य | पंडिताचार्य | विश्वाचार्य |
| उत्पत्तिस्थाने | कोल्लिपाकी सोमेश्वर लिंग | वटक्षेत्री सिद्धेश्वर लिंग | द्राक्षराम रामनाथ लिंग | सुधाकुंड मल्लिकार्जुन लिंग | काशीक्षेत्र विश्वनाथलिंग |
| सिंहासंनाची स्थाने | रंभापूरी बाळहळ्ळी | उज्जयनी | हिमवत्केदार | श्री शैलपर्वत | काशी |
| सिंहासनांची नावे | वीरसिंहासन | सत्धर्म सिंहासन | वैराग्य सिंहासन | सूर्य सिंहासन | ज्ञान सिंहासन |
| गोत्रे | वीर | नंदी | भ्रंगी | वृषभ | स्कंद |
| सुत्रे | पड्वडी | वृष्टी | लंबन | मुक्तगुच्छ | पंचवर्ण |
| शाखा | रेणुक शाखा | दारूक शाखा | घंटाकर्ण शाख | धेनुकर्ण | विश्वकर्ण |
| प्रवर | एकाक्षर शिवचार्य | द्वाक्षर शिवाचार्य | त्र्याक्षर शिवाचार्य | चतुराक्षर शिवाचार्य | पंचाक्षर शिवाचार्य |
| दंड | अश्वत्थदंड (पिंपळ) | पलाशदंड (पळस) | वेणुदंड (वेळू) | न्याग्रोद दंड (वड) | बिल्वदंड (बेल) |
| कमंडलू | श्वेतवर्ण | तांब | लोखंड | कांस्य | सोने |
| कंथा (वस्त्रे) | हिरवी | तांबडी | निळी | पांढरी | पिवळी |
| तत्त्वे | पृथ्वी | आप | तेज | वायु | आकाश |
| बीजमंत्र | नकार | मकार | शिकार | वकार | यकार |
| पंचाक्षर मंत्र | प्रसाद पंचाक्षरी | मायापंचाक्षरी | सूक्ष्म पंचाक्षरी | स्थूल पंचाक्षरी | मुलपंचाक्षरी |
| वेद | ऋग्वेद | यजुर्वेद | सामवेद | अथर्ववेद | अजपवेद |

| परमेश्वराची पाच मुखे | सद्योजात | वामदेव | अघोर | तत्पुरुष | ईशान |
|---|---|---|---|---|---|
| महासूत्रांची | १. पुराण | १. लोहकं | १. त्रिपुटी | १. गोणीक | १. पाशुपत |
| उपसूत्रे | २. पच्छकंथा | २. ज्वालत्कं | २. रज्जुकं | २. दंति | २. कंबाल |
| | ३. षंडगी | ३. शृंगी | ३. भस्मी | ३. जटिल | ३. दशमुख |
| | ४. मोरट | ४. मसणी | ४. शिखरी | ४. त्रिगुण | ४. गोचर |
| | ५. वेणी | ५. कुठार | ५. रौप्यकं | ५. केशकं | ५. वृषभ |
| | ६. भित्ति | ६. मैत्री | ६. चंद्रगुंड | ६. ललाट | ६. जरत्कंथ |
| | ७. दिगंबर | ७. उदार | ७. कृत्कंथा | ७. व्याघ्रग्रकं | ७. गुहाग्र |
| | ८. नाटी | ८. चामरी | ८. काष्टकं | ८. लोचनं | ८. गगन |
| | ९. शैरी | ९. कपाट | ९. मुंडी | ९. भगिनी | ९. पंचमुख |
| | १०. सुतूर | १०. कुक्षीकं | १०. खडगी | १०. जालकं | १०. मुसली |
| | ११. मुसडी | ११. स्वार्णकं | ११. रामगि | ११. नटन | ११. लुगडी |
| | १२. सुरंगी | १२. सिंहि | १२. पवन | १२. बदडी | १२. शिथिली |

### ५.२.७ हिमवतकेदार श्री श्री श्री १००८ जगद्‌गुरु भीमाशंकरलिंग पंचाचार्यांचा परिचय

केदारनाथ रावल पदवी विभूषित वैराग्य सिंहासनधीश्वर जगद्‌गुरु भिमाशंकरलिंग शिवाचार्य महास्वामीजी हे एक महान योगी, वैराग्याचा अखंड तेजोमय कल्लोळ, महाज्ञानी, सूर्य असून त्यांच्या सानिध्यात भक्ताचे जीवन तेजोमय बनत जाते. शांती, समृद्धी, सन्मार्गाचे संस्कारे करण्यासाठी हिमालयापासून कन्याकुमारी पर्यंत रंभापुरी, उज्जैनी, हिमवतकेदार, श्रीशैल, काशी असे सर्वाच्य पदस्थ पाच पीठे आहेत. ह्याच पाच पीठापैकी नांदेड जिल्ह्यातील शिराढोण येथील शिवाचार्य हे हिमवत केदार वैराग्यपीठ उत्तराखंड 'ओखीमठ' येथे विराजमान झाले आहेत. ते वर्तमान समयी परंपरेनुसार ३२४ वे श्री श्री श्री १००८ केदारनाथ रावल जगद्‌गुरु भीमाशंकरलिंग शिवाचार्य महास्वामीजी धर्मशासन चालवित आहेत. एखाद्या व्यक्तीचे जीवन फुलासारखे सुगंधीत असते. फुलाच्या भोवती सुंगध दरवळत राहावा तशी ती व्यक्ती



आपल्या उक्ती-कृतीतून अवतीभवती सदैव भक्तांना प्रसन्नता पेरीत असते. प.पु. केदार जगद्‌गुरु भीमाशंकरलिंग महास्वामीजी यांच्या सहवासात असाच प्रसन्नतेचा सुगंध दरवळताना अनुभवास येतो. केदारपीठाच्या टेहरी गढवाल राजाकडून 'रावळ' पदवी दिली गेली. ती पुढे 'रावल' पदवी श्रीना १९८३ मध्ये दिली गेली. तेव्हा पासून केदारनाथ रावल जगद्‌गुरु भिमाशंकरलिंग शिवाचार्य महास्वामीजी असे नावारुपाला आले. जगद्‌गुरु भिमाशंकरलिंग शिवाचार्य महास्वामीजीचे जीवनपट अशा १-२ पेजवर रेखाटण्यासारखा नाही. श्री श्री श्री १००८ जगद्‌गुरु भिमाशंकरलिंग शिवाचार्य महास्वामीजी यांचा जन्म कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील 'मिरगी' या गावी दि. १ जून १९५६ रोजी झाला. मिरगीचा गावामध्ये एक तेजस्वी सूर्यानेच जन्म घेतला होता. तो पुढे परमेश्वराचा अवतारच वाटू लागला. प्रांत काळाच्या सूर्याप्रमाणे बाळ वाढू लागले. स्वाग्रामी जगद्‌गुरु भिमाशंकर लिंग शिवाचार्य मुळाक्षरे गिरवू लागले. अशा महान ज्ञानी तेजस्वी गुरुमुर्तीचे प्राथमिक शिक्षण पूर्ण झाले. सन १९६५ ते १९७२ या काळात श्रीमद् वीरशैव गुरुकुलात त्याचे पाचवी ते अकरावी पर्यंतचे शिक्षण सोलापूर या ठिकाणी झाले. इ.स. १९७२ मधील डिसेंबर महिन्याचा पहिला दिवस उजाडला या वैराग्यमूर्तीचे ज्ञान सूर्याला षडक्षर शिवाचार्य हे नवे नामाभिधान मिळून शिराढोण येथील स्वतंत्र गादीवर पट्टाभिषेक झाला. जगद्‌गुरु भिमाशंकर लिंग शिवाचार्य महास्वामीजी जगाच्या कल्याणासाठी इ.स. १९७३ मध्ये पहिले श्रावणमास अनुष्ठाण भिमाशंकर मठ संस्थान येथून आरंभ केला. लहान बालकावर केलेले संस्कार कधीच मिटवले जात नाहीत. या दृष्टीकोनातून महास्वाीजीनी इ.स. १८८७ ते १९९० या काळात 'हम्पय्या स्वामी प्राथमिक शाळा', 'जगदगुरु पंचाचार्य हायस्कूल' स्थापन करुन विद्यार्थ्यावर धर्म, निती व सामाजिक संस्काराचे बीजे रोवली. यातुनच नव्या पिढीला घडविण्याचे कार्य जगद्‌गुरुनी शाळेमार्फत केले. भिमाशंकर मठाच्या जिर्णोद्धाराची पायाभरणी २६ डिसेंबर १९९० रोजी करण्यात आली इ.स. १९७२ ते १९९० या काळात महास्वामीजीनी शिवदीक्षेच्या माध्यमातून लाखो सदभक्तांना अध्यात्मिक तत्तवज्ञानाचा साक्षात्कार केलेला आहे. जगद्‌गुरुनी अनेक समाज उपयोगी कार्य करुन जनकल्याणासाठी अनेक उपक्रम हाती घेतले आहेत.

भीमाशंकर महाराजांच्या पावन स्पर्शाने पावन झालेल्या शिराढोण गावाची एक वेगळी ओळख संपूर्ण जगात जगदगुरुच्या कृपाशिर्वादाने झाली आहे.

जगद्‌गुरुनी अनेक अनुष्ठाची कार्य करुन जनकल्याणाचे कार्य हाती घेतले होते. इ.स. २००० साली पर्यंतची त्याची धार्मिक, शैक्षणिक सामाजिक कार्याची दखल घेवून श्री केदार जगद्‌गुरु सिद्धेश्वर लिंग शिवाचार्य महास्वामीजी केदारपीठ यांनी आपले केदारपीठाचे उत्तराधिकारी करण्याचे मनोगत पंचपीठाधीश्वर व होटगीकर महाराज महाजलगावकर महाराज तथा अनेक शिवाचार्याच्या सन्मुख मनोगत व्यक्त केले होते. त्यामुळे दि. १३ ऑक्टोबर २००० रोजी वैराग्य पीठावर ३२४ वे जगद्‌गुरु म्हणून विराजमान झाले. अशा रीतीने ते 'वैराग्य सिंहासनधीश्वर हिमत्वकेदार श्री श्री श्री १००८ भीमाशंकरलिंग शिवाचार्य महास्वामीजी' झाले. अशा महान तपस्वी जगद्‌गुरुचे समाजासाठी अनेक मोलाचे कार्य आहे. धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक, शैक्षणिक कार्य त्याचे जनकल्याणासाठी अविरत आहेत. वीरशैव लिंगायत समाजाच्या अनेक समस्या सोडवण्याचे काम त्यांनी आतापर्यंत केले आहे. संबंध भारत देशामध्ये संचार करुन त्यांनी अनुष्ठाने, पूजा-जप करुन भारतात शांतता प्रस्थापित करण्यासाठी अनेक ठिकाणी शांती व धर्म जागृती केली आहे. अनेक वेळी कठोर धार्मिक शासन करुन निर्णय घेतले आहेत. अशा महान विभूतीना १ जून २०१६ रोजी साठ वर्ष पूर्ण झाले तेव्हा वीरशैव लिंगायत समाजाच्या मार्फत गोपाळचावडी येथे षष्ठाब्धि कार्यक्रम संपन्न झाला. तो कार्यक्रम डोळ्याचे पारणे फेडणारा होता. अशा महातपस्वी जगद्‌गुरुच्या दर्शनाला लाखोच्या संख्येने जनसमुदाय हजर राहीला होता. जगद्‌गुरु भीमाशंकर लिंग शिवाचार्य एक महाज्ञान सूर्य एक तेजस्वी आत्मा चा तेजोमय प्रकाश भास्कर, गुरुवर्य जगतोद्धारक जगद्‌गुरु भीमाशंकर लिंग शिवाचार्य महास्वामीजीच्या कार्याचा थोडक्यात परिचय करुन देण्याचा प्रयत्न केला आहे. अशा महान, ज्ञानी, धर्मद्धार, जगवंदनीय जगद्‌गुरुच्या पावन चरणाने नांदेड नगरी पावन झालेली आहे. श्री गुरु दशमुखाश्रम भिमाशंकर नगर गोपाळचावडी नवीन नांदेड या ठिकाणी त्यांचा कार्याचा मागोवा घेण्याचा प्रयत्न घेतला आहे. भारतीय संस्कृतीत वैविध्य असले तरी तिच्यात एकत्व आहे. एका परमत्वालाच लोक विविध



नामरुपांनी थोडक्यात, याची त्यांना जाणीव आहे. म्हणूनच त्यांच्या समोर नम्र होण्यात धन्यता वाटते. उच्चविद्याविभुषित, तत्वचिंतक, धर्मोपदेशी, तत्तवज्ञानी अशा अनेक नावाने सर्वांगिण अवतार असलेले या समन्वयशील सुगंधी व्यक्तिमत्त्वाने यापुढेही सुगंधाने आसमंत दरवळून जावा ही जगनियत्याजवळ प्रार्थना आणि जगद्‌गुरु भीमाशंकरलिंग शिवाचार्य या महाज्ञानी सूर्याला अनंत प्रणाम !

## ५.३ नांदेड जिल्ह्यातील वीरशैव मठपरंपरा :

वीरशैव समाजामध्ये मठाला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. मठ हे वीरशैवाचे एक सांस्कृतिक मूल्य जोपासणारे केंद्र आहे. वीरशैव समाजाचा सर्वांगिण विकास व समाजसंघटन व्हावे या उद्देशातून मठाची निर्मिती झाली आहे. मठाची मुळ संकल्पना ही प्रामुख्याने 'वास्तव करणे' असा असला तरी त्यामागचा विचार हा धार्मिक विचाराची देवाणघेवाण असाच आहे. मठाची मुळ संकल्पना, उदय, विकास, कोणी, कधी, केव्हा केला हे जरी निश्चित सांगता येत नसले तरी त्याची निर्मिती धार्मिक जोपासनेतून झालेली आहे हे निश्चितपणे सांगता येईल. गुरुच्या मठाकडे वीरशैव समाजाचा पाहण्याचा दृष्टीकोन एक प्रमुख श्रद्धास्थान व आशास्थान म्हणून पाहिल्या जाते. जसे कुटुंबामध्ये मुख्य व्यक्तीला महत्त्व असते. त्याचप्रमाणे वीरशैव समाजामध्ये गुरुच्या मठाला महत्त्व आहे. नांदेड जिल्ह्यामध्ये वीरशैव समाजाचे अनेक मठाना प्राचीन वारसा आहे. ज्या ठिकाणी वीरशैवाची अधिक वस्ती त्या ठिकाणी मठाची स्थापना त्याचबरोबर कमी लोकसंख्येत सुद्धा मठाची स्थापना करण्यात आलेली आहे. वीरशैव समाज ग्रामीण भागात राहत असल्यामुळे त्यांचे मठ सुद्धा मोठ्या प्रमाणे ग्रामीण भागात आहेत. मठातील गुरुचे व्यक्तिमत्त्व, नितिमत्ता, भाषेवर प्रभुत्व, धर्माचे ज्ञान, धार्मिक तत्वज्ञान, धार्मिक प्रसाराची तळमळ, जिद्द, समाजसेवाभावी वृत्ती, सहकार्याची भावना इ. कार्यामुळे दूर्गम भागातही अनेक ठिकाणी मठाची स्थापना झाली. मठातील गुरुचे अध्यात्मिक प्रभुत्व, निष्कलंक चारित्र्य, निस्वार्थ जीवन, मनमिळाऊ स्वभाव या आकर्षक सर्वगुणसंपन्न व्यक्तिमत्त्वामुळे आजच्या २१ व्या शतकात मठातील गुरुची लोकप्रियता वाढलेली आहे. पंचाचार्यानी वीरशैव समाजाचा प्रसार करण्यासाठी पंचपीठाची निर्मिती करुन अनेक शाखा मठाची निर्मिती

केली आहे. पंचपीठाच्या अनेक शाखा व उपशाखा संपूर्ण भारतात आहेत. वीरशैव समाज आणि त्यांचे मठ यांचे परस्पर निकटचे संबंध प्राचीन काळापासून चालत आलेले आहेत. वीरशैव समाजव्यवस्थेत गुरुच्या मठाना अतिउच्च स्थान आहे. वीरशैव समाज हा मठप्रधान संस्कृती जोपासणारा आहे. ग्रामीण भागातील भक्तांना धार्मिक विचारांची शिकवण ही मठामधून मिळत असते. सकनवाडे म्हणतात की, 'वीरशैवाची मठ संख्या फार मोठी आहे. इतर कोणत्याही समाजात ऐवढे वीरशैव समाजा एवढे मठ सापडत नाहीत.'

### ५.३.१ धार्मिक संस्कार केंद्र

वीरशैव समाजाचे मठ हे धार्मिक संस्कार केंद्र व श्रद्धास्थान आहेत. माणसाच्या जडण-घडणीमध्ये घर आणि गुरुचे मठ भक्ताच्या भविष्य व चरित्र्याचे संवर्धन करण्याचे काम करत असतात. पंचाचार्यानी धर्मप्रसारासाठी तसेच समाजोपयोगी विविध कार्याच्या पूर्ततेसाठी मठ स्थापनेला प्राधान्य दिले. भक्ताच्या विचाराला योग्य वळण देण्याचे काम हे मठामधून केल्या जाते. अर्थात मठाधीशांचे व्यक्तिमत्त्व, नितिमत्ता, जिद्द, तळमळ ही ग्रामीण भागात लगेच भक्त आर्कर्षित करत असतात. गुरुचे मठातील राहणीमान, निष्कलंक चारित्र्य, अध्यात्मिक प्रभुत्व, साधी राहणी व उच्च विचारसरणी व आकर्षक व्यक्तिमत्त्व, कल्याणकारी समाजउपयोगी कार्य, मठामधील दासोहकेंद्र, आरोग्य विषयक शिबीरे, अनेक उपक्रमात कार्यक्रम यामुळे दिवसेंदिवस मठाचे महत्त्व वाढत आहे. कंधार तालुक्यात उरलिंगपेद्दीचे फार प्राचीन मठ आहेत. अपरंपार मठ, शिवलिंग बादशाह मठ, गणाचारी मठ, खाकेश्वर मठ, लासिना मठ, गुरु बुद्धिस्वामी मठ, थोरला मठ, निर्वाणी मठ असे अनेक मठ जिल्ह्याच्या वैभवात भर घालणारी संस्कार केंद्रे आहेत. मठ ही वीरशैव समाजाची प्राचीन धार्मिक पंरपरा आहे. या मठामुळेच वीरशैव समाजाचे सांस्कृतिक मूल्य जोपासली जात आहेत. वीरशैव समाजाचे धार्मिक संघटन, विचारांची देवाण-घेवाण, संस्कार केंद्र हा मुळ उद्देशातून मठाची निर्मिती झाली. 'गुरुच्या वाणीने जिथे संस्कार केले जातात ती पावनभूमी म्हणजे मठ होय.' ज्या ठिकाणी वीरशैव लिंगायत समाजाची लोकवस्ती जास्त असते, त्याठिकाणी गुरुचा उद्देश हा महत्त्वाचा मानला जातो. त्या ठिकाणचे



मठ दगडी भाजीव विटांनी बांधलेले असतात. या पुण्यभूमीला मठ म्हणतात. प्रत्येक वीरशैव व्यक्ती आणि कुटुंब यांचे त्यांच्या गुरुच्या मठव्यवस्थेशी अत्यंत घनिष्ठ संबंध जवळीकतेचे असतात. दीक्षा संस्कारापासून घरातील अनेक धार्मिक कार्य गुरुच्या साक्षीने केले जातात. त्यामुळे व्यक्ती कोणत्यातरी गुरुच्या मठाशी बांधला गेला असतो. वीरशैव समाज हा गुरुपरंपरा मानणारा आहे. तो समाज गुरु प्रधान, गुरुला उच्चत्तम महत्त्व देणारा आहे. गुरुशिष्याच्या विचार आचाराची देवाण-घेवाण ही मठा मधून होत असते. त्यामुळे वीरशैव समाजामध्ये मठाला अतिशय महत्त्व आहे. वीरशैव समाजाच्या मठाची व्याख्या करताना अमरकोशात असे म्हटले आहे की,

'मठ छात्रादि लिनयो: ।'

म्हणजेच 'छात्राचे वस्तिस्थान म्हणजे मठ होय.' गुरुनी शिष्यांना ज्या ठिकाणी ज्ञानबोध करण्यासाठी जे स्थान बांधले त्या ठिकाणाला 'मठ' म्हणतात. परंतु वीरशैव समाजामध्ये मठाची स्थापना भक्ताच्या 'धार्मिक संस्काराचे पीठ' म्हणून मठाची स्थापना करण्यात आलेली आहे. वीरशैव समाजाच्या मठाची निर्मिती संशोधकाच्या मते, मठ हे आध्यात्मिक ज्ञानाबरोबरच समाजात भक्तानी कसे वागावे याची शिकवण मठात दिली जाते. म्हणजे मठ हे आद्य गुरुकुल आहे. गुरुच्या सानिध्यात अनेक सकारात्मक विचाराची पेरणी ही मठामध्ये केली जाते. त्यामुळे वीरशैव समाजामध्ये मठाला अती उच्च स्थान आहे. पण शून्यपीठाची शाखा नांदेड जिल्ह्यामध्ये नाही. म्हणून गुरुच्या विचारांना नांदेड जिल्ह्यामध्ये आदराचे स्थान आहे. मठसंस्थाही वीरशैव समाजाला धार्मिकदृष्ट्या अनेक दृष्टीने पोषक ठरलेली आहे. नांदेड जिल्ह्यातील अनेक मठात दासोह केंद्र अर्थात अन्नछत्र धर्माविषयीचे मार्गदर्शन, संस्काराची पूर्तता, महापुरुषांच्या जयंत्या, व्याख्याने आयोजन केले जातात. त्यामधून भक्ताच्या बौद्धिक विचारसरणीवर भर पडतो. "मठामध्ये धार्मिक ग्रंथाचे प्रकाशन व संपादन सामाजिक प्रबोधन, शैक्षणिक संस्थाची निर्मिती वसतिगृहाची स्थापना, शैक्षणिक मदत योजना, राहण्याची सुरक्षितता, न्याय निवाडा सामाजिक व धार्मिक उपयोगी उपक्रमाची पूर्तता मठाकडून केली जाते. त्यामुळेच मठेही ग्रामीण भागातील

वीरशैव समाजाचे श्रद्धास्थान व आशास्थान बनले आहे." मठ व्यवस्था हे संस्काराने तयार झालेले केंद्र असते. कारण प्रत्येक वीरशैव समाजाच्या व्यक्तीला जन्मल्यापासून मरेपर्यंत वेगवेळे संस्कार केले जातात. हे संस्कार मठाच्या गुरुकडून करुन घेतले जातात. मठातील गुरुच्या साक्षीने केल्यामुळे व्यक्ती बंधनात राहतो. गुरुने केलेले संस्कार त्या व्यक्तीला त्याचे जीवन सफल व संस्कारमय बनवण्यासाठी मदत करते. संस्कारामुळे व्यक्तीच्या जीवनात अनेक बदल होत असतात. संस्कारामुळे त्यांच्या जीवनात सकारात्मक विचारांची पेरणी झालेली असते. त्यामुळे मठाच्या सानिध्यात आल्यामुळे तो संस्कारमय जीवन जगू शकतो. संस्कारामुळे मठ व्यवस्था ही अतिशय महत्त्वाची ठरलेली आहे. गुरुच्या कृपेने मठाच्या सानिध्यात राहून भक्ताच्या विचारात व कृतीत बदल दिसून येतात. हे फक्त मठाच्या धार्मिक, अध्यात्मिक, बौद्धिक विचारातून प्राप्त होऊ शकते. त्यासाठी मठाच्या संस्कार केंद्राची खूप गरज आहे.

### ५.३.२ दासोह केंद्र :

वीरशैव लिंगायत समाजाच्या मठामध्ये अनेक ठिकाणी दासोह केंद्र चालत असतात. त्यामध्ये अनेक भक्त प्रसाद म्हणून अन्न ग्रहण करत असतात. नांदेड जिल्ह्यातील बेटमोगरा, नागठाणा, मुखेड या ठिकाणी मठामध्ये दासोह केंद्र आहेत. संशोधकांनी स्वत: बेटमोगरा या ठिकाणी भक्तांनी अर्पण केलेले दासोहचा प्रसाद घेतला आहे. वेगवेगळ्या कार्यक्रमामध्ये सुद्धा दासोह केंद्र चालवले जातात. मठामध्ये आल्यानंतर अनेक भक्तांना राहण्याची सोय सुद्धा करण्यात आलेली आहे. दासोहमध्ये गुरुबदल आदर प्रेम, धार्मिक प्रवृत्तीची सोय या ठिकाणी होत असते. 'कायक' आणि 'दासोह' तत्त्व यांचा 'अविनाभाव' संबंध आहे. दासोह म्हणजे आपल्या संपादनातील प्राप्तीचा समाजकार्यासाठी व लोकासाठी विनियोग करणे होय, गरजेपेक्षा अधिक संग्रही बाळगणे हे कायक सिद्धांताशी विसंगत आहे. त्यामुळे दासोह केंद्र उभारुन मठाला सहकार्य करुन मदत करावी. समस्त मानवजातीच्या हितासाठी व मानवी मूल्याच्या जोपासनेसाठी 'कायक व दासोह' यांचा समन्वय असणे अतिशय महत्त्वाचे आहे.



### ५.३.३ न्यायनिवाडा व विश्वास केंद्र :

मठामध्ये गुरुच्या आदेशानुसार अनेक कार्य केले जातात. गुरुवरील आत्यंतिक श्रद्धा व विश्वास यामुळे मठ हे धार्मिक आचरणातील केंद्रबिंदू बनलेले आहेत. लिंगायत गुरु हे प्रभावशाली व न्यायप्रिय असतात. त्यामुळे मठामध्ये अनेक भक्त आपल्या न्याय निवाड्यासाठी मठामध्ये येत असतात. "मठ हे वीरशैव लिंगायत समाजाच्या धार्मिक विश्वासाची मध्यवर्ती केंद्र धारणा असते." वीरशैव लिंगायत मठामध्ये अध्यात्मिक, धार्मिक, न्यायिक दृष्टीकोनातून अनेक विचारांची देवाण घेवाण केल्या जाते. त्यामुळे भक्ताचे ते विश्वास केंद्र म्हणून कार्य करते. गुरुच्या मठामध्ये अनेक धार्मिक संस्कार, तत्वज्ञान, मठामध्ये सागितले जातात. त्यामुळे अनेक समस्याचे निरासन हे मठात केले जाते. गुरुच्या मठातील संस्कार न्यायिक वृत्तीने भक्ताचे प्रश्न सोडवले जातात. म्हणून कोणत्याही कुटुंबाच्या समस्या न्यायनिवाडा व विश्वास केंद्र म्हणून अनेक मठाच्या गुरुकडे पाहिले जाते. वीरशैव लिंगायत समाज धार्मिक प्रसार करण्यासाठी मठपरंपरेचा फार मोठा वाटा आहे. आज देखील नांदेड जिल्ह्यातील मठ हे समाज विकासाचे कार्य हे मठातून चालत असते. मठसंस्थांनी वीरशैव समाजाची संस्कृती जिवंत ठेवण्याचे कार्य हे मठामधून करण्यात आले आहे.

### ५.३.४ आद्य शैक्षणिक केंद्र :

"वीरशैव लिंगायत समाजाची मठे ही आद्य शैक्षणिक संस्था होत्या. वीरशैव लिंगायत समाजाच्या शैक्षणिक विकासाला फार मोठी परंपरा लाभलेली आहे." मुखेड येथील संस्कृत पाठशाला. गोपाळचावडी येथील शिक्षण संस्था श्री गुरु बुद्धिस्वामी मठातील शाळा व महाविद्यालय हे मठातील शैक्षणिक विकासाच्या सुधारणेत टाकलेले पाऊल आहे. प्राचीनकाळी गुरुच्या सानिध्यात राहून शिक्षण घेत विद्यार्थ्यांना मठात राहून शिक्षण घ्यावे लागत असत. त्यामुळे मठाला लागुनच अनेक वसतिगृहाची निर्मिती करण्यात आली. या वसतिगृहातून विद्यार्थ्यांना धार्मिक ज्ञानाबरोबरच, बौद्धिक तत्वज्ञान सुद्धा सांगितले जायचे. मठामार्फत शिक्षणप्रसाराच्या उदात्त हेतुने प्रेरित होऊन महाराष्ट्रात, मराठवाड्यात, नांदेड जिल्ह्यामध्ये अनेक शैक्षणिक संस्थाची

निर्मिती करण्यात आली. मठाच्या व्यवस्थापनाखाली विविध शैक्षणिक संस्था निर्माण करुन समाजात शिक्षणाचा प्रसार केला. राष्ट्राच्या उभारणीसाठी शिक्षणासारखे दुसरे कोणतेही प्रभावी माध्यम नाही. त्यामुळे मठाच्या माध्यमातून गुरुनी हे कार्य सुरु केले आहे. त्यामुळेच वीरशैव लिंगायत समाजाची आद्य शैक्षणिक केंद्रे म्हणून मठाकडे आजही पाहिल्या जाते.

**५.३.५ मठामार्फत जनजागृती**

वीरशैव लिंगायत समाजाची मठे ही लोकजागृती, समाज संघटन व धार्मिक तत्वज्ञानाचा प्रसार करण्याचे मुख्य आचार केंद्र आहे. या आचार केंद्रामध्ये लोकसंपर्क असणे अतिशय महत्त्वाचे आहे. त्यामुळे मठामध्ये गुरुच्या व्यक्तिमत्त्वाचा व धार्मिक तत्त्वज्ञानाचा पगडा पडणे आवश्यक आहे. त्यासाठी मठाच्या मार्फत अनेक ग्रंथाची निर्मिती केली जाते. त्या ग्रंथाच्या माध्यमातून भक्ताच्या बुद्धीचा विकास केला जातो. आपल्या समाजाच्या प्राचीनतेचा वारसा भक्तांना सांगणे हे गुरुचे कर्तव्य आहे आणि गुरु हे आपल्या प्रवचनातून वेगवेगळ्या कार्यक्रमातून सांगत असतात. वेगवेगळ्या मठामध्ये ग्रंथाची निर्मिती केली जाते. त्यामध्ये वसमतचे सिद्धेश्वर मठ, बेटमोगऱ्याचे शिवलिंग बादशहा मठ हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. आज अनेक संशोधक वीरशैव लिंगायत मठ परंपरा, गुरु परंपरा, मठाचा अभ्यास करत आहे. अशा संशोधकाला मठाच्या गुरुमार्फत सहकार्य मिळून ग्रंथाची उपलब्धता करुन दिली आहे. गुरुच्या अभ्यासपूर्व विचारातून संशोधकाला प्रेरणा मिळत आहे. बेटमोगरा येथील अभ्यासु श्री १०८ शिवाचार्य सिद्धदयाळ, लासिन मठाचे गुरु श्री १०८ शिवाचार्य करब शिवाचर्य, थोरला मठ संस्थानचे श्री १०८ वेदांताचार्य दिगांबर शिवाचार्य, मुखेड येथील श्री १०८ विरुपाक्ष शिवाचार्य, नागठाणा येथील शिवाचार्य या सर्व गुरुमार्फत बहुमूल्य अभ्यासातून संशोधकाला अनेक मठाची माहिती मिळू शकली व त्यांचे संदर्भ ग्रंथ संशोधकाला अभ्यासता आले. ह्याचे सर्व श्रेय गुरुच्या लोकसंपर्कातून जनजागृतीमुळे शक्य झाले.

**५.३.६ मठाची आर्थिक स्थिती**

"नांदेड जिल्ह्यातील वीरशैव लिंगायत समाजाचे सर्व मठ हे ग्रामीण भागात



आहेत. त्यामुळेच त्यांचे आर्थिक उत्पन्न हे गावातील भक्तांनी दिलेली देणगी, उत्पन्नाचा काही भाग, पट्टी जमा करुन मठाची आर्थिक बाजू सांभाळली जाते. वीरशैव लिंगायत समाजातील मोठे जमीनदार वर्ग, व्यापारी, उद्योजक इ. भक्ताकडून मठाला काही तरी देगणी देत असतात." काही गावामध्ये सुगीच्या दिवसात किंवा पैशाच्या रुपात मठाला देगणी देत असतात. काही मठामध्ये गहू, ज्वारी जमा करत असतात. नांदेड जिल्ह्यातील काही मठाना आर्थिक उत्पन्नाचे साधन म्हणून गावातील ग्रामस्थानी मठाला जमीन दान केलेल्या आहेत. त्यामध्ये बेटमोगरा, मुखेड, मुदखेड, कासराळी, नागठाणा, वसमत, लासिन मठ, पूर्णा या ठिकाणी शेती असल्यामुळे शेतीतून निघणारे उत्पन्नातून मठाचा आर्थिक कारभार पाहिला जातो. मठाच्या गुरुंना विवाहप्रसंगी, कार्यक्रमाच्या प्रसंगी कपडे दिले जातात. शेतकरी व जमिनदाराकडून धान्य दान दिल्या जाते. मठांना लोकाकडून सदभावनेने देगणी दिली जाते ती ही भक्ताला घडेल त्याप्रमाणे त्यामध्ये पैसा, जमीन, वस्तू, धान्य इ. स्वरुपात ते देणगी असू शकते. देणगी म्हणून दिलेल्या जमीनी मठाच्या उत्पन्नाचे मुख्य साधन आहे. काही मठांना जमीन असून त्याचा कारभार ग्रामस्थांच्या हाती आहे. त्यामुळे मठाची आर्थिक बाजू कमकुवत बनलेली आहे. त्यामुळे ज्या मठाच्या उत्पन्नात वाढ होते त्या मठाचा सर्वच बाबतीत विकास होत असतो. मठाला जर आर्थिक पाठबळ मिळाले तर गुरुच्या आदेशानुसार नवनवीन उपक्रमाला गती प्राप्त होऊ शकते. मठाच्या जागेत नवीन बांधकाम करणे, भक्तांना राहण्यासाठी निवास बांधणे, कार्यालये बांधणे, मंगल कर्यालयाची निर्मिती करणे, सभागृहाची निर्मिती करणे, वसतिगृहाची निर्मिती करणे इ. नवनवीन कामे मठामध्ये सुरु करु शकतात. तेव्हा त्यांना आर्थिक पाठबळ मिळू शकते. ज्यांच्या विचारातून नवनवीन उपक्रम माठामध्ये सुरु करण्यात येत आहे. गुरु सिद्धदयाळ शिवाचार्य, करबसव शिवाचार्य, वेदांतचार्य दिगांबर महाराज यांच्या वेगवेगळ्या कार्याना गती प्राप्त होणे महत्त्वाचे आहे. मठातील गुरु हे उच्च विद्याविभूषित असल्यामुळे मठामध्ये वेगवेगळे उपक्रम ते राबवत आहेत. विरुपाक्ष महास्वामी, करबसव शिवाचार्य यांच्या विचारातून अनेक भक्तांना समाजात काहीतरी करण्याची प्रेरणा मिळत असते. त्याच्या प्रवचनातून समाज प्रबोधन घडून येत

असते. एकंदरीत पाहता मठाच्या उत्पन्नाची साधने वाढावीत यासाठी सर्व भक्तांनी 'कायक व दासोह' या तत्त्वाचा स्वीकार करुन आपल्या कुवतीप्रमाणे मठांना देणगी द्यावी. तरच मठांच्या सामाजिक उत्पन्नाचा समाजहितासाठी उपयोग होऊ शकतो. यातून समाजकार्य करण्यासाठी मठातील गुरुना आर्थिक पाठबळ देणे आज गरजेचे आहे. काही मठ आर्थिक संपन्न आहेत व काही मठांना आर्थिक पाठबळ देणे गरजेचे आहे. काही मठ तर उत्पन्नाअभावी मोडकळीस आले आहेत. एकंदरीत काही मठांची आर्थिक स्थिती अतिशय नाजूक आहे. मठाच्या जागा व उत्पन्नाच्या साधनावर काही लोक कब्जा करुन आपल्याच नावावर करत आहेत. त्यामुळे धर्म प्रसारासाठी धडपडणाऱ्या प्रामाणिक, जिद्दीने कार्य करणाऱ्या गुरुला नाईलाजास्तव कोणतेच कार्य करता येत नाही. मठ ही मुलतः एक सामाजिक संस्था आहे. याचा अर्थ मठाची जागा ही सर्व समाजाची होय. त्यावर अधिकार समाजाचा असतो. परंतू काही स्वार्थी राजकारणी आपला स्वार्थ पाहून मठाच्या जमिनीवर आपले प्रभुत्व निर्माण करत आहेत. मठ हे समाजाचे श्रद्धास्थान आहे. या श्रद्धा मंदिराला वाईट दिवस येऊ नयेत. यासाठी समाजातील प्रत्येक व्यक्तीने मठाची काळजी घेणे गरजेचे आहे. संशोधन करत असताना नांदेड जिल्ह्यातील अनेक मठांना भेटी दिल्यानंतर अनेक शिवाचार्यांनी मठाची सद्यस्थिती सांगितली. नांदेड जिल्ह्यातील व वसमत तालुक्यातील शिवाचार्यानी मठातील सर्व माहिती सांगितली. जे शिवाचार्य आहेत त्यांच्यामध्ये कार्य करण्याची तळमळ संशोधकाला दिसून आली. मठाचे सर्व शिवाचार्य उच्चशिक्षित असून त्यांना या विज्ञान युगात सुद्धा प्रवचनाच्या माध्यमातून समाज प्रबोधन करावयाचे आहे ते अवश्य करतील कारण समाजाचे आशास्थान आहेत. समाज त्यांना आदराने 'बापू' म्हणतो. तरुण पिढीमध्ये सुद्धा भक्तीची नाळ मठापर्यंत नेण्याचे कार्य आजचे शिवाचार्य करत आहेत. वीरशैव लिंगायत समाजाचे मठ इमारतीचे प्रतीक नसनू ते गुरुत्वाचे प्रतीक आहे. वीरशैव मठ संस्थेला फार प्राचीन वारसा लाभलेला आहे. धर्म संस्थेला स्थिरीकरण करणारी संस्था म्हणजे मठ होय. वीरशैव लिंगायत समाजामध्ये गुरुला वीरशैव धर्मात अनन्यसाधारण महत्त्व असल्यामुळे भक्ताच्या जन्मापासून ते मृत्युपर्यंत वेगवेगळ्या संस्काराची गुरुच्या सान्निध्याची, मार्गदर्शनाची, आशीर्वादाची



गरज असते. मठ ही वीरशैव समाजाची प्रेरणास्थाने, श्रद्धास्थाने आहेत. मठसंस्था या वीरशैवाच्या धार्मिक संघटनेचे एक वैशिष्ट्यपूर्ण व भूषणास्पद अंग आहे. "भक्ताचे धार्मिक, नैतिक, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन समृद्ध व सिकसित करण्यासाठी प्राचीन काळापासून चालत आलेली ही एक प्रभावी गुरु परंपरा आहे." मठातील गुरुच्या विचारातून वीरशैव लिंगायत समाजाच्या परंपरागत श्रद्धेला पुन्हा एकदा उजाळा मिळाला आहे. नांदेड जिल्ह्यातील अनेक मठ आहेत ती आजही वीरशैव लिंगायत समाजाचे धार्मिक प्रेरणेचे प्रतीक व संस्कार केंद्रे म्हणून उदयाला येत आहेत.

## ५.४ उर्लिंगदेव मठ, कंधार

नांदेड जिल्ह्यातील कंधार हा तालुका ऐतिहासिक मानला जातो. अनेक प्राचीन संस्कृतीचा वारसा या कंधार शहराला लाभला आहे. नांदेडच्या दक्षिणेस ५२ कि.मी. वर मन्याड नदीच्या उत्तर काठावर वसलेले हे शहर प्राचीन काळी राष्ट्रकूट घराण्याची उप-राजधानी म्हणून भरभराटीला आली. प्राचीन नाव किरणपूर म्हणजेच कंधारपूर आहे. या ऐतिहासिक शहरामध्येच उर्लिंगदेव यांचा मठ आहे. आज तो मठ नावारुपालाच राहिलेला आहे. कंधारचे उर्लिंगदेव एके दिवशी नांदेड येथे वीरशैव लिंगायत समाजाच्या सुरय्या दरगू यांच्या घरी मुक्कामी होते. त्याच वेळेस 'पादपूजा' आणि 'लिंगपूजा' करण्यात येत होती. त्याच दिवशी रात्री आंध्रातील पेद्दी चोर चोरी करण्यास आला होता. परंतू उर्लिंगदेवच्या पादपूजा व लिंगपूजेचा कार्यक्रम असल्यामुळे तो चोरी करु शकला नाही. हा कार्यक्रम पाहून त्याच्याही मनात आपण गुरुकडून दीक्षा घ्यावी यासाठी तो कंधारला गेला. गुरु वचनाचा व इष्टलिंग दीक्षेचा प्रभाव पेदन्नाच्या डोक्यात सतत बेचैन करु लागला. 'सुरय्या' प्रमाणेच आपणही उर्लिंगदेवापासून दीक्षा घ्यावी असे पेद्दीला वाटत होते. काही दिवसानंतर पेद्दीची साधना पाहून त्याला उर्लिंगदेवजी इष्टलिंगाची दीक्षा दिली. चातुवर्ण व्यवस्थेतील एका शिष्याला पूर्वीच्या चोराला सुसंस्कारीत करुन महाराजांनी आपल्या गादीवर समारंभपूर्वक विराजमान करुन त्यांच्यापुढे आपण नम्रपणे शिष्यत्व पत्कारुन आपल्या गादीचे 'उर्लिंगपेद्दी' हे नाव ठेवून कंधार व मन्याड खोरे अजरामर केले. असा

महिमा या 'शुर मन्याड' नगरीत कंधार या राष्ट्रकुट कालीन राजधारीच्या शहरात बाराव्या शतकात असा महान क्रांतीचा जातीवर्ण विध्वंस करणारा सोहळा जन्माला येऊन समतेचा, बंधुप्रेमाचा प्रसार केला. त्यामुळेच या प्राचीन मठपरपंरेचा वारसा समतेचा संदेश देतो.

## ५.५ भीमाशंकर मठ संस्थान, शिराढोण

वीरशैव लिंगायत समाजाचा गुरु परंपरेचा शिराढोण भीमाशंकर येथील मठ फार जुना असून खुप प्राचीन वारसा या मठाला लाभला आहे. मठ वीरशैवाच्या 'स्कंदगोत्रीय काशी' पीठाची शाखा आहे. काशी पीठाचा हा मराठवाड्यातील एकमेव मठ आहे. शिराढोण या ठिकाणी २०० वर्षापूर्वी भीमाशंकर हा जाजवल्य महायोगी शिवाचार्य होऊन गेले. त्यांच्याच नावाने हा मठा 'भिमाशंकर मठ' म्हणून नावारुपाला आला आहे. या मठाच्या महाराष्ट्र, आंध्र प्रदेश या ठिकाणी अनेक शाखा आहेत. या मठाच्या शिष्य पंरपरेत अनेक जातीत धर्माचे लोक या मठाच्या सानिध्यात आहेत. त्यामुळे महाराष्ट्र, कर्नाटक, आंध प्रदेश या राज्यात गुरुच्या शिष्य वर्गाचा समावेश आहे. भीमाशंकर मठाची शिष्याची परंपरा गुरुपद्धतीची आहे. त्यांची नावे देखील 'दशमुख' आणि 'षडाक्षर' अशी आहेत. दरवर्षी मठात नवरात्र महोत्सव होतो. या मठाच्या संस्थानामार्फत समाजातील प्रज्ञावान, बुद्धिवंताचा आणि गुणवान विद्यार्थ्यांना दरवर्षी या मठामध्ये गौरविण्यात येते. भीमाशंकर मठाला ऐतिहासिक वारसा लाभला आहे. इ.स. १९१६ साली कसबे लोहगावच्या गुरुवर्याच्या हस्ते हम्पय्या स्वामीना भीमाशंकर मठ संस्थानाच्या गादीवर बसविले व त्यांचा पट्टाभिषेक होऊन ते शिवाचार्य झाले. त्यांनी या मठामध्ये छत्तीस वर्ष म्हणजे तीन तपे खडतर तपश्चर्चा केली. याच काळात त्याला त्यांना कार्याची सिद्धी प्राप्त झाली. या सिद्धीच्या जोरावर त्यांनी अनेक भक्तांचा उद्धार केला. सन १९७२ साली महाराजांनी षडाक्षर शिवाचार्य स्वामी यांचा पट्टाभिषेक केला. अशा अनेक विद्यावान मठाच्या गुरुची परंपरा या मठाला लाभलेली आहे. आज या मठाचे नुतनीकरण करण्यात आले आहे. भीमाशंकर मठामध्ये श्री षडाक्षर शिवाचार्य समाधी, श्री दशमुख शिवाचार्य स्वामी समाधी, श्री षडाक्षर शिवाचार्य समाधी अशा तीन समाध्या असून त्याच बरोबर हप्पाय्या स्वामीची



समाधी मठामध्ये आहे. भीमाशंकर मठाला सन १९७२ मधील डिसेंबर महिन्यामध्ये वैराग्यमूर्ती ज्ञान सूर्याला षडक्षर शिवाचार्य हे नवे नामविधान मिळून शिराढोण येथील स्वतंत्र गादीवर त्यांचा पट्टभिषेक झाला. भीमाशंकर लिंग शिवाचार्याचा पट्टभिषेक झाल्यानंतर त्यांनी शिराढोण येथील भीमाशंकर मठामध्ये नवे नवे उपक्रम हाती घेतले. त्यामध्ये नवरात्र महोत्सव, व्यसनमुक्ती, दीक्षा, श्रावणमास अनुष्ठान असे धार्मिक कार्यक्रम त्यांनी मठामध्ये सुरु केले. गुरु बद्दल आदर म्हणून त्यांनी हम्पय्या स्वामी प्राथमिक शाळा, पंचाचार्य हायस्कूल, दशमुख आश्रम, शिव दिक्षेच्या माध्यमातून लाखो सद्‌भक्तांना अध्यात्माचा संस्कार त्यांनी दिला. १९९१ ला जनकल्याणासाठी त्यांनी महायज्ञ केला. १९८३ मध्ये कपीलेश्वर येथील गोदावरी नदीच्या तिरावरील उंच जागेवर भीमाशंकर शिवाचार्यांनी अनुष्ठान सुरु केले. त्याच वेळेस गोदावरी नदीला पुर आला. सगळीकडे हाकाकार झाला होता. परंतु शिवाचार्य भीमाशंकरलिंग अनुष्ठान व महाईष्टलिंग पूजा करत राहिले पण अनुष्ठान सोडले नाही. हा अद्‌भूत चमत्कार भीमाशंकर लिंग शिवाचार्य हातून घडला. भिमाशंकर महाराजाच्या पावन स्पर्शाने पूनीत झालेल्या शिराढोण गावाची एक वेगळी ओळख निर्माण झाली आहे. भीमाशंकरलिंग शिवाचार्य यांनी मठ संस्थानामार्फत पूर्व मठाधिपतीच्या पूण्यतिथीबरोबरच नवरात्रात पालखी, अग्निपूजा, अनुष्ठान, दीक्षासंस्कार, गुणवंताचा सत्कार, इ. कार्यक्रम मठामध्ये नित्यनेहमी घेत असतात. भीमाशंकर मठ संस्थानाच्या शाखा कलंबर, भोकर, हंगरगा, त्याच बरोबर आंध्रप्रदेश, कर्नाटक या ठिकाणी सुद्धा शाखा मठे आहेत. या मठाचे शिवाचार्य २००१ रोजी वीरशैव लिंगायत पंचपीठा पैकी केदारपीठाचे जगद्‌गुरु झाले आहेत. अशा रितीने भीमाशंकर मठाचे शिवाचार्य केदारपीठाचे जगद्‌गुरु झाले. अनेक धर्मिक कार्यक्रम ते घेत असतात. आजही जगद्‌गुरु शिराढोणच्या मठात अनेक कार्यक्रम घेतात त्यामध्ये ४५ वे अनुष्ठान २०१७ मध्ये त्यांनी शिराढोणला घेतले. अनुष्ठानामध्ये विविध धार्मिक, सामाजिक, कार्यक्रम घेतले जातात. त्यामुळे या पावन भूमीला अनुष्ठानातील इष्टलिंग पुजा, महाप्रसाद याला लाखोंच्या संख्येने जनसागर येत असतो.

## ५.६ शिवलिंग बादशहा मठ संस्थान, बेटमोगरा

"वीरशैव लिंगायत समाजाच्या मठाला अनन्य साधारण असे महत्व आहे. मठामधून शिष्य वर्गाला संस्काररुपी ज्ञानाची गोडी मठामधुन निर्माण केली जाते. वीरशैव लिंगायत समाजाच्या मुख्य पाच पीठापैकी बेटमोगरा येथील शिवलिंग बादशहा मठ हे 'उज्जैन' पीठाचा शाखामठ असून नंदी गोत्राशी संबंधीत आहे." बेटमोगरा या गावाला फार प्राचीन वारसा लाभलेला आहे. प्राचीन काळात 'शिवपूर' या नावाने हे गाव ओळखल्या जात असत. तर मध्ययुगीन काळामध्ये 'बेटमोगरा' हे नाव श्री शिवलिंग बादशहा स्वामी यांच्यापासून रुढ झाले आहे. बेटमोगरा परिसर हा मन्याड नदीमुळे हिरव्यागार वनराईने नटला आहे. या नदीच्या खोऱ्यात नवाश्मयुगापासून लोकवस्तीचे पुरावे मिळाले आहेत. त्याचबरोबर सातवाहन वस्तीही अस्तित्वात होती. अशा परिसराला प्राचीन संस्कृतीची पार्श्वभूमी लाभलेली आहे. नांदेड जिल्ह्यातील वीरशैव लिंगायत समाजातील मठपरंपरेची संपूर्ण माहिती या मठामधुन मिळते. अनेक प्राचीन दस्तऐवज, इनामे, ताम्रपट, नाणी या मठामध्ये आजही पाहावयास मिळतात. त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील मठाचा अभ्यास शिवलिंग बादशहा मठाशिवाय पूर्ण होऊच शकत नाही. नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्याला तशी प्राचीन परंपरा लाभलेली आहे. त्यामध्ये बेटमोगरा मठाची भर पडली आहे. बेटमोगरा हे गाव नांदेड-देगलूर महामार्गावर शंकरनगर पासून दक्षिणेला ६ कि.मी. अंतरावर आहे. गावाच्या पश्चिमेस एका टेकडीवर भव्य किल्लेवजा मध्ययुगीन वास्तू असून ती समुद्रसपाटीपासून टेकडी ३८६ मिटर उंच आहे. तांबड्या-मांजरा खडकाची ही टेकडी बेटमोगरा गावाचे नाव सार्थ ठरते. बेटमोगरा गावाला मन्याड नदी चंद्रकोराप्रमाणे वळसा घालून वाहते. चारही बाजूनी पाणी व मध्यभागी ही टेकडी व शुभ्ररंगाची मठाची वास्तू हे दृश्य बेटावर मोगरा फुलल्यासारखे भासते म्हणून या गावाला 'बेटमोगरा' हे नाव पडले असावे. उज्जैनी पंचपीठाचे जगद्गुरु मरुळसिद्ध स्वामी हे उज्जैनी हुन बीदर मार्गे महाराष्ट्रात आले, धर्मप्रसार व मठस्थापना करत पुढे महाराष्ट्रात येत असताना त्या ती प्राचीन 'शिवपूरचा' परिसर पाहून उंच टेकडीवर मठ स्थापन केला. आजही बेटमोगरा मठात मरुळसिद्ध यांच्या नावाने 'सिद्धेश्वर' नावाचे लिंग आहे. त्यामुळे उज्जैनीपीठाचे जेवढे मठ आहेत त्या ठिकाणी 'सिद्धेश्वर' मंदिर



आहेत. या मठावर अनेक गुरुची परंपरा होऊन गेली. त्यांची नावे महालिंग, शिवसिद्ध अशी आढळतात. परंतू बेटमोगरा या मठाला प्रसिद्धी मिळाली ती मध्ययुगीन काळात मठाचे गुरु श्री शिवलिंग स्वामी यांच्या काळात ते क्रमाने या मठाचे बारावे गुरु होते. अगोदरच्या काही गुरुची नावे आहेत पण मुळ संस्थापक गुरुचे नाव नाही. बेटमोगरा व टाकळी या गावाच्या परिसराला (शिवपूर) म्हणून संबोधल्या जाते. कारण या ठिकाणी मन्याड नदी वाहत जाते व या नदीच्या परिसरात अनेक दगडावर शिवलिंग (पिंडी) कोरलेल्या आहेत. त्यामुळेच या परिसराला 'शिवपूर' नाव पडले असावे. अशाच या बेटावर शिवलिंग बाल ध्यानमग्न बसत असे. एक दिवस शिवलिंग बाळास साक्षात्कार होऊन अनेक चमत्कार घडल्याचे दंतकथेवरुन समोर आले. पुढे हाच बाळ टेकडीवर जात असे. तोच पुढे शिवलिंग स्वामी म्हणून नावारुपाला आला. शिवलिंग स्वामी यांनी बेटमोगऱ्याच्या जीर्ण झालेल्या मठाला व्यवस्थित करुन तो अधिकार शिवलिंग स्वामीस दिला. याच गुरुंना अकरा गुरुच्या समाध्याचा जिर्णोद्धार केला. शिवलिंग स्वामी मन्याड नदीतील प्राचीन बेटावर जावून अनुष्ठान करत असत. त्याचवेळेस इ.स. १६८५ च्या दक्षिण स्वारीच्या वेळी आमलगीर औरंगजेब कंधारहून बेटमोगरा परिसरातून देगलूरकडे जात होते. त्यावेळी बेटावर ध्यानस्त शिवलिंग स्वामी पाहून मोगलांनी त्या परिसरात मुक्काम केला त्यावेळेस औरंगजेबाच्या कानावर शिवलिंग स्वामीची किर्तीची ख्याती आली त्यामुळे त्यांनी दुतामार्फत भेटण्यास सांगितले. लगेच होकार देवून स्वामी दुताच्या अगोदर औरंगजेबास जावून भेटले. बादशहा व शिवलिंग स्वामीचा संवाद सुरु झाला. स्वामीचे अलौकिक ज्ञान व तपश्चर्याचे तेज पाहून बादशहा खुश झाला. व त्याने शिवलिंग स्वामीना 'बादशहा' ही पदवी (खिताब) दिला. व या परिसरात मठ व मंदिरे बांधण्याची परवानगी दिली. तेव्हा पासून बेटमोगरा येथील मठ हे 'शिवलिंग बादशहा मठ' म्हणून ओळखल्या जातो. मठ म्हणजे सर्वधर्म समभावाचे प्रतीक समजले जाते. त्यामुळे या मठात वीरशैव लिंगायत समाजाच्या सणवाराबरोबरच, हिंदू, मुस्लिम यांच्या परंपरा सुद्धा या मठात अविरतपणे चालू असतात. शिवलिंग बादशहाने अनेक ठिकाणी मठाच्या शाखा स्थापन केल्या, त्यामध्ये टाकळी, येलोरी, कौठ,

तुंबरपल्ली, किनी, बारसगाव, आरळी, हम्पी, नेकनुर, बिदर या ठिकाणी शिवलिंग बादशहा मठाच्या शाखा स्थापन केल्या आहेत.

बेटमोगरा परिसरात शिवलिंग बादशहाने अनेक वीरशैव लिंगायत तसेच सर्वधर्मिय समाजकार्य, धार्मिक न्यायज्ञान, धर्मप्रसार, धर्मत्त्वज्ञान, मठाचा जीर्णोद्धार करुन इ.स. १७०५ मध्ये शिष्याची आज्ञा घेऊन संजीवन समाधी बेटमोगरा येथे घेतली. तेव्हा पासून या मठाला बेटमोगरा 'शिवलिंग बादशहा मठ' असे नाव पडले. पुढे त्याचे शिष्य निलसिद्ध हे मठावर गुरु म्हणून विराजमान झाले. त्यांनी बाजारपेठ बसवली. "बलुतेदार व आलुतेदार कामगार मानून परीसरातील सिद्धपेठ हे नाव दिले. गुरुच्या स्मृतीसाठी गुरुवारी बाजार आरंभ केला. पुढे निजाम काळात बेटमोगरा बाजारपेठ कापडासाठी प्रसिद्ध झाली."

### ५.६.१ मठाची गुरुपरंपरा

मठाची गुरुपरंपरा प्राचीन आहे. पण त्याचा संदर्भ सापडत नाही. फक्त काही मोजकेच गुरुची नावे जसे शिवसिद्ध, सिद्धलींग असे नावे मिळतात. परंतु शिवलिंग स्वामी हे बारावे होते. तेव्हा पासून यादी प्राप्त होते, ती पुढील प्रमाणे. १२) श्री शिवलिंग स्वामी (बादशहा) १३) श्री निलसिद्ध स्वामी १४) श्री शिवसिद्ध स्वामी १५) श्री सिद्धलिंग स्वामी १६) श्री सिद्धदयाळ स्वामी १७) श्री सिद्धलिंग स्वामी १८) श्री अमरसिद्ध स्वामी १९) श्री सिद्दयाळ स्वामी २०) श्री अमरसिद्ध स्वामी २१) विद्यमान गुरु श्री सिद्दयाळ स्वामी असे नावे आहेत. उज्जैन शाखामठ असल्यामुळे प्रत्येक नावात सिद्धलिंग हे पद पुढे मागे लागत असते.

### ५.६.२ मठाची वास्तू :

बेटमोगरा मठाची वास्तू भव्य किल्लेवजा आहे. या वास्तूवर मुघलशैलीचा प्रभाव पडलेला दिसतो. प्रवेशद्वार हे पूर्ण चिरेबंदी बांधलेले आहे. त्याच बरोबर चुन्याचा मसाला वापरुन बांधकाम केले आहे. सव्वातीनशे वर्षाचा काळ उलटूनही ही वास्तू जशीच्या तशी आहे. हे आश्चर्यच म्हणावे लागेल. तटबंदीला एकूण ७ बुरूज आहेत. दुसऱ्या मजल्यावर नगारखाना, देवीची भव्य मूर्ती शिखराच्या मधोमध 'न्यायदानाची कचेरी' आहे. जसे जातीपंचायत होती त्याच प्रमाणे मठामध्ये



गुरुच्यासाक्षीने न्यायदान करण्याचे कार्य केले जात असत. शिखरावर मध्यभागी कळस व एका बाजूला लहान शिखरावर चंद्रकोर आहे. त्यामुळे हे मठ धार्मिक सलोख्याचे उत्तम उदाहरण आहे.

मठाच्या आतील भागामध्ये आतपर्यंतच्या सर्व गुरुंच्या समाध्या या ठिकाणी आहेत. मठाच्या गर्भगृहाच्या प्रवेशद्वारात पायऱ्यावर निजामकालीन व मुघल कालीन नाणी लावलेली आहेत. याचा मुख्य उद्देश म्हणजे मठात प्रवेश करताना सत्ता व संपत्ती हे व्यक्तीच्या जीवनात दुय्यम आहेत. हे या मठाच्या पायरीवरून समजते. मठात प्रवेश केल्यानंतर उजव्या बाजूला मुख्य गुरु गादी असून त्यावर शिवलिंग बादशहा स्वामीची पंचधातुची मूर्ती आहे व डाव्या बाजूला विद्यमान गुरुची बसण्याची जागा आहे. प्रवेश केल्यानंतर मुस्लिम दैवत, पंजे मोहरमात त्यांची मिरवणूक निघते. तीथेच मोरपिसांचा गुच्छ व जुनी हत्यारे, त्रिशुळ ठेवलेले आहेत. घुमटामध्ये दोन समाध्या आहेत.

### ५.६.३ न्यायदानाची कचेरी :

बेटमोगरा मठाचे गुरुच्या आज्ञेनुसार न्यायदान केल्या जात असे. तशी कचेरी दुसऱ्या मजल्यावर आहे. याचा अर्थ मठ हे प्राचीन काळापासून न्यायदान करण्याची भूमिका बजावत असे. त्याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणून त्या ठिकाणी न्यायदान कचेरी ही त्याची साक्ष देते. बेटमोगरा येथील शिवलिंग बादशहा मठाचे विद्यमान गुरु सिद्धदयाळ हे अत्यंत अभ्यासु व तत्वचिंतक गुरु आहेत. ते स्वतः उच्चविद्याभूषित असून त्यांना वीरशैव लिंगायत समाजाच्या तत्त्वज्ञानाचे संपूर्ण ज्ञान आहे. सिद्धांत सिखामणि, शैवागम, पंचाचार्य, वीरशैव तत्त्वज्ञानातील तत्त्वाचा त्याचा गाढा अभ्यास आहे. विशेष म्हणजे त्यांचे मोलाचे मार्गदर्शन असते. ते स्वतः एका संशोधक वृत्तीने अभ्यास करत असतात. त्याचेही स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठामध्ये संशोधनाचे काम चालू आहे. हे विशेष म्हणावे लागेल. बेटमोगऱ्याच्या मठामध्ये ते अनेक धार्मिक, सण, उत्सव नित्य नियमाने घेतात.

### ५.६.४ मठाचे धार्मिक कार्य :

शिवलिंग बादशहा मठामध्ये सर्वधर्मिय भक्तगण, शिष्यवर्ग येतो. त्यामुळे मठाच्या

सण-उत्सवात वीरशैव अनुययाबरोबर सर्वच जातीचे लोक सहभागी होतात. महाशिवरात्र, नवरात्र, गुडीपाडवा, दीक्षा संस्कार, श्रावण मास, ईद-मोहरम, होळी हे सण मठामध्ये पार पाडले जातात. त्याच बरोबर अखंड शिवनाम सप्ताह, परमरहस्य पारायण, बेटमोगरा ते कपिलधार पदयात्रा, वेगेगळ्या ठिकाणच्या धार्मिक कार्यात सहभाग असतो. पालखी मिरवणूक, यात्रा, जयंती, पट्टाभिषेक अशा कार्यक्रमानी बेटमोगरा परिसराचा परिसर धार्मिक वातावरण गजबजून जाते. त्याच बरोबर श्री सिद्धदयाळ स्वामी यांनी एक लक्ष दीपोत्सव कार्यक्रम या ठिकाणी घेतला होता. या धार्मिक कार्यक्रमामध्ये सर्व धर्माचे लोक सहभागी होऊन राष्ट्रीय भावनाची रुजवण करतात. हे करण्याचे काम श्री १०८ सिद्धदयाळ शिवाचार्य करत असतात. त्याच्या मार्गदर्शनानुसारच हे धार्मिक कार्यक्रम पार पाडले जातात. पदयात्रेची सुरुवात गुरुनी २००५ पासून सुरु केली आहे. हजारो भाविक या परिसरातून शिवाचार्याच्या पदयात्रेत सामिल होत असतात. बेटमोगरा येथील मठ हे हिंदू-मुस्लिम वीरशैव परपंरेचे मुख्य आकर्षण आहे. मुख्य म्हणजे हा मठ धर्मिक सहिष्णुता पाळणारा एकमेव मठ नांदेड जिल्ह्यातील आहे. ज्या ठिकाणी मुस्लिम लोकही या मठाचे शिष्य आहेत.

**५.६.५ मठाचे सामाजिक कार्य :**

वीरशैव लिंगायत समाजाचे मठपरंपरेची असलेले नाते व त्यामध्ये होणारे समाजप्रबोधन यामुळे अनेक सामाजिक केंद्राचे माहेरघर बनत आहेत. मठ संस्थान मठामध्ये धार्मिक बरोबर सामाजिक कार्यही उल्लेखनिय आहे. मठात येणारा भक्ताना व शिष्यवर्गाना अन्नदान (अन्नछत्र) चालवल्या जाते. ज्यावेळेस संशोधक मठाला भेट देण्यासाठी जात असे. तेथील श्री १०८ सिद्धदयाळ शिवाचार्य यांनी मठातील प्रसाद खाल्याशिवाय जाऊ देत नाहीत. मठात येणाऱ्या प्रत्येक भक्ताला येथ प्रसादाची सोय आहे. प्रसाद सकाळपासून संध्याकाळपर्यंत सदैव चालू असतो. त्याचबरोबर येणाऱ्या भक्ताना जर जाण्यास उशीर झाला तर मठामध्ये राहण्याची सुद्धा सोय गुरुंनी केली आहे. येथील अमरसिद्ध गुरुनी हैद्राबाद मुक्ती संग्रामात सहभाग घेतला होता. त्याच बरोबर त्यांना १० महिन्याचा कारावासही झाला होता. सिद्दयाळ गुरु अनेक प्रवचनातून समाज प्रबोधन, व्यसनमुक्ती धडे, मार्गदर्शन शिबीरे, रक्तदान,



आरोग्य सल्ला, मोफत उपचार इ. कार्य श्री १०८ सिद्धदयाळ गुरु करत असताना आणि ती पण मोफत सेवा देत असतात. त्यामुळे सामाजिक बांधिलकीतून अनेक सामाजिक कार्य गुरुच्या कृपा आशीर्वादाने या ठिकाणी नेहमी घेतले जातात. विद्यार्थ्यांना मोफत राहण्याची व भोजनाची तसेच शालेय साहित्य देण्याचे कार्य गुरुकडून होत असते. मठाच्या संशोधनासाठी आलेल्या संशोधकाला पूर्णवेळ मठाचा परिसराची माहिती देवून संदर्भ ग्रंथ, प्राचीन दस्तऐवज, मठातील शस्त्रे, नाणी, कागदपत्रे स्वतः सिद्धदयाळ गुरु दाखवत असतात. त्यामुळे सामाजिक दृष्टीकोनातून कोणताही भेदभाव न करता आलेल्या प्रत्येक धर्माच्या व्यक्तींना ते मार्गदर्शन करतात.

**५.६.६ मठाचे शैक्षणिक कार्य :**

बेटमोगरा येथे निजामकाळापासून प्राथमिक शाळा होती. त्यावेळेस शिक्षणाकरिता अनेक विद्यार्थी बेटमोगऱ्याला येत असत. त्यावेळेस विद्यार्थ्यांच्या राहण्याची व जेवणाची व्यवस्था मठात मोफत केली जात असे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर इ.स. १९५६ ते इ.स. १९६१ या पाच वर्षाच्या काळात श्री मारोती पाटील टाकळीकर यांनी 'सिद्धेश्वर' हायस्कूल नावाची संस्था स्थापन करण्यासाठी महाराजांनी शाळेकरिता मोफत मठाची इमारत वापरायला दिली. अशी सोय शिक्षणासाठी बाहेरगावून येणाऱ्या गोर-गरिब विद्यार्थ्यांना आजही गुरु मठात जेवणाची व राहण्याची सोय मोफत करतात. मठामध्ये धार्मिक शिक्षणही दिले जाते. त्यामध्ये इष्टलिंगपूजा वीरशैव तत्त्वज्ञान, धार्मिक विधी यांचा अभ्यास करुन घेतला जातो व संस्कार व्यवस्थेचा प्रसार करण्यासाठी शास्त्र, पुरोहित मठामध्ये तयार केले जातात. श्री १०८ सिद्धदयाळ यांच्या मार्गदर्शनानुसार शिवलिंग बादशहा मठामध्ये वेगवेगळे नवनवीन उपक्रम घेतले जातात. सिद्धदयाळ यांच्या नवनवीन विचारातून मठाचा विकास करण्याचे ध्येय त्यांच्या कार्यशील कार्यामुळेच साध्य होत आहे. श्री १०८ सिद्धदयाळ यांचा स्वभाव मार्गदर्शकाची भूमिका पार पाडणारा आहे. सदैव भक्ताला मार्गदर्शकाची भूमिकेतून सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक विचाराची पेरणी ते करत असतात. शिवलिंग बादशहा मठ याच दृष्टीकोणातून सदैव कार्य करत आहे.

एखाद्या व्यक्तीचे जीवन फुलासारखे सुगंधीत असते. फुलाच्या भोवती सुगंध

दरवळत राहावा तशी ती व्यक्ती आपल्या उक्ती-कृतीतून अवती भवती सदैव प्रसन्नता पेरीत असते. श्री १०८ सिद्धदयाळ शिवाचार्याच्या सहवास असाच प्रसन्नतेचा दाखला अनुभवास येतो. श्री सिद्धदयाल शिवाचार्य हे वीरशैव लिंगायत समाजाचे गुरु असले तरी ते शिवलिंग बादशहा मठासारखे ते सर्वधर्मियांत आपलेसे वाटतात ते त्यांच्या मार्गदर्शक, समन्वयशील आणि अभ्यासू व्यक्तिमत्त्वामुळे त्यांच्या त्यांच्या वाणीतून निघणारे अनेक विचार भक्तवर्गाला प्रेरणा देत असतात. त्याचा अनुभव संशोधकाला मुलाखत घेत असताना आला आहे. चांगला समाज घडवण्याचा असेल आणि समाजात परिवर्तन घडवून आणावयाचे असेल तर समाजातील प्रत्येक व्यक्तीने सकारात्मकरित्या बदलले पाहिजे. असे मत श्री १०८ सिद्धदयाळ महास्वामीजी आपल्या प्रवचनातून सांगत असतात. भारत हा अध्यात्मिक अधिष्ठान लाभलेला देश आहे. वीरशैव लिंगायत मठपरंपरेचा त्यावर प्रभाव दिसूतो म्हणून माध्यमिक संस्कृतीचा एवढा प्रभाव वाढल्याने वीरशैव लिंगायत समाजातील शिष्यवर्ग शाकाहारी बनले आहेत.

### ५.७ श्री निर्वाणी मठ संस्थान, नागठाणा

**।। जे का शिवभक्त जण त्यांच्या दर्शनी पावन, सकळ सृष्टीचे जीवन होवू आनंदे।।**

नांदेड जिल्ह्यातील उमरी तालुक्यातील निसर्गाच्या कुशीत वसलेले छोटेसे, गाव नागठाणा आहे. या नागठाणा गावाच्या वैभवात सिद्धेश्वराच्या मंदिराने भर घातली आहे. त्यामध्येच सिद्धेश्वर मंदिराचे निर्वाणीमठ संस्थान नागठाणा येथे अस्तित्वात आहे. नागठाणा येथे एक हजार फुट उंच डोंगरावर सिद्धेश्वराचे मंदिर आहे. पूर्वी येथे नागराजाची वस्ती होती. त्यामुळेच या गावाला नागठाणा असे नाव पडले. म्हणून नागठाणा या गावाचे कुलदैवत सिद्धेश्वर म्हणून नावारुपाला आले. अशा उल्लेख अनेक ग्रंथात येतो. पुराणातील अख्यायिकेनुसार फार-फार वर्षापूर्वी तीन इशरुपी भावंड तीथे राहत होती. त्यांच्या वास्तवामुळे गावाला वैभव प्राप्त झाले. निर्वाणी महाराजानी गावातच पश्चिमेस समाधी घेतली तीथे आज निर्वाणी मठ रुपाला आला. गेल्या ३५ वर्षाच्या काळात मठाची माहिती उपलब्ध नाही. पण



कर्नाटक देशाचे संतपुरुष थोर विभूती पिता चरणतया माता मंगला यांच्या पोटी आलेल पुत्ररत्न श्री १०८ श्री निर्वाण रुद्र पशुपती शिवाचार्य महाराज हे वर्तमान काळात या मठाचे शिवाचार्य आहेत. त्यांचा पट्टभिषेक दि. २८ फेब्रुवारी २००८ रोजी केदार जगद्‌गुरु श्री श्री श्री १००८ भीमाशंकरलिंग शिवाचार्य यांनी केला आहे. तेव्हापासून आजपर्यंत निर्वाणीनी मठाची धुरा त्यांनी संभाळली आहे. निर्वाणीमठ संस्थान हे उज्जैन पंचपीठाच्या शाखेचे मठ असून नंदी गोत्र आहे. सिद्धेश्वराचे कुलदैवत या मठाच्या परिसरात आहे. त्यामुळे सिद्धेश्वराच्या मंदिरामध्ये हजारो भाविक याठिकाणी येत असतात. निर्वाणी मठामध्ये निर्वाणीरुद्र बालतपस्वी पशुपती शिवाचार्याच्या पावन चरणाने या नगरीचा परिसर भक्तीमय झाला आहे. केदारच्या जगद्‌गुरुनी पंचक्रोशीतील वीरशैव लिंगायत समाजाला गुरुच्या आशीर्वाद मिळावा यासाठी त्यांचा पट्टाभिषेक करुन नागठाणा गावी धार्मिक संस्काराची परंपरा सुरु केली. नागठाणा हे गाव छोटे खेडे आहे. त्यामुळे येथे धर्मिक दृष्टीकोनातून कोणताही प्रसार झाला नाही. "शिवाचार्यानी प्रथम या ठिकाणी आल्यानंतर सर्व वीरशैव लिंगायत समाजातील भक्तांना विभूती व रुद्राक्षाची माळ घालण्यास सांगितले व आश्चर्य सर्व नागठाणा गाव विचारांनी प्रभावीत होऊन प्रत्येक व्यक्तीच्या गळ्यात रुद्राक्षाची माळ व कपाळी विभूती आज दिसून येते ही परंपरा निर्वाणीरुद्र बलतपस्वी पशुपती शिवाचार्याची किमया आहे." २००८ पूर्वी मठामध्ये पेरी महाराज होते पण त्यांच्या जवळ कोणत्याही संदर्भ ग्रंथाचा व ऐतिहासीक कागदपत्राचा उल्लेख नाही. निर्वाणी शिवाचार्यानी मठाच्या उभारणीत शून्यातून विश्व निर्माण केले आहे. मठाच्या धर्मिक परंपरेला सुरुवात केली. दरवर्षी श्रावण मासात सिद्धेश्वर मंदीरात भक्ताची हजारोच्या संख्येने गर्दी असते. त्यामध्ये गुरुंचा रुद्राभिषेक, प्रवचन, अनुष्ठान, इष्टलिंगपूजा, अखंड शिवनाम सप्ताह, परमरहस्य पारायण, दिपोत्सव, रक्तदान शिबीरे असे अनेक सामाजिक, धार्मिक, कार्यक्रम ते मठाच्या माध्यमातून घेत असतात.

मठामध्ये आलेल्या भक्तांना राहण्याबरोबरच जेवणाची सोयसुद्धा मठामध्ये केली जाते. मठाला लोकांच्या वर्गणीतून दानातून आर्थिक पाठबळ मिळते व मठाची काही जमीन आहे त्यामधून मठाचा खर्च भागविला जातो. मठाच्या विकासाला,

नागठाणा, उमरी, निमटेक, परिसरातील हजारो गावे मदत करण्यास पुढे येतात. निर्वाणी-रुद्र शिवाचार्य आपल्या भक्तांना प्रवचनातून वीरशैव समाजाचे तत्त्वज्ञान सांगून त्यांना भक्तीमार्गात विलीन करतात. भक्ताच्या आचार-विचारात गुरुच्या वाणीमुळे परिणाम होत असतो. शिवाचार्य यांनी मठामध्ये अनेक कार्य करुन मठाची दिनदर्शिका काढली आहे. त्यामध्ये वर्षातील सर्व मठाची दिनदर्शिकाद्वारे त्यांचे कार्यक्रमाचे नियोजन ठरत असते. समाजातील राजकारणी, प्रतिष्ठित व्यापारी, शेतकरी यांचा सदैव गुरुला सदिच्छा भेट असते. गुरुचा आशीर्वाद त्यांना असतो. निर्वाणमठामधून दीक्षा संस्कार, इष्टलिंग पूजा, श्रावण सोमवार, मंत्रोपदेश, गुरुपरंपरा, बालसंस्कार यामधून केले जातात. निर्वाणी मठामध्ये दीपोत्सव दरवर्षी होत असतो. त्या माध्यमातून ते धर्मसभा, वीरशैव तत्वज्ञान सांगून लोकांना एकत्र आनण्याचे कार्य निर्वाणीरुद्र पशुपती शिवाचार्य करत असतात. "जनमानसात प्रकाश पेरणारा नागठाण्याचा 'दीपोत्सव' हा कार्यक्रम एक पणती उजळली की कितीही दाट काळोख असो तो अनेक पणतीद्वारे दूर होतो. तोच भविष्यातील प्रकाशपर्वाचा तो प्रारंभ असतो." "भगवान शिवशंकर आराध्य असलेले सिद्धेश्वर कुलदैवत निर्वाणी महाराज जयंती उत्सव, मार्गशिष, प्रतिपदा दीपोत्सव कार्यक्रम अनेकांच्या जीवनात प्रकाश आणण्याचा कार्य करतो." दीपोत्सव कार्यक्रमाला पंचक्रोशीतील हाजारो भाविक या कार्यक्रमात हजेरी लावतात. बाल तपस्वी १०८ निर्वाणरुद्र पशुपती शिवाचार्य महाराज यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम दरवर्षी घेतला जातो. त्याचदरम्यान रक्तदान शिबीर आरोग्य शिबीर, वीरशैव लिंगायत समाजाच्या शिवाचार्याची धार्मिक सभा या ठिकाणी होऊन समाजाला मार्गदर्शन केल्या जाते. बाल तपस्वी निर्माण रुद्र पशुपती शिवाचार्य यांच्या संकल्पनेतून नवनवीन कार्यक्रम नागठाणा परिसरात घेतले जातात. भंडाराचा महाप्रसाद असतो, मठातील महाप्रसादाला अनेक भाविक येतात. अशा अनेक धार्मिक विचाराचे पालन गावातील भक्त मंडळी करत असतात. यामुळेच मठामध्ये धार्मिक वातावरणाची नांदी सुरु झाली आहे. त्याचे सर्व श्रेय गुरु शिवाचार्यांना द्यावे लागेल.



## ५.८ खाकेश्वर मठ संस्थान, कासराळी

नांदेड जिल्ह्याच्या शेवटच्या टोकाला म्हणजे महाराष्ट्र - तेलंगणा राज्याच्या रोडवर हे कासराळी गाव आहे. या रोडपासून १ कि.मी. अंतरावर वीरशैव लिंगायत समाजाचे खाकेश्वर मठ आहे. हा मठ शहराच्या मध्यभागी असून मठाची इमारत आज क्षणी मोडकळीस आलेली आहे. खाकेश्वर मठामध्ये खाकेश्वर महाराजाची समाधी आहे. खाकेश्वर मठाला शिवाचार्याची परंपरा निळकंठ शिवाचार्यापासून सुरु झाली. खाकेश्वर मठाला प्राचीन वारसा लाभलेला आहे. पण आज कोणताही दस्तावेज कासराळीकर शिवाचार्याजवळ उपलब्ध नाही. केदार जगद्‌गुरु यांच्या पट्टाभिषेकाने खाकेश्वर मठावर निळकंठ लिंग शिवाचार्य कासराळीकर हे विराजमान झाल्यापासून मठाला एक अध्यात्मिक केंद्राचे रुप आले आहे. खाकेश्वर मठाच्या मार्फत इष्टलिंगपूजा, महाशिवरात्र, दीक्षासंस्कार यात्रा, खाकेश्वर जयंती, पूण्यतिथी, श्रावणमास अशा अनेक कार्यक्रमाची सुरुवात शिवाचार्यांनी सुरु केली आहे. पंचाचार्याच्या हिमवत केदारपीठाची शाखा खाकेश्वर मठ संस्थान आहे. मठाचे वैराग्य सिंहासन असून भृंगी गोत्र आहे. त्यांचा वेनुदंड (वेळु) आहे. कमंडलू लोखंड आहे. तर वस्त्रे ही निळी आहेत. पंचाक्षर सुक्ष्म पंचाक्षरी असून वेद सामवेद आहे. खाकेश्वर मठामध्ये दोन वर्षापूर्वीच श्री निळंकठ लिंग शिवाचार्य यांचा पट्टाभिषेक झाल्यामुळे काही दिवसात त्यांनी मठाचा विकास करण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे.

श्री १०८ निळकंठ लिंग शिवाचार्य कासराळीकर यांनी पदयात्रा, तपोनुष्ठाण, दीपोत्सव असे कार्यक्रम करुन वीरशैव लिंगायत समाजामध्ये अध्यात्माची गोडी निर्माण केली आहे. दीक्षा संस्कार, रक्तदान शिबीर, आरोग्य शिबीरे, त्रिकाल पूजा या मधुन त्यांनी कासराळी हे गाव भक्तीमय करण्याचा प्रयत्न केला आहे. खाकेश्वर मठाची जमीन असून ते गावातील प्रतिष्ठित व्यक्तीकडे आहे त्यामुळे त्यांच्यातून येणारे उत्पन्न हे मठाच्या विकासासाठी वापरले जाते. त्याचबरोबर लोकांनी दिलेली देगणी यावर सुद्धा विकास करण्याचा प्रयत्न केला जातो. "खाकेश्वर मठाचे शिवाचार्य हे अनेक धार्मिक कार्यक्रमामध्ये सहभागी होतात. अनेक ठिकांनी प्रवचन,

गुरुपौर्णिमेच्या दिवशीचा कार्यक्रम या ठिकाणी अनेक शिष्य मंडळींना गुरुच्या आशीर्वादरुपी विचारातून मिळत असतो." वीरशैव लिंगायत समाजामध्ये गुरुला अत्यंत आदरणीय स्थान आहे. त्यामुळे गुरुच्या निवासाने मठामध्ये शिष्यांना ज्ञानरुपी भांडाराची गरज आहे. कासराळी गावातील ग्रामस्थ नित्य नियमाने गुरुच्या प्रवचनाचा लाभ घेतात. श्री १०८ निळकंठलिंग शिवाचार्य कासराळीकर हे कपिलधार निघणाऱ्या पदयात्रेला सहभागी असतात. गावातील अनेक वीरशैव बांधव या पदयात्रेमध्ये सहभागी होतात.

### ५.९ शिवलिंगेश्वर मठ संस्थान, तमलूर

नांदेड जिल्ह्यातील वीरशैव लिंगायत समाजाचे संस्कार केंद्र म्हणून मठाला स्थान आहे. मठामधील शिवाचार्य आध्यात्मिक, बौद्धिक, संस्कारिक ज्ञान देवून भक्ताला अनेक विचार कृतीत उतरविण्यास सांगतात. शिवलिंगेश्वर मठ संस्थानाचे श्री १०८ शिवाचार्य सद्‌गुरु शिवानंद महास्वामीजी यांनी भक्ताला ज्ञानरुपी सागराचा सहवास लाभण्यासाठी मठाच्या सानिध्यात येणे खुप गरजेचे आहे. प्राचीन परंपरेनुसार गुरुच्या आशीर्वादाने भक्ताचे कल्याण होत असते. मठाच्या सानिध्यात आल्यामुळे शिष्य वर्ग संस्कारमय जीवन जगतील. नांदेड जिल्ह्यातील तमलुर हे गाव नांदेड - देगलूर रोडवर खानापूर फाट्यापासून ३० कि.मी. अंतरावर आहे. शिवलिंग बादशहा मठाची शाखा आहे. उज्जैनी पंचपीठाची शाखा असून नंदी गोत्र आहे. "तमलुर मठामध्ये, गुरुपौर्णिमा, दीक्षा संस्कार, नवरात्र महोत्सव, श्रावणमास, आरोग्य, रक्तदान शिबीरे मठामार्फत घेतले जातात."

शिवलिंगेश्वर मठ संस्थानामध्ये धार्मिक कार्याबरोबर शिवाचार्य अनेक सामाजिक कार्यात सुद्धा सहभागी होतात. अनेक तपोनुष्ठानमध्ये प्रवचन करुन शिष्याचे प्रबोधन घडवून आणतात. मठही वीरशैव लिंगायत समाजाची धार्मिक श्रद्धास्थळे असून गुरुचा विचार म्हणजे त्यांचा प्रसार असतो. अशा प्रसादरुपी विचारातून श्री १०८ शिवाचार्य सदगुरु शिवानंद महास्वामीजी आपल्या शिवलिंगेश्वर मठ संस्थानामार्फत तमलूर येथील भक्त गणाला धार्मिक संस्काराचे व सामाजिक प्रबोधनाचे ते धडे शिकवत असतात.



### ५.१० हिरेमठ संस्थान हणेगाव :

नांदेड जिल्ह्यातील वीरशैव समाजाची मठपरंपरा कर्नाटक राज्यापर्यंत पोहचलेली दिसून येते. नांदेड जिल्ह्यातील हणेगाव हे मठ संस्थान त्याचे प्रतीक आहे. कारण देगलूरपासून ३२ कि.मी. अंतरावर हे हिरेमठ संस्थान हणेगाव ठिकाणी आहे. हिरेमठ मठसंस्थान हे पंचपीठ रंभापुरीचे शाखा मठ असून वीर गोत्रीय आहे. मुखाचे रंग हिरवा असून दिशा पूर्व आहे. पंच गणाधीश्वर रेणुक असून उत्पत्तीस्थाने कोल्लिपाकी, सोमेश्वरलिंग आहे. सिंहासनाचे वीर सिंहासन आहे. हिरेमठ मठाचे दंड हे पिंपळ असून कमंडलू श्वेतवर्ण आहे. वस्त्रे हिरवी आहेत आणि वेद ऋग्वेद आहे. हिरेमठ मठ संस्थानाचे सध्याचे शंकरलिंग शिवाचार्य हणेगावकर यांच्या मार्गदर्शनानुसार अनेक धार्मिक कार्यक्रम मठामध्ये पार पाडले जातात. हणेगाव येथील मठामध्ये गुरुपौर्णिमा, नवरात्र महोत्सव, शिवरात्र, श्रावणमास, दीक्षा संस्कार, अखंड शिवनाम सप्ताह हे मठामध्ये घेतले जातात. शंकरलिंग शिवाचार्य महास्वामीजी यांच्या अनेक प्रवचनातून हणेगाव वासीयांना आध्यात्मिक गोडी लागली आहे. मठाच्या मार्फत अनेक सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम पार पाडले जातात व वीरशैव लिंगायत तत्त्वज्ञानाची रुजवण ही मठामधून करण्याचे कार्य हिरेमठ संस्थानातील शिवाचार्य करत असतात.

### ५.११ गणाचार्य मठ संस्थान मुखेड :

नांदेड जिल्ह्यातील मुखेड हा तालुका नांदेडच्या दक्षिणेस ८५ कि.मी. वर वसलेला आहे. मुखेड तालुका मन्याड, लेंडी, तीरु नदीच्या खोऱ्यात वसलेला असून या तालुक्यात बालाघाटच्या उपरांगा पसरलेल्या आहेत. "मुखेड तालुका निसर्गरम्य वातावरणात वसलेला असून राष्ट्रकुट चालुक्य काळात या शहराला मोहनावती म्हणून संबोधल्या जात असे." या शहराला पौराणिक परंपरा लाभली असून अनेक प्राचीन मंदिरे विरभद्र देवस्थान यामुळे शहराच्या प्राचीनतेत वैभवाची भर पडली आहे. त्याचबरोबर मुखेड या ठिकाणी प्राचीन महादेव मंदिर आहे. मुखेडचे ग्रामदैवत असलेल्या विरभद्राचा मठ भव्य आहे. वीरशैव लिंगायत समाजाच्या शिवाचार्यांनी मध्ययुगीन काळात या मठाची स्थापना केली आहे. या मठामध्ये विरभद्राची मूर्ती

आहे व मूर्तीच्या मुखाला चांदीचे डोळे, नाक, मिशा लावल्या असून चांदीचा मुकुट डोक्यावर आहे. मठामध्ये कार्तिकी पौर्णिनंतर विरभद्राची भव्यदिव्य यात्रा भरते. यावेळी येथे पालखी निघते. मुखेडच्या वैभवात भर टाकणारे वीरशैव लिंगायत समाजाचे गणाचारी मठ मुखेड या शहराच मध्यभागी आहे. हा मठ वीरशैव लिंगायत समजाच्या पंचपीठाच्या उज्जैन पीठाशी म्हणजेच (नंदी गोत्राशी) संलग्न असून उज्जैन पीठाच्या हा मठ स्थापन केल्याचे समजते. हा मठ २५० वर्षापूर्वीचा वारसा लाभलेला आहे. मुखेडच्या गणाचारी मठामध्ये प्रवेश करण्याअगोदर उंच दगडी चौथऱ्यावर मठाचे प्रवेशद्वार असून ते उत्तराभिमुख आहे. मठामध्ये प्रवेश केल्यानंतर मठामध्ये गुरुच्या संजीवन समाध्या आहेत. मठामध्ये प्रवेश केल्यानंतर विरुपाक्ष शिवाचार्य महाराज यांनी गणाचारी मठाच्या गादीचे आसन व्यवस्था आहे. विरुपाक्ष महास्वामीजी हे कन्नडमध्ये उच्च विद्याविभुषीत आहेत. विरुपाक्ष महास्वामीजीनी आपल्या धार्मिक तत्त्वज्ञानामध्ये पीएच.डी. गुलबर्गा विद्यापीठातुन मिळालेली आहे. श्री १०८ शिवाचार्य विरुपाक्ष महास्वामीजींनी पडझड झालेल्या मठाचे बांधकाम सुरु केले आहे. त्याचबरोबर नव्या मठाची त्यांनी प्रतिकृती तयार करुन मठ तशा साक्षात उतरविण्याची भक्त गणांना मनोदय व्यक्त केला आहे. श्री १०८ डॉ. विरुपाक्ष शिवाचार्य महास्वामीजी यांचे भक्तगण नांदेड जिल्ह्यातील परिसराबरोबरच कर्नाटक, आंध्रप्रदेश मध्ये सुद्धा आहेत. विरुपाक्ष महास्वामीजी गुरुच्या पुण्यतीथ्या, वेगवेगळे धार्मिक कार्यक्रम, पारायण, इष्टलिंगपूजा, किर्तन, मुळ समाधीला रुद्राभिषेक, नवरात्रात कुमारिका पूजन, गुरुपौर्णिमा, महात्मा बसवेश्वर जयंती, रक्तदान शिबीरे, वेगवेगळ्या कार्यक्रमाला हजेरी, वीरशैव लिंगायत समाजाबरोबर इतरही समाजाच्या कार्यक्रमाला ते हिरीरिने सहभागी होतात. मुखेड हा गुरुमठ असून या मठाची मेहकर या ठिकाणी शाखा आहे. श्री डॉ. विरुपाक्ष शिवाचार्य यांचे अनेक ठिकाणी कार्यक्रम होतात. प्रवचन, धर्मसभा, तपोतुष्ठाण अशा वेगवेगळ्या कार्यक्रमामध्ये ते नेहमी सहभागी होतात. गुरुपौर्णिमेच्या दिवशी तर गुरुच्या आशीर्वादासाठी व प्रवचनासाठी हजारो भक्तगण मठामध्ये रांगा लावतात. त्याच दिवशी कार्यक्रम संपल्यानंतर पूजा पूर्ण झाल्यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम केला जातो. त्यामध्ये अनेक भक्तगण सहभागी होतात.



गणाचारी मठामध्ये गुरुच्या आदेशानुसार संस्कृत पाठशाळा चालत असते. त्यामध्ये परिसरातील अनेक विद्यार्थ्यांना समाजाचे ज्ञान आत्मसात करण्यासाठी येत असतात. या मठाला श्री १०८ विरुपाक्ष महास्वामीजीचे सतत मार्गदर्शन असल्यामुळे वीरशैव लिंगायत समाजाचे हे मठ श्रद्धास्थान व आशास्थान बनले आहे.

### ५.१२ सदगुरु अपरंपार स्वामी मठ संस्थान, मुदखेड

मुदखेडचा मठ हा शहराच्या मध्यभागी आहे. या परिसरात अनेक वीरशैव लिंगायत समाजाचे घरे आहेत. नांदेड मुख्यालयापासून २० कि.मी. अंतरावर मुदखेड हे गाव आहे. मठ बारड रोडवर शहराच्या बाजूला आहे. सदगुरु अपरंपार स्वामी मठ वीरशैव लिंगायत समाजाच्या पंचपीठापैकी रंभापुरी पीठाची शाखा आहे. मठाचे मुळ संस्थापक हे अपरंपार स्वामी यांच्या नावाने हा मठ ओळखला जातो. मठ सहाशे वर्षापूर्वीचा असून ह्या मठाला धार्मिक व प्राचीनतेचा वारसा लाभलेला आहे. अपरंपार स्वामी मठाचे प्रवेशद्वार हे उत्तरभिमुख असून ते विटांनी बांधलेले आहे. मंदिराचे बांधकाम खुप जूने आहे. मठामध्ये प्रवेश केल्यानंतर मुळ दगडी बांधकाम असलेली परंपरा आहे व बाजुलाच इतर गुरुच्या समाध्या आहेत. अपरंपार मठामध्ये आजुबाजूच्या परीसरातील अनेक भक्त गण या मठात येत असतात. सध्या मठाचा कारभार ट्रस्ट मार्फत चालत असून सध्या या मठाचे शिवाचार्य कोण आहेत ते येथील सचिव सांगू शकतील. मठामध्ये १४ वर्षापूर्वी ईश्वर महाराज या मठामध्ये होते. परंतु ते या ठिकाणाहून चाभरा परिसरातील मन्मथस्वामी मंदिराची निर्मिती करुन तेथे वास्तव्यास गेले आहेत. परंतू तेथील मठाचा वाद असल्यामुळे मठाचा खरा वारसदार कोण याविषयी सध्या मतभेद आहेत. या मठाला प्राचीन परंपरा असल्यामुळे शिवरात्री, दत्तात्रय जयंती, अपरंपार स्वामीजीच्या नावाने यात्रा भरते. किर्तन, भजन, अग्निपूजा, पालखी, मिरवणुका इ. कार्यक्रम या मठामध्ये घेण्यात येत होत्या.

अपरंपार स्वामी मठाच्या अनेक शाखा आहेत. त्यामध्ये पाटनुर, शेंबोली, वसमत, मालेगाव या ठिकाणी शाखा मठ आहेत. अपरंपार स्वामी मठाच्या अंतर्गत नांदेड तामसा रोडवर निर्मल डोंगर रांगेमध्ये अपरंपार स्वामीचे मंदिर पाटनूर पासून ३

कि.मी. व तामसा रोडवरुन ३ कि.मी. अंतरावर उंच टेकडीवर हे मंदिर आहे. या मंदिरात अनेक समाध्या आहेत. पाटनुर येथे मठ असून त्याचा कारभार गुरुमाऊलीकडे आहे. मठाच्या उत्पन्नासाठी जमीनी दान दिलेल्या आहेत. त्यामार्फत मठाचे आर्थिक कारभार चालला जातो. अपरंपार महादेव मंदिर अतिप्राचीन हेमाडपंथी मंदीर आहे. या मंदीरात श्रावण महिन्यात या मंदीरात पूजा-हवन व भंडाऱ्याचे आयोजने केल्या जातात. अपरंपार मठामध्ये जे भक्त येतात ते अपंरपार महादेव मंदिरात येत असतात. दर सोमवारी भक्ताची मोठी गर्दी या ठिकाणी असते.

### ५.१३ राजुर मठ संस्थान, अहमदपूर

राजूर मठ संस्थान अहमदपुरला असून हा मठ जरी नांदेड जिल्ह्यामध्ये जरी नसला तरी अहमदपुरच्या डॉ. राष्ट्रसंत शिवलिंग शिवाचार्य महाराजाचे भक्त मोठ्या प्रमाणात नांदेड जिल्ह्यामध्ये आहेत. त्यामुळे या मठाची माहिती घेणे अतिशय महत्त्वाचे आहे. राजूर म्हणजेच आताचे अहमदपूर या ठिकाणी वीरमठ असून तो रंभापूरी शाखेचा मडिवाळ स्वामी प्राचीन मठ आहे. या मठाचे मुळ स्वामी रेकुलगीहुन राजुरला आले असा जुना उल्लेख सापडतो. राजुर मठाचे मुळ पुरुष मडवळ अप्पा असून आजचे डॉ. शिवलिंग शिवाचार्य यांच्या पर्यंतची गुरुपरंपरा चालू आहे. श्री १०८ राष्ट्रसंत शिवलिंग शिवाचार्य उच्चविद्या विभूषित व वीरशैव लिंगायत समाजाचे आशास्थान आहेत. त्यांचा पट्टाभिषेक हा इ.स.१९३७ साली झाला. तेव्हा पासून ते या मठाचे शिवाचार्य म्हणून कार्यरत आहेत. गेल्या कित्येक वर्षापासून अविरतपणे आजही वयाची १०० वर्षे पूर्ण करुनही धर्म प्रचाराचे कार्य चालू आहे.

राष्ट्रसंत शिवलिंग शिवाचार्य यांनी राजूर मठामध्ये अनेक धार्मिक कार्यक्रम घेतले इ.स. १९५४ पासून त्यांनी चापोली पासून कार्तिक शुद्ध पौर्णिमेला भरणाऱ्या मन्मथ स्वामीच्या कपिलधार यात्रेत शिवभजनासह पायी दिंडी सुरु केली. त्या दिंडीतून त्यांनी जागोजागी भजनी मंडळे स्थापन केली. नांदेड जिल्ह्यातील अर्धापूर, देगलूर, मुखेड, हदगाव तालुक्यातून अनेक भक्तगण या दिंडीमध्ये पायी जातात. कपिधार मन्मथ स्वामीचा खरा विकास राष्ट्रसंत शिवलिंग शिवाचार्यांनीच केला. मन्मथ स्वामीची दिंडी आजही अप्पाच्या ६३ वर्षाची परंपरा या दिंडीला आहे. या दींडीला अहमदपूरच्या



अप्पामुळे नांदेड जिल्ह्यातील अनेक मठाच्या शिवाचार्याच्या मार्फत त्यांच्या परीक्षेत्रातून दिंड्या ह्या शेवटी एकत्र कपिलधार येथे मिळतात. जसा अनेक उपनद्या सागरास मिळतात. त्याच प्रमाणे प्रत्येक दिंड्या शेवटी कपिलधार या ठिकाणी मिळतात. राजूर मठामध्ये राष्ट्रसंत शिवलिंग शिवाचार्याच्या मार्गदर्शनानुसार इष्टलिंगपूजा, गुरुपौर्णिमा, दीक्षा संस्कार, परमरहस्यपारायण, बसवेश्वर जयंती, पारायण सोहळा, शिवभक्तीचा प्रसार इ. कार्य या मठामधून अप्पाच्या मार्गदर्शनानुसार होत असतात. राष्ट्रसंत शिवलिंग शिवाचार्याचे प्रवचन ऐकण्यासाठी लाखो त्याचे अनुयाची कोणत्याही कार्यक्रमात सहज उपलब्ध होतात. नांदेड जिल्ह्यामध्ये अनेक समाज प्रबोधनावर त्यांनी शिबीरे घेतली आहेत. निस्वार्थपणे ते धर्मप्रसार करतात. शिवलिंग शिवाचार्य यांनी परमरहस्यग्रंथ, सिद्धांत सिखामणि, मन्मथस्वामीचे चरित्राची निर्मिती केली आहे. अनेक शिक्षणसंस्था, वसतिगृहातून शैक्षणिक उपक्रमाना त्यांनी मठामधून चालना दिली आहे. सध्या काळातील तरुणाईला निर्व्यसनी बनविण्याची आवश्यकता वाटल्यामुळे त्यांनी 'शिवा संघटनेच्या माध्यमातून तरुणाला नैतिक अधिष्ठान प्राप्त करुन देण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे.' राष्ट्रसंत शिवलिंग शिवाचार्य यांनी मन्मथ स्वामीनी सांगितलेल्या साध्या सोप्या भक्तिमार्गाचा अवलंब करुन महाराजांनी तो जनसामान्यापर्यंत पोहचविण्याचे अभूतपूर्व कार्य त्यांनी नांदेड जिल्ह्यामध्ये केले आहे. अनेक लोकांना भक्तीमार्गाची शिकवण ठेवून त्यांचे जीवन उन्नत करण्याचा प्रयत्न त्यांनी केला व ते आजही करतात. अप्पा आपल्या शिष्यांना सांगत असतात की,

'शिवसंस्कार सुकलेषु जातिभेदानविधते'

म्हणजेच जो शिव संस्काराने युक्त असतो तो सदाचार संपन्न आहे. तो वीरशैव आहे वीरशैव लिंगायताचे मुख्य चिन्ह इष्टलिंग आहे. तो प्रत्येक व्यक्तीजवळ असलाच पाहिजे. त्याशिवाय तो वीरशैव होऊच शकणार नाही. भस्म त्रिपुंडू असणे त्याचबरोबर रुद्राक्ष हे अत्यंत महत्त्वाचे व उपयुक्त आवरण आहे. म्हणूनच या आवरणाविषयी वीरशैव परंपरेत अत्यंत महत्त्व आहे. भक्तांनी नेहमी जीवनाच्या साधनेकरिता खालील कृती करणे आवश्यक आहे.

"भाळी भस्मलिंगगळा।
शोभे रुद्राक्षाच्या माळा।।
मुखी मंत्र पंचाक्षर।
धन्य धन्य ते शरीर।।"

म्हणजेच भक्तांनी भस्म, रुद्राक्ष धारण केल्याशिवाय त्याला शिवपूजेचा अधिकारच नाही असे म्हटले आहे. असे अनेक विचाराची पेरणी करुन राजूर हे मठ भक्तीचे माहेरघर बनले आहे. मठामध्ये भक्तांना राहण्याची त्यांच्या जेवणाची सोय केली जाते. अप्पाच्या आशीर्वादासाठी अनेक लोक पुणे, मुंबई, कर्नाटक, आंध्रप्रदेश, विदर्भ या ठिकाणाहुन दर्शनास येत असतात. त्यामुळे राजूर मठ जरी नांदेड जिल्ह्यामध्ये नसले तरी त्या मठाशिवाय नांदेड जिल्हा पूर्ण होऊ शकणार नाही.

राष्ट्रसंत शिवलिंग शिवाचार्य चाभरा येथील प्रवचनात म्हणतात की, "भारत देश हा साधु, संतांचा देश आहे. त्यामुळे भारतात अनेक धर्म, जाती, जमाती असुनही साधुसंतांच्या विचारामुळे भारतात सर्वच बंधु-भावाने वागतात, परंतु आपल्या कर्माने कोणी बंगल्यात राहतो तर कोणी झोपडीत राहतो."गरीबी श्रीमंती न पाहता बंगल्यातील लोकांनी झोपडीत राहणाऱ्या लोकांची जाण ठेवून यथाशक्ती प्रमाणे सहकार्य करावे. जेणेकरुन लोकांनमध्ये मतभेद निर्माण होऊ नयेत यासद्याठी प्रवचन नेहमी देत असतात.

### ५.१४ श्री गुरु बुद्धिस्वामी मठ संस्थान, पूर्णा

मराठवाडा ही संतांची भूमी आहे. संतांच्या पावन स्पर्शाने भूमी पावन झालेली आहे. याच भूमीमध्ये श्री गुरु बुद्धिस्वामी मठ आहे. श्री गुरु बुद्धिस्वामी यांच्या कार्याने पावन झालेली 'लक्ष्मीवन' भूमी आज पूर्णा म्हणून ओळखली जाते. प्राचीन काळापासून पूर्णा या तालुक्याला ऐतिहासिक परंपरा लाभलेली आहे. प्राचीन काळात 'लक्ष्मीवन' या नावाने ओळखण्यात येणाऱ्या लक्ष्मीवनाला 'लासीना' या नावाने ओळखले जाते. आज पूर्णा या नावाने हा तालुका ओळखला जातो. वीरशैव लिंगायत परंपरेचा वारसा लाभलेले लासीना किंवा लक्ष्मीवनाचे भुषण ठरलेले श्री गुरु बुद्धिस्वामी यांचा परिचय अतिशय महत्त्वाचा आहे. लासीना येथील मठाला



प्राचीन परंपरा लाभलेली आहे. उज्जैनी नगरीतील वटक्षेत्र सिद्धेश्वरलिंगातून जगद्गुरु मरुळाराध्य शिवाच्या प्रमुख पंचगंगापैकी एका मध्ये अवतरले. नंदीगोत्र असलेल्या मठाचे उज्जैनीची शाखा मठ आहे. मरुळराध्य शिवाचार्य हे यवनाच्या त्रासामुळे छिंदवाडा जिल्ह्यातील पांडूरर्णा मार्ग लक्ष्मीवन या ठिकाणी श्री बुद्धिस्वामी मठ या नावाने प्रसिद्ध असलेल्या मठातील सिद्धेश्वर शिवलिंगाच्या जागी येवून थांबले व तेथून ते निघून गेले. निघुन जात असतांना त्यांनी पळसाच्या झाडाच्या काठीचा ध्वजदंड तिथे रोवला त्याला काही काळानंतर तो ध्वजदंड पल्लवीत झाला. श्री गुरु बुद्धिस्वामीनी सामाजिक विकासाच्या दृष्टीकोणातून महाराजांनी कोणताही भेदभाव न मानता समाजाची सेवा करण्याचे काम सतत केले आहे. गुरुनी समाजाला धनसंपन्न होण्यापेक्षा आरोग्य संपन्न व्हा असा संदेश देवून समाजाला वाईट मार्गापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. याच बरोबर वीरशैव लिंगायत तत्त्वाचा प्रसार करण्यासाठी कार्य केले. वैशाख शुद्ध पंचमी या दिवशी मुळ आचार्याच्या अवतार दिना बरोबरच नवरात्रोत्सव साजरा केला जातो. विजयादशमीच्या दिवशी स्वर्णपालखीत बसून लक्ष्मीवन परीसरातून सिमोल्लंघनाची पद्धत आजही सुरु आहे. गुरु बुद्धिस्वामी यांच्या नंतर ती परंपरा श्री १०८ नंदिकेश्वर स्वामीजी हे परंपरा चालवत आहेत. मठामध्ये श्री गुरु बुद्धिस्वामीची संजीवन समाधी असून नित्य नेहमी अनेक कार्यक्रम श्री १०८ नंदिकेश्वर महास्वामीजी करत असतात. लासीना मठाच्या एकूण ३६४ शाखा असून हयातनगर, गौर तसेच लासिना मठ आहेत. त्या ठिकाणी या मठाची शाखा मठे आहेत. आंधप्रदेश, कर्नाटक, मध्यप्रदेश, महाराष्ट्रातील काही भागात या मठाची शाखा मठे आढळून येतात.

सन १९८२ मध्ये मराठवाड्यात अतीवृष्टी झाली होती. या अतिवृष्टीत लासीना मठाची दुमजली इमारत कोसळली व यामध्ये अनेक प्राचीन हस्तलिखित ग्रंथ, कागदपत्रे संपुष्टात आले. यावेळी विराजमान श्री १०८ सदगुरु नंदिकेश्वर शिवाचार्य हे देऊळगाव ता. लोहा येथे अनुष्ठानास बसले होते. त्याच वेळेस या नैसर्गिक आपत्तीमध्ये या गुरु बुद्धिस्वामी मठाचे बरेच नुकसान झाले. लासीना मठामध्ये गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर मोठा उत्सव साजरा करण्यात येतो. लासीना मठामध्ये

गुळाची खिर आणि 'उलपल्ली' हा महाप्रसाद केला जातो. श्री गुरु बुद्धिस्वामी महाराजांची संजीवन समाधी असल्यामुळे या ठिकाणाला वीरशैव लिंगायत समाजाच्या धार्मिक व अध्यात्मिक परंपरेला अनन्य साधारण महत्त्व आहे. मठाच्या माध्यमातून अनेक धार्मिक कार्यक्रम घेतले जातात. त्यामध्ये इष्टलिंगपूजा, गुरुपौर्णिमा, तपोनुष्ठान, शिवरात्र, नवरात्र महोत्सव, रक्तदान शिबीरे, गुणवंतांचा सत्कार मठामध्ये वेगवेगळे कार्यक्रम घेतल्या जातात. श्री १०८ नंदिकेश्वर शिवाचार्य हे उच्चविद्या विभुषित असून अनेक शैक्षणिक संस्थांची त्यांनी निर्मिती केली आहे. मठाजवळ त्यांनी शैक्षणिक प्रसार व्हावा यासाठी मठाच्या परीसरात श्री शिवाचार्य विद्यालयाची स्थापना केली. श्री गुरु बुद्धिस्वामी महाविद्यालयाची निर्मिती करण्यात आली आहे. श्री १०८ नंदिकेश्वर महास्वामीजी या महाविद्यालयाचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत. यावरुन लक्षात येते की त्यांच्या कार्यामुळे पूर्णा शहरामध्ये गोर-गरिब विद्यार्थ्यांना शिक्षणाचा लाभ घेता येत आहे.

श्री गुरु बुद्धिस्वामी मठाच्या माध्यमातून श्री १०८ डॉ. नंदिकेश्वर शिवाचार्य महास्वामीजी समाजाच्या कल्याणासाठी अनेक शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक कार्य करत आहेत. ही बाब पूर्णा वासियांची पुण्याची गोष्ट आहे. श्री डॉ. नंदिकेश्वर महास्वामीजी मठाच्या माध्यमातून समाजाला प्रेरणा मिळणारे कार्य ते सतत करत असतात. त्यामुळेच त्यांचे भक्त नांदेड जिल्ह्यामध्ये सुद्धा आहेत. त्यामुळे नांदेड जिल्ह्याची वीरशैव मठपरंपरा पूर्णा, अहमदपूर, वसमत मठाच्या पूर्णत्वाशिवाय ही परंपरा पूर्ण होऊच शकत नाही. "शिवाचार्य नेहमी आपल्या धार्मिक कार्यातून म्हणजे मन्मथ स्वामीच्या दिंडीतून प्रवचन, प्रबोधन, शिबीरे ते घेत असतात. म्हणून श्री डॉ. नंदिकेश्वर शिवाचार्य महास्वामीजी श्री गुरु बुद्धिस्वामी महाराजांची परंपरा चालवताना मानवसेवा हीच ईश्वरसेवा मानून कार्य करत असतात."

'जन्मा अलियाचे फळा गुरु भेटी एक वेळ ।
गुरुक्षेत्र डोळा पाहू । अवघा आनंदाचा काळ ।।'

मानवाचा देह हाची महालाभ, उपाय सुलभ सापडला, जीवनामध्ये चिरंतन शांती, सुख, समृद्धी प्राप्त व्हावी म्हणून मनुष्य नको तिथे भटकंती करतो. धडपड करणे व



मनाजोगे प्राप्त करुन घेणे हा त्यांचा स्वभाव आहे. मनासारखे झाले नाही तर तो उद्विग्न होतो. अशांती मनाला व जीवाला सातत्याने अस्वस्थ करते.

'काय करु कोठे जावू ।
काय अंगा राख लावू ।।'

असे होवून जाते परंतु कलीयुगामध्ये सुद्धा गुरु क्षेत्रासारखे साधन आहे. पूजा, ध्यान, धारणा, योग, अनुष्ठान यासाठी गुरुक्षेत्र मुक्तीचे माहेर आहे. यात शंकाच नाही.

'धन्य भाग्य त्याचे, वसे गुरुक्षेत्री
मनाचे मनोरथ साध्य होईल'

असे म्हणत ते उगीच नाही अम्हा तेसे पूण्यवंत कोणी नसे त्रेलोक्यात असे थोर भाग्य पूर्णा वासियाचे प्राप्त झाले सर्व सुख. सर्वात महत्त्वाचे म्हणजे सजीवन समाधिस्त बुद्धिस्वामी सारखे संत विभूती या नगरीमध्ये अवतरले आरती गाताना कवीराज म्हणतात,

"मनोभावे करु आरती नन्जकेश्वरा। गुरुवर्य नंदिकेश्वरा
कैलासाहुनी मूर्ती अवतरली लासिना या नगरा।"

कैलासिचा शिव गुरु रुपाने तिथे वास्तव्य करुन आहे. तर मग काय कैलासाला करावे कैलास साक्षात पूर्णेलाच अवतरला आहे असे म्हणावे लागेल. उज्जैनी जगद्‌गुरु पीठाची परंपरा असणारे एक महान लासिना पीठ पूर्णेत आहे. दक्षिणपंथी मुख असणारे हे सद्‌गुरुचे पूण्यक्षेत्र गावावरील सर्व संकटे दुर करत असते. चैत्र, शुद्ध प्रतिपदेच्या गुढीपाडवा उत्सवाने घरोघरी आनंदाने गुढ्या उभ्या केल्या जातात आणि लासिना मठामध्ये श्री गुरु बुद्धिस्वामीच्या सानिध्यात, नाम गजरामध्ये, भक्तीत विलिन सारे लोक होतात. गुरुभक्त श्री प्रसाद घेवून तृप्त होतात. स्थानिक भक्तांनी अखंड शिवनाम सप्ताहाचे सुद्धा आयोजन याच कार्यक्षेत्रात घडवून आणले. आषाढ मासामध्ये गुरुपौर्णिमेचा सोहळा मठामध्ये फार उत्साहाने संपन्न होतो. ज्ञानाचा आद्य स्त्रोत म्हणजे सद्‌गुरु जीवाला अंधारातून प्रकाशाकडे घेऊन जाणाऱ्या धर्म परंपरेशी शिकवण देणाऱ्या मोक्षदायक सदगुरुचे पूजन चिंतन आणि नामस्मरण गुरु पौर्णिमेच्या

दिवशी विधीयुक्त केले जाते. त्याच प्रमाणे आम्ही वीरशैव भक्त गुरुपौर्णिमेचा दिवस सदगुरु माऊलीच्या सानिध्यात साजरा करतो. गुरुपीठाचे पूजन, संजीवन समाधीला रुद्राभिषेक मंत्रपठण, सामुहिक इष्टलिंग पूजा, चिंतन, शिवनाम जप, शिवजागर अशा वेळी सर्व लक्ष्मीवन जगबजलेले असते.

'चिंतनात दिसती,
ओढ मनाची राहीना।
गुरुपौर्णिमेचा सोहळा,
पाहुद्यारे सदगुणाचा कृपा आशीर्वाद ।।

हा सोहळा आनंदाने पार पाडला जातो. श्रावण मासामध्ये परमार्थाची पर्वणी म्हणजे सद्‌गुरु माऊलीचे इष्ट लिंगपूजा अनुष्ठान महिनाभर श्री ष.ब्र.प्र. १०८ नंदिकेश्वर शिवाचार्य माऊली ध्यानस्थ असतात. पूजा, स्नान, भजन, चिंतन या कार्यामध्ये माऊलीचा अनुष्ठानाचा काळ मार्गी लागतो. प्रसंगानुसार शिवदीक्षा, शिवभजनाचे प्रशिक्षण, इष्टलिंगपूजा, शिवरुद्र संहिता असे अमृताचे डोस शिष्याला पाजले जातात. त्यानंतर मठामध्ये शिवकीर्तन, शिवजागराने व महाप्रसारदाने कार्यक्रमाची सांगता होते. असे पूण्यनगरी त्यामध्ये वैभवात भर टाकणारे श्री गुरु बुद्धिस्वामी मठ व श्री १०८ नंदिकेश्वर शिवाचार्य यामुळे हा परिसर कैलासाची जणू भूमी असल्यासारखे वाटते.

### ५.१५ श्री सिद्धेश्वर ग्रामदैवत लासिन मठ संस्थान, वसमत

।। वीरशैव सद्‌शं मतमस्ति जगत्रये ।।

वसमत येथील श्री सिद्धेश्वर ग्राम दैवत असलेले लासिन मठ संस्थान प्राचीन ऐतिहासिक पुरातत्व देवस्थान आहे. इ.स. ११३५ ते इ.स. १२ व्या शतकात दैव स्थान काळ समजला जातो. कालमर्यादा पुरातन वस्तू, दस्तऐवज, दगडी बांधकाम हस्तलिखित ग्रंथ या मठामध्ये उपलब्ध आहे.

स्कंद पुराण १५ वे खंड सह्याद्रीपर्वामध्ये मुळ संस्कृत सहितेत व अंतर्गत वसुमती पुराण या ग्रंथावरुन असे लक्षात येते की, वसुमती ही प्राचीन वारसा लाभलेली देवदानवाची फार पुरातन नगरी होती. दक्षिण उत्तर पूर्व पश्चिम प्रवास करणाऱ्या



भाविक लोकांचे मुक्कामाचे तीर्थक्षेत्राचे ठिकाण असणारी ही वसुमती नगरी नांदेड, परभणी, हिंगोली या तीन जिल्ह्याचे हृदयस्थान असलेली प्राचीन नगरी, दोन ज्योतिर्लिंगाच्या मध्ये असणारा परिसर त्यामुळे भारत भ्रमण करत असताना, मध्यप्रदेश, उज्जैन महाकालेश्वर येथून सदर्थ पिठ स्थलांतराचा प्रवासात जिथे-जिथे मुक्काम करायचा तिथे-तिथे आपल्या अनुयाया पैकी उत्तम अशा शिष्याला त्या-त्या ठिकाणच्या देवस्थान किंवा जागेवर नुतन सहधर्म पिठाचे शाखा मठ स्थापन करुन मठ निर्माण करीत गेले. तो काळ होता अकराव्या व बाराव्या शतकाचा ऐतिहासिक दस्ताऐवजानुसार सिद्ध होते. वसुमती या ठिकाणी सिद्धेश्वर मंदिर येथेच अशाच पद्धतीने पुढे आलेले आहे. श्री सिद्धेश्वर मंदिरामध्ये त्या काळचे उत्तम सिद्धी प्राप्त, शिवयोगी ईश्वर या अनुयायास या भैरवक्षेत्र असलेल्या सिद्धेश्वर महादेव मंदिर येथेच राहण्यास सांगून वसुमती ह्या नगरीची ऐतिहासिकता जपण्यास सांगण्यात आले. श्री सिद्धेश्वर महादेव मंदिर येथे राहून आराधना, करुन धर्मधुरा सांभाळून वीरशैव लिंगायत समाजाचे रक्षण करण्याची आज्ञा दिली. त्यामुळे या ठिकाणी संदर्भ सिंहासनीय, दारुक शाखिय, नंदिगोत्रीय वृष्टी सुभ्रीय उज्जैनी परंपरागत शाखा मठ, लासिन मठ, संस्थान स्थापन करुन या मठावर पहिले गुरु श्री १०८ ष.ब्र. ईश्वर शिवाचार्य महाराज तक्त सिंहासनावर विराजमान करुन कथा-रक्त वर्ण, धर्मदंण्ड, पलाव, तांब्र-कमंडलू कपिलेश्वराचे ध्यान, यजुर्वेदाचे उच्चारण, गोमेद लिंगाचे सकरी, वामदेवमुखी, उत्पत्ती, जपमयुरासनी, भुचरी मुद्रा गुरुचे ध्यान (म.) मकारबीजा अक्षरी माया पंचाक्षर जप असा मठाचा गुरु अनुग्रह असा आशीर्वाद देवून पुढे प्रवासाला निघाले. अशा प्रकारे आचार्य जगद्‌गुरु यांची आज्ञा प्राप्त करुन तेव्हापासून प्राचीन गुरुपरंपरा ही एकूण २४ होऊन गेले. त्यापैकी एकूण १३ समाधी वसमत मुळ संस्थान मठामध्ये उपलब्ध असून काही अन्य शाखा मठामध्ये शेतामध्ये उपलब्ध आहेत. श्री सिद्धेश्वर मठाचे बांधकाम चिरेबंदी बांधकाम १२ व्या शतकातील व काही १४ व्या शतकातील काही चुनामाती, मोगल, हेमाड मिश्र पद्धतीचे बांधकाम या मठाचे आहे. तसेच ५० फुटापैकी अधिक उंच चुना मातीचे शिखर तांब्याचे कळस या मठाचे शोभत आहे. इतिहास संशोधक समुद्रगुप्त पाटील

यांनी सुद्धा मुलाखतीतून सांगितलेले आहे की, नांदेड जिल्ह्यातील परिसरात भैरवाची मंदिरे होती. म्हणून वीरशैव लिंगायत परंपरेतील लासिन मठाची ऐतिहासिकता जैनधर्माच्या अतापर्यंतच्या २४ तीर्थकारावरुन समजते त्याच प्रमाणे या मठाची परंपरा आतपर्यंतच्या २४ गुरुच्या कार्यावरुन कळते. श्री सिद्धेश्वर मठातील शिवाचार्याची यादी जरी उपलब्ध जरी नसली तरी या मठाचे २२ वे आचार्य करबसव शिवाचार्य, २३ वे आचार्य ईश्वर शिवाचार्य, २४ वे विद्यमान ज्ञानपंडीत आचार्य श्री ष.ब्र. १०८ करबसव शिवाचार्य यांनी मठाची धुरा सांभाळलेली आहे. म्हणूनच या मठाला 'करबसव' 'शिबसव' अशी परपंरा या मठाला लाभलेली आहे.

श्री सिद्धेश्वर मठाचे २४ वे आचार्य श्री १०८ करबसव शिवाचार्य हे उच्च विद्याविभूषित, प्रचंड ज्ञानी, वीरशैव समाजाचे तत्त्वज्ञान, सिद्धांत सिखामणि, परमरहस्य, पंचाचार्याची परंपरा या सर्व ज्ञानामध्ये त्यांचे ज्ञान अमूल्य असे आहे. वीरशैव लिंगायत समाजाला प्रवचनातून अनेक ठिकाणी ते समाजप्रबोधन करतात. त्यांचा पट्टाभिषेक होऊन ते श्री सिद्धेश्वर मंदिर लासिन मठाचे २४ वे ते शिवाचार्य झाले आहेत. करबसव शिवाचार्याच्या चरणाने तेथील मठामध्ये अनेक नवनवीन उपक्रमाची नांदी निर्माण होत आहे. या मठाचे नांदेड, हिंगोली, परभणी जिल्ह्याबरोबरच महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश या ठिकाणी शिष्यगण आहेत व काही जिल्ह्यामध्ये शाखा मठ आहेत.

१) मुख्य संस्थान मठ - ग्रामदैवत सिद्धेश्वर मंदिर, लासिन मठ, वसुमती म्हणजेच आजचे वसमत होय. जि. हिंगोली.

२) नांदेड जिल्ह्यातील नांदेड जुने गाव व ईतवारा या परिसरामध्ये २ शाखामठ आहेत.

३) हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी तालुक्यातील हिवरा या ठिकाणी या मठाची एक शाखा आहे. त्याचप्रमाणे डोंगरकडा या ठिकाणी विश्वेश्वर मंदिर व शाखा मठ आहे. आखाडा बाळापूर शैवाळा या ठिकाण महादेव मंदिर व शाखा मठामध्ये ईनामपत्र उपलब्ध आहे. जवळा पांचाळ या ठिकाणी शाखा मठ असून वीरशैव भवन समाज मंदिर या ठिकाणी आहे.



४) अमरावती दहीसात या परिसरामध्ये अंबागेट नं. १ या ठिकाणी वसमतच्या मठाची शाखा आहे.

५) नांदेड जिल्ह्यातील दर्याबाई उमरी ता. हदगाव या ठिकाणी लासिन मठाची शाखा आहे.

६) परभणी जिल्ह्यातील पूर्णा तालुक्यातील मौजे गौर या ठिकाणी महदलिंग देवस्थान व ईनामपत्र उपलब्ध आहे.

७) कर्नाटक राज्यातील औराद जि. बिदर या ठिकाणी लासिन मठाची एक शाखा उपलब्ध आहे.

अशा अनेक ठिकाणी वसुमती या मठाची शाखा मठे अस्तित्वात आहेत. शाखा मठाबरोबरच या मठाचे भक्तगण ही संबंध भारतभर पसरलेले आहेत. श्री १०८ करबसव शिवाचार्य यांच्या प्रेरणेतून अनेक नवनवीन संदर्भ ग्रंथाची मठाच्या ऐतिहासिक माहितीची जूळवाजुळव करताना दिसत आहेत. सिद्धेश्वर मंदिरामध्ये अनेक हस्तलिखित ग्रंथाची व पुरातन कागदपत्राची साठवण शिवाचार्यानी केली आहे. त्यामध्ये सिद्धांत सिखामणि मुळ हस्तलिखित प्रत, परमेश्वरारत्न, लिंगपुरानम, कुमारसंभवम्, शिवपटस्तम, शिवलीलामृत, पाणिनीव्याकरण, अनुभवसुत्र, वीरशैवविधी, दीक्षाविधी, बसवपुराण, महादेव गाथा, मुलस्तंभ अशा एकूण १२ हस्तलिखित ग्रंथ त्यांच्या मठामध्ये संग्रही आहेत. आणि ती संशोधकांनी स्वतः पाहिलेली आहेत. या प्राचीन वारसेचा दस्तऐवज त्यांनी सांभाळून ठेवला आहे.

श्रावण महिन्यामध्ये वसुमतीनगरी आनंदाने फुललेली असते. अशा मंगलमय श्रावणामध्ये परमार्थाची पर्वणी म्हणजे सदगुरु शिवाचार्याची इष्टलिंगपूजा अनुष्ठान, श्रावण महिनाभर पूजा, भजन, प्रवचन, चिंतन या धार्मिक कार्यामध्ये अनुष्ठानाचा काळ जातो. वसुमती परिसरातील शिवभक्ताचे वीरशैव लिंगायत शिष्याचे इष्टलिंग पूजा, शिवरुद्र संहिता, अमृताचे डोस, प्रवचन, प्रसाद प्रवचन यामधून श्री १०८ करबसव शिवाचार्य भक्तांना मार्गदर्शन करतात. गुरु पौर्णिमेचा दिवस तर जिकडे तिकडे भक्तीमय वातावरण असते.

चिंतन दिस जाती, ओढ मनाची राहिना ।

गुरुपौर्णिमेचा सोहळा, पाहु द्यारे एक वेळ ।।

अशा सोहळा वसुमती या नगरीमध्ये पार पाडला जातो. गुरुच्या मार्गदर्शनानुसार अनेक धार्मिक कार्य पार पाडले जातात. श्री करबसव शिवाचार्य यांनी नांदेड जिल्ह्यातील हदगाव तालुक्यातील चाभरा या ठिकाणी कलशारोहणाच्या प्रसादाची सांगता हजारो भक्तांना सांगितली. त्यांच्या प्रवचनातून हजारो भक्त मंत्रमुग्ध झाले. अशा अनेक ठिकाणी वीरशैव लिंगायत समाजाचा प्रसार व समाजप्रबोधन ते करताना दिसतात. मराठवाड्यातील कपिलधार या ठिकाणी श्री १०८ करबसव शिवाचार्य सिद्धेश्वर मंदिरातून पदयात्रा आरंभ करतात. मन्मथस्वामीची पायी दिंडीमध्ये हजारो भक्तगण या पदयात्रेला वसमत मधून निघत असतात. प्रवचनातून समाजाला आध्यत्मिक वीरशैव तत्त्वज्ञानाचे प्रसाद शिष्य वर्गाला देत असतात. श्री करबसव शिवाचार्यानी अखंड शिवनाम सप्ताह, नवरात्रमहोत्सव, बसवेश्वर जयंती, शिवदीक्षा संस्कार, रक्तदान शिबीरात स्वतः रक्तदान केले. त्याच बरोबर वीरशैव लिंगायत समाजाच्या जोडप्यांचा विनामूल्य सामुहिक विवाह घडवून आणला. असे अनेक समाज प्रवर्तक शिवाचार्य श्री सिद्धेश्वर मंदिर लासिनमठाला मिळाले हे त्यांच्या शिष्यांचे भाग्यच म्हणावे लागले. म्हणून श्री १०८ करबस शिवाचार्य विषयी म्हणावेसे वाटते की,

"धन्य धन्य गुरु श्री करबसव शिवाचार्य।<br>
धन्य ती पावन वसुमती नगरी।।"

लासिनमठाच्या कार्यामुळे व गुरु करबसवच्या मार्गदर्शनामुळे वीरशैव लिंगायत समाजाचे गुरुच्या सानिध्यातच स्वर्ग प्राप्ती झाली आहे. जसे साखर खाल्याशिवाय त्याची गोडी कळत नाही. त्याच प्रमाणे गुरुच्या सानिध्यात आल्याशिवाय गुरुची प्रचिती होत नाही. गुरुच्या सानिध्यात स्वर्ग प्राप्ती आहे. हे वीरशैव लिंगायत समाजातील शिष्यांना जाणीव आहे. त्यामुळे श्री १०८ करबसव शिवाचार्याच्या सानिध्यात हजारो भक्तगण त्यांच्या सेवेमध्ये कार्यरत असतात.

### ५.१६ थोरला मठ संस्थान, वसमत

वसुमती या प्राचीन शहरामध्ये वीरशैव लिंगायत समाजाचे तीन मठ आहेत.



त्यामध्ये थोरलामठ, लासिन मठ, अपरंपार स्वामी मठ, अपरंपार स्वामी मठ हे मुदखेडच्या अपरंपार स्वामी मठाची शाखा आहे. तर सिद्धेश्वर मंदिराचे लासिन मठ वसमत मध्येच आहे. त्यामुळे वीरशैव लिंगायत परंपरेचे तीन मठ एकत्र असणारे वसुमती हे क्षेत्र एकमेव आहे. परभणी, नांदेड, विदर्भ या ठिकाणी थोरल्यामठाचे भक्तगण आहेत. थोरलामठ संस्थानाची नांदेड जिल्ह्यामध्ये हदगाव, तामसा, या ठिकाणी शाखा मठे आहेत. उज्जैनी पीठाच्या थोरला मठ हे शाखा मठ आहे. या मठाचे गोत्र नंदी आहे. आंबेगाव, लोण, अर्धापूर, चाभरा, बारसगाव, कंधार, मुदखेड, मुखेड अशा अनेक ठिकाणचे भक्तगण या मठाचे शिष्य आहेत. या मठामध्ये अनेक समाध्या असून मठाची वास्तू भाजलेल्या विटांनी बांधलेली आहे. चिरेबंदी कमान आहे. या मठाच्या मुख्य गाभाऱ्यामध्ये १० पेक्षा जास्त समाध्या आहेत. या मठामध्ये श्री १०८ सांब शिवाचार्य असून त्यांनी वेदांतचार्य दिगांबर शिवाचार्य याला पट्टाभिषेक करुन या थोरल्या मठाच्या पिठासनावर त्यांना बसवले आहे. वीरशैव लिंगायत समाजातील मठपरंपरेला फार प्राचीन वारसा लाभलेला आहे. मठ हे गुरुत्वाचे प्रतीक आहे. धर्मसंस्थेला स्थिरीकरण करणारी संस्था म्हणजे मठ, गुरुला वीरशैव धर्मात अनन्यसाधारण महत्त्व असल्यामुळे जन्मापासून मृत्यूपर्यंत गुरुच्या सानिध्याची, मार्गदर्शनाची, आशीर्वादाची गरज असते. मठ ही वीरशैवाची प्रेरणास्थाने, श्रद्धास्थाने असतात. मठ हे भक्ताचे धार्मिक, नैतिक, सामाजिक, सांस्कृतिक जीवन समृद्ध व विकसित करण्यासाठी प्राचीन काळापासून चालत आलेली ही एक प्रभावी परंपरा आहे. उज्जैनी पिठाची शाखा असल्यामुळे लासिनमठ सारखीच परपंरा या मठाला लाभलेली आहे. इष्टलिंगपूजा, प्रवचन, रक्तदान शिबीरे, आरोग्य शिबीरे, अखंड शिवनाथ सप्ताह, गुरुपौर्णिमा, विद्यार्थ्यांचे संस्कार केंद्र, अशा अनेक कार्यक्रमाची निर्मिती थोरला मठामध्ये घेतली जाते. वेदान्त दिगांबर महाराज यांच्या मार्गदर्शनातून हा मठ अतीउच्च शिखरावर जातांना दिसत आहे.

थोरला मठ संस्थान पंचपीठ उज्जैनी शाखा मठ असल्यामुळे वामदेवाचे मुख असलेले तांबडा मुखाचे रंग असून त्यांची दिशा दक्षिण आहे. दारुक गणाधीश्वर असून आद्य पंचाचार्य मरुळाचार्य असून सत्धर्म सिंहासन नंदी गोत्र आहे. दारक

शाखेचा मठ असून पळस हा दंड आहे. वेद यजुर्वेद असून वस्त्रे तांबडी आहेत. वेदांतचार्य दिगांबर महाराज यांच्या विराजमानाने थोरला मठामध्ये अनेक धार्मिक कार्यक्रमाची रेलचेल मठामध्ये सुरु झाली आहे. थोरला मठामध्ये वेदांतचार्य दिगांबर शिवाचार्य उच्च विद्याविभूषीत असून नांदेड जिल्ह्यातील अनेक ठिकाणी त्यांनी प्रवचनाच्या मार्फत समाज प्रबोधन करण्याचे कार्य ते करत आहेत. वेदांतचार्य यांनी वीरशैव व लिंगायत यामधील फरक अतिशय मार्मिकपणे सांगला आहे. त्यांच्यामध्ये वीरशैव हा प्राचीन समाज असून वीरशैव हे तत्त्ववाचक शब्द असून लिंगायत रुढी वाचक त्यामुळे वीरशैव व लिंगायत हे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे.

**सारांश :**

अध्ययनातून असे निदर्शनास आले आहे की, नांदेड जिल्ह्याचा प्राचीन इतिहास वैभवशाली आहे. आणि तो लोकापर्यंत पोहचविणे खूप मोठे आव्हान होते. महाराष्ट्राच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक वाटचालीमध्ये नांदेड जिल्ह्याचा फार मोठा वाटा आहे. प्राकृतिक रचनेचा त्यात होणाऱ्या बदलांचा मानवी-जीवन, समाज व संस्कृती यावर प्रभाव पडत असतो. प्राचीन इतिहास म्हणजे नांदेड जिल्ह्याच्या सांस्कृतिक जीवनाचा आरंभ या सांस्कृतिक जीवनाची सुरुवात गोदावरी नदीच्या खोऱ्यात व परिसरत झाली आहे. म्हणून गोदावरी नदीला 'दक्षिण गंगा' म्हटले जाते. दक्षिण गंगा नांदेड जिल्ह्यातील सांस्कृतिक जीवनाची जन्मदात्री होय. गोदावरी नदीच्या काठीच नांदेड हे शहर वसलेले आहे. प्राचीन काळी नंदीग्राम म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नंदीच्या स्थापनेपासून हे नावारुपाला आले आहे. नंदी हे शिवाचे वाहन असून वीरशैव लिंगायत समाजाचे आराध्य दैवत म्हणून म्हणून शिवाला पूजले जाते. यावरुन नांदेड जिल्ह्यामध्ये वीरशैव लिंगायत समाजाचे बुहसंख्य लोक जिल्ह्यातील परिसरात वास्तवव्यात होते, हे ह्यावरुन सिद्ध होते. जिल्ह्यावर अध्यात्मिक, कला, विद्या, समाजकारण, राजकारण या क्षेत्रावर प्रभाव पडलेला आहे. इतिहासकाराच्या मते शिव आणि शक्तीच्या पूजनाची सुरुवात मोहजोदाडो संस्कृतीपासून सुरु झालेली दिसून येते. जग हे शक्तिविशिष्ट परशिवापासून उत्पन्न झाले असून ते मिथ्या नाही,



तर सत्य आहे. रेणुकाचार्य म्हणतात की, 'ज्याप्रमाणे पुष्प आणि फल वृक्षापासून भिन्न नाहीत त्याचप्रमाणे शिवापासून उत्पन्न झालेले हे जग शिवापासून भिन्न नाही.' भारतीय समाजात वीरशैव दर्शनाला शक्तिविशिष्टद्वैत असे म्हणतात. यातील परमतत्त्व एकमात्र शिव आहे. शिव हा पूर्व अर्हतारुप आणि पूर्ण स्वातंत्र्यरुप आहे. वीरशैव लिंगायत समाजातील व्यक्ती शिवाची उपासना करत असतो. अनेक ग्रंथातून, चरित्रातून, श्लोकातून शिवाचीच स्तुती केलेली आहे. वीरशैव लिंगायतच्या ह्दयामध्ये शिवशंकर हा कल्याणकारक म्हणूनच विराजमान झालेला आहे. म्हणूनच शिवाची लोकप्रियता वाढत आहे.

नांदेड जिल्ह्यामध्ये वीरशैव लिंगायत बहुसंख्य ग्रामीण भागात विस्तारलेला आहे. प्राकृतिक पर्यावरण, हवामान, ग्रामीण जीवन, समाज व्यवस्था, राहणीमान, आहार, संस्कृती ह्याचा प्रभाव वीरशैव लिंगायत समाजावर पडला आहे. नांदेड जिल्ह्यामध्ये अनेक जाती-धर्माचे लोक राहतात पण त्यांच्या संस्कृतीचा आदर करुन वीरशैव समाजातच आपली संस्कृती जोपासताना दिसत असतात. वीरशैव लिंगायत समाजामध्ये स्त्रियाला पुरुषाच्या बरोबरीचा दर्जा दिला आहे. अनेक धार्मिक कार्यात ते पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून धार्मिक विधीमध्ये सोबत असतात. वीरशैवानी स्त्री-पुरुष भेद झुगारुन दिला आहे. त्यांनी स्त्रियांना धर्माचे दार सन्मानाने उघडले आणि पुरुषाच्या बरोबरीने सर्व कार्यात अधिकार दिले आहे. स्त्रियांच्या कुचंबलेल्या प्रवाहाला त्यांनी वाहते केले आहे. नांदेड जिल्ह्यातील वीरशैव लिंगायत समाजातील समस्या सोडवण्यासाठी अनेक संघटनांची निर्मिती करण्यात आली आहे. त्यामध्ये महाराष्ट्र वीरशैव सभा जिल्हा शाखा नांदेड, शिवा संघटना, बसव ब्रिगेड, महात्मा बसवेश्वर विचारमंच, नंदी फाऊंडेशन अशा अनेक सामाजिक संघटना आहेत. त्याद्वारे समाजातील अनेक प्रश्न सोडवत असतात. महाराष्ट्र वीरशैव शाखेद्वारे अनेक उपक्रम राबवले जातात. त्यामध्ये राजेंद्र हुरणे, अविनाश मारकोळे, प्रभाकर थोन्टे, प्रा. उदगिरे, राजन मिसाळे, जयचंद्र तत्तापुरे, देवराव चिंचोलकर व त्यांचे सहकारी यांनी संघटनेच्या माध्यमातून समाज संघटन करण्याचे कार्य केले आहे. महाराष्ट्र वीरशैव समाजात अनेक कार्य या संघटनेमार्फत पार पाडल्या जातात.

नांदेड जिल्ह्यामध्ये शिवा संघटना, बसव ब्रिगेड, बसवेश्वर विचारमंच यांच्या माध्यमातून महात्मा बसवेश्वरांच्या विचारांची पेरणी करण्याचे कार्य या संघटनेच्या माध्यमातून केले जाते. वीरशैव लिंगायत समाजाचे नांदेड जिल्ह्यातील बसवेश्वर कालीन दरगु घराणे आहे. त्यांच्या काळात 'दासोहकेंद्र प्रमुख' म्हणून शरणसुरय्या यांनी कार्य केले. त्यामुळे त्यांच्या कार्याचा उल्लेख या माध्यमातून करण्यात आलेला आहे. त्याचबरोबर नांदेड जिल्ह्यातील गुरुदरबारची परंपरा व वीरशैव लिंगायत समाजाची परंपरा यांचे साम्य कसे आहे. याचे विवेचन करण्यात आले आहे. नांदेड जिल्ह्याबरोबरच महाराष्ट्रातील अनेक प्राचीन वास्तुचा संग्रह, ऐतिहासिक पुरावे, नाणी यांचा अभ्यास नांदेड जिल्ह्यातील समुद्रगुप्त पाटील यांनी आपल्या ३५ वर्षाच्या संशोधनातून कार्य केले आहे. त्याचे सविस्तर विवेचन त्यांच्या कार्याच्या माध्यमातून सांगण्यात आले आहे. वीरशैव समाजातील सिद्धांतामध्ये सविस्तर विवेचन करण्यात आले आहे. भारतीयांची शिवोपासना ही मुळातच मुर्तीसंबद्ध नाही, ती लिंग संबंध आहे. भारतीय कोणत्याही शिवालयात आपण जर गेलो तर शिवाची मूर्ती नसून त्या ठिकाणी 'शिवलिंग' आहे. वीरशैवाचा भगवान शिव म्हणजेच लिंगस्थाल - इष्टलिंगपूजन हे वीरशैवाचे नित्य कर्म मानले आहे. सामान्यजनांना आत्मलिंगाची कल्पना करता येत नाही. म्हणून इष्टलिंगाद्वारे ती करायची असते. लिंगपूजेतूनच तप, कर्म, जप, ध्यान, या पंचयज्ञांचा लाभ घेता येतो. वर्षभेद विषमता यामुळे अनेक अस्पृश्यांना मंदिर प्रवेशास मनाई होती. अशा परिस्थितीत प्रत्येकाने आपल्या इष्टदेवतेस शरीरावर धारण करण्याचे मंदिर प्रवेशाचा प्रश्नच येणार नाही. साक्षात इष्टलिंग धारण केल्यामुळे शिवाची साक्ष त्याला मिळत असे. इष्टलिंग पूजापद्धतीमुळे शिव व भक्त यांच्यात ऐक्याची भावना निर्माण झाली. सदगुरुकडून दीक्षात मिळालेले इष्टलिंग आपल्या शरीरापासून विलग न करता जो सावधपणे धारण करतो तो वीरशैव होय. 'वीरशैव हा शब्द वीरवृत्तीने शैवमताचा पुरस्कार करणारे असाही होतो.' ते भक्तीच्या पराकाष्टेचे, अतीव उत्कटतेचे द्योतक आहे. इष्टलिंग हे वीरशैव लिंग व अंग यांचे अखंड नाते आहे. वीरशैव वीरवृत्तीचे अखंड केलेले वृत्त म्हणजे वीरशैव होय. भगवान परशिव ब्रम्हा हेच त्यांचे एकमेव उपास्य दैवत आहे. जीव हा



शिवाचा अशंरुप आहे. त्यामुळे वीरशैवांनी नित्यनियमाने इष्टलिंगपूजा करावी. ही इष्टलिंगपूजा पंचाचार्याच्या साक्षीने शिवाचार्याचा अनुग्रह करुन दीक्षा संस्कार करावा. गुरुच्या साक्षीने भक्तीमध्ये विलीन होऊन भक्ताच्या गळयात, हातात, पंढरपूरच्या विठ्ठलाच्या डोक्यावर, लिंग पाहावयास मिळतात. व्यक्तीच्या इष्टलिंगाबद्दल आदर ह्यामधून दिसून येतो.

वीरशैव लिंगायत समाजामध्ये अष्टावरणाला अतिशय महत्त्व आहे. ही आठ आवरणे भक्ताला 'सुरक्षा कवच' म्हणून कार्य करत असते. क्रियाशील, सापेक्ष, लोकमत असलेल्या वीरशैव लिंगायत शील-नीतींना ओळखण्यासाठी अष्टावरणाची निर्मिती झाली. गुरु, लिंग, जंगम, पादोदक, प्रसाद, विभूती, रुद्राक्ष, मंत्र हे वीरशैव लिंगायतांचे बाह्य आणि अंतरिक रुपाचे संकेत बनले आहेत. विश्व सृष्टीला कारणीभूत असलेल्या देवाने सांकेतीक स्वरूप म्हणजेच 'इष्टलिंग' होय. इष्टलिंगामध्ये श्रद्धा निर्माण करुन त्याच्या विषयीचे ज्ञान देणाराच 'गुरु' होय. ती श्रद्धा व ज्ञानाचा प्रसार करणाराच 'जंगम' होय. गुरुचे चरण धुतलेले पाणीच 'पादोदक' आणि गुरुची कृपाच 'प्रसाद' होय. पादोदक ही विचारांचे मिळालेले पाणी होय. पादोदक-प्रसाद हे दोन्ही भाव गुरु भक्तीच्या अन्योन्य संबंधाचे संकेत आहेत. 'विभूती' आणि 'रुद्राक्ष' हे लिंगभक्ताच्या बहिरंगाची चिन्हे आहेत. 'भस्म' हे कपाळावर व 'रुद्राक्ष' गळयात असे समिकरण आहे. परमात्म्याचे स्मरणच 'मंत्र' होय. बाळाच्या जन्म संस्कारापासून मृत्यूपर्यंत गुरु आपल्या शिष्यास वारंवार ईश्वराचे स्मरण करुन देत असतो. दीक्षा संस्कारामध्ये 'नमः शिवाय' अशा पंचाक्षरी मंत्र वदविला जातो. वचनात व्यक्त होणारे शील व तीच्या विवरणाचा मुख्य उद्देश म्हणजे वीरशैव लिंगायत समाजाची शाश्वत निरंतरता व सुरक्षित ठेवणे होय. समाजास आधार देण्यासाठी शील व नीतीने परिपूर्ण लिंगाचार, सदाचार, शिवाचार, गणाचार, भ्रत्याचार असे पाच आचार प्रदान करुन पंचाचाराचा स्वीकार केला जातो. वीरशैव लिंगायत समाजामध्ये पुरुष व महिलांना नीती व शील सारखेच दिले जाते. पारमार्थिक प्रपंचात जशी समानता प्रतिवाहन करण्यात आलेली आहे. तशीच लौकीक जीवनात देखील समानता सांगितली आहे. वीरशैवामध्ये षट्स्थलास महत्त्व दिले असून व्यक्तीच्या देह, इंद्रिये, मन,

बुद्धी आदिचा त्याग करुन राहतो तो भक्त होय. आत्मस्वरुपात लीन होणारा भक्त माहेश्वर, आत्मनंदाने प्रसन्नता मिळविणारा भक्तच प्रसादी, इष्टलिंगाला आपला प्राण समजणारा प्राणलिंग. जेजे दिसे दृष्टीमुळे ते अवघे शिवरुप गाढे अशी मनाची अवस्था होऊन नम्र झालेला भक्त शरणस्थळी म्हटला जातो. शिव व जीव हा द्वैतभाव विसरुन समाधीस्त होणारा भक्त ऐक्यस्थळी होय. अशा अष्टावरण, षट्स्थलामधून, पंचाचाराचा भाव वीरशैव समाजांनी स्वीकारला आहे. वीरशैव समाजाची धार्मिक स्थिती ही शुद्ध विचारसारणीवर अवलंबून कुठेही कर्मकांडाचा त्यामध्ये लवलेश दिसत नाही. शुद्ध आचरण पद्धतीवर नीती व बुद्धीची सामरस्ता यामध्ये आहे. वीरशैवाची अष्टावरणे, पंचाचार, षट्स्थलाबरोबरच संस्कार व्यवस्थाही महत्त्वाची आहे. व्यक्ती जन्माच्या अगोदर अनेक संस्कार केले जातात. या सर्व मार्गाचा अधिकार मिळविण्यासाठी संस्कार व्यवस्था खूप महत्त्वाची आहे. 'दीक्षा संस्कार' मिळविण्याशिवाय वरील मार्गाचा अवलंब व्यक्तीला करता येत नाही. गर्भ आठ महिन्याचा असताना मातेजवळ गर्भाचे लिंग दिले जाते. जन्मानंतर तेच लिंग बालकास लगेच दिले जाते. त्यामध्ये गर्भधान संस्कार, जातकर्म संस्कार, नामकरण संस्कार, दीक्षा संस्कार करुन संस्कार व्यवस्था पार पाडली जाते. कोणत्याही समाजाची उंची व संस्कृतीचे श्रेष्ठपण त्या समाजातील व्यक्तीच्या सदाचरणावरच अवलंबून असते. संस्कृतीची ओळख व्यक्तीच्या किंवा समाजाच्या आचरणातून प्रतिबिंबित होत असते.

वीरशैव समाजामध्ये लग्नविधीला फार महत्त्व आहे. इतर समाजापेक्षा वीरशैवाची लग्न विधी वेगळी आहे. त्यामध्ये गुग्गुळ विधी, महादेवाची गादी, पंचकलश वेगळेपण दिसून येतो. वीरशैव लिंगायत समाजामध्ये इतर समाजाप्रमाणे आंतरपाट नसतो. पंचकलस पूजा करुन पंचकलस म्हणजे वीरशैव लिंगायत समाजाचे पंचाचार्य आहेत. त्यांना साक्षी मानुन विवाह विधी पार पाडला जातो. जंगमाच्या हातान पूजा करुन विवाह विधी पार पाडला जातो. वीरशैव समाजाची शेवटचा संस्कार म्हणजे अंत्येष्टी होय. वीरशैव लिंगायत समाजामध्ये प्रेत जमिनीत पुरण्याची पद्धत आहे. शिवऐक्य झाल्यानंतर वीरशैव लिंगायत समाजामध्ये सुतक पाळले जात नाही. तीन दिवसानंतर



शिवाचे नामस्मरण करुन कार्याची सुरुवात केली जाते. वीरशैव लिंगायत समाजामध्ये कायक व दासोहला अत्यंत महत्त्व आहे. कायक म्हणजे शरीरश्रम, हातकाम, कायक म्हणजे उद्योग कर्तव्य. कायक हा सत्य व हितकारक असला पाहिजे या उद्देशाने कायाचा अर्थ महत्त्व विशद करण्यात आले आहेत. कायक प्रत्येकांनी केलाच पाहिजे. त्याशिवाय व्यक्तीचा विकास होणार नाही. कायकातून जमा झालेला पैसा 'दासोह' साठी वापरुन समाजहित करता आले पाहिजे. कायक केल्यानंतर गरजेहून जास्त जमलेला पैसा समाजाच्या हितासाठी, कल्याणासाठी अर्पण करणे हाच खऱ्या 'दासोह' आहे. दासोह व्यवस्थेमुळे समाजातील विषय मिळकतीचे व संग्रह प्रवृत्तीचे नियंत्रण शक्य झाले. तसेच असमर्थ व्यक्तीच्या पालन पोषणाची लोकावरच येईल. अशा रितीने कायक व दासोहचा योग्य नियोजन केल्यास समाजामध्ये आर्थिक विषमता निर्माण होणार नाही. त्यामधून धार्मिक, अध्यात्मिक, दातृत्वाची भावना व्यक्तीमध्ये निर्माण होईल. वीरशैव लिंगायत समाजातील उत्सव, महोत्सव, शिवरात्र यांचा धार्मिक दृष्टीकोनातून महत्त्व आहे. यात्रा, उत्सव यामधून व्यक्ती एकत्र येतात. एकत्र आल्यामुळे समाजाच्या दृष्टीकोनातून काही नवे नियम तयार होऊ शकतात. अशा अनेक धार्मिक कार्यातून समाजाचा विकास होण्यास मदत होते. रुद्राक्ष, बेल हे शिवाला कसे प्रिय आहेत. त्यामुळे बेलाचे व रुद्राक्षांचे महत्त्व समाविष्ट केले आहेत.

वीरशैव समाजामध्ये महात्मा बसवेश्वर आणि मन्मथ स्वामी यांना अनन्य साधारण महत्त्व आहे. महात्मा बसवेश्वराला वीरशैव लिंगायत समाज समाजाचे श्रद्धास्थान व मार्गदर्शक मानतात. बसवेश्वरांच्या विचारधारेने भारावून गेलेले अनेक तत्वज्ञानी वीरशैव समाजाला लाभले आहे. महात्मा बसवेश्वरांच्या विचारातून स्वातंत्र्य, समता, बंधुता विचाराची रुजवण करण्यात आली. म्हणून ते समता पुरुष म्हणून ओळखले जातात. त्यांचाही प्रभाव वीरशैव लिंगायत समाजावर आहे. त्यामुळे त्यांच्या कार्याचा थोडक्यात परिचय करुन दिला आहे. त्याच बरोबर कपिलधार येथील मन्मथ स्वामी यांचे साहित्य चिरकाल टिकणारे आहे. त्यांच्या साहित्यातून वीरशैव समाजातील लोकांचा संजीवनी मिळाली आहे. त्याचबरोबर दरवर्षी नांदेड जिल्ह्यातील

हजारो वीरशैव भाविक पायी कपिलधारला जातात. त्यामध्ये कोणताही दुजाभाव नसतो. सर्वजण पायी असल्यामुळे श्रेष्ठ-कनिष्ठ भेदभाव राहत नाही. पदयात्रेला सर्व धर्माचे लोक मोठ्या श्रद्धेच्या भावाने या पदयात्रेमध्ये सहभागी होतात. मन्मथस्वामीनी ४५० वर्षापूर्वी रचलेल्या परमरहस्यात 'वीरशैव' हे नाव स्पष्टपणे ग्रंथात अनेक ठिकाणी नोंदवले आहे. लिंगायत नाम स्वतंत्र नसून वीरशैव पर्याय वाचक नाव आहे. वीरशैव हा मुळ शब्द असून लिंगायत हा रुढीने आलेला शब्द आहे. त्यामुळे वीरशैव व लिंगायत एकच आहेत. मन्मथ स्वामींनी वीरशैव समाजाला आपल्या ग्रंथातून तत्वज्ञान सांगितले त्याचा उल्लेख करणे गरजेचे होते. त्यामुळे महात्मा बसवेश्वर व मन्मथस्वामी यांचा थोडक्यात परिचय करुन दिला आहे.

वीरशैवाचे श्रद्धास्थान असलेले कपिलधार असलेल्या काही तीर्थक्षेत्रांच्या माध्यमातून सांस्कृतिक दृष्टीकोनातून जनजीवनाच्या विविधतेमधील एकतेचे दर्शने हे तीर्थक्षेत्रातून घडत असते. कपिलधार येथे मन्मथस्वामीची संजीवन समाधी आहे. त्यामुळे शिवमंदिरे वीरशैवाची महत्त्वाची तीर्थक्षेत्रे आहेत. वीरशैव समाजाचे आर्थिक जीवन हे महात्मा बसवेश्वरांच्या 'कायक वै कैलास' या तत्त्वानुसार आर्थिक जीवन विकसित झालेले पाहावयास मिळते. वीरशैव समाज 'कायक वै कैलास' माणूस कर्माला महत्त्व देवून कार्यशील असल्यास मग्न असतो. त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील वीरशैव समाजाचा मुख्य व्यवसाय शेतीच असून व्यापार, उद्योग, नोकरी क्षेत्रात आपले वर्चस्व निर्माण करत आहेत. त्यामध्ये श्री गणपतराव मोरगे यांनी नांदेड जिल्ह्यामध्ये 'शारदा कन्स्ट्रक्शनच्या' मार्फत नांदेड जिल्ह्यातील अनेक बंधाऱ्याची निर्मिती केली आहे. ह्या बंधाऱ्यामधून हजारो एकर जमिन पाण्याखाली आली आहे. त्यामध्ये बळेगाव बंधारा, आमदुरा बंधारा, गोदावरी नदीवर सुशोभिकरण असे अनेक कार्य करुन त्यांनी नांदेड जिल्ह्याचा विकास करण्यासाठी मोलाचा वाटा त्यांचा आहे. नांदेडमधील यात्री निवास, बोंढार येथील जल शुद्धीकरण केंद्र, नांदेडचे विमानतळ, भक्ती लॉंस, असे अनेक कार्य नांदेडमध्ये त्यांनी सुरु करुन उच्च प्रतिचे कामे केले आहेत. त्याचबरोबर 'बसवेश्वर लॅंड डेव्हलपर्सच्या' माध्यमातून अनिल शेटकार यांनी अनेक गरीबाचे घराचे स्वप्न साकार केले आहे. 'कायक वै



कैलास' या तत्त्वाचा पुरस्कार करणारे व बसवेश्वरांच्या विचारधारेवर विश्वास ठेवणारा अनिल शेटकार यांनी नांदेडमध्ये अनेक नगरांची निर्मिती केली आहे. श्री राजेंद्र हुरणे यांनी व्यवसायाबरोबर अनेक सामाजिक संघटनांच्या मार्फत वीरशैव सभा असो की सामाजिक उपक्रम असोत सदैव ते सहभागी असतात. नांदेड जिल्ह्यातील हे वीरशैव रत्न प्रा. चौगुले हे सर्वजण समाजातील व्यक्तींना कार्याप्रती प्रेरणा देतात. वीरशैव लिंगायत समाजाचे व्यक्तींनी त्यांच्या कार्यातून सिद्ध करुन दिले आहे. असे शुन्यातून विश्व निर्माण करणाऱ्या व्यक्तीची मुलाखतीद्वारे त्यांच्या कार्याची समाजाला ओळख व्हावी आणि यामधून त्यांची प्रेरणा घेऊन त्यांच्या सारखे कार्य करण्याची जिद्द त्यांच्यामध्ये निर्माण व्हावी यातून नांदेड जिल्ह्यातील वीरशैव लिंगायत समाजातील व्यक्ती परिचय देण्यात आला आहे. वीरशैव समाजाचे राजकीय जीवन पाहिले तर संशोधनातून सिद्ध झाले आहे की, नांदेड जिल्ह्यामध्ये वीरशैव समाजाचा राजकीय वारसा खुप कमी प्रमाणात आहे. नांदेड जिल्ह्यामध्ये काही सेवाभावी संघटनेच्या अंदाजानुसार वीरशैव लिंगायत समाजाची लोकसंख्या ८,७६,३१२ च्या आसपास आहे. लोकसंख्येचा विचार केल्यास राजकीय वारसा म्हणावा तसा मिळालेला नाही. नांदेड जिल्ह्यामध्ये माजी आमदार ॲड. गंगाधर पटने, ॲड. ईश्वरराव भोसीकर सोडले तर आतापर्यंत नांदेडचा आमदार आज तरी कोणी झाले नाही. माजी नगराध्यक्ष विश्वनाथ पाटील बन्नाळीकर व सुनिल शेटे सोडले तर नगराध्यक्ष पदावरही कोणी नाही. फक्त नांदेड जिल्ह्यातील जि.प. सदस्यामध्ये माधवराव मिसाळे, संजय बेळगे, बबनराव बारसे, अनुराधाबाई पाटील सध्या वीरशैव लिंगायत समाजाचे प्रतिनिधीत्व करत आहेत. यावरुन हेच सिद्ध होते की नांदेड जिल्ह्यामध्ये राजकीय वारसा म्हणावा तेवढा नाही. वीरशैव लिंगायत समाजामध्ये अनुभव मंटपाला राजकीय कणा म्हणून समाजानी मान्यता दिलेली आहे. त्यामुळे अनुभव मंटपाच्या शिकवणीनुसार प्रतिनिधी कार्य करत असतात. अनुभव मंटपाची विचारसरणी ही समतेची आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता या विचारसारणीवर त्याची राजकिय व्यवस्था चालत असते. अनुभव मंटपामध्ये प्रत्येक व्यक्तीच्या अनुभवाचा विचार मंटपामध्ये केला जातो. व्यक्तीच्या रोज उद्भवणाऱ्या समस्यांच्या वैचारिक देवाण घेवाणीसाठी, नितिमूल्यांच्या

जपणुकीसाठी अनुभवी तज्ज्ञ विद्वानाच्या मार्गदर्शनाखाली 'अनुभव मंटप' अशी लोकहिताच्या दृष्टीकोणातून 'लोकसंसद' त्यांनी निर्माण केली होती. ती वीरशैव लिंगायत समाजाच नाही तर लोकहिताचा विचार करुन निर्माण केली होती. नांदेड शहराला प्राचीनतेचा वारसा लाभलेला आहे. ह्या वारसामध्ये वीरशैव लिंगायत समाजातील अनेक मठांनी भर घातलेली आहे. मठ वीरशैव समाजाची सांस्कृतिक मूल्य जोपासणारी केंद्रे आहेत. वीरशैव समाजाला धर्मिक तत्त्वाचे मार्गदर्शन करण्याचे काम हे मठामधून केल्या जाते. समाजाच्या धार्मिक प्रसारासाठी व लोकांच्या सहमतीने जगद्‌गुरु धार्मिक प्रसारासाठी मठाची स्थापना करतात. मठाची स्थापना जगद्‌गुरुच्या पट्टाभिषेकांनी शिवाचार्याची नेमणूक केली जाते. तेव्हा पासून गुरु हा शिवाचार्य म्हणून संबोधल्या जातो. नांदेड जिल्ह्यातील अनेक मठ आहेत त्यांना प्राचीन परंपरा लाभलेली आहे. वीरशैव समाजामध्ये पंचाचार्य व जगद्‌गुरु यांना खुप महत्त्व आहे. जिल्ह्यामधील अनेक मठ हे पंचपीठाचे शाखा मठ आहेत. त्यांचा गोत्र त्या पंचपीठाशी असतो. त्यावरुन वीरशैव लिंगायत समाजाच्या गोत्राची ओळख होत असते. पंचपीठातील जगद्‌गुरुचा प्रभाव वीरशैव समाजावर पडला आहे. त्यामुळे त्यांचा गुरुचा परिचय थोडक्यात करुन दिला आहे. त्याचबरोबर विरक्त मठाची माहिती दिली आहे. नांदेड जिल्ह्यामध्ये शिराढोण येथील शिवाचार्य भीमाशंकर लिंग हे इ.स. २००० नंतर कुबेर पीठाचे जगद्‌गुरु झाले आहेत. त्याचा प्रभाव नांदेड जिल्ह्यातील भक्तगणावर पडलेला आहे. त्यामुळे त्यांचा थोडक्यात परिचय करुन दिला आहे. त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील अनेक मठ हे वीरशैव लिंगायत समाजातील धार्मिक संस्कार केंद्र, न्यायनिवाडा, आद्य शैक्षणिक केंद्र मठामध्ये जनजागृती करण्याचे कार्य शिवाचार्य करत असतात. मठाचा विकास करण्याच्या दृष्टीकोनातून अनेक दानशूर व्यक्ती मठाच्या विकासासाठी पुढे येवून दान देतात. नांदेड जिल्ह्यामध्ये मठाची परंपरा आहे. त्यामध्ये कंधारचा उर्लिंगदेवचा मठ आहे. त्याचबरोबर शिराढोण येथील भीमाशंकर मठसंस्थान यांचा उल्लेख करण्यात आला आहे. नांदेड जिल्ह्यातील बेटमोगरा या मठाला धर्मसंहिष्णुतेचा वारसा लाभलेला आहे. या मठाचे नावच शिवलिंग बादशहा' आहे. त्यामुळे त्या मठाच्या नावावरुनच आपल्याला सर्वधर्म समभावाची



ओळख होते. मठामध्ये मुस्लिम सणा बरोबरच हिंदूचे सण सुद्धा या मठामध्ये एकत्रच साजरे केले जातात. हे विशेष या मठामध्ये अनेक प्राचीन, ऐतिहासिक कागदपत्राचे असून औरंगजेबांनी या मठाला 'बादशहा' ही पदवी दिलेली आहे. असे येथील श्री १०८ विद्यमान शिवाचार्य सिद्धदयाळ यांनी सांगितले आहे. नांदेड जिल्ह्यातील मुखेड, कासराळी, तमलूर, हणेगाव, मुदखेड, नागठाणा या मठाबरोबरच परिक्षेत्राबाहेरील अहमदपूर, वसमत, पूर्णा या मठाची ही माहिती घेण्यात आली आहे. जरी ही मठे नांदेड जिल्ह्यात जरी येत नसली तरी त्यांचे भक्तगण नांदेड जिल्ह्यातील आहेत. त्यामुळे ह्या मठाची माहिती संशोधकांनी घेतली आहे. येथील शिवाचार्य नांदेड जिल्ह्यातील अनेक कार्यक्रमातून समाजाचे प्रबोधन करतात. त्यामुळे त्यांच्या कार्याचाही उल्लेख प्रस्तुत प्रकरणात करण्यात आलेले आहे.

अशा प्रकारे वीरशैव समाजाचे सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय व मठपरंपरेचा संशोधन पूर्ण रितीने मूल्यमापन करून आलेल्या निष्कर्षाची मांडणी खाली केलेली असून काही शिफारशी केल्या आहेत. व त्याचबरोबर आलेल्या गृहीतकृत्याची पडताळणी करण्यात आलेली आहे.

**वीरशैव लिंगायत समाजासाठी शिफारशी :**

१) वीरशैव समाजामध्ये एकमेकाबद्दल द्वेशाची भावना कमी व्हावी. २) वीरशैव व लिंगायत एकच असून त्यासाठी एकमेकांत संघर्ष निर्माण होऊ नये. ३) वीरशैव समाजातील काही लोकांच्या व्यसनातून वाईट कार्य करतात. ते करू नये. ४) महात्मा बसवेश्वरांच्या विचारांची गरज आहे पण त्याकडे दुर्लक्ष करत असतात. ५) वेगवेगळ्या संघटना आपआपल्या विचाराने वागतात. समाज कार्यासाठी एकत्र येत नाहीत. ६) वीरशैव लिंगायत समाजाने अष्टावरण, पंचाचार, षट्स्थलाचे नित्य नियमाने आचरण करावे. ७) वीरशैव तत्त्वज्ञानाचे पालन करावे. ८) वीरशैव लिंगायत समाजाच्या विद्यार्थ्यानसाठी पुण्याच्या धर्तीवर नांदेडमध्ये वसतिगृह सुरु करावे. ९) वीरशैव लिंगायत समाजाच्या मागण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन कार्य करावे. १०) मठातील शिवाचार्याचा आदर करुन धार्मिक संस्कार स्विकारावेत.

❒❒❒

# -: संदर्भ सूची :-


१) अहमदपुरकर शिवलिंग शिवाचार्य, 'संत शिरोमणी मन्मथस्वामीचे रत्नत्रय, गुरुगीता : स्वयप्रकाश : अनुभवानंद, संस्कृती प्रकाशन वीरमठ संस्थान राजूर (अहमदपूर) १९७३.

२) अहमदपूरकर राष्ट्रसंत शिवलिंग शिवाचार्य, 'सार्थपरमरहस्य', श्री संस्कृती प्रकाशन अहमपूर, २००४.

३) अभ्यंकर अपर्णा, 'भारतीय संप्रदाय', आदित्य प्रतिष्ठान, पुणे, १९२३.

४) अभ्यंकर शंकर वासुदेव, भक्तिकोश भारतीय संप्रदाय, अदित्य प्रतिष्ठान पुणे, २००१.

५) अनवाणे भाऊ, वीर अरक्षक (साप्ताहिक) संपादकिय, २७ जुलै १९८१, नागपूर.

६) आंबटवार वृषाली, शोधनिबंध भारतीय इतिहास अनुसंधान परिसंवाद, स्वा.सै. सूर्यभान पवार महाविद्यालय, पूर्णा.

७) ईश्वरन हिरेमल्लुर, अनुवाद, बिरादार स्वरुपा, 'लिंगायत धर्म संस्कृती व समाज', सुविचार प्रकाशन, माला उस्तुरी, २००९.

८) उदे उमाकांत हरी, 'वीरशैव लिंगायत समाज', ६०३, अ. ब्राम्हण गल्ली भिंगार, लेख.

९) करडीगुदी राजशेखर, 'लिंगायत तत्त्वज्ञान व आचरण', महाराष्ट्र बसवपरिषद, भालकी, बिदर, २०१३.

१०) कवडे शिरीष शांतराम, 'दीक्षा रहस्य', श्री वामनराज प्रकाशन, पुणे.

११) कल्लावार अभय, 'दक्षिणेचा प्रबुद्ध', संकेत प्रकाशन नागपूर, २०१६.

१२) कपाळे चंद्रशेखर, 'वीरशैव संत साहित्य अभ्यास ग्रंथ', वीरशैव साहित्य मंडळ, सोलापूर, १९९२.

१३) काशी जगद्‌गुरु चंद्रशेखन शिवाचार्य, 'सिद्धांत सिखामणी' शैवभारती प्रतिष्ठान जंगमवाडी, वाराणसी, १९९१.





१४) काशी जगद्‌गुरु चंद्रशेखर शिवाचार्य, 'सिद्धांतशिखामणी, परिच्छेद -१५, ८, शैवभापती प्रतिष्ठान, वीरशैव साहित्य मंडळ, सोलापूर, १९९०.

१५) काशी जगद्‌गुरु चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी, सिद्धांत सिखामणी, अध्याय १६-५९, शैवभारती शोध प्रतिष्ठान, जंगमवाडी, वाराणसी, १९९४.

१६) कारंजकर प्रविण, 'संत मन्मथस्वामी आणि संत तुकाराम 'तौलनिक अभ्यास, लाखे प्रकाशन.

१७) कामत अशोक, बसवेश्वर रचिला पाया, बसवसेट, सोलापूर, २००१.

१८) कामत अ.प्र. आणि पासरकर शे.द., 'वीरशैव संत साहित्य, अभ्यास ग्रंथ, वीरशैव साहित्य संशोधन मंडळ, सोलापूर, १९९२.

१९) कुमार पोळ कक्कय्या, अनुवादिका दोडमनी शालिनी श्रीशैल, 'चातुर्वर्ण धर्म दर्शन', महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान भालकी, बिदर, २०१३.

२०) कुलकर्णी एम., 'असे छंद असे छिंदष्ट !'

२१) कुलकर्णी पी.के., 'भारतीय धर्म' विद्याभारती प्रकाशन, लातूर, १९९८.

२२) खोले प्रभाकर, दै. सकाळ लेख दि. २१ ऑक्टोबर १९८९, पुणे, पृ. ०१, संपा. पंड्या गौरीशंकर, 'भारतीय संस्कृती का विश्वव्यापी प्रभाव', शारदा प्रकाशन.

२३) गायधनी र.ना., 'प्राचीन भारताच इतिहास', अनिरुद्ध पब्लिशिंग हाऊस, पुणे, २००९.

२४) गुगल सर्च, 'वेबदुनिया', संस्काराचे महत्त्व, इंदूर लेख.

२५) गुंडे धनंजय, दै. पुढारी, 'शाकाहार नैतिकतेचा आधार', लेख ६, एप्रिल १९८६.

२६) गंधे कांचनगंगा, 'मराठी विश्वकोष संकलन', जोगळेकर कुलकर्णी भाग्यश्री, बेलाचे धार्मिक महत्त्व, लेख.

२७) ग्रंथालय मित्र स्मरणिका, ५० व महाराष्ट्र राज्य ग्रंथालय सम्मेलन, नांदेड, २०१६.

२८)	घुगरे सूर्यकांत, 'वीरशैव व इतर धर्म आणि समाज', साधना बुक स्टॉल गडहिंग्लंज, कोल्हापूर, २०००.

२९)	घुगरे सूर्यकांत, 'वीरशैव दर्शन', वीरशैव धर्माची इष्टलिंग उपासना : संकल्पना स्वरुप आणि महत्त्व लेखन, २ जुलै १९९२.

३०)	चक्रवर्ती आर. (संपा) शक्ति-विशिष्टाद्वैत, जगन्नाथ करंजे, भारतीय दर्शन.

३१)	चंदापुरे शिवदास, सिद्धेश्वराचा वरदहस्त लाभलेला गाव नागठाणा लेख.

३२)	चिदानंदमूर्ती एम. (अनु.) हुणे रविंद्र, 'श्री बसवेश्वर नॅशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडिया', नवी दिल्ली, १९९१.

३३)	जवरेगौडा दे. (अनु.) मडकी शशिकला, महात्मा बसवेश्वर-डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महाराष्ट्र बसव परिषद, भालकी, बिदर, २००७.

३४)	जयशेट्टी भालचंद्र, (संपा) वचन, कर्नाटक साहित्य अकादमी, बेंगलोर, १९९८.

३५)	जोशी गजानन नारायण, भारतीय तत्त्वज्ञानाचा बृहद् इतिहास, शंकरोत्तर वेदान्त व शैवदर्शन खंड - ५, शुभदा सारस्वत प्रकाशन, पुणे, १९९४.

३६)	जोशी दाता, नांदेड आयकॉन, दै. लोकमत प्रकाशन, नांदेड, २०१६.

३७)	जुबरे राजू ब., 'शरण जीवनदर्शन', महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान भालकी, बिदर, २०१४.

३८)	जुबरे राजु ब., 'लिंगायत धर्मचिंतन', महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान, भालकी, बिदर, २०१४.

३९)	ठडका श्रीधर व्यंकटेश, 'महाराष्ट्रीय ज्ञानकोश', यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, खंड-२०.

४०)	ढगे एस.के., हासे सी.पी., 'संशोधन पद्धती', के.एस. पब्लिकेशन, पुणे, २०११.

४१)	तिवारी भगवानदास, 'जगत् ज्योति महात्मा बसवेश्वर' बसव सेंटर प्रकाशन, सोलापूर, १९९९.



४२)	तोडारे राम, 'वीर आरक्षक' मराठी लेख, वीरशैव संत वाङ्मयातील बसवदर्शन', १२ जुलै १९८२.

४३)	थोटे श्विनाथ (निर्देशित) 'आलोचना' (मराठी) लेख मंचरकर र.वा. ग्रंथ समिक्षणात्मक लेख जून-जुलै, मुंबई, १९९०.

४४)	दरगु मोदी शशिकांत, 'शरण सुरय्या', सिद्धी पब्लिकेशन हाऊस, नांदेड, २०१७.

४५)	दरगु शशिकांत, लघु शोध निंबध, 'शैवागम', नागपूर विद्यापीठ, २०११.

४६)	दर्गा रमजान, 'बसवप्रज्ञा', महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान भालकी, बिदर, २०१३.

४७)	देवनुर के.स., 'श्री क्षेत्र उळवी महात्म्य', वचन, १४.

४८)	देव शांताराम भालचंद्र, 'पुरातन विद्या'.

४९)	देशमुख सुधाकर, 'वीरशैव तत्वज्ञान', जनशक्ती वाचक चळवळ, औरंगाबाद, २०१६.

५०)	देशमुख किरण, 'असाही मराठवाडा', निर्मल प्रकाशन, नांदेड, २०१२.

५१)	दंडे जयश्री, जगजपी सुषमा, बसवेश्वरांचे आर्थिक चिंतन, जगत् ज्योति महात्मा बसवेश्वर जयंती, स्मरणिका, २०१५.

५२)	धारणकर सरल, 'इतिहासाचा अभ्यास आणि संशोधन', बिना प्रकाशन नाशिक.

५३)	धोंडगे केशव, 'शुर मन्याडखोरी कंधारचे युगपुरुष महात्मा उर्लिंग पेदी मोफत एज्युकेशन सोसायटी कंधार', २०१४.

५४)	नालवार जगदीशशास्त्री (संपा), श्री चण्णबसव विजय' (मराठी / संस्कृत).

५५)	'निलकरिण शरण, स्मरण, ग्रंथ दासोही', परिचय गंगाधर पटणे, महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्था, भालकी, बिदर.

५६)	पट्टदेवरु बसवलिंग, अष्टावरणातील विभुती, रुद्राक्ष, मंत्र, महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान, भालकी, बिदर.

५७) पट्टदेवरु बसवलिंग, 'अष्टावरणातील गुरु', २०१२, महाराष्ट्र बसव परिषद, २०१२.

५८) पट्टदेवरु बसवलिंग, 'षट्स्थल दर्शन', महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान भालकी, बिदार, २०१३.

५९) पट्टदेवरु बसवलिंग, 'धर्मगुरु बसवण्णा आणि अष्टावरण', महाराष्ट्र बसव परिषद हिरेमठ संस्था, भालकी, बिदर, २०१४.

६०) परांजपे ताराबाई, 'सिमा प्रदेशातील भावगंगा', हैद्राबाद, १९८५.

६१) पसारकर शे.दे., जगद्गुरु पलिसिद्ध, सुविद्या प्रकाशन, २००८.

६२) पाटील भिमराव ब्रह्माजीराव, महात्मा बसवण्णाचे कायक व दासोह सिद्धांत', शरण साहित्यमंडळ, लातूर, २०१०.

६३) पाटील भिमराव, महात्मा बसवण्णा, चरित्र त्यांची तत्त्वे आणि समाज, शरण साहित्य मंडळ, लातूर, २०१४.

६४) पाटील भीमराव, संशोधनात्मक शोधनिबंध, 'शरण संस्कृतीचा मराठी भू प्रदेशावरील प्रभाव, शरण साहित्य मंडळ, लातूर, २०१४.

६५) पोळकुमार कक्कय्या, अनुवादिका दोडमनी शालिनी श्रीशैल, 'चातुर्वर्ण धर्म दर्शन', महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान भालकी, बिदर, २०१३.

६६) पंडित दिवेदी, व्रजवल्लभ, 'चंद्रज्ञानम', १०-३३-३४, शैवभारती शोध प्रतिष्ठान जंगमवाडी, वाराणसी, १९९४.

६७) पंडित मल्लिकार्जून शास्त्री (संपा) 'पारमेश्वरागम' (मराठी / संस्कृत) पटल - ८.

६८) पं. शास्त्री मलिकार्जून (संपा). 'क्रियासार' अध्याय-१६, वारद ग्रंथमाला, सोलापूर, १९१०.

६९) पंडित मुसलगावकर गजाननशास्त्री, 'अनुभवसुत्र', अध्याय ६-४५, शैवभारती शोधप्रतिष्ठान, जंगमवाडी मठ, वाराणसी, १९९८.

७०) बिच्चेवार सचितानंद, 'परिवर्तनाचा महामेरु महात्मा बसवेश्वर', स्वाती प्रकाशन, पूर्णा, २०१५.



७१) भटाचार्य हरिदास (संपा), 'द कल्चरल हेरिटेज ऑफ इंडिया'.

७२) भुसनुरमठ, आर.सी. (संपा), 'बसवदर्शन' बसव समिती, बेंगलोर, १९९४.

७३) मंचरकर र.बा. (संपा), वीरशैव संप्रदाय, कल्याणकर गौरवग्रंथ, श्रीरामपूर १९८९.

७४) मठवाले ई.आर. 'समाज भूषण सद्गुरु स्मरणिका' लेख.

७५) माते महादेवी, ज्ञानप्रसाद लेख, 'वीरशैव धर्म संस्कार', मार्च १९८१.

७६) मानखेडकर स्वामी, शिवा, 'ज्ञानप्रसार' लेख, जाने. १९८९.

७७) मानुरकर शिवचंद्र, श्रीशंकर मुगेद्रस्वामी.

७८) मिरजकर शांताराम, वीर आरक्षण लेख, 'मानवी स्वातंत्र्याचे दीक्षा गुरु महात्मा बसवेश्वर, ३० ऑगस्ट, १९८२.

७९) मेनकुदळे अशोक, 'क्रांतीकारी युगप्रवर्तक महात्मा बसवेश्वर', महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान भालकी, २०००.

८०) मेनकुदळे महालिंग शंकर, 'भोलेनाथ वरदान', शैवभारती-शोधप्रतिष्ठानम्, सातारा, २००९.

८१) मोगलेवार सुधाकर, 'वीर आरक्षक' लेख १ डिसेंबर १९८०, नागपूर.

८२) मोरवंचीकर रा.श्री., 'सातवाहनकालीन महाराष्ट्र', प्रतिमा प्रकाशन, २००९.

८३) मोरवंचीकर रा.श्री., 'दक्षिण काशी पैठण', रविराज प्रकाशन, पुणे.

८४) राजन अभिताभ, 'स्थानिक इतिहास आणि साहित्य : एक शोध नांदेड', महाराष्ट्र राज्य रौप्य महोत्सवी वर्ष १९८५-८६, संदर्भ ग्रंथ समिती, नांदेड.

८५) रोडे सोमनाथ, 'सामाजिक क्रांतीचे जनक महात्मा बसवेश्वर', विद्याभारती प्रकाशन, लातूर, २०११.

८६) लालकृष्ण बलदवा, 'प्राच्य सिद्धांत अर्थात भारतीय संस्कृतीचा शोध, विद्याभारती प्रकाशन, लातूर, १९९४.

८७) लिंगाडे सोमण्णा, ज्ञानप्रसादलेख, 'वीरशैव धर्माचे प्रमुख संस्कार', जुन, १९८६.

८८)	वर्मा प्रसाद विश्वनाथ, 'भारतीय दर्शन', ज्ञानदा प्रकाशन, नई दिल्ली, २०१६.

८९)	वर्मा विश्वनाथ प्रसाद, 'भारतीय दर्शन' ज्ञानदा प्रकाशन, नई दिल्ली, २०१६.

९०)	शास्त्री पंडित काशीनाथ, 'वीरशैवरत्न' (मराठी).

९१)	शास्त्री मलिकार्जून, 'सिद्धांत-सिखामणी', मनूर मठाध्यक्ष, वीरशैव.

९२)	शास्त्री महादेव, प्राचीन भारतीय स्थल कोश खंड - १; पुणे, १९६९.

९३)	शेडे प्रमोद, महात्मा बसवेश्वर - आद्य भारतीय समाजसुधारक', लेख दि. १८.०७.२०१५.

९४)	'सनातन मिर्मित ग्रंथ', शिव, शिवाला बेल वाहण्यामागील शास्त्रलेख.

९५)	साखरे विजया, ऐतिहासिक पर्यटन, अक्षरलेण प्रकाशन सोलापूर, २०१२.

९६)	सार्दल शंकर धोडो (संपा), 'लिलाविश्वंभर' (मराठी).

९७)	संपादक, अदिमठाध्यक्ष धारेश्वर महाराज, 'बृहत शिवार्चन पद्धती', श्री १०८ नीलकंठ शिवाचार्य सदगुरु प्रकाशन, धारेश्वर, सातारा, २०१३.

९८)	सोलापुरे अमरनाथ, 'बसव पुराण', शैवभारती भवन जंगमवाडीमठ, वाराणसी, १९५२.

९९)	हुसेन एस.अबीद, अनुवाद केजकर देशपांडे प्रकाश, 'भारताची राष्ट्रीय संस्कृती', नॅशनल  बुक ट्रस्ट, इंडिया, नवी दिल्ली, १९९२.

**गौरवग्रंथ / विशेषांक / स्मरणिका**

१)	मराठवाडा विशेषांक, उद्यमशील वीरशैव लिंगायत विशेषांक, १९९८.

२)	महात्मा बसवेश्वर जयंती स्मरणिका

३)	मंचरकर र.बा., वीरशैव संप्रदाय कल्याणकर गौरव ग्रंथ समिती, श्रीरामपूर.

४)	वीरशैव धर्माचे भारतीय संस्कृतीला योगदान स्मरणिका

५)	शेटकार अनिल, 'वाटचाल', सुवर्ण महोत्सव गौरव ग्रंथ.

६)	हुरणे राजेंद्र, 'बहुआयामी गौरवग्रंथ'.